मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय अधिक पौष–माघ फाल्गुन शके १९४५

जानेवारी–फेब्रुवारी–मार्च २०२४/खंड ४७, अंक ४

# ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल अॅड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

(यु.जी.सी. केअर लिस्ट (ग्रुप१) समावेशीत तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२४ / खंड ४७ / अंक ४

**प्रमुख संपादक**
**राहुल शं. म्होपरे**
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
**चंद्रकांत जाधव**
(य.च.वारणा महाविद्यालय, वारणानगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०२२-२५)**
**संतोष दास्ताने**
**मुक्ता जहागिरदार**
**के. के. पाटील**
**एस. एम. भोसले**

**संपादकीय पत्रव्यवहार**
**राहुल शं. म्होपरे**
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२,
प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,
दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे,
उजळाईवाडी, ता. करवीर,
जि. कोल्हापूर - ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अ नु क्र म णि का

१. राहुल शंकरराव म्होपरे
संपादकीय ........ २२९
२. दिलीप अर्जुने
भारतातील दारिद्र्यनिर्मूलनासाठी शेतीउत्पन्न वाढीची आवश्यकता ..... २३१
३. नरेश बोडखे, योगेश पायलीमोडे
महाराष्ट्रातील प्रादेशिक विकासाचा असमतोल आणि
वैधानिक विकास मंडळाची प्रासंगिकता ........ २४५
४. सोनवणे (बच्छाव) आशालता देवराम
सूक्ष्मवित्त - शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये गाठण्याचा मार्ग ......... २६४
५. हरी पंढरी वंगरवार
भारतातील उच्च शिक्षणाची वाढ आणि लैंगिक असमानता
प्रत्यावर्तनाचा विश्लेषणात्मक अभ्यास ........ २७२
६. मारोती विरभद्र तेगमपुरे, संभाजी शिवाजी सावंत
कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया व्यवसायाचा आर्थिक अभ्यास ...... २८२
७. प्रकाश कांबळे
शाश्वत आणि समावेशक विकास अनुकूल महाराष्ट्र
अंदाजपत्रक २०२४-२५ ........ २९३
८. मानसी कृतकोटी, मिनल भोसले
कळसुबाई हरिश्चंद्रगड वन्यजीव विभागात येणाऱ्या अतिदुर्गम
भागातील आदिवासी महिला बचतगटांच्या माध्यमातून
महिला सक्षमीकरणाचा अभ्यास ........ ३००
९. गणेश आदिनाथ टेकळे
जागतिक आनंद निर्देशांकाचा सैद्धांतिक अभ्यास आणि
भारताची दशा व दिशा ........ ३०९
- मराठी अर्थशास्त्र परिषद
४५ वे वार्षिक अधिवेशन : २०२२-२३ कार्यवाहांचा अहवाल .. ३१७
- संदर्भ सूची
अ) लेख सूची ........ ३२२
ब) लेखक सूची ........ ३२४
क) नवीन आजीव सभासदांची यादी ........ ३२६
ड) तज्ज्ञ परीक्षक सूची ........ ३३०

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यकारी मंडळ २०२३-२४

- **अध्यक्ष**

  **दिलीप अर्जुने (जालना)**

- **कार्याध्यक्ष**

  **अविनाश रा. निकम (शहादा)**

- **कार्यवाह खजिनदार**

  **मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

  **राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

  **अजय दरेकर (बारामती)**
  **विकास सुकाळे (नांदेड)**
  **विठ्ठल घीणमीने (हिंगणघाट)**

- **सदस्य**

  **सुरेश ढाके (भुसावळ)**
  **जितेंद्र तलवारे (धुळे)**
  **राजाराम पाटील (सोलापूर)**
  **दयाळू राठोड (अकोला)**
  **मनीषकुमार कायरकर (बल्लारपूर)**
  **संजय धनवटे (कारंजा)**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **सुरेश घुमटकर (बीड)**
  **जयवंत इंगळे (हुपरी)**
  **बाळासाहेब पाटील (पनवेल)**
  **सुभाष सावंत (नाशिक)**

- **स्वीकृत सदस्य**

  **जनार्दन काकडे (चंद्रपूर)**
  **अनिल वावरे (सातारा)**

- **स्थानिक कार्यवाह**

  **विशाल पावसे (सासवड)**



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना.
पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७


**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य | : रु. ३०००/- (एकरकमी) |
| इमारत निधी | : रु. २०००/- |
| सदस्य सूची | : रु. १००/- |
| एकूण | : रु. ५१००/- |

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

| | |
|---|---|
| शैक्षणिक संस्था<br>व्यावसायिक संस्था<br>ग्रंथालये | रु.२०००/-(त्रैवार्षिक)<br>रु.३०००/-(पंचवार्षिक) |

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.


**'अर्थसंवाद'साठी अनुदानाबद्दल आभार:**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.


हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# संपादकीय

आपणा सर्वांनाच हे माहित आहे की, बदल हा निसर्गनियम आहे. याला अनुसरूनच आपल्या अर्थव्यवस्थेतसुद्धा सातत्याने बदलाची प्रक्रिया सुरू असते. राष्ट्रीय व जागतिक अर्थव्यवस्थेत सातत्याने उलथापालथ होत असते. अर्थात, कोणत्याही जिवंत अर्थव्यवस्थेचे हे एक प्रमुख लक्षण आहे. अर्थव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या विविध प्रश्नांवर उपाय सुचविणे, त्यावर भाष्य करणे, अर्थव्यवस्थेतील आर्थिक प्रश्नांची सोप्या भाषेत उकल करणे, त्याची कारणे शोधून काढणे इ. कामे धोरणकर्ते, अर्थशास्त्रज्ञ, विचारवंत, शिक्षक आणि संशोधक आपापल्या परीने सातत्याने करत असतात. थोडक्यात, अर्थव्यवस्थेत निर्माण होणारे प्रश्न आणि त्यावरील विविध बाजूंनी होणारे भाष्य ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. अर्थव्यवस्थेतील अशाच प्रकारच्या विविध प्रश्नांवर लेखन तथा विचारविनिमय करण्याचे एक दर्जेदार माध्यम म्हणून मराठी अर्थशास्त्र परिषदेमार्फत चालविल्या जाणाऱ्या अर्थसंवादच्या अंकाकडे पाहिले जाते. गेल्या ४७ वर्षांपासून अर्थसंवाद वाचकांना दर्जेदार लेखांच्या माध्यमातून आर्थिक ज्ञानाची शिदोरी अविरतपणे पुरवित आहे. आजपावेतो अर्थसंवादचा एकही अंक प्रसिद्ध केला गेला नाही, असे झालेले नाही.

निसर्गाच्या बदलप्रक्रियेत अर्थसंवादसुद्धा अपवाद ठरलेला नाही. अर्थसंवादने आज जी उंची गाठलेली आहे त्याचे प्रमुख कारण म्हणजे अर्थसंवादमध्ये गुणवत्ता वाढीच्या अनुषंगाने काळानुरूप करण्यात आलेले लहान-मोठे बदल हेच आहे. आजपर्यंतच्या अर्थसंवादच्या सर्वच संपादकांनी आपापल्या क्षमतेने अर्थसंवादचा दर्जा उंचावण्याचे काम केलेले आहे. १ एप्रिल, २०१७ पासून आजपावेतो मी अर्थसंवादच्या प्रमुख संपादकाची जबाबदारी ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सांभाळण्याचा प्रयत्न करीत आहे. अर्थात, अर्थसंवादरूपी हा जगन्नाथाचा रथ ओढण्यासाठी मला मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्वच घटक सर्वतोपरी मदत करीत असतात. अर्थसंवादच्या प्रमुख संपादकाची जबाबदारी माझ्याकडे आल्यानंतर सर्वप्रथम आपण अर्थसंवादसाठी रंगसंगती वगळता कायमस्वरूपी राहील, अशा पद्धतीचे योग्य व प्रतिष्ठित मुखपृष्ठ तयार केले. त्यामुळे आज अर्थसंवादची मुखपृष्ठावरून होणारी ओळख अधिक ठळक झाली आहे. माझ्या कारकिर्दीत अर्थसंवादमध्ये करण्यात आलेला दुसरा प्रमुख बदल म्हणजे, अर्थसंवाद तज्ज्ञ परिक्षित नियतकालिक करण्यात आले. आज अर्थसंवादमधील प्रत्येक लेख तज्ज्ञ परीक्षकांकडून परीक्षण करून घेतला जातो व परीक्षकांच्या अहवालाला अनुसरून लेखकांकडून लेखात बदल करून घेवून नंतरच तो अर्थसंवादमध्ये प्रकाशित केला जातो. अर्थसंवादचा सातत्याने वाढत जाणारा छपाई खर्च व त्यातून निर्माण होणारी मोठी तूट कमी करण्याच्या अनुषंगाने आपण अर्थसंवादमध्ये सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने तिसरा बदल केला. सदर बदल म्हणजे आजीव सदस्यांना अर्थसंवाद हार्ड कॉपीमध्ये न पाठवता तो मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या संकेतस्थळावर १ एप्रिल, २०२२ पासून आभासी पद्धतीने उपलब्ध करून दिला आहे. याचा परिणाम म्हणून

अर्थसंवादची तूट मोठ्या प्रमाणात कमी तर झालीच आहे; पण विशेष म्हणजे अर्थसंवादच्या खात्यावर इतिहासात प्रथमच शिलकीचे प्रमाणदेखील वाढलेले आहे. आज आपल्या राज्याने नवीन शैक्षणिक धोरणाचा स्वीकार केला आहे. नवीन शैक्षणिक धोरणाला (NEP) अनुसरून शिक्षण पद्धतीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात आमूलाग्र बदल होवू घातले आहेत. अलीकडील काळात गुणवत्ता वाढीच्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोग स्टँडर्ड जर्नल्सचे निकष ठरवून, त्या अनुसार युजीसी मान्यताप्राप्त जर्नल्सची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करते. संपादक या नात्याने मला आपणास सांगावयास अभिमान वाटतो की, १ जानेवारी २०२४ पासून अर्थसंवादच्या अंकास युजीसीने केअर लिस्ट जर्नलचा दर्जा देवून युजीसीच्या केअर लिस्ट जर्नलच्या (ग्रुप १) यादीत अर्थसंवादचा रीतसर समावेश केला आहे. माझ्या संपादक कारकिर्दीतील अर्थसंवादमध्ये झालेला हा चौथा प्रमुख बदल आहे. सदर कामासाठी मला डॉ. धीरज कदम (नागपूर विद्यापीठ) यांनी तांत्रिक सहाय्य केले. तसेच डॉ. संतोष दास्ताने (पुणे), डॉ. एम. एस. देशमुख (कोल्हापूर), डॉ. पुरुषोत्तम देशमुख (औरंगाबाद), डॉ. राजू पाटील (सोलापूर), डॉ. आढाव (पुणे), डॉ. लोणारकर (नांदेड), डॉ. कमरकर (बल्लारपूर), डॉ. ए. के. वावरे (सातारा), डॉ. बाळासाहेब पाटील (पनवेल) इ. विविध विद्यापीठांमधील सर्वच प्राध्यापक मित्रांनी मौलिक सहकार्य केले. त्याबद्दल संपादक या नात्याने मी त्यांचा ऋणी आहे. थोडक्यात, आज पुन्हा एकदा चालू अंकासाठी अर्थसंवादने कात टाकून नावीन्यात प्रवेश केलेला आहे.

प्रस्तुत अंकात एकूण आठ लेखांचा समावेश आहे. यामध्ये पहिला लेख दिलीप अर्जुने (अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद) यांचा आहे. दारिद्र्य निर्मूलन आणि शेती उत्पन्न वाढ याचा सहसंबंध स्पष्ट करणारा हा लेख त्यांच्या परिषदेच्या अध्यक्षीय भाषणाचा सारांश आहे. नरेश बोडले आणि योगेश पायलीमोडे यांनी त्यांच्या लेखात महाराष्ट्रातील प्रादेशिक विकासाच्या असमतोलाच्या अनुषंगाने वैधानिक विकास मंडळाची प्रासंगिकता सुंदररीत्या वर्णन केलेली आहे. आशालता सोनवणे यांनी आपल्या लेखात शाश्वत विकासाची उद्दिष्टे गाठण्याचा सूक्ष्मवित्त हा एक उत्तम मार्ग असल्याचे नमूद केले आहे.

हरी वंगरवार यांनी आपल्या लेखात भारतातील उच्च शिक्षणाची वाढ आणि लैंगिक असमानता याचा अभ्यास सांख्यिकी व सुंदर आलेखांद्वारे वाचकांसमोर मांडलेला आहे. संभाजी सावंत व मारोती तेगमपुरे या लेखकद्वयींनी आपल्या लेखातून कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया व्यवसायाचा सविस्तर मागोवा घेतल्याचे दिसून येते. प्रकाश अंदाजपत्रकावर आधारित असून यामध्ये त्यांनी सदर अंदाजपत्रक हे शाश्वत आणि समावेशक विकासासाठी पूरक असल्याचे नमूद केलेले आहे. मानसी कृतकोटी आणि मिनल भोसले या लेखकद्वयींनी आपल्या लेखातून आदिवासी महिला बचत गट आणि महिला सक्षमीकरण याबाबतची अभ्यासपूर्ण मांडणी केलेली आहे. अंकाच्या अखेरच्या लेखात गणेश टेकळे या संशोधक विद्यार्थ्याने जागतिक आनंद निर्देशांक आणि भारत असा नावीन्यपूर्ण विषय यशस्वीरीत्या वाचकांसमोर सादर केला आहे.

अशा पद्धतीने वरिष्ठ प्राध्यापकांपासून ते संशोधक विद्यार्थ्यांच्या लेखापर्यंत विविध वयोगटातील लेखकांचा हा अंक आपणासमोर सादर करताना प्रमुख संपादक या नात्याने मला मनस्वी आनंद होत आहे. आपल्या सर्व सूचनांचे मी मनापासून स्वागत करतो.

धन्यवाद!

**- राहुल शं. म्होपरे**

# भारतातील दारिद्र्यनिर्मूलनासाठी शेतीउत्पन्न वाढीची आवश्यकता

**दिलीप अर्जुने** †

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४६ व्या वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून माझी निवड केली त्याबद्दल परिषदेचे सर्व पदाधिकारी, परिषदेचे सदस्य व सर्व हितचिंतक यांचे मी आभार व्यक्त करतो. तसेच मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनास उपस्थित असलेले सर्व मान्यवर व परिषदेचे सदस्य यांचे शब्दसुमनाने स्वागत करून माझ्या अध्यक्षीय भाषणास सुरुवात करतो.

संयुक्त राष्ट्रसंघाने २००० या वर्षांमध्ये सहस्रकातील विकासाची ध्येयं निश्चित करत असताना जी ध्येयं निश्चित केलेली आहे, त्यामध्ये दारिद्र्य आणि उपासमारीचे एकूण प्रमाण निम्म्यावर आणण्याचे निश्चित करण्यात आले आहे. जगातील वेगवेगळ्या देशातील दारिद्र्याच्या अभ्यासावरून दारिद्र्य ही जागतिक समस्या असल्याचे दिसते. भारतामध्ये पंचवार्षिक योजनेला सुरुवात झाली तेव्हापासून दारिद्र्य कमी करणे हे उद्दिष्ट असल्याचे दिसते. वेगवेगळे तज्ज्ञ आणि समित्यांनी भारतातील दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या प्रमाणाबद्दल अहवालातून जी माहिती दिलेली आहे त्यावरून सदरील उद्दिष्ट पूर्तता समाधानकारक झाले नाही, हे स्पष्ट दिसून येते. बेरोजगारी, उच्च शिक्षणाचा अभाव, भाववाढ, कर्जबाजारीपणा, शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि आरोग्य संदर्भातील समस्यांच्या मुळाशी दारिद्र्य ही मूळ समस्या असल्याचे दिसून येते. भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील बहुसंख्य लोक उपजीविकेसाठी आणि रोजगारासाठी कृषिक्षेत्रावर अवलंबून आहे. परंतु या कृषिक्षेत्रातील महत्त्वाचा घटक शेतकरी कुटुंब उत्पन्नाच्या दृष्टिकोनातून मागासलेला आहे. शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासकीय पातळीवर अनेक उपाययोजना केल्या जात आहेत. एम. एस. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीच्या अहवालातील बाबी यातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे दिसते.

**दारिद्र्याची संकल्पना**

आर्थिक विकासप्रक्रियेतील अनेक अडथळ्यांपैकी दारिद्र्य हा प्रमुख अडथळा असल्याचे समजले जाते. दारिद्र्याची संकल्पना आणि मापनासंबंधी अनेक अहवाल प्रसिद्ध झालेले आहेत. वेगवेगळ्या देशातील आर्थिक स्थितीमध्ये असणारी भिन्नता आणि जीवन आवश्यक गरजांची संख्या वाढत असल्यामुळे

† अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

आजीव सभासद क्र. १०३८, भ्रमणध्वनी : ९४२२२२९७२३, ई-मेल : darjune39@gmail.com

दारिद्र्याच्या संकल्पनेमध्ये आर्थिक स्थितीनुसार आणि काळानुसार बदल होत जातो. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या मूलभूत गरजांची उणीव म्हणजे दारिद्र्य होय. व्यक्तीच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक क्षमतेचा अभाव म्हणजे दारिद्र्य होय. भारतीय नियोजन आयोगानुसार, 'ग्रामीण क्षेत्रात ज्या व्यक्तीला प्रतिदिन २४०० कॅलरीज उष्मांक आणि शहरी भागात राहाणाऱ्या व्यक्तीला २१०० कॅलरीज उष्मांक मिळत नाही त्या व्यक्तीस गरीब समजावे. जागतिक विकास अहवाल २०००-०१ नुसार, 'दारिद्र्य म्हणजे योग्य पद्धतीने अन्न व निवारा याचा अभाव. या स्थितीमध्ये व्यक्तीस सुयोग्य पद्धतीने राहाणीमान, निवासासाठी घरे, आरोग्य सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा मिळत नाही.' निरपेक्ष दारिद्र्य आणि सापेक्ष दारिद्र्य या दोन संकल्पनेच्या आधारे दारिद्र्याचा अभ्यास केला जातो.

**निरपेक्ष दारिद्र्य**

व्यक्तीला मिळणाऱ्या उत्पन्नातून व्यक्ती आपल्या व आपल्या कुटुंबाच्या जीवनावश्यक गरजांची पूर्तता करू शकत नाही तेव्हा अशा स्थितीला निरपेक्ष दारिद्र्य असे म्हणतात. या स्थितीमध्ये निरक्षरता, कुपोषण, आजारपण, बालमृत्यूचे जास्त प्रमाण आणि सरासरी आयुर्मान कमी असणे अशी लक्षणे दिसून येतात. भारतामध्ये नियोजन आयोगाच्या मतानुसार, शहरी भागातील एका व्यक्तीला दररोज त्याच्या आहारात २१०० उष्मांकांची आणि ग्रामीण भागात एका व्यक्तीला २४०० उष्मांकांची गरज असते. एवढे उष्मांक मिळवून देणारे अन्न जी व्यक्ती आपल्या उत्पन्नातून खरेदी करू शकत नाही ती व्यक्ती किंवा त्याच्या कुटुंबाच्या स्थितीला निरपेक्ष दारिद्र्य संबोधले जाते. विकसनशील देशांमध्ये अशा प्रकारचे दारिद्र्य मोठ्या प्रमाणात असल्याचे आढळून येते.

**सापेक्ष दारिद्र्य**

दोन गटातील उत्पन्न विषमता स्पष्ट करण्यासाठी सापेक्ष दारिद्र्य ही संकल्पना उपयोगात येते. वेगवेगळी उत्पन्न पातळी असलेल्या गटामध्ये तुलनात्मकदृष्ट्या कमी उत्पन्न असलेला गट सापेक्ष दारिद्र्य समजला जातो. सापेक्ष दारिद्र्य हे सार्वत्रिक स्वरूपाचे असून विकसनशील आणि विकसित अशा दोन्ही देशांमध्ये दिसून येते.

**दारिद्र्यरेषा**

भारतामध्ये व्यक्तीला आपल्या किमान मूलभूत गरजा पूर्ण करता येतील एवढी निश्चित केलेली उत्पन्न पातळी म्हणजे दारिद्र्यरेषा होय. दारिद्र्यरेषेसाठीची उत्पन्न पातळी आर्थिक विकासाबरोबर बदलत जाणारी असते. भारतामध्ये दारिद्र्यरेषेची उत्पन्न पातळी वेगवेगळ्या काळात वेगवेगळी निश्चित करण्यात आल्याचे आढळून येते.

**भारतातील दारिद्र्याचे मापन**

स्वातंत्र्यपूर्व काळात दादाभाई नौरोजी यांनी निर्वाह आहाराच्या खर्चावर आधारित देशातील गरिबीचा अंदाज काढला. दारिद्र्याचे निकष ठरवणे आणि दारिद्र्य कमी करणे हा स्वातंत्र्यापासून राष्ट्रीय कार्यक्रमाचा भाग आहे. धनंजयराव गाडगीळ कार्यगट, दांडेकर आणि रथ, वाय.के. अलाघ टास्क फोर्स, प्रा. लकडावाला समिती, प्रा. तेंडुलकर समिती आणि रंगराजन समिती अंतर्गत अर्थतज्ज्ञ आणि तज्ज्ञ गट यांनी भारतातील दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकसंख्येचा अंदाज घेतल्याचे आढळून येते.

१) डॉ. व्ही. एम. दांडेकर व श्री निळकंठ रथ : दारिद्र्यरेषा निश्चित करण्यासाठी उष्मांक हा निकष अत्यंत महत्त्वाचा असल्याचे दिसून येते. डॉ. व्ही. एम. दांडेकर व श्री. निळकंठ रथ यांनी भारतातील दारिद्र्यविषयीचे मोजमाप करण्यासाठी उष्मांक या निकषाचा आधार घेतला. १९६८-६९ च्या

किमतीनुसार त्यांनी ग्रामीण लोकांसाठी दरडोई दरवर्षी रुपये ३२४ एवढे उत्पन्न निश्चित केले व शहरी लोकांसाठी रुपये ४८६ उत्पन्न निश्चित केले. त्यांच्या अंदाजानुसार १९६८-६९ या वर्षांमध्ये ४० प्रतिशत ग्रामीण लोकसंख्या आणि ५० प्रतिशत शहरी लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत असल्याचे दिसून आले.

२) श्री. पी. डी. ओझा : दारिद्र्यरेषा निश्चित करत असताना प्रत्येक व्यक्तीला निर्वाहासाठी दररोज २२५० उष्मांकांची आवश्यकता पी.डी.ओझा यांनी लक्षात घेतली. एवढे उष्मांक प्राप्त करण्यासाठी १९६०-६१च्या किमतीनुसार ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीला दरमहा रुपये ८ ते ११ एवढे उत्पन्न, तर शहरी भागातील प्रत्येक व्यक्तीला दरमहा रुपये १५ ते १८ एवढे उत्पन्न निश्चित केले. या आधारानुसार ५१.८ प्रतिशत लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगतात आणि १९६७-६८ ला दारिद्र्यरेषेखालील लोकांमध्ये वाढ होऊन ७० प्रतिशत लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत असल्याचे सांगितले.

३) सातव्या वित्तआयोगातील अंदाज : सातव्या वित्त आयोगाने दारिद्र्यरेषा निर्धारित करत असताना कुटुंबाचा दरडोई मासिक खर्च आणि सरकारचा दरडोई होणारा मासिक खर्च समाविष्ट करून 'वर्धित दारिद्र्यरेषा' तयार केल्याचे दिसून येते. सातव्या वित्तआयोगाच्या या संकल्पनेनुसार १९७०-७१ मध्ये एकूण लोकसंख्येच्या ५२ प्रतिशत लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील ५३ प्रतिशत तर शहरी भागातील ५१ प्रतिशत लोक दारिद्र्यरेषेच्या खाली असल्याचा अंदाज सातव्या वित्तआयोगाने मांडला.

४) बी. एस. मिन्हास यांनी केलेल्या अभ्यासावरून १९८७-८८ मध्ये ग्रामीण भागात ४४.०८ प्रतिशत तर शहरी भागात ३६.०५ प्रतिशत लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली होती.

५) जागतिक बँक : १९८९ मध्ये जागतिक बँकेने भारतातील दारिद्र्याचा अंदाज केल्याचे दिसून येते. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार १९७० ते १९८८ या काळामध्ये भारतातील दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण ५२.४ प्रतिशतवरून ३९.६ प्रतिशत एवढे कमी झाले. याच काळामध्ये ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण ५३ प्रतिशतवरून ४१.७ प्रतिशत झाले, तर शहरी भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण ४५.५ प्रतिशतवरून ३६.६ प्रतिशत झाले.

६) प्रा. डी. टी. लकडावाला समिती : भारतातील दारिद्र्याचा अंदाज करण्यासाठी १९८९ मध्ये प्रा. डी. टी. लकडावाला यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात आली. या समितीने १९९३ मध्ये आपला अहवाल सादर केला. या समितीने १९८७-८८ या वर्षात भारतातील ३९.१ प्रतिशत लोकसंख्या दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत असल्याचे सांगितले. यामध्ये ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण ३९.१ प्रतिशत, तर शहरी भागातील दारिद्र्यरेषेखाली लोकसंख्येचे प्रमाण ४०.२ प्रतिशत होते. दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण काढण्यासाठी या समितीने १९८७-८८ या वर्षात उपभोग खर्चासाठी ग्रामीण भागात दरमहा दरडोई रुपये ४९ तर शहरी भागात दरमहा दरडोई रुपये ५७ एवढे उत्पन्न निश्चित केल्याचे दिसते.

७) डॉ. सुरेश तेंडुलकर समिती : सुरेश तेंडुलकर समितीने दारिद्र्याचे मापन करण्यासाठी उष्मांक या निकषा ऐवजी उपभोग खर्चावर आधारित नवीन सूत्र मांडले. २००४-०५ या वर्षाच्या किमती आधारभूत घेऊन ग्रामीण भागासाठी प्रतिमहिन्याला रुपये ४४६.६८ आणि शहरी भागासाठी रुपये ५७८.८० खर्च निर्धारित केला. हा किमान खर्च

भागविण्याइतपत ज्यांचे उत्पन्न नसेल ती व्यक्ती दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती म्हणून समजली गेली. या सूत्रानुसार २००४-०५ मध्ये भारतातील ३७.२ प्रतिशत लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली असल्याचे आढळून आले.

८) राष्ट्रीय नमुना पाहणी : राष्ट्रीय नमुना पाहणीच्या ६६व्या फेरीनुसार २००९-१० मध्ये २९.८ प्रतिशत लोकसंख्या दारिद्र्यरेषेच्या खाली होती. राष्ट्रीय नमुना पाहणीच्या ६८व्या फेरीनुसार २०११-१२ मध्ये भारतातील दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण २१.९ प्रतिशत होते. राष्ट्रीय नमुना पाहणीने कुटुंबाचा उपभोग बाबीवरील खर्च हा निकष दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या निश्चित करण्यासाठी आधार घेतल्याचे दिसून येते.

९) डॉ. सी. रंगराजन समिती : भारतीय नियोजन मंडळाने जून २०१२ मध्ये दारिद्र्याच्या समस्येचे पुनरावलोकन करण्यासाठी डॉ. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने जून २०१४ मध्ये दारिद्र्यसंबंधीचा अहवाल सरकारला सादर केला. त्या समितीच्या अहवालानुसार २०११-१२ मध्ये भारतातील २९.५ प्रतिशत लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली होती. दारिद्र्यरेषा निश्चित करण्यासाठी या समितीने ग्रामीण भागासाठी प्रतिदिन प्रतिव्यक्ती रुपये ३२ आणि शहरी भागासाठी प्रतिदिन प्रतिव्यक्ती रुपये ४७ एवढ्या उत्पन्नाची आवश्यकता निश्चित केल्याचे दिसून येते. या समितीच्या अहवालानुसार शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण तुलनेने जास्त असल्याचे दिसून आले.

सुरेश तेंडुलकर समितीच्या अहवालानुसार २०११-१२ या वर्षांमध्ये ग्रामीण भागातील २५.७ प्रतिशत लोकसंख्या दारिद्र्यरेषेच्याखाली आहे, तर याच वर्षांमध्ये सी. रंगराजन समितीच्या अहवालानुसार ग्रामीण भागातील ३०.९ प्रतिशत लोकसंख्या दारिद्र्यरेषेच्याखाली आहे. शहरी भागातील दारिद्र्याच्या संदर्भात २०११-१२ या वर्षांमध्ये सुरेश तेंडुलकर समितीने शहरी दारिद्र्याचे प्रमाण १३.७ प्रतिशत तर सी. रंगराजन समितीने शहरी दारिद्र्याचे प्रमाण २६.४ प्रतिशत असल्याचे सांगितले. याचवर्षी सुरेश तेंडुलकर समितीने भारतातील एकूण दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण २१.९ प्रतिशत तर सी. रंगराजन समितीने २९.५ प्रतिशत असल्याचे स्पष्ट केले. वरील दोन समितीच्या अहवालातील आकडेवारीमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असल्याचे दिसून येते.

**आंतरराष्ट्रीय व्यापार आणि दारिद्र्याचा अभ्यास**

देशातील लोकांना उपभोगासाठी उपलब्ध असणाऱ्या वस्तू आणि दारिद्र्य यांचा जवळचा संबंध असतो. अर्थतज्ज्ञ एज्वर्थ यांनी आर्थिक अभिवृद्धीचा देशातील उपभोगावर आणि दारिद्र्यावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास केला आहे. आर्थिक अभिवृद्धी होत असताना व्यापाराच्या अटी प्रतिकूल बनल्या तर अभिवृद्धीमुळे घडून येणारे अनुकूल परिणाम नष्ट होतात आणि देशाच्या कल्याणात घट होते, ही बाब त्यांनी स्पष्ट केली. प्रा. हिक्स यांनी आर्थिक विस्तार आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अभ्यास केला. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे आर्थिक विस्ताराबरोबर लाभ होत असताना हानी होऊ शकते, याबाबीकडे हिक्स यांनी लक्ष वेधले. प्रा. जगदीश भगवती यांच्या मते, 'आर्थिक अभिवृद्धीमुळे जर देशाच्या व्यापार अटी प्रतिकूल बनल्या व त्यामुळे लोकांच्या वास्तविक उत्पन्नात, उपभोगात व कल्याणात घट होत असेल (पर्यायाने त्यांच्या दारिद्र्यात वाढ होत असेल), तर अशा आर्थिक वृद्धीला दारिद्र्यकारी अभिवृद्धी असे म्हणतात. १९५६ मध्ये प्राध्यापक जगदीश भगवती यांनी Immiserizing Growth: A Geometrical Note या शोधनिबंधामध्ये या संकल्पनेला दारिद्र्यकारी अभिवृद्धी असे नाव दिले. प्रा. जगदीश भगवती यांच्या मते, जागतिकीकरणामुळे

भारतातील गरिबी वाढली असं म्हणता येणार नाही. भारतातील गुंतवणुकीची उत्पादकता मुळात कमी आहे. सरकारचा जास्त हस्तक्षेप आणि परवाना पद्धत या बाबींचा परिणाम भारताच्या वृद्धिदरावरती झाला. सार्वजनिक क्षेत्रातील अकार्यक्षमतेमुळे स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढले नाही. भारताचे माजी अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी 'भारतातील मोठ्या प्रकल्पामध्ये जी गुंतवणूक झालेली आहे त्याचा अपेक्षित लाभ न मिळाल्यामुळे शेती आणि उद्योगक्षेत्राचा विकास झाला नाही', याबाबी अधोरेखित केल्या आहेत. निर्यातीच्या माध्यमातून वस्तू परकीय देशांमध्ये जात असेल तर यातून देशातील लोकांच्या राहाणीमानाच्या पातळीवरती परिणाम होतो. यातून लोकांच्या कल्याणात घट व दारिद्र्यात वाढ होण्याची शक्यता असते. दारिद्र्यकारक वृद्धीचे हे जलद परिणाम आहेत. विकसनशील देशाने याबाबीवरती प्रामुख्याने लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे. दारिद्र्यकारी अभिवृद्धीची संभाव्यता कमी करण्यासाठी संरक्षणात्मक धोरण आणि देशांतर्गत उत्पादनाची रचना यामध्ये बदल करून संभाव्यता कमी करता येईल.

### सरकारी हस्तक्षेप आणि दारिद्र्य

दारिद्र्य निर्मूलनासाठी प्रयोगात्मक संशोधन करणारे अभिजीत बॅनर्जी, एस्थर डफ्लो आणि मायकल क्रेमर यांना २०१९ मध्ये अर्थशास्त्रातील नोबल पुरस्कार देण्यात आला. अभिजीत बॅनर्जी यांनी दारिद्र्यनिर्मूलनासाठी मर्यादित सरकारी हस्तक्षेपाची मागणी करणाऱ्या विचारसरणीला खोडून काढताना मोफत गोष्टी गरिबांना आळशी बनवतात असे सिद्ध करणारे कोणतेही पुरावे किंवा निष्कर्ष उपलब्ध नसल्याचे स्पष्ट केले. पौष्टिक अन्नधान्याचा अभाव, पालकांची शिक्षणाबद्दल असणारी अनास्था, रोजगार संधीची कमतरता, सामाजिक सुरक्षिततेचा अभाव, संस्थात्मक कर्जपुरवठा उपलब्धतेतील अडचणी हे प्रामुख्याने दारिद्र्यावरती परिणाम करणारे घटक आहेत. दारिद्र्य कमी करण्यासाठी एकूण मागणीमध्ये वाढ झाली पाहिजे; तसेच शासकीय धोरण आणि योजना या गरजू लोकांपर्यंत गेल्या पाहिजे, याबाबींवर त्यांनी भर दिला. त्यांच्या संशोधनामुळे जागतिक आरोग्य सुविधांमध्ये आणि अनुदानामध्ये वाढ झाली.

### बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक आणि विषमता

सप्टेंबर २०१५ मध्ये जगातील १९३ देशांनी शाश्वत विकास ध्येयाच्या जाहीरनाम्याचा स्वीकार केल्याचे दिसते. यामध्ये १७ मुख्य ध्येये व त्याअनुषंगाने १६९ लक्ष्य असल्याचे दिसून येते. शाश्वत विकास ध्येये आणि भारताच्या स्थितीचे अवलोकन करण्यासाठी Bertelsmann stiftung and sustainable development solutions network यांनी तयार केलेल्या 'शाश्वत विकास अहवाल २०१९'चा आधार घेतला आहे. शाश्वत विकासाची ध्येये साध्य करण्यासाठी भारत देश प्रयत्नशील असल्याचे दिसून येते. शाश्वत विकास अहवाल २०१९ नुसार १६२ देशांच्या तुलनात्मक स्थितीची माहिती होते. वरील अहवालानुसार जागतिक स्तरावर शाश्वत विकास ध्येये (SDG) साध्य क्रमवारीमध्ये डेन्मार्क या देशाचा पहिला क्रम आल्याचे दिसून येतो. या क्रमवारीत भारताचा क्रमांक ११५, तर जपानचा क्रमांक १५ असल्याचे आढळून येते. अमेरिकेचा क्रमांक ३५ असून १६२ या शेवटच्या क्रमांकावर सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिकन देश असल्याचे दिसून येते. गरीब आणि श्रीमंत देशाच्या विकासासाठी संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने वेगवेगळ्या देशातील दारिद्र्यनिर्मूलन, चांगले आरोग्य, दर्जेदार शिक्षण, लैंगिक समानता, शुद्ध पाणी आणि आरोग्यदायक स्वच्छता, नुतनीकरण करण्याजोगी स्वस्त ऊर्जा, चांगल्या नोकऱ्या आणि नवीन उपक्रम, पायाभूत सुविधा, असमानता कमी करणे, शाश्वत शहरे आणि समाज, उपलब्ध साधनांचा जबाबदारीपूर्वक वापर, हवामानाचा परिणाम,

शाश्वत महासागर, जमिनीचा शाश्वत उपयोग, शांतता आणि न्याय, शाश्वत विकासासाठी भागीदारी या १७ शाश्वत विकास ध्येयांचा समावेश केला आहे. या शाश्वत विकासाच्या ध्येयामध्ये दारिद्र्यनिर्मूलन हे पहिल्या क्रमांकाचे शाश्वत विकासाचे ध्येय आहे. बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाच्याआधारे त्याचे मापन केले जाते. २०१५-१६ या वर्षातील माहितीच्याआधारे बहुआयामी दारिद्र्य प्रमाणानुसार भारतामध्ये बिहार राज्यांमध्ये गरीब लोकांचे प्रमाण ५१.९१ प्रतिशत तर गरीब लोकांचे सर्वात कमी प्रमाण केरळ राज्यात ०.७१ प्रतिशत असल्याचे दिसते. झारखंड, उत्तरप्रदेश व मध्यप्रदेश या राज्यामध्ये गरीब लोकांचे प्रमाण ३५ प्रतिशतपेक्षा जास्त असल्याचे दिसते. तामिळनाडू, सिक्कीम व गोवा या राज्यांतील गरीब लोकांचे प्रमाण पाच प्रतिशतपेक्षा कमी असल्याचे बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाच्याआधारे दिसते. यावरून भारतातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये गरीब लोकांच्या प्रमाणामध्ये मोठ्या प्रमाणात विषमता असल्याचे दिसते.

**शाश्वत विकास ध्येय आणि दारिद्र्य**

पंधराव्या वित्तआयोगाच्या अहवालामध्ये राज्यसरकारांनी पुढील काळातील योजना तयार करताना राजकोषीय सुधारणा तसेच स्थानिक सत्ता याबाबींना विशेष महत्त्व दिल्याचे आढळून येते. पंधराव्या वित्तआयोगाच्या अहवालातील खंड चार हा संपूर्णपणे राज्यांच्या संदर्भात असून, यामध्ये प्रत्येक राज्याच्या अर्थव्यवस्थेचे सूक्ष्म विश्लेषण हे त्या राज्यातील संसाधने, त्या राज्यांच्यासमोरील अडचणी व त्या अनुषंगाने शिफारशी याबाबींचे विश्लेषण त्यामध्ये असल्याचे दिसून येते. खंड चार या अहवालामध्ये भारतातील २८ राज्यांचे विश्लेषण केल्याचे दिसून येते. हे विश्लेषण करत असताना १८ सामान्य राज्य आणि १० हिमालय आणि पूर्वेकडील राज्य या पद्धतीने राज्यांचे विश्लेषण केल्याचे दिसते. महाराष्ट्र राज्याचे व्यापक आर्थिक निकष आणि राजकोषीय निकष चांगल्या स्थितीमध्ये असताना काही भागांचा विकासाचा अनुशेष प्रलंबित असल्याचे या अहवालातून दिसून येते. सामाजिक, आर्थिक निकषांचे विश्लेषण करण्यासाठी सदरील राज्यातील लोकसंख्येमध्ये दहा वर्षांमध्ये झालेली वृद्धी, जन्मदर, नीती आयोगाने २०१९ मध्ये प्रकाशित केलेले एसडीजी निकष तसेच वित्तीय वर्ष २००५ व २०१२ या काळात गरिबीमध्ये झालेली घट याबाबींचा आढावा घेतलेला दिसून येतो. महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येचे देशाच्या लोकसंख्येशी असलेले प्रमाण ९.४ प्रतिशत, राज्याच्या क्षेत्रफळाचे देशाच्या क्षेत्रफळाचे असलेले प्रमाण ९.४ प्रतिशत, राज्याच्या वनक्षेत्राचे देशाच्या वनक्षेत्राशी असलेले प्रमाण ७.२ प्रतिशत, राज्याच्या वनक्षेत्राचे राज्याच्या क्षेत्रफळाशी असलेले प्रमाण १६.५ प्रतिशत असल्याचे अहवालातून दिसून येते. अहवालातून महाराष्ट्र राज्यामध्ये ४५.२ प्रतिशत नागरीकरण झाल्याचे दिसते. महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर प्रतिकूल असल्याचे अहवालातून दिसून येते. नीती आयोगाने प्रकाशित केलेल्या 'शाश्वत विकासाचे निकष' २०१९, मध्ये महाराष्ट्राने ६४ एसडीजी अंक मिळवून सर्व राज्यांमध्ये दहाव्या नंबरवरती स्थान घेतल्याचे दिसते. शाश्वत विकासाचे चौथे ध्येय गुणवत्ता पूर्ण शिक्षण, शाश्वत विकासाचे सहावे ध्येय स्वच्छ जल आणि स्वच्छता, सातवे ध्येय किफायत आणि स्वच्छ ऊर्जा, आठवे ध्येय सामाजिक कार्य व आर्थिक वृद्धी, दहावे ध्येय असमानतेतील कमी, पंधरावे ध्येय जमिनीवरील जीवन, सोळावे ध्येय शांतता व न्यायसंस्था या शाश्वत विकास ध्येयामध्ये महाराष्ट्र राज्य अग्रणी असल्याचे अहवालातून दिसून येते. शाश्वत विकासाचे पहिले ध्येय गरिबी, दुसरे ध्येय भूकमारी, पाचवे ध्येय लिंग असमानता, अकरावे ध्येय नगर व समुदाय सुधार या शाश्वत विकासाच्या ध्येयामध्ये महाराष्ट्र राज्याने सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे या अहवालात नमूद

केल्याचे आढळून येते.

**दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण सर्वाधिक असलेली पाच राज्ये**

२००४-०५ आणि २०११-१२ या वर्षातील भारतातील वेगवेगळ्या घटकराज्यांतील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण अभ्यासले असता असे दिसून येते की, २००४-०५ या वर्षांमध्ये ओरिसा, बिहार, छत्तीसगड, मध्यप्रदेश आणि झारखंड हे दारिद्र्यरेषेखाली लोकसंख्येचे प्रमाण सर्वाधिक असलेली पाच घटकराज्ये आहेत. याच काळात ओरिसा आणि बिहार या राज्यातील अर्ध्यापेक्षा जास्त लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत असल्याचे दिसून येते. २०११-१२ या वर्षांमध्ये दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकसंख्येचे सर्वाधिक प्रमाण छत्तीसगड, झारखंड, मणिपूर, अरुणाचल प्रदेश, बिहार या पाच राज्यांत दिसून येते. सदरील काळामध्ये दारिद्र्यनिर्मूलनासाठी मध्यप्रदेश आणि ओरिसा या घटकराज्याने समाधानकारक कामगिरी केल्याचे दिसून येते. २०११-१२ या वर्षांमध्ये अरुणाचल प्रदेश हे घटकराज्य वगळता वरील चार राज्यांचे दरडोई उत्पन्न भारतातील घटकराज्यांच्या सरासरी उत्पन्नापेक्षा कमी होते. २००४-०५ मध्ये दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या प्रमाणामध्ये प्रथम क्रमांकावर असलेल्या ओरिसा राज्याने २०११-१२ मध्ये समाधानकारक कामगिरी केल्यामुळे दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकांच्या प्रमाणात घट झाल्याचे दिसते.

**दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या प्रमाणात वाढ झालेली राज्ये**

२००४-०५ ते २०११-१२ या कालावधीमध्ये अरुणाचल प्रदेश, मिझोराम व नागालँड या घटकराज्यातील दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या प्रमाणामध्ये घट न होता वाढ झाल्याचे आढळून येते.

**दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण सर्वाधिक कमी असलेली पाच घटकराज्ये**

२००४-५ या वर्षांमध्ये नागालँड, जम्मू आणि काश्मीर, मिझोराम, मेघालय आणि केरळ ही राज्ये दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण कमी असलेली पाच राज्ये असल्याचे दिसून येते. २०११-१२ या वर्षांमध्ये गोवा, केरळ, हिमाचल प्रदेश, सिक्कीम आणि पंजाब ही दारिद्र्यरेषेखालील प्रमाण कमी असलेली पाच राज्ये आहेत. २०११-१२ या वर्षांमध्ये गोवा आणि सिक्कीम या राज्याचे दरडोई उत्पन्न अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय स्थानावरती होते.

दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण कमी असलेली राज्य आणि जास्त दरडोई उत्पन्न असलेली राज्य या दोन घटकांचा संबंध असल्याचे दिसते. घटकराज्यांच्या सरासरीपेक्षा जास्त दरडोई उत्पन्न असलेल्या राज्यांमध्ये दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण कमी असल्याचे दिसते. यामुळे भारतामध्ये दरडोई उत्पन्न वाढवण्याची आवश्यकता असल्याचे दिसते.

**मानव विकास मापदंडामध्ये सुधारणा**

वरच्या दिशेने जाणारा मानवी विकास हा सामाजिक गतिशीलतेचे प्रमुख साधन आहे. कोविड-१९ महामारी आणि रशिया-युक्रेन संघर्षानंतर निर्माण झालेल्या आव्हानांचा जगासोबतच भारताच्या अनेक आर्थिक घटकांवरती परिणाम झालेला आहे. युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम (UNDP) च्या अहवालानुसार ९० टक्के देशांनी २०२०-२१ मध्ये त्यांच्या मानवी विकास निर्देशांक (HDI) मूल्यात घट नोंदवली आहे. २०२०-२०२१ या वर्षातील मानव विकास निर्देशांक अहवालात १९१ देशांपैकी भारत १३२ व्या क्रमांकावर असल्याचे दिसते. भारताचे ०.६३३ एचडीआय मूल्य जागतिक सरासरीपेक्षा कमी आहे तर दक्षिण आशियाई देशातील सरासरीपेक्षा जास्त आहे. भारताचे मूल्य मध्यम मानवी विकास श्रेणीमध्ये आहे. सामाजिक पायाभूत

सुविधांमधील गुंतवणुकीला प्राधान्य दिल्याने १९९० पासून ते सातत्याने वाढत आहे आणि जागतिक सरासरीकडे जात आहे. दारिद्र्य कमी करण्यासाठी तसेच दारिद्र्याच्या अनुषंगाने असणारे इतर निर्देशांक सुधारण्यासाठी देशातील लोकांच्या दरडोई उत्पन्नामध्ये वाढ होणे आवश्यक आहे. भारत कृषिप्रधान देश असून बहुसंख्य लोक रोजगार आणि उपजीविकेसाठी शेतीव्यवसायावर अवलंबून आहेत. भारतातील दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे.

भारतामध्ये शेतकऱ्याचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिकोनातून स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीचा अहवाल महत्त्वपूर्ण आहे.

**स्वामिनाथन आयोग**

एन.डी.ए.च्या किमान समान कार्यक्रमानुसार अर्थतज्ज्ञ शेतीविषयाचे अभ्यासक आणि योजना आयोगाचे सदस्य असलेले श्री. सोमपालसिंग शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली शेतीक्षेत्रातील प्रश्नांचा अभ्यास करून ते सोडविण्यासाठी १० फेब्रुवारी २००४ रोजी राष्ट्रीय शेतकरी आयोगाची स्थापना करण्यात आली. युपीएच्या सरकार स्थापनेनंतर भारतातील हरितक्रांतीचे जनक, प्रा. एम. एस. स्वामिनाथन यांच्या शेतीक्षेत्रातील कार्यामुळे त्यांच्या अध्यक्षतेखाली १८ नोव्हेंबर २००४ मध्ये राष्ट्रीय शेतकरी आयोगाचे पुनर्गठन करण्यात आले. नोव्हेंबर २००४ ते ऑक्टोबर २००६ या कालावधीमध्ये या आयोगाने पाच अहवाल सादर केले. ४ ऑक्टोबर २००६ रोजी या आयोगाने सादर केलेला पाचवा अहवाल महत्त्वपूर्ण समजला जातो व त्यास सर्वसामान्यपणे स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी म्हणून ओळखले जाते. अन्न आणि पोषक आहार सुरक्षेसाठी धोरणात्मक कार्यक्रम आखणे, आयात-निर्यातीपासून व आंतरराष्ट्रीय किमतीतील चढउतार यापासून भारतीय शेतीक्षेत्राचे संरक्षण करणे, पडीक-कोरडवाहू आणि वापरात नसलेली जमीन शेती योग्य करण्यासाठी धोरणात्मक कार्यक्रम सुचविणे, शेतमालाची उत्पादकता वाढवून नफा वाढविणे; तसेच ग्रामीण कर्जपुरवठा व्यवस्थेत अनुकूल बदल सुचविणे, या उद्देशाने शासनाने या आयोगाची स्थापना केल्याचे आढळून येते. शेतकऱ्याचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिकोनातून या अहवालातील बाबी महत्त्वाच्या असल्याच्या दिसून येतात. पाचव्या अहवालातील तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

**जमीन मालकी हक्कामध्ये तफावत**

स्वामिनाथन आयोगाला १९९१-९२ या वर्षाच्या एन.एस.एस.च्या सर्वेक्षणाच्या आधारे शेतजमिनीच्या मालकी हक्कामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असल्याचे दिसून आले. ग्रामीण भागातील शेती करणाऱ्या ६० प्रतिशत लोकांकडे एक हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे. ११.२४ प्रतिशत लोकांकडे शेतजमीनच नसल्याचे आढळून आले. या अनुषंगाने या आयोगाने शासनाच्या ताब्यातील अतिरिक्त जमीन, जंगल भागातील शेती करण्यायोग्य जमीन अल्पभूधारकांना देण्यात यावी, शेतमजुरांना किमान एक एकर जमीन महिलेच्या किंवा दोघांच्या नावावर देण्यात यावी व शेतीयोग्य जमिनीचा वापर हा औद्योगिक कारणासाठी करू नये, अशी महत्त्वपूर्ण शिफारस केली. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिकोनातून ही शिफारस महत्त्वपूर्ण होती. या सगळ्या शिफारशींचा आजच्या संदर्भामध्ये आढावा घेतला असता यादृष्टीने शासनाने ठोस निर्णय घेतल्याचे आढळून येत नाही. आजही अनेक शासकीय प्रकल्पासाठी, महामार्गासाठी व औद्योगिक कारणासाठी सहजपणे शेतजमिनीचे अधिग्रहण होत असल्याचे आढळून आले. भूमिहीन शेतमजुराला एक एकर शेत जमीन नावावर झाल्याचे आढळून येत नाही.

## सिंचन व्यवस्थेबाबतीतील बाबी व शिफारशी

या आयोगाला भारतीतील बहुतांश शेतजमीन (६० प्रतिशत) पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याचे दिसून आले; तसेच भूजल पातळीमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून आले. रेन वॉटर हॉर्वेस्टिंगसाठी अर्थसंकल्पामध्ये भरीव तरतूद करणे, पाण्याचे प्रदुषण कमी करण्यासाठी किटकनाशकांचा वापर कमी करणे, पाणी साक्षरता चळवळीला प्रोत्साहन देणे, प्रत्येक गावांमध्ये पाणी पंचायतीच्या माध्यमातून पाण्याचे समान वाटप यासाठी नियोजन करणे या शिफारशी या आयोगाने केल्याचे दिसून येते. रेन वॉटर हॉर्वेस्टिंगसाठी शासनाने अनुदान देणे गरजेचे आहे. परंतु त्यासंदर्भात योग्य प्रयत्न होत नसल्याचे दिसून येतात. प्रत्येक गावामध्ये पाणीपुरवठा समित्या स्थापन झाल्यात; परंतु अनेक गावातील समित्यांचा सहभाग सक्रिय आढळून येत नाही. ग्रामीण भागातील किटकनाशकांचा वापर कमी झाल्याचे आढळून येत नाही. पाणीपुरवठा समित्यांच्या माध्यमातून गावातील पिकांचे नियोजन आवश्यक आहे. परंतु त्यासंदर्भात पाणीपुरवठा समित्या कार्यवाही करत नाही.

## शेतमालाची उत्पादकता

भारतातील पिकांची दर एकरी उत्पादकता कमी असल्याचे या आयोगाला आढळून आले. पायाभूत सुविधांची वाढ करून माती परीक्षणाचे जाळे उभारून शेतमालाच्या उत्पादकतेत वाढ करण्याची शिफारस या आयोगाने केली. शेतीच्या उत्पादकतेमध्ये माती परीक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी माती परीक्षण अनिवार्य केल्यास त्याचा लाभ शेतीक्षेत्राला होऊ शकतो. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिकोनातून माती परीक्षण हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. माती परीक्षण संदर्भात शेतकऱ्यामध्ये असलेली उदासीनता कमी करणे आवश्यक आहे. शासनामार्फत त्यांना प्रोत्साहन देऊन माती परीक्षण करण्यात यावे. पायाभूत क्षेत्रामध्ये होत असलेल्या अनुकूल बदलाचा लाभ शेतीक्षेत्राला होत असल्याचे दिसून येते.

## शेती पतपुरवठा

या आयोगाला सीमांत व लहान शेतकऱ्यांना बँकांनी केलेल्या कर्जपुरवठ्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून आले. शेतकऱ्यांना ४ प्रतिशत दराने कर्जपुरवठा करावा, नैसर्गिक आपत्तीमध्ये कर्जाची मुदतवाढ करावी, किसान क्रेडिट कार्डचे वाटप करावे, कृषिक्षेत्रासाठी आपत्ती निवारण फंड उभा करावा, जनावरांचा विमा उतरावा, पीक विमा योजना राबवावी, या प्रमुख शिफारशी स्वामिनाथन आयोगाने केल्या. नाबार्ड या शेतीसाठी कार्य करणाऱ्या शिखर बँकेने शेती ही जास्त धोका असलेली आर्थिक क्रिया आहे. त्यामुळे प्रत्येक पिकासाठी विमा आवश्यक असल्याचे नमूद केले. शेतीक्षेत्रासाठी अल्पदाराने कर्जपुरवठा, प्रमुख पिकांसाठी पीक विमा योजना आणि किसान क्रेडिट कार्ड या शिफारशींची अंमलबजावणी समाधानकारक आहे. प्रत्येक जनावरांसाठी विमा, कर्जाची मुदतवाढ यासाठी शासकीय स्तरावर निधीची उपलब्धता यासाठी कार्यवाही होणे गरजेचे आहे.

## शेतकरी आत्महत्या

स्वामिनाथन आयोगाला शेतकरी आत्महत्येमध्ये सतत वाढ होत असल्याचे दिसून आले. त्या रोखण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर करावा, राज्यस्तरावर कृषी आयोग स्थापन करावा, शेतकऱ्यांचा आरोग्य विमा उतरावा, शेतकऱ्यांना उतरत्या काळात पेन्शन द्यावे, पीक विम्याचे मोजमाप गावपातळीवर करण्यात यावे. महागडे बी-बियाणे यांना पर्याय उपलब्ध करून देणे व शेतमालाच्या आयातीवर बंधने घालणे अशा प्रमुख शिफारशी या आयोगाने केल्याचे आढळून येते. १९६५ मध्ये भारतामध्ये प्रा. दंतवाला यांच्या अध्यक्षतेखाली कृषी व मूल्य आयोगाची स्थापना

करण्यात आली. पुढे त्यास कृषिखर्च व मूल्य आयोग म्हणून ओळखले जाऊ लागले. २३ एप्रिल २०१५ रोजी महाराष्ट्र शासनाने श्री. पाशा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कृषिमूल्य आयोग स्थापन केला. असा आयोग स्थापन करणारे महाराष्ट्र हे दुसरे राज्य आहे. सध्या २५ पिकांना या आयोगाच्या माध्यमातून किमान हमीभाव जाहीर होतो. परंतु बाजारातील शेतमालाच्या किमती हमीभावापेक्षा कमी असल्यामुळे व हमीभावाने खरेदी करणारी शासकीय यंत्रणा अपुरी असल्यामुळे हमीभावाचा लाभ शेतकऱ्यांना सहजपणे होत नसल्याचे आढळून येते. शेतमालाला हमीभाव उपलब्ध करून देणारी प्रभावी यंत्रणा असली पाहिजे.

जैविक स्त्रोत, मासे, दुभती जनावरे, पशुपालन यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते. गाय, बैल, म्हैस व बकरी यामुळे महिलांना रोजगार उपलब्ध होतो. सागरी व अंतर्गत मासेमारीमुळे रोजगारात वाढ होते. याबाबींसाठी बचतगटाच्या माध्यमातून कर्जपुरवठा करण्यात यावा. या अनुषंगाने बचतगटांनी चांगली कामगिरी केल्याचे दिसते. बँक, बाजार आणि कृषिप्रक्रिया या उद्योगामध्ये सहकार क्षेत्राचा महत्त्वाचा सहभाग असल्यामुळे सहजपणे या क्षेत्राला वित्त उपलब्ध करून देण्याची शिफारस या आयोगाने केली. स्वामिनाथन आयोगाने केलेल्या शिफारशीची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे झाली, तर निश्चितच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

**शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा आढावा घेण्यासाठी समिती**

आर्थिक वर्ष २०२२-२३ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी मार्च २०१६ पासून शासनाने वेगवेगळ्या उपाययोजना केल्या आहेत. शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा तसेच ते वाढविण्यासाठी आवश्यक बाबींचा अभ्यास करण्यासाठी व उपाय सुचविण्यासाठी राष्ट्रीय प्रर्जन्य क्षेत्र प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक दलवाई यांच्या अध्यक्षतेखाली १३ एप्रिल २०१६ रोजी 'Doubling farmers Income Committee' गठित करण्यात आली. या समितीने ऑगस्ट २०१७ ते सप्टेंबर २०१८ या कालावधीमध्ये चौदा खंडामध्ये अहवाल सादर केल्याचे दिसून येते. केंद्रशासनाच्या अंदाजपत्रकामध्ये या समितीच्या काही शिफारशींची अंमलबजावणी झाल्याचे दिसून येते. या समितीने पहिल्या खंडातील अहवालामध्ये भारतीय शेतीक्षेत्राचा आढावा घेतला तर दुसऱ्या खंडातील अहवालामध्ये भारतातील शेतकरी कुटुंबाच्या उत्पन्नाची मांडणी केली आहे.

**आधार आणि लक्षित वर्षातील शेतकऱ्यांचे उत्पन्न**

२०१५-१६ या आर्थिक वर्षातील शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न आणि २०२२-२३ या वर्षातील शेतकरी कुटुंबाचे लक्षित उत्पन्न याबाबींची माहिती DFI समितीने सादर केलेल्या १४ व्या खंडातील अहवालात दिलेली आहे.

**शेतकरी कुटुंबाच्या उत्पन्नाच्या बाबींचा आढावा**

डॉ. अशोक दलवाई यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या DFI समितीने ऑगस्ट २०१७ मध्ये 'Status of Farmers Income : strategies for Accelerated growth' हा अहवाल (खंड दोन) सादर केला. या अहवालामध्ये पान क्र.११ वरील तक्त्यावरून शेतकरी कुटुंबाच्या उत्पन्नाचे विश्लेषण करता येते. २०१२-१३ मध्ये शेतकरी कुटुंबाच्या उत्पन्नामध्ये शेती पिकांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा ४७ प्रतिशत, मजुरीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा ३२ प्रतिशत, पशुपालन व्यवसायापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा १३ प्रतिशत, तर शेती व्यतिरिक्त व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा ०८ प्रतिशत आहे. यातून असे दिसून येते की, शेतकरी कुटुंबाचे शेतीव्यतिरिक्त व्यवसायावर असणारे अवलंबन अल्प आहे. ते वाढविण्यासाठी नियोजित शासकीय प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे दिसून येते. शेतीपिकापासून

**आधार आणि लक्षित वर्षातील शेतकऱ्यांचे उत्पन्न (रुपये)**

| राज्य/ देश | आधार वर्ष २०१५-१६ (२०१५-१६ च्या किमतीनुसार) | लक्षित वर्ष २०२२-२३ (२०१५-१६ च्या किमतीनुसार) | लक्षित वर्ष २०२२-२३ (२०२२-२३ च्या किमतीनुसार) |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १,००,०३३ | १,७४,१५३ | २,४२,७३६ |
| भारत | ९६,७०३ | १,७२,६९४ | २,४२,९९८ |

**आधार :** DIF समितीचा अहवाल खंड १४ वा.

मिळणारे उत्पन्न आणि शेतकरी कुटुंबाला मजुरीपासून मिळणारे उत्पन्न हे दोन घटक शेतकरी कुटुंबातील उत्पन्नाच्या प्रमुख बाबी आहेत. भारतातील शेतकरी कुटुंबाचे २०१२-१३ मध्ये सरासरी एकूण उत्पन्न रु. ७७,९७६ असल्याचे दिसून येते. शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न वाढविण्यासाठी आणि शेतीव्यतिरिक्त व्यवसायवरती अवलंबन वाढविण्यासाठी शेतीआधारित व्यवसायांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

### महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबांच्या उत्पन्नाची स्थिती

महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न भारतातील शेतकरी कुटुंबांच्या सरासरीपेक्षा जास्त आहे. DFI समितीच्या अहवालातील शेतकरी कुटुंबाच्या राज्यनिहाय उत्पन्नाच्या आकडेवारीआधारे महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबाच्या एकूण वार्षिक सरासरी उत्पन्न स्थितीचा अभ्यास करता येतो. आर्थिक वर्ष २०१२-१३ मध्ये भारतातील शेतकरी कुटुंबांचे सरासरी एकूण उत्पन्न रु. ७७,९७६ तर महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबांचे सरासरी उत्पन्न रु. ९१,५०१ आहे. राज्यनिहाय शेतकरी कुटुंबाच्या आकडेवारीआधारे पंजाब राज्यातील शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न इतर राज्यांच्या तुलनेत सर्वात जास्त असून ते रु.२,१७,४५० असल्याचे दिसून येते. अकरा राज्य आणि चार केंद्रशासित प्रदेशातील शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबांच्या तुलनेत जास्त असल्याचे दिसते. शेतकरी कुटुंबाच्या उत्पन्नामध्ये राज्यनिहाय मोठ्या प्रमाणात विषमता आहे.

### शेतीपिकांपासून सर्वाधिक उत्पन्नाची प्राप्ती

भारतातील शेतकरी कुटुंबांच्या सरासरी उत्पन्नापेक्षा महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबाला शेतीपिकापासून तुलनेने जास्त उत्पन्न मिळत असल्याचे दिसते. शेतीपिकांपासून शेतकरी कुटुंबाला मिळणाऱ्या उत्पन्नाच्या राज्यनिहाय अभ्यासावरून असे दिसते की, आर्थिक वर्ष २०१२-१३ मध्ये भारतातील शेतकरी कुटुंबाला सरासरी वार्षिक उत्पन्न रु. ३६,९५० तर महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबाला सरासरी वार्षिक उत्पन्न ४६,३८५ मिळतात. राज्यनिहाय अभ्यासावरून असे दिसते की, पंजाब राज्यातील शेतकरी कुटुंबाला सर्वात जास्त उत्पन्न रु. १,३०,१६३ मिळतात. शेतीपिकांपासून शेतकरी कुटुंबाला मिळणाऱ्या उत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण भारतासाठी ४७ प्रतिशत, तर महाराष्ट्रासाठी ५०.६९ प्रतिशत असल्याचे आढळून येते. याचा दुसरा अर्थ असा आहे, महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंब शेतीपिकापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर इतर राज्यांच्या तुलनेत जास्त प्रमाणात अवलंबून आहे. त्यामुळे शेतमालाच्या किमतीमध्ये होणाऱ्या बदलाचा परिणाम महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबावर जास्त असतो.

### मजुरीच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न

मजुरीपासून शेतकरी कुटुंबाला मिळणाऱ्या उत्पन्नाच्याबाबतीत भारताच्या सरासरीच्या तुलनेत महाराष्ट्रातील उत्पन्न कमी असल्याचे दिसते. २०१२-१३ मध्ये मजुरीपासून शेतकरी कुटुंबाला मिळणाऱ्या उत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण भारतासाठी

३२ प्रतिशत, तर महाराष्ट्रासाठी २८.१५ प्रतिशत दिसून येते. २०१२-१३ मध्ये भारतातील शेतकरी कुटुंबाला मजुरीपासून वार्षिक सरासरी उत्पन्न रु.२४,८०१ तर महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबाला वार्षिक सरासरी उत्पन्न रु.२५,७६५ मिळत असल्याचे अहवालातून दिसते.

**पशुपालनापासून मिळणारे उत्पन्न**

पशुपालन हा भारतातील महत्त्वाचा शेतीपूरक व्यवसाय आहे. पशुपालनामुळे शेतकरी कुटुंबाच्या रोजगारात आणि उत्पन्नात वाढ होते. शेतीसाठी खताची उपलब्धता होण्यास मदत मिळते. पशुपालनापासून शेतकरी कुटुंबाला मिळणाऱ्या उत्पन्नाच्या राज्यनिहाय अभ्यासावरुन असे दिसते की, आर्थिक वर्ष २०१२-१३ मध्ये भारतातील शेतकरी कुटुंबाला पशुपालनापासून सरासरी वार्षिक उत्पन्न रु.१०,०१६ मिळतात, तर महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबाला सरासरी वार्षिक उत्पन्न रु.९,३०८ मिळतात. या संदर्भातील राज्यनिहाय अभ्यासावरून सर्वात जास्त उत्पन्न रु.५७,६०४ चंदीगडमध्ये मिळत असल्याचे दिसून आले. महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबाला पशुपालनापासून मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ करण्यासाठी वाव असल्याचे दिसते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पशुपालनापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण १०.१७ प्रतिशत आढळून आले. शेतकरी कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी पशुपालनापासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या प्रमाणात वाढ होणे आवश्यक आहे.

**शेतीव्यतिरिक्त व्यवसायातून मिळणारे उत्पन्न**

२०१२-१३ मध्ये शेतकरी कुटुंबाला शेतीव्यतिरिक्त व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण अल्प असल्याचे दिसते. भारतातील शेतकरी कुटुंबाला शेतीव्यतिरिक्त व्यवसायातून वार्षिक सरासरी उत्पन्न रु.६,२०९ तर महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबाला वार्षिक सरासरी उत्पन्न रु.१०,०४४ मिळाल्याचे दिसते. शेतीव्यतिरिक्त व्यवसायातून केरळमधील शेतकरी कुटुंबाला सर्वाधिक वार्षिक सरासरी उत्पन्न रु. ३१,३०३ मिळाल्याचे दिसून आले. बहुतांश राज्यांतील शेतीव्यतिरिक्त व्यवसायातून मिळणारे उत्पन्न अल्प असल्याचे दिसते. शासनाच्या वेगवेगळया योजनांच्याआधारे शेतकरी कुटुंबाचे शेतीव्यतिरिक्त व्यवसायातून उत्पन्न आवश्यक आहे.

**वार्षिक वृद्धिदर**

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी डॉ. अशोक दलवाई यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने सात वर्षांच्या कालावधीमध्ये, वार्षिक वृद्धिदर गाठण्याचे लक्ष निश्चित करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी सात बाबी अधोरेखित केलेल्या आहेत. पिकांच्या उत्पादकतेमध्ये सुधारणा करणे, पशुपालनापासून मिळणाऱ्या उत्पादकतेमध्ये सुधारणा करणे, पिकांचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी उपलब्ध साधने कार्यक्षमतेने वापरणे, उच्च मूल्य असलेल्या पिकांची लागवड करणे, शेतकऱ्यांना मिळणाऱ्या बाजारभावामध्ये सुधारणा करणे, शेतीव्यतिरिक्त व्यवसायातून उत्पन्न वाढविणे, ठरावीक कालावधीमध्ये पिक घेण्याची संख्येत (पिकांच्या घनतेत) वाढ करणे या घटकांच्या माध्यमातून शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न वाढवण्यासाठी या समितीने निकष सुचवलेले आहेत. समितीने सुचवलेल्या वरील सात बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.

प्रा.एम.एस. स्वामिनाथन आयोग आणि शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीच्या अहवालातून शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न कमी असल्याचे आढळून येते.

**शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी असण्याची कारणे**

१) शेतकरी कुटुंबाला वेगवेगळ्या मार्गापासून मिळणाऱ्या उत्पन्नापैकी बहुसंख्य उत्पन्न हे शेतीतूनच मिळत असल्यामुळे आणि भारतातील शेती पावसाच्या पाण्यावरती अवलंबून असल्यामुळे

शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी आहे.

२) अपुऱ्या सिंचन सुविधा आणि पावसावरती असणारे शेतीचे अवलंबन यामुळे शेतकरी कुटुंबाला शेती व्यवसायामध्ये वर्षभर पूर्णकाळ रोजगार उपलब्ध होत नाही.

३) भारतीय अर्थव्यवस्था ही शेतीप्रधान अर्थव्यवस्था आहे. परंतु ग्रामीण भागातील अनेक लोकांना स्वतःच्या मालकीची शेती उपलब्ध नाही. शेतमजूर, मागास प्रवर्ग आणि वंचित घटक या कारणामुळे दारिद्र्य अवस्थेत जीवन जगत असल्याचे दिसून येते. १९९१-९२ या वर्षातील एन.एस.एस. या सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागातील शेती करणाऱ्या ६० प्रतिशत लोकांकडे एक हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे, तर ११.२४ प्रतिशत लोकांकडे शेतजमिनीत नसल्याचे आढळून आले. अल्प जमीन धारणा यामुळे शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न कमी आहे.

४) शेतकरी कुटुंब आपल्या उत्पन्नाचा महत्त्वाचा भाग अनुत्पादक प्रथा व परंपरेवर खर्च करत असल्यामुळे आर्थिक स्थितीमध्ये बदल होत नाही.

५) वारसा हक्कामुळे ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात जमिनीचे तुकडीकरण होत आहे. त्यामुळे शेती व्यवसाय नुकसानीचा होत चालला असून यामुळे दारिद्र्यात वाढ होत आहे.

६) भारतातील पिकाची दर एकरी उत्पादकता कमी आहे. त्यामुळे भारतातील शेतकरी कुटुंबाला खुल्या अर्थव्यवस्थेचा लाभ मिळत नाही.

७) वेगाने वाढत जाणाऱ्या लोकसंख्येच्या अन्नधान्यविषयक गरजांची पूर्तता करण्यासाठी शेतमालाच्या किमती आणि निर्यातीवरती नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न शासनामार्फत होत असतो. यामुळे शेतकरी कुटुंबाचे नुकसान होते. हे दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे.

८) काळा पैसा आणि भ्रष्टाचार यामुळे जमा झालेला पैसा शेतजमिनी विकत घेण्यासाठी वापरला जातो. त्यामुळे शेतजमिनीच्या किमती वाढतात. अशा पद्धतीने विकत घेतलेल्या शेतजमिनी कुंपण करून पडीक पडतात. शेतकरी कुटुंब शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून शेतजमीन खरेदी करू शकत नाही.

९) जमिनीच्या तुकडीकरणामुळे तसेच अल्पभूधारणेमुळे नैसर्गिक साधनसामग्रीचा अपुरा वापर होत आहे. यामुळे शेतकरी कुटुंबातील साधनसामग्रीचा पूर्ण क्षमतेने वापर होत नाही.

१०) आजही अनेक भागात शेतकरी कुटुंब परंपरागत पद्धतीने निर्वाह शेतीचाच अवलंब करत असल्यामुळे उत्पन्नामध्ये वाढ होत नाही.

**शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न वाढवण्यासाठी उपाययोजना**

१) जलयुक्त शिवार योजना शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची योजना आहे. महाराष्ट्रामध्ये सुरुवातीला या योजनेच्या माध्यमातून चांगले काम झाले आहे. नियोजन आणि सातत्य ठेवून जलयुक्त शिवार योजनेचे काम झाल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल.

२) शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना अत्यल्प दराने कर्जपुरवठा करण्यात यावा. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना अधिक सक्षम करून कर्जपुरवठा करण्यात यावा.

३) नैसर्गिक आपत्तीमध्ये कर्जाला मुदतवाढ आणि व्याजामध्ये सवलत देण्यात यावी.

४) किसान क्रेडिट कार्डचे वाटप, कृषिक्षेत्रासाठी आपत्ती निवारण फंड, कृषी जनावरांच्या विम्यामध्ये वाढ या स्वामिनाथन आयोगाने केलेल्या शिफारशीची अंमलबजावणी करण्यात यावी.

५) शेती पिकांच्या उत्पादकतेत वाढ होऊन शेतकरी कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल. शेती पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी माती परीक्षण हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. माती परीक्षण करण्यासाठी, त्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी प्रभावी शासकीय यंत्रणेची आवश्यकता आहे. अनेक शेतकरी आजही माती परीक्षण न

करता पिकांचे उत्पादन घेत असल्याचे आढळून येते.

६) भूमिहीन शेतकरी कुटुंब गायरान जमिनीवरती शेती करतात. गायरान जमिनीची मालकी शेती करणाऱ्या भूमिहीन घटकाला देण्यात यावी. मालकी हक्कामुळे उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते.

७) गाय, बैल, म्हैस, शेळीपालन आणि कुक्कुटपालनामुळे शेतकरी कुटुंबामध्ये रोजगार वाढण्यास मदत होते. त्यामुळे सदरील बाबींसाठी बचत गटाच्या माध्यमातून कर्जपुरवठ्यात वाढ करण्यात यावी.

८) शेती व्यवसायासाठी असलेल्या वेगवेगळ्या शासकीय योजना शेतकऱ्यापर्यंत पोहोचल्या पाहिजे. अनेक शासकीय योजना शेतकरी कुटुंबाच्या विकासासाठी महत्त्वाच्या आहेत. परंतु अशा योजना शेतकरी कुटुंबाला योग्य वेळेत मिळत नाही.

९) किमान आधारभूत किमती ठरवत असताना शेतकऱ्यांनी केलेल्या गुंतवणुकीवरील व्याज आणि स्वतःच्या शेतजमिनीचे मूल्य या घटकाचा समावेश करावा.

१०) किमान आधारभूत किमतीच्याआधारे शेतमाल खरेदी करणारी शासकीय यंत्रणा सक्षम करण्यात यावी.

११) नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभाग आणि जागतिक बँकेच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेली पोकरा योजना शेतकरी कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची आहे. वेगवेगळ्या शेतीपूरक बाबींना या योजनेतून अर्थसहाय्य उपलब्ध होते. पोकरा योजना महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत सुरू करण्यात यावी.

**संदर्भ ग्रंथ सूची:**


१) Economics Survey 2022-23, Government of India, Ministry of Finance, Department of Economic Affairs Economic Division, New Delhi, 2023.

२) Finance Commission in Covid Time, Report For 2021-26, XV Finance Commission, Volume -IV, The States, October 2020.

३) Finance Commission in Covid Times, Report for 2021-26, XV Finance Commission, Volume-I, Main Report October 2020.

४) Immiserizing Growth: A Geometrical Note, Jagdish Bhagwati, Review of Economic Studies, Vol- 25, June 1958.

५) National Commission on Farmers - Fifth and final report, 4 October 2006.

६) National Multidimensional poverty Index, Baseline Report, Niti Aayog, 2021.

७) Report of the Committee on Doubling Farmers' Income, Volume I To XIV, August 2017 to September 2018, Document prepared by the committee on doubling farmers income, Department of Agriculture, Cooperation and Farmers welfare, Ministry of Agriculture and Farmers Welfare.

८) Sustainable Development Report-2019, Bertelsmann Stiftung, Sustainable Development Solution Network, A Global Initiative for the United Nations, Pica publishing Ltd., June- 2019.

९) https://www.niti.gov.in/reports-sdg

१०) भारतीय अर्थव्यवस्था, डॉ. विश्वास कदम, डॉ. गणेश गावंडे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१३.

११) महाराष्ट्रातील कृषी व ग्रामीण विकास: एक चिंतन, संपादक डॉ. सुनिल नरवडे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०२१.


◆

# महाराष्ट्रातील प्रादेशिक विकासाचा असमतोल आणि वैधानिक विकास मंडळाची प्रासंगिकता

**नरेश बोडखे** †
**योगेश पायलीमोडे** ††

## १. प्रस्तावना

प्रादेशिक नियोजन ही अशी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये उपलब्ध संसाधनाचा स्थानिक भागामध्ये कार्यक्षम वापर करून विकासाचे अपेक्षित उद्दिष्ट साध्य केले जाते. त्याचप्रमाणे विकसित प्रदेशातील अतिरिक्त संसाधनाचे मागास प्रदेशांकडे हस्तांतरण होऊन विकास साधला जातो. परिणामतः आर्थिक क्रियाकल्पांमध्ये वाढ होऊन रोजगारीच्या संधी निर्माण होतात व पर्यायाने विकासाचा बहुमुखी परिणाम हा शेवटच्या घटकापर्यंत पोहचणे साध्य होते. त्याचप्रमाणे आंतर-जिल्हा विसंगती कमी होऊन समतोल विकासाला प्रोत्साहन मिळते. असे जरी असले तरी देशपरत्वे एकाच देशाच्या विभिन्न प्रदेशांमध्ये असमतोलाची स्थिती विद्यमान असलेली दिसते.

प्रादेशिक असमतोलाला ऐतिहासिक, भौगोलिक, राजकीय व सामाजिक-आर्थिक असे विभिन्न घटक प्रभावित करतात. या विभिन्न घटकांमध्ये राजकीय अर्थकारण हा घटक प्रादेशिक असमतोलाला बव्हंशीरीत्या जबाबदार आहे. जगातील विभिन्न देशातील विकास पातळीचे अवलोकन केल्यास असे लक्षात येते की, प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न हा मुळात राजकीय अर्थकारणाशी निगडित आहे. जागतिक पातळीवर विभिन्न देशातील शासनव्यवस्था व राजकीय नेतृत्व करणारे पुढारी विशिष्ट प्रदेशाकडे अधिकाधिक निधी व अनुदाने वळविण्याचा प्रयत्न करतात. परिणामतः विकास निधीचे वाटप करताना विशिष्ट प्रदेशांना अधिक निधी व अनुदाने प्राप्त होऊन अन्य प्रदेशांना तुलनेने अत्यल्प वित्तीय संसाधने प्राप्त होतात. वित्तीय संसाधनांचा असमान वितरणामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर विसंगती निर्माण झालेली दिसून येते (Kanbur and Venables : 2005). उदा. युरोपिअन समुदायातील सदस्य राष्ट्रांमध्ये सामाजिक निधीचे झालेले असमान वितरण ही बाब आंतरराष्ट्रीय पातळीवरील विसंगतीला प्रामुख्याने दृष्टिगोचर करते. आंतरराष्ट्रीय पातळीवरील ही प्रवृत्ती भारतातील विभिन्न राज्यामध्ये विद्यमान आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये वित्तीय संसाधनाच्या प्रदेशनिहाय असमान वितरणामुळे प्रादेशिक विसंगती प्रकर्षाने दृष्टीस पडते.

† सहयोगी प्राध्यापक, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे.
आजीव सभासद क्र. २००९, भ्रमणध्वनी : ९४२२५४५२२२, ई-मेल : naresh.bodkhe@gipe.ac.in
†† संशोधन विद्यार्थी, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
आजीव सभासद क्र. १५४४, भ्रमणध्वनी : ७५८८०८०८३३, ई-मेल : yogesh.paylimode@gipe.ac.in

समतोल प्रादेशिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक नियोजन काळामध्ये भारत सरकार व विभिन्न राज्य सरकारांनी बरेच प्रयत्न केलेले दिसून येते. भारताच्या आर्थिक नियोजनाच्या पहिल्या तीन पंचवार्षिक योजनेचे एकत्रित मूल्यमापन केल्यास असे दिसते की, क्षेत्रीय नियोजनामुळे देशामध्ये ग्रामीण-शहरी विसंगती निर्माण झाली होती. विकासाचे लाभ केवळ शहरीकेंद्रित क्षेत्रापुरतेच मर्यादित न राहाता समाजातील शेवटच्या घटकापर्यंत प्रतिबिंबित होणे क्रमप्राप्त असून त्यासाठी विकेंद्रित नियोजनाची आवश्यकता भासू लागली. परिणामतः चतुर्थ-पंचवार्षिक योजनेमध्ये क्षेत्रविकास दृष्टिकोनावर भर देण्यात आला. सदर पंचवार्षिक योजनेचा भर हा मागासप्रदेशांचा विकास करून आंतरराज्यीय असमतोल कमी करणे हा होता. त्यानुसार सरकारने मागास क्षेत्रविकास मंडळाची स्थापना केली. ज्यामध्ये रायलसीमा विकास मंडळ, तेलंगणा विकास मंडळ, उत्तर प्रदेश पहाडी विकास मंडळ इत्यादींचा अंतर्भाव होता (Fourth Five Year Plan:1972). या मागास भागामध्ये स्थानिक संसाधनांचा वापर करून समतोल प्रादेशिक विकास करण्याचे निश्चित झाले. महाराष्ट्रामध्येही असे प्रयत्न आठव्या पंचवार्षिक योजनेच्या काळापासून सुरू झालेले दिसते.

राज्याच्या स्थापनेनंतर प्रादेशिक असमतोलाच्या प्रश्नावर अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने विविध अभ्यास समित्यांची स्थापना केली. विविध अभ्यास गटाच्या अनुमानानुसार राज्यामध्ये विदर्भ व मराठवाडा प्रदेश, उर्वरित महाराष्ट्रापेक्षा कमी प्रगत असून, या प्रदेशातील विभिन्न क्षेत्रामध्ये विकासाचा अनुशेष वाढल्याचे निदर्शनास आले (Khandewale & Others: 2021). राज्यातील प्रदेशांचा समतोल विकास करण्यासाठी भारतीय राज्यघटनेच्या कलम ३७१(२) नुसार १९९४ मध्ये विदर्भ वैधानिक विकास मंडळ, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ आणि उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्यात आली. वैधानिक विकास मंडळाची स्थापना हे त्या अर्थाने विकेंद्रित नियोजनाचे एक मूर्त रूप आहे. परंतु वैधानिक विकास मंडळाच्या कार्याचे मूल्यमापन केल्यास असे आढळून येते की, विकास मंडळाच्या स्थापनेमुळे प्रदेशांचा अनुशेष कमी होत असला तरी प्रदेशातील प्राधान्य क्षेत्रांना केंद्रबिंदू मानून विकासाची दीर्घकालीन व्यूहरचना तयार करण्यामध्ये विकास मंडळांना अद्यापही म्हणावे तसे अपेक्षित यश प्राप्त झाले नाही. प्रदेशनिहाय वित्तीय निधीचे असमान वितरण, विकसित प्रदेशाकडे विकास निधीचे हस्तांतरण, अविभाज्य निधीचे वाढते प्रमाण, विशेष विकास निधीचे विशिष्ट जिल्ह्यामध्ये केंद्रीकरण, विभिन्न विकास प्रकल्पांच्या मंजुरीकरिता प्रशासकीय विलंब यामुळे समतोल प्रादेशिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये विकास मंडळे मागे असल्याचे दिसते. तात्पर्य, महाराष्ट्र राज्य एकीकडे औद्योगिक विकासामध्ये अग्रेसर असले तरी विभिन्न प्रदेशामध्ये विकासाच्या बाबतीत तफावत आढळते. एकाच राज्याच्या तीन प्रदेशांमध्ये विकासाच्या विभिन्न निर्धारकांच्या पातळीमध्ये कमालीची तफावत असणे; ही बाब महाराष्ट्र राज्याच्या प्रादेशिक असमतोलाला प्रामुख्याने अधोरेखित करते. औद्योगिकदृष्ट्या विकसित महाराष्ट्रामध्ये प्रादेशिक असमतोल निर्माण होण्यामध्ये वैधानिक विकास मंडळाची भूमिका काय? तसेच प्रादेशिक असमतोल निर्माण होणाऱ्या जबाबदार कारणांचा शोध घेऊन समतोल प्रादेशिक विकासाची शाश्वत व दीर्घकालीन व्यूहरचना कशी असावी? या दृष्टीने अध्ययन करण्याचा प्रयत्न सदर लेखामध्ये करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनात्मक लेख मुख्यतः समतोल प्रादेशिक विकासामध्ये वैधानिक विकास मंडळाच्या भूमिकेचे चिकित्सक अध्ययन करतो.

## २. वैधानिक विकास मंडळाचा ऐतिहासिक मागोवा

समतोल प्रादेशिक विकासासाठी वैधानिक विकास मंडळाची स्थापना अलीकडील काळामध्ये चर्चिला जाणारा प्रश्न असला तरी त्याचे संदर्भ एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी आढळून येतात. ऐतिहासिक अध्ययनावरून असे निरीक्षणास येते की, वैधानिक विकास मंडळाची स्थापना महाविदर्भ चळवळीशी (१९०५) संबंधित आहे. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी विदर्भ प्रदेश हा मध्यप्रदेश व बेरारमध्ये, मराठवाडा प्रदेश हैद्राबाद प्रांतामध्ये तर पश्चिम महाराष्ट्र मुंबई प्रांतामध्ये समाविष्ट होता. मध्यप्रांत व बेरार आणि हैद्राबाद प्रांत हे मुंबई प्रांताच्या तुलनेमध्ये मागासलेली होती. प्रदेशाच्या मागासलेपणामुळे प्रशासकीय सुलभतेसाठी राज्याचे तीन भागामध्ये विभाजन करून स्वतंत्र विदर्भ राज्याची निर्मिती करावी; असे प्रयत्न प्रारंभीच्या नागपूर कराराच्या रूपाने दिसून येतात. अशीच शिफारस राज्य पुनर्रचना आयोगाने आपल्या अहवालामध्ये प्रतिपादित केली होती. परंतु भारत सरकारने राज्यातील तिन्ही प्रदेशांचा समतोल विकास करण्यासाठी राज्यघटनेचे कलम ३७१(२) नुसार स्वतंत्र प्रादेशिक विकास मंडळाची स्थापना करण्यावर भर दिला. नंतरच्या काळामध्ये तीनही प्रदेश महाराष्ट्र राज्यामध्ये समाविष्ट करण्यात आले. वैधानिक विकास मंडळाच्या ऐतिहासिक आढाव्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे.

### २.१ नागपूर करार

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संवैधानिक मार्गाने प्रादेशिक विकास मंडळे स्थापन झाली असली तरी असे प्रयत्न यापूर्वी नागपूर कराराच्या माध्यमातून झालेले दिसतात. प्रशासकीयदृष्ट्या राज्याचे तीन प्रदेशांमध्ये विभाजन असावे, असा ठराव २८ सप्टेंबर १९५३ मध्ये विदर्भातील नेतेमंडळींद्वारे मंजूर करण्यात आला, त्यालाच 'नागपूर करार' असे म्हणतात. नागपूर ही राजधानी मानून प्रदेशातील लोकसंख्येच्या प्रमाणात विकास निधीचे वाटप, सरकार स्थापन करताना प्रदेशातील लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व, व्यवसाय प्रशिक्षण व विशेषीकृत व्यवसाय प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रदेशातील लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व, उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणुकांमध्ये सेवेतील अधिकारी व वकिलांना पुरेसे प्रतिनिधित्व, शासनाच्या व शासन नियंत्रित सर्व श्रेणीतील नोकर भरतीमध्ये प्रदेशातील लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व, प्रशासनाचे विकेंद्रीकरण, शासनाचे कार्यस्थान दरवर्षी निश्चित कालावधीसाठी हलविणे व दरवर्षी राज्य विधिमंडळाचे किमान एक अधिवेशन नागपूर येथे भरविणे या बाबींचा समावेश होता (Khandewale & Others:2021). त्याचप्रमाणे प्रदेशाचा मागासलेपणा दूर करण्यासाठी विदर्भ हे स्वतंत्र राज्य म्हणून निर्माण व्हावे, अशी मागणी महाविदर्भ चळवळीतील प्रमुख नेतेमंडळींची होती. नागपूर करार जरी संवैधानिक मार्गाची चौकट नसली तरी करारातील अंतर्भूत बाबी प्रदेशाचा दीर्घकालीन समतोल विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण होत्या. या बाबींची पूर्तता न झाल्यामळे प्रादेशिक असमतोलाची स्थिती अद्यापही विद्यमान असल्याचे प्रत्ययास येते.

### २.२ राज्य पुनर्रचना आयोग

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विभिन्न प्रदेशाची संरचना नव्याने आखण्यासाठी भारत सरकारने २९ डिसेंबर १९५५ रोजी फाझल अली यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना केली. दिनांक १० ऑक्टोबर १९५५ रोजी राज्य पुनर्रचना आयोगाचा अहवाल प्रकाशित झाला. राज्य पुनर्रचना आयोगाने द्विभाषी राज्याची शिफारस केली. ज्यामध्ये मराठी भाषिक मुंबई व हैद्राबाद आणि गुजराती भाषिक मुंबई, सौराष्ट्र व कच्छ प्रदेशांचा समावेश होता. त्याचप्रमाणे विदर्भ प्रदेशाचा मागासलेपणा, असमतोल विकास आणि प्रदेशातील लोकांमध्ये दुर्लक्षित असल्याची भावना या आधारावर

स्वतंत्र विदर्भ राज्याची शिफारस केली (Planning Commission:2003). परंतु भारत सरकारने स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीकडे लक्ष न देता घटनादुरुस्ती करून प्रादेशिक विकास मंडळे स्थापण्याचे निश्चित केले.

**२.३ राज्यघटनेचे कलम ३७१(२) व शासकीय आश्वासने**

राज्याच्या स्थापनेच्यावेळी मध्यप्रांत व बेरार आणि हैद्राबाद प्रांत हे मुंबई प्रांताच्या तुलनेमध्ये मागासलेली होती. भारत सरकारने राज्यातील तिन्ही प्रदेशांचा समतोल विकास करण्यासाठी १९५६ मध्ये, भारतीय राज्यघटनेच्या सातव्या घटनादुरुस्तीनुसार कलम ३७१(२) लागू केले. कलम ३७१(२) जरी राज्यघटनेची चौकट असली तरी असे प्रयत्न १९५३ मध्ये गैर-संवैधानिक मार्गाच्या (नागपूर करार) रूपाने झाल्याचे दिसते. कलम ३७१(२) नुसार भाषिक आधारावर राज्याची पुनर्रचना करून राज्यातील विभिन्न प्रदेशांचा मागासलेपणा दूर करण्यासाठी स्वतंत्र प्रादेशिक विकास मंडळाची स्थापना करण्याचे निश्चित करण्यात आले (Planning Commission: 2003). नंतरच्या काळामध्ये १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची (राज्यघटनेच्या नवव्या घटनादुरुस्तीनुसार १९५६) निर्मिती होऊन त्यामध्ये मुंबई, मध्यप्रदेश व हैद्राबाद हे मराठी भाषिक प्रांत विलीन केले.

विदर्भातील तज्ज्ञ नेतेमंडळींनी प्रदेशाचा मागासलेपणा प्रकर्षाने मांडून भाषिक आधारावर स्वतंत्र विदर्भ राज्याचे वेळोवेळी समर्थन केले. स्वतंत्र विदर्भाची मागणी किती प्रासंगिक आहे, याचे प्रत्यंतर डॉ. बी. आर. आंबेडकरांच्या युक्तिवादावरून लक्षात येते. डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी प्रशासनिक सुलभतेसाठी 'एक राज्य- एक भाषा' या तत्त्वाचा पुरस्कार केला. मिश्र प्रांतीय व्यवस्थेमध्ये लोकसंख्येचे विभिन्न गटामध्ये विभाजन होऊन राजकीय सत्ता स्थापन करण्यासाठी निर्माण होणारी स्पर्धा ही बाब सुलभ प्रशासनाच्या दृष्टीने हितावह नाही. लोकशाहीचे प्रभावीरीत्या संचालन करण्यासाठी एकजिनसी लोकसंख्येच्या समुदायाचे अस्तित्व आवश्यक असून त्यासाठी महाराष्ट्राचे चार भागामध्ये विभाजन असावे; असे प्रतिपादन केले (Dr.B. R. Ambedkar Writing and Speeches: 2019). महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर राज्य सरकारने विकास मंडळाची स्थापना करून समतोल विकासाबाबत वेळोवेळी आश्वस्त केले. वाय. बी. चव्हाण (तात्कालीन मुख्यमंत्री, म. रा.) यांनी विधानसभेला संबोधित करताना प्रतिपादित केले की, 'राज्याच्या स्थापनेवेळी विदर्भ, मराठवाडा, कोकण प्रदेश हे उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेमध्ये कमी प्रगत असून, या प्रदेशांच्या विकासासाठी सरकारद्वारे सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. समतोल प्रादेशिक विकासाच्या दृष्टीने विकास मंडळे स्थापन करून प्रदेशनिहाय होणाऱ्या खर्चाचे वितरण आणि विकास मंडळाची कार्यपद्धती याविषयीचा अहवाल दरवर्षी विधानसभेपुढे सादर केला जाईल' (Item 73, Maharashtra Legislative Assembly 1963-64).

मुळात आर्थिक नियोजनाचा प्राथमिक एकक प्रदेश असावा की जिल्हा असावा, याबाबत नियोजनकर्त्यांमध्ये संभ्रम असल्याचे दिसते. याची प्रचिती व्ही. पी. नाईक (तात्कालीन मुख्यमंत्री, म. रा.) यांच्या विधानावरून येऊ शकेल. '.... राज्याच्या स्थापनेनंतर एकूण राज्याच्या आर्थिक मागासलेपणाची स्थिती लक्षात घेता विशिष्ट प्रदेशांना मागास ठरविणे संयुक्तिक होणार नाही. जिल्हा हा नियोजनाचा प्राथमिक एकक प्रमाण मानून त्यानुसार आर्थिक धोरणे राबविणे हे समतोल प्रादेशिक विकासाच्या दृष्टीने अधिक उचित ठरू शकेल. समतोल विकास साध्य करण्यासाठी प्रदेश हा नियोजनाचा एकक न मानता जिल्हा प्रमाण मानून जिल्ह्यातील विविध सामाजिक-आर्थिक घटकाच्या सापेक्ष विकास पातळीचे अवलोकन करण्यासाठी राज्य शासनाद्वारे अभ्यास

समितीचे गठन केले जाईल' (FFC 1984). परिणामतः जिल्हा हा नियोजनाचा मूलभूत व प्राथमिक एकक लक्षात घेऊन आर्थिक विकासाच्या सापेक्ष पातळीतील अंतर मोजण्यासाठी सरकारद्वारे विभिन्न अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली आणि समतोल प्रादेशिक विकासासाठी विकास मंडळाची स्थापना करण्याची शासकीय वचनबद्धता काही काळासाठी लांबणीवर पडली.

**३. प्रादेशिक समतोल व अभ्यास समिती**

राज्य स्थापनेच्या प्रारंभीच्या दोन दशकामध्ये विकासाच्या विभिन्न निर्धारकांच्याबाबतीत असमतोलपणा कमी-अधिक असला तरी असमतोलाच्या प्रश्नाने फारसे गंभीर स्वरूप निर्माण केले नव्हते. राज्याच्या तिन्ही प्रदेशामध्ये वास्तविक प्रतिव्यक्ती उत्पन्न आणि विकास दर यामध्ये वाढ होत होती. परंतु नंतरच्या काळामध्ये राज्याच्या विकासदरामध्ये प्रदेशनिहाय उच्चावचने आढळून येतात (Kelkar Committee:2017). साधारणतः १९८० च्या दशकापासून राज्यातील प्रादेशिक असमतोलाच्या प्रश्नाकडे नियोजनकारांचे लक्ष वेधले गेले. सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये (१९८०-८५) रस्ते, सिंचन, सार्वजनिक आरोग्य, तंत्रशिक्षण या क्षेत्रामध्ये विभिन्न प्रदेशामध्ये विकासाच्या बाबतीत विसंगती दिसून आली. विकासाच्या विभिन्न निर्धारकांमधील तफावत कमी करण्यासाठी राज्यसरकारने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी क्रमशः ३८-कलमी, ३५-कलमी आणि १७-कलमी कार्यक्रमांचा अवलंब केला (Planning Commission:2003). प्रादेशिक असमतोलाच्या विभिन्न कारणांच्या शोध घेऊन असमतोलाची तीव्रता कमी करण्यासाठी राज्य सरकारने विविध प्रकारचे अभ्यासगट व विकास मंडळाची स्थापना केली. ज्यामध्ये सत्यशोधन समिती (FFC1984), निर्धारके व अनुशेष समिती (I&BC:1994 and 2000), समतोल प्रादेशिक विकासासाठी उच्च-स्तरीय समिती (Kelkar Committee:2013) चा समावेश होतो. विभिन्न समित्यांनी प्रदेशांच्या विभिन्न क्षेत्रातील निर्धारकांचा अभ्यास करून आर्थिक-सामाजिक आधारभूत संरचनेतील तफावत (अनुशेष) कमी करण्यासाठी पर्याप्त प्रमाणात वित्तीय संसाधनाच्या वितरणावर भर दिला. प्रादेशिक असमतोलाच्या कारणांचे स्वरूप व तीव्रता याबाबत विभिन्न अभ्यासगटाची निरीक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

**३.१ सत्यशोधन समिती**

राज्याच्या प्रादेशिक विकासातील वाढता असमतोलपणा आणि अनुशेषाचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने जुलै १९८३ मध्ये व्ही. एम. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समितीची (Fact Finding Committee) स्थापना केली. समितीने तीन प्रदेशातील विभिन्न क्षेत्रातील विसंगती व अनुशेषाची चौकशी करून एप्रिल १९८४ मध्ये अहवाल सादर केला आणि तीनही प्रदेशातील प्रमुख ९ क्षेत्रामध्ये (२९ उप-क्षेत्रे) प्रादेशिक विसंगती असल्याचे निरीक्षण नोंदविले. ज्यामध्ये रस्ते, सिंचन, ग्रामीण विद्युतीकरण, सामान्य शिक्षण, तंत्रशिक्षण, सार्वजनिक आरोग्यसुविधा, पाणीपुरवठा, भूमिविकास व भू-संवर्धन आणि पशुवैद्यकीय सेवा इत्यादींचा समावेश होता. समितीच्या मते, राज्याच्या एकूण भौतिक अनुशेषामध्ये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राचे प्रमाण क्रमशः ३९.१%, २३.६% व ३७.३% होते. विभिन्न निर्धारकांमध्ये रस्ते व सिंचन क्षेत्रामध्ये विसंगती अधिक असून सिंचन क्षेत्रामध्ये प्रामुख्याने ३०३ हजार हेक्टरचा भौतिक अनुशेष असल्याचे प्रतिपादित केले. या क्षेत्रातील विकासाचा अनुशेष दूर करण्यासाठी रु. ३१८६.७८ कोटी वित्तीय संसाधनाची आवश्यकता असल्याचे समितीने अधोरेखित केले (FFC: 1984). त्याचप्रमाणे विभिन्न प्रदेशांचा समतोल विकास करण्यासाठी विशेष

विकास प्रतिवर्ष निधी रु. १०० कोटी तरतूद करण्याचे प्रतिपादित केले. राज्य सरकारने आंशिक स्वरूपामध्ये समितीच्या शिफारशी मान्य करून विकासातील अनुशेष कमी करण्यासाठी १९८५-९४ कालावधीमध्ये रु. ३१५६ कोटी खर्च केले. परंतु विदर्भ व मराठवाडा प्रदेशाचा अनुशेष हा नंतरच्या काळामध्ये वाढत जाऊन उर्वरित महाराष्ट्राचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते. परिणामतः विकासाच्या प्रक्रियेमध्ये उर्वरित महाराष्ट्र अग्रगामी राहून तुलनेने मराठवाडा व विदर्भ प्रदेश कमी प्रगत असल्याचे दिसते.

### ३.२ निर्धारके आणि अनुशेष समिती

विभिन्न प्रदेशांच्या विकास पातळीचे सापेक्ष मूल्यमापन करण्यासाठी त्याचप्रमाणे विभिन्न क्षेत्रातील अनुशेषाची गणना करण्यासाठी राज्य सरकारने १९९४ मध्ये भुजंगराव कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली निर्धारके व अनुशेष समितीची स्थापना केली. ज्यामध्ये सत्यशोधन समितीद्वारे विचारात घेण्यात आलेल्या ९ क्षेत्राचा समावेश होता. समितीनुसार या क्षेत्रातील विकासाचा एकूण अनुशेष रु. १५३५५.७७ कोटी होता. त्यामध्ये विदर्भ व मराठवाडा प्रदेशाचा अनुशेष वाढत असून उर्वरित महाराष्ट्राचे प्रमाण कमी होत असल्याचे स्पष्ट केले (Indicatros & Backlog Committee: 1997). विकासाच्या अनुशेषातील वास्तविक परिस्थितीचा बोध होण्यासाठी राज्य सरकारने २००० मध्ये निर्धारके व अनुशेष समितीचे पुनर्गठन केले. त्यानुसार १५ अतिरिक्त क्षेत्रांचा अंतर्भाव करण्यात आला. ज्यामध्ये विद्युतीकरण, कृषी, सामाजिक कल्याण, महिला विकास, अनुसूचित जाती व जमाती कल्याण, नागरी विकास, वाहतूक सेवा, गरिबी व बेरोजगारी निर्मूलनाचे कार्यक्रम, सार्वजनिक सेवा, श्रमिक कल्याण, सहकारिता, वित्तसुविधा, कृषी उद्योग इत्यादी क्षेत्रांचा समावेश होता. विभिन्न निर्धारकांमध्ये सिंचन व रस्ते क्षेत्रांचा अनुशेष अधिक असून एकूण अनुशेषामध्ये हे प्रमाण ७०% होते. विशेषतः सिंचनाच्या वित्तीय अनुशेषाचे प्रमाण हे ५३% असून भौतिक अनुशेषाचे प्रमाण ९४५.३ हजार हेक्टर होते (Planning Commission:2003). दोन्ही अभ्यासगटाच्या अहवालातून लक्षात येते की, १९८४-२००२ या कालावधीमध्ये विदर्भ व मराठवाडा प्रदेशाचा वित्तीय व भौतिक अनुशेष हा उर्वरित महाराष्ट्रापेक्षा अधिक होता. एकूण अनुशेषामध्ये विदर्भाचे प्रमाण ३९.१२% वरून ४८.३७% पर्यंत वाढले, तुलनेने मराठवाड्याचे प्रमाण २३.५६% वरून २९.३८% झाले. उलट उर्वरित महाराष्ट्राचे अनुशेषाचे प्रमाण ३७.२२% वरून २२.२५% पर्यंत कमी झाल्याचे दिसते. एकीकडे उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष कमी होत असताना विदर्भ व मराठवाडा प्रदेशाचा वाढता अनुशेष (विशेषतः सिंचनाचा वाढता अनुशेष) ही बाब राज्याच्या प्रादेशिक विसंगतीला प्रामुख्याने दृष्टिगोचर करते.

तात्पर्य रूपाने असे म्हणता येईल की, प्रदेशनिहाय वित्तीय संसाधनाचे असमान वितरण झाल्यामुळे राज्याच्या तिन्ही प्रदेशामध्ये विकासाच्या बाबतीत लक्षणीय तफावत होती. प्रदेशाच्या अनुशेष निर्मूलनामध्ये वार्षिक अंदाजपत्रकीय संसाधने व अतिरिक्त अंदाजपत्रकीय संसाधनांचा अल्प वापर, विशेष विकास निधीचे विशिष्ट जिल्ह्यामध्ये केंद्रीकरण, निर्धारके गणनापद्धतीतील गुंतागुंत तसेच खाजगी क्षेत्रातील सुविधेकडे दुर्लक्ष या कारणांमुळे विभिन्न प्रदेशामध्ये विकासातील विसंगती वाढल्याचे लक्षात येते. प्रदेशांचा मागासलेपणा दूर करण्यासाठी १९९४ मध्ये तीनही प्रदेशासाठी स्वतंत्र वैधानिक विकास स्थापन करण्यात आली व त्यानुसार प्रदेशांचा विकास करण्याचे प्रयत्न झाले. वैधानिक विकास मंडळे व कार्यक्षमतेचे मूल्यमापनाचे विश्लेषण प्रकरण ४ आणि ५ मध्ये केले आहे.

### ३.३ समतोल प्रादेशिक विकासासाठी उच्चस्तरीय समिती

महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासासाठी राज्य सरकारने विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली २०११ मध्ये समतोल प्रादेशिक विकासासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन केली. समितीने मागासलेपणाच्या अनुशेषावर भर न देता प्रदेशनिहाय अपर्याप्त आर्थिक-सामाजिक आधारभूत संरचना, भांडवली गुंतवणुकीचे असमान वितरण व प्रतिव्यक्ती उत्पन्न वृद्धिदरातील भिन्नता यामुळे प्रादेशिक असमतोल असल्याचे स्पष्ट केले. समितीनुसार १९९३-९४ ते १९९९-०० या कालावधीमध्ये प्रदेशनिहाय प्रतिव्यक्ती उत्पन्न वृद्धिदरातील विसंगती कमी दराने वाढली; परंतु २०००-०१ ते २००९-१० कालावधीमध्ये यामध्ये वाढ झाली. या कालावधीमध्ये विदर्भ व मराठवाडा प्रदेशातील प्रतिव्यक्ती उत्पन्नाची पातळी ही उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेमध्ये अनुक्रमे २७% व ४०% नी कमी असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे. समितीने विदर्भ व मराठवाडा प्रदेशातील कृषी व संबंधित क्षेत्राचा नकारात्मक वृद्धिदरामुळे मूलभूत प्रादेशिक विसंगतीचे चित्र अधोरेखित केले. विदर्भ प्रदेशातील कृषी व संबंधित क्षेत्राचा मागासलेपणा (विशेषतः अमरावती विभाग), पर्याप्त सिंचन सुविधेची कमतरता, शहरीकेंद्रित औद्योगिक व सेवाक्षेत्राचा स्थापनाविस्तार तसेच प्रदेशनिहाय विकास निधीचे अप्रमाणशीर वितरण यामुळे विदर्भ व मराठवाडा प्रदेश अधिक मागासलेला आहे. हा मागासलेपणा मुख्यतः संचारयंत्रणा, शिक्षण व कौशल्य विकास, आरोग्य, वित्त आणि विद्युत उपलब्धता इत्यादी क्षेत्रामध्ये दृष्टिगोचर होतो असे समितीने स्पष्ट केले आहे. समितीच्या मते, विभिन्न निर्धारकांमधील विकास अंतर विदर्भ व मराठवाडा प्रदेशामध्ये अनुक्रमे ०.३९ व ०.३७ असून उर्वरित महाराष्ट्रामध्ये हे प्रमाण ०.२४ आहे (Kelkar Committee:2013). समतोल प्रादेशिक विकासासाठी वित्तीय संसाधनाच्या समन्यायी वितरणाबरोबर संस्थात्मक यंत्रणेचे बळकटीकरण आवश्यक असल्याचे समितीने स्पष्ट केले.

### ४. राज्यघटनेचे कलम ३७१(२) व वैधानिक विकास मंडळाची स्थापना

तिन्ही प्रदेशांचा समतोल विकास करण्यासाठी राज्य सरकारने सत्यशोधन समिती तसेच निर्धारके व अनुशेष अभ्यासगटांची स्थापना केली. या अभ्यासगटांनी प्रादेशिक मागासलेपणाच्या विभिन्न कारणांचा शोध घेऊन मागासलेपणाचा अनुशेष कमी करण्यासाठी वित्तीय संसाधनाचे समन्यायी वाटप करण्याची शिफारस केली. अभ्यासगटाच्या शिफारसीनुसार राज्यसरकारने अनुशेष कमी करण्यासाठी प्रदेशनिहाय वित्तीय संसाधनाचे वाटप केले. परंतु १९८०-९४ या कालावधीमध्ये तिन्ही प्रदेशाचा विकास असमान पद्धतीने होऊन विदर्भ व मराठवाडा प्रदेशातील विकासाचा अनुशेष सतत वाढत राहिला. विभिन्न प्रदेशांचा मागासलेपणा दूर करण्यासाठी राज्यघटनेचे कलम ३७१(२) (सातवी घटनादुरुस्ती १९५६) नुसार प्रादेशिक विकास मंडळे स्थापन करण्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार मान. राष्ट्रपतींनी ९ मार्च १९९४ ला वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्याचा ठराव संमत करून राज्यपालांना विकास मंडळे स्थापन करण्याचे निर्देश दिले. दिनांक ३० एप्रिल १९९४ रोजी तीनही प्रदेशासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळे गठित करण्यात आली आणि समतोल प्रादेशिक विकासाच्या अवलोकनाकरिता मान. राज्यपालावर विशेष जबाबदारी निश्चित करण्यात आली. राज्यघटनेचे कलम ३७१(२) ही संवैधानिक व्यवस्था असल्यामुळे कलमातील निहित बाबींची पूर्तता करणे क्रमप्राप्त ठरते. कलम ३७१(२) मध्ये पुढील बाबींचा अंतर्भाव होतो.

अ) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र प्रदेशांचा समतोल विकास करण्यासाठी विशेष विकास मंडळे स्थापन करणे.

ब) प्रदेशांच्या विकासपूर्ततेसाठी विकास निधीचे समन्यायी वाटप करणे.

क) सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधांचे समान वितरण तसेच पर्याप्त रोजगारीच्या संधी निर्माण करणे.

### ४.१ वैधानिक विकास मंडळे व कलमातील बाबींची पूर्तता

राज्याच्या प्रादेशिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारने ३० एप्रिल १९९४ रोजी तीन वैधानिक विकास मंडळांची स्थापना केली. ज्यामध्ये विदर्भ वैधानिक विकास मंडळ, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ आणि उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचा समावेश होता. कलमातील निहित उर्वरित दोन बाबींच्या पूर्ततेचे विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

### ४.१.१ प्रदेशनिहाय वित्तीय निधी व खर्च वितरणातील प्रवृत्ती

राज्यघटनेचे कलम ३७१(२) नुसार प्रदेशांच्या विकासपूर्ततेसाठी विकास निधीचे समन्यायी वाटप होणे अपेक्षित आहे. परंतु विभिन्न प्रदेशांसाठी विकास निधीची होणारी तरतूद व प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण यामध्ये भिन्नतेची प्रवृत्ती आढळून येते. त्याच्या परिणाम प्रदेशांच्या असमतोलामध्ये प्रतिबिंबित होतो. प्रादेशिक असमतोलपणा दूर करण्यासाठी विशिष्ट कालावधीमध्ये विभिन्न प्रदेशांसाठी वित्तीय संसाधनाची पर्याप्त प्रमाणात तरतूद होणे आवश्यक आहे. जेणेकरून प्रदेशाच्या विभिन्न क्षेत्रातील वाढता अनुशेष कमी करणे सुलभ होईल, अशी शिफारस दोन्ही अभ्यासगटांनी (FFC and I&BC) केली. परंतु विदर्भ व मराठवाड्याच्या तुलनेमध्ये उर्वरित महाराष्ट्राला अधिकाधिक वित्तीय निधी उपलब्ध झाल्याचे दिसून येते. तक्ता क्र. १ मध्ये विभिन्न पंचवार्षिक योजना तसेच वार्षिक योजनेतील तरतूद निधी व प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण तपासले असता असे लक्षात येते की, प्रदेशनिहाय एकूण तरतूद निधीच्या प्रमाणात वाढ होत असताना प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण उत्तरोत्तर कमी होत गेले. त्याचप्रमाणे विभिन्न पंचवार्षिक योजना व वार्षिक खर्चाचे वितरण हे विदर्भ व मराठवाड्याच्या तुलनेमध्ये उर्वरित महाराष्ट्राच्या बाजूने झाल्याचे दिसते.

वैधानिक विकास मंडळे स्थापन होण्याच्या अगोदर प्रदेशनिहाय प्रत्यक्ष खर्चाचे तरतुदीशी असलेले प्रमाण समाधानकारक होते. १९८५-८६ ते १९९३-९४ या कालखंडामध्ये उर्वरित महाराष्ट्राचे प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण ८४.६५% होते, तर विदर्भ व मराठवाडा प्रदेशाचे प्रमाण क्रमशः ९१% व ९०.०७% होते. विकास मंडळाच्या स्थापनेनंतर प्रत्यक्ष खर्चामध्ये उर्वरित महाराष्ट्राचे प्रमाण अधिक होऊन तुलनेने विदर्भ व मराठवाड्याचे प्रदेशामध्ये प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण कमी झाले. वार्षिक योजना २०१०-११ ते २०१७-१८ या काळामध्ये प्रत्यक्ष खर्चामध्ये विदर्भाचे प्रमाण ३०.८२% वरून २६% व मराठवाडा प्रदेशाचे प्रमाण १७% वरून १८% झाले. याउलट उर्वरित महाराष्ट्राचे प्रमाण ५२% वरून ५५% पर्यंत वाढलेले दिसते. दुसऱ्या शब्दामध्ये असे म्हणता येईल की, प्रत्यक्ष खर्चामध्ये सर्वाधिक प्रमाण उर्वरित महाराष्ट्राचे (५०% पेक्षा अधिक) असून विदर्भ (२५%) व मराठवाड्याचे प्रमाण (१९%) उत्तरोत्तर कमी होत आहे. उपलब्ध निधीचे प्रदेशनिहाय असमान वितरणामुळे अभ्यासगटांनी निर्धारित केलेल्या क्षेत्राला पर्याप्त प्रमाणात निधी उपलब्ध होऊ शकला नाही. परिणामतः विदर्भ व मराठवाडा प्रदेशातील सिंचनाचा अनुशेष वाढत असताना उर्वरित महाराष्ट्रातील अनुशेष उत्तरोत्तर कमी झालेला दृष्टीस पडतो. सिंचन क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी राज्य सरकारने वैधानिक विकास मंडळाच्या स्थापनेनंतर सिंचन विकास महामंडळ स्थापन करून वाढीव निधीची तरतूद केली. त्यानुसार उर्वरित महाराष्ट्रामध्ये कृष्णा खोरे सिंचन विकास महामंडळ, मराठवाडा सिंचन विकास महामंडळ व विदर्भ सिंचन विकास महामंडळाची स्थापना केली. परंतु सर्वाधिक निधी हा कृष्णा खोरे सिंचन

**तक्ता क्र. १ : प्रदेशनिहाय वित्तीय तरतूद व खर्चाची प्रवृत्ती**

(रु. कोटीमध्ये)

| योजना | विदर्भ | | मराठवाडा | | उर्वरित महाराष्ट्र | | अविभाज्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रत्यक्ष खर्च | खर्चाचे तरतुदीशी प्रमाण (%) | प्रत्यक्ष खर्च | खर्चाच तरतुदीशी प्रमाण (%) | प्रत्यक्ष खर्च | खर्चाचे तरतुदीशी प्रमाण (%) | खर्चाचे एकूण तरतुदीशी प्रमाण (%) |
| सातवी योजना (१९८५-९०) | ४८७.८४ | ८९.७० | ३९७.१८ | १०४.१६ | ५६२.१२ | ७७.५४ | - |
| आठवी योजना (१९९२-९७) | १२९०.६३ | १००.५८ | ७५१.८ | ९८.९८ | ११०७.१५ | १०५.१० | - |
| नववी योजना (१९९७-०२) | २३०५.०६ | ७७.५४ | १५८३.६५ | ९४.३७ | १६४६.६१ | ९६.१९ | - |
| २०१०-११* | ८८१८.६४ | ३०.८२ | ४९७१.३० | १७.३७ | १४८१८.८४ | ५१.७९ | १३.४३ |
| २०१५-१६* | १५२८५.६४ | ३२.०९ | ८५८६.३४ | १८.०३ | २३७५०.२० | ४९.८७ | १४.६६ |
| २०१६-१७* | १७०६२.४२ | ३०.७० | ११०१६.०२ | १९.८२ | २७४८३.६९ | ४९.४६ | १०.८२ |
| २०१७-१८* | १६६०२.५१ | २६.४१ | ११५७४.४१ | १८.४१ | ३४६७८.२३ | ५५.१७ | २९.०३ |
| २०२१-२२ | २४८०७.८९ | २६.०० | १७७५८.०१ | १८.६२ | ५२८१७.७६ | ५५.३८ | २६.६३ |

**स्रोत :** Planning Commission (2003), GoI. Pg. 38; *Department of Planning (2020) and Budget Estimate, Department of Finance (2022), GoM

विकास महामंडळाला पुरविण्यात येऊन विदर्भ व मराठवाडा सिंचन महामंडळाला तुलनेने कमी निधी प्राप्त झाला. परिणामतः विदर्भ व मराठवाडा प्रदेशातील कृषिक्षेत्र निसर्गावर निर्भर राहून प्रादेशिक विसंगती प्रकर्षाने दृष्टिगोचर होते. २०१०-११ पासून प्रदेशनिहाय वित्तीय तरतुदीमध्ये अविभाज्य खर्चाचे प्रमाण सतत वाढत आहे. एकूण वित्तीय तरतुदीमध्ये अविभाज्य खर्चाचे प्रमाण २०१०-११ मध्ये १३.४३% होते; ते २०१७-१८ मध्ये वाढून २९% झाले. विदर्भ व मराठवाडा प्रदेशावर अधिक खर्च अपेक्षित असताना अविभाज्य निधीची तरतूद करून उपलब्ध निधी उर्वरित महाराष्ट्राकडे हस्तांतरित होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे सरकारने अंदाजपत्रकीय व गैर-अंदाजपत्रकीय साधनांद्वारे वित्तीय निधीमध्ये जरी वाढ केली असली तरी हे प्रमाण वार्षिक योजनेच्या केवळ १०% ते १५% होते. वास्तविकता संवैधानिक विकास मंडळे स्थापन झाल्यानंतर विदर्भ व मराठवाडा प्रदेशांना पर्याप्त प्रमाणात निधी प्राप्त होऊन असमतोलपणा कमी होणे अपेक्षित होते. परंतु अनुशेष निधीचे प्रदेशनिहाय निर्धारण राज्य नियोजन मंडळामार्फत केले जाऊन विकास मंडळांना तुलनेने अधिकार कमी आहे. त्याचा परिणाम उर्वरित महाराष्ट्राच्या सिंचन अनुशेष कमी होऊन विदर्भ व मराठवाड्यामध्ये वाढताना दिसतो. तात्पर्य, प्रदेशनिहाय वित्तीय निधीचे असमान वितरण ही बाब भारतीय राज्यघटनेच्या कलम ३७१(२) चे उल्लंघन करणारी ठरते.

### ४.१.२ प्रदेशनिहाय औद्योगिक स्थापना विस्तार आणि रोजगार

प्रदेशनिहाय वित्तीय निधीच्या असमान वितरणामुळे त्याचा कमीअधिक परिणाम शैक्षणिक सुविधा व रोजगारीच्या संधीमध्ये दिसतो. निर्धारके व अनुशेष समितीनुसार (१९९४) उर्वरित महाराष्ट्रामध्ये वैद्यकीय महाविद्यालयाची संख्या ६ असताना विदर्भामध्ये हे प्रमाण केवळ १ होते; तर मराठवाड्यामध्ये या सुविधेचा अभाव होता. परंतु नंतरच्या काळामध्ये सर्वप्रकारच्या शैक्षणिक सुविधांच्या बाबतीत (ज्यामध्ये सामान्य शिक्षण, तंत्रशिक्षण, व्यावसायिक शिक्षण) विदर्भ व मराठवाडा प्रदेश उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेमध्ये पुढे आहे. २०१५-१६ मध्ये प्रतिलाख लोकसंख्येमागे शैक्षणिक संस्थांची संख्या उर्वरित महाराष्ट्रामध्ये ८२ असताना मराठवाडा व विदर्भामध्ये अनुक्रमे १०९ व १०३ आहे; जी राज्याच्या सरासरीपेक्षा (९१) अधिक आहे (Mahades:2015-16). शैक्षणिक सुविधा पर्याप्त प्रमाणात उपलब्ध असल्या तरी अशी परिस्थिती औद्योगिक स्थापनाविस्तार व रोजगार संधीच्या बाबतीत दिसून येत नाही. प्रदेशनिहाय रोजगारीच्या संधीमध्ये तफावत दिसते. मुळात महाराष्ट्र हे देशातील प्रमुख औद्योगिकप्रधान राज्य असले, तरी उद्योगांचा स्थापनाविस्तार प्रामुख्याने उर्वरित महाराष्ट्र (विशेषतः मुंबई, ठाणे, पुणे व नाशिक शहरे) व काही प्रमाणात मराठवाडा (औरंगाबाद शहर) येथेच झालेला दिसतो. परिणामतः कारखानदारी क्षेत्रातील रोजगारीच्या संधी या प्रदेशामध्येच मोठ्या प्रमाणात केंद्रीकृत झालेल्या दिसून येतात. सूक्ष्म-लघु व मध्यम उद्योग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातंर्गत औद्योगिक क्षेत्रे तसेच विशेष आर्थिक क्षेत्रे इत्यादींचा स्थापनाविस्तार प्रमुख्याने उर्वरित महाराष्ट्रामध्ये झालेला दिसून येतो. आर्थिक पाहणी (२०२०-२१) महाराष्ट्र शासनाच्या अहवालानुसार एकूण औद्योगिक क्षेत्रापैकी ७२% क्षेत्रे उर्वरित महाराष्ट्रामध्ये केंद्रित असून विदर्भ व मराठवाड्याचे प्रमाण क्रमशः १२% व १५% आहे. त्याचप्रमाणे एकूण विशेष आर्थिक क्षेत्रापैकी ३२ क्षेत्रे उर्वरित महाराष्ट्रामध्ये स्थापित असून विदर्भ व मराठवाड्यामध्ये क्रमशः २ व ३ क्षेत्रे आहेत. एकाच प्रदेशामध्ये उद्योगांचे केंद्रीकरण झाल्यामुळे उद्योगातील गुंतवणूक व निर्मित रोजगारीच्या संधीमध्ये प्रदेशनिहाय तफावत आढळते. तक्ता क्र. २ नुसार मार्च २०१५-ऑक्टो. २०२० दरम्यान सूक्ष्म-लघु व मध्यम उद्योगांच्या स्थाननिश्चितीचे प्रमाण उर्वरित महाराष्ट्रामध्ये ७८% असून विदर्भ व मराठवाड्यामध्ये क्रमशः १२% व १०% आहे.

प्रदेशनिहाय लोकसंख्येच्या प्रमाणानुसार राज्य सरकारचे विभिन्न विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच राज्य सरकारच्या उपक्रमामध्ये उर्वरित महाराष्ट्राचे प्रमाण अधिक असून, विदर्भ व मराठवाडा प्रदेशाचे प्रमाण कमी आहे. विकास मंडळाच्या स्थापनेच्या रूपाने विकास प्रक्रियेचे विकेंद्रित स्वरूप असताना उद्योगांचा स्थापनाविस्तार आणि स्थाननिश्चिती ही मुख्यतः उर्वरित महाराष्ट्रामध्ये केंद्रित होणे ही बाब मागास प्रदेशातील नागरिकांना अप्रत्यक्षपणे रोजगारीची संधी नाकारण्यासारखे आहे. तात्पर्य, एकंदरीत असे लक्षात येते की, कारखानदारी क्षेत्रातील उद्योगांचा स्थापनाविस्तार, गुंतवणूक आणि रोजगारीच्या संदर्भात राज्यामध्ये प्रादेशिक विसंगती प्रकर्षाने आढळते.

### ५. वैधानिक विकास मंडळाची कार्ये

वैधानिक विकास मंडळे ही घटनात्मक चौकट असल्यामुळे विकास मंडळाच्या कार्याची मान. राज्यपालांकडून वेळोवेळी समीक्षा केली जाते. वैधानिक विकास मंडळाच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन मुख्यतः प्रादेशिक विसंगतीचे स्वरूप व तीव्रतेच्या संदर्भात प्रभावी कार्ययोजना, समतोल प्रादेशिक विकासासाठी दीर्घकालीन व्यूहरचना, मान. राज्यपालांच्या निर्देशांची

**तक्ता क्र. २ : विभागनिहाय औद्योगिक स्थापनाविस्तार व रोजगार संधी**

| विभाग | MSME संख्या | गुंतवणूक (रु. कोटी) | रोजगार (लाख) |
|---|---|---|---|
| कोकण | ३८६२०९ | ४८३१७ | २०.२४ |
| नाशिक | १५७५१५ | २५८४५ | ७.५३ |
| पुणे | ४०४०७८ | ६९८५६ | २३.५९ |
| औरंगाबाद | १८१३५५ | २५५०१ | ८.७९ |
| अमरावती | ६७२०६ | ७६१३ | २.५४ |
| नागपूर | २०४५४७ | १८७३७ | ६.७८ |
| एकूण | १७६७३५९ | २३८५४३ | ९१.०१ |

**स्रोत :** Economic Survey of Maharashtra (2020-21)

अंमलबजावणी, विशेष विकास निधीचा परिपूर्ण वापर या निकषांवर केले जाते. एकूणच विकास मंडळाला विशिष्ट निकषांच्या आधारावर कार्य करावे लागते. त्यानुसार वैधानिक विकास मंडळाच्या कार्यांना विशेष कार्ये व दैनंदिन कार्यामध्ये विभाजित केले जाते.

वैधानिक विकास मंडळाच्या विशेष कार्यामध्ये अ) प्रदेशाच्या विभिन्न क्षेत्रातील निर्धारकांच्या आधारावर विकासाची सापेक्ष पातळी निश्चित करणे. ब) विभिन्न विकास योजनांचा अनुशेष निर्मूलनावरील प्रभावाचे अध्ययन करणे. क) पंचवार्षिक योजना व वार्षिक योजनेमध्ये प्रदेशाच्या विकासासाठी विकास खर्चाच्या पातळीचे निर्धारण करणे, इत्यादींचा अंतर्भाव होतो. तर दैनंदिन कार्यामध्ये अ) विशेष विकास निधीच्या वापरासाठी प्रदेशाची विकास योजना तयार करणे. ब) विकास मंडळाच्या वार्षिक योजनेची अंमलबजावणी करून विकास खर्चाचा आढावा घेणे. क) प्रदेशामध्ये जाणीवजागृती कार्यक्रमाचा अवलंब करणे. ड) विकास मंडळाने प्रतिवर्ष वार्षिक अहवाल राज्यपालांकडे सादर करणे, या बाबींचा समावेश होतो (Annual Report of VSDB:1997).

### ५.१ वैधानिक विकास मंडळाच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन

वैधानिक विकास मंडळाचे कार्यक्षमतेच्या निकषावर मूल्यमापन केल्यास असे आढळते की, विकास मंडळाच्या शिफारशी राज्याच्या विकासप्रक्रियेला प्रत्यक्षपणे प्रभावित करीत नाही. मंडळाच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन बव्हंशीरीत्या राज्य नियोजन व वित्त विभागाच्या प्रतिसादावर निर्भर असलेले दिसते. उदा. विशेष विकास निधीचा वापर करण्यासाठी नियोजन व वित्त विभागाची संमती घेणे क्रमप्राप्त ठरत असल्यामुळे ठरावीक कालावधीमध्ये प्रदेशांना निधी प्राप्त होण्यास विलंब होतो. पर्याप्त प्रमाणात वित्तीय संसाधनाचा पुरवठा करण्यात नियोजन व वित्त विभागाच्या उदासीनतेमुळे मंडळाच्या कार्ययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही. हे जरी खरे असले तरी प्रदेशाचा अनुशेष कमी करण्यात विकास मंडळाच्या भूमिकेकडे दुर्लक्ष करता येणार नाही. विकास मंडळाच्या स्थापनेमुळे नियोजन प्रक्रियेमध्ये लक्षणीय बदल होऊन प्रदेशांचा अनुशेष कमी होण्यास हातभार लागला. १९८४-९४ काळामध्ये रु. ३१५६ कोटी खर्च करूनही प्रदेशनिहाय सामाजिक-आर्थिक आधारभूत संरचनेतील विसंगती ही सत्यशोधन समितीच्या निरीक्षणापेक्षा बिकट असल्याचे

विकास मंडळांनी सांख्यिकीय माहितीच्या आधारे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे सिंचनाचा अनुशेषाची गणना करताना उर्वरित महाराष्ट्र प्रदेशाला अधिक लाभ होऊन तुलनेने विदर्भ व मराठवाडा प्रदेश कमी प्रगत असल्याचे सप्रमाण दाखवून दिले. त्याचा परिमाण नंतरच्या काळामध्ये अधिक निधीची तरतूद होऊन विकासाचा अनुशेष काही प्रमाणात कमी झाल्याचे दिसते.

विभिन्न विकास योजनांच्या प्रभावाचे अध्ययन करण्यासाठी विकास मंडळांनी स्थानिक संशोधन संस्थांच्या सहभागाद्वारे २००१ पर्यंत एकूण २१ अध्ययन अहवाल तयार करून मान. राज्यपालांकडे सादर केले. विशेष विकास निधीचा वापर हा प्रदेशातील शिक्षण व आरोग्यक्षेत्रासाठी होत असला तरी त्याची उपलब्धता विशिष्ट जिल्ह्यापुरतीच मर्यादित असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे प्रदेशातील उपलब्ध संसाधनांचा वापर करून संसाधन-आधारित उद्योगाची स्थापना करणे, पर्यायाने दीर्घकालीन विकासाची व्यूहरचना निर्माण करण्यात विदर्भ वैधानिक विकास मंडळ व मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला अद्यापही म्हणावे तसे यश प्राप्त झालेले नाही. त्याचा परिमाण प्रदेशामध्ये आंतरजिल्हा विसंगती निर्माण झालेली दिसते. तात्पर्य, विकास मंडळाच्या स्थापनेमुळे प्रदेशांचा अनुशेष कमी होत असला तरी प्रदेशातील प्राधान्य क्षेत्रांना केंद्रबिंदू मानून विकासाची दीर्घकालीन व्यूहरचना तयार करण्यामध्ये विकास मंडळे मागे पडत आहे. परिणामतः समतोल प्रादेशिक विकासाचे उद्दिष्ट्य अद्यापही साध्य झालेले दिसत नाही.

### ६. प्रदेशनिहाय विकासाची सद्यस्थिती

प्रदेशनिहाय वित्तीय निधीचे असमान वितरण आणि अपर्याप्त रोजगारीच्या संधी यामुळे विदर्भ व मराठवाडा प्रदेश उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेमध्ये अद्यापही मागासलेले आहे. शासकीय स्तरावर विदर्भ व मराठवाड्याचा वित्तीय व भौतिक अनुशेष समाप्त झाला असे जाहीर होत असले तरी वास्तविक चित्र मात्र निराळेच आहे. वित्तीय संसाधनाचे नियोजन करताना उर्वरित महाराष्ट्राला अधिक प्राधान्य दिल्यामुळे या प्रदेशाचा वित्तीय व भौतिक अनुशेषाचा प्रश्न समाप्त झाला, हे मात्र खरे. परंतु अपुरी वित्तीय तरतूद व विकसित प्रदेशाकडे निधीचे हस्तांतरण यामुळे विदर्भ व मराठवाडा प्रदेशाचा सिंचनाचा भौतिक अनुशेषाचा प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे. त्याचप्रमाणे विभिन्न विकास निर्धारकांच्या बाबतीत विदर्भ व मराठवाड्यामध्ये अंतर (Development Gap) आढळते. समग्र विकास निर्धारकांचे प्रदेशनिहाय अध्ययन केल्यास विदर्भ व मराठवाडा प्रदेश हे उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेमध्ये अद्यापही मागासलेला आहे. ही बाब सिंचनाचा भौतिक अनुशेष व विकास निर्धारकांतील अंतरावरून स्पष्ट होते.

### ६.१ सिंचन अनुशेषाचा प्रलंबित प्रश्न

राज्य सरकाद्वारे विभिन्न प्रदेशासाठी तरतूद करण्यात आलेल्या विकास निधीचे असमान वितरण झाल्यामुळे विदर्भ व मराठवाड्यामध्ये अनुशेषाचा प्रश्न निर्माण झालेला दिसतो. वित्तीय व भौतिक अनुशेषामध्ये संचयी पद्धतीने होणारी वाढ ही बाब विदर्भ व मराठवाडा प्रदेशाच्या मागासलेपणाला बव्हंशीरीत्या कारणीभूत आहे. राज्याच्या स्थापनेनंतर विविध अभ्यासगटांनी प्रदेशनिहाय अनुशेषाचे निर्धारण करून अनुशेष कमी करण्यासाठी वित्तीय तरतूद करण्याची शिफारस केली. राज्य सरकारने वेळोवेळी अंदाजपत्रकीय व गैर-अंदाजपत्रकीय संसाधनांचा अवलंब करून वित्तीय निधीची तरतूद केली. परंतु विदर्भ व मराठवाडा प्रदेशामध्ये उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत निधीच्या खर्चाचे प्रमाण कमी असल्यामुळे या दोन प्रदेशाच्या अनुशेषामध्ये उत्तरोत्तर वाढ झालेली आढळते. भौतिक अनुशेषाचे प्रमाण विचारात घेतल्यास असे लक्षात येते की, सिंचन व रस्ते क्षेत्राचा भौतिक अनुशेष विदर्भामध्ये सर्वाधिक (२००० मध्ये ७०%) असून मराठवाडा व उर्वरित

महाराष्ट्रामध्ये हे प्रमाण कमी होते. सत्यशोधन समितीच्या अनुमानानुसार (१९८४) विभिन्न प्रदेशाचा सिंचनाचा भौतिक अनुशेष ३०३ हजार हेक्टरवरून १९९४ मध्ये ९४५.१३ हजार हेक्टर झाला. म्हणजेच दहा वर्षाच्या कालावधीमध्ये सिंचनाच्या भौतिक अनुशेषामध्ये तीन पटीपेक्षा अधिक वाढ झाल्याचे आढळते. एकंदरीत दोन्ही अभ्यासगटांनी प्रतिपादित केले की, १९८४-९४ या कालावधीमध्ये विदर्भ व मराठवाडा प्रदेशामध्ये भौतिक अनुशेषाचे प्रमाण १८% व ९% नी वाढले, तर उर्वरित महाराष्ट्राचे प्रमाण २७% नी कमी झाले. तक्ता क्र.३ वरून लक्षात येते की, विदर्भ व मराठवाडा प्रदेशाचा सिंचनाचा वित्तीय अनुशेष वाढत असून तुलनेने उर्वरित महाराष्ट्राचे प्रमाण सातत्याने कमी झाल्याचे दिसते. १९८४ ते २०१२-१३ कालावधीमध्ये एकूण सिंचनाचा अनुशेषामध्ये विदर्भ प्रदेशाचे प्रमाण ३८.०५% वरून ६०.५६% पर्यंत सर्वाधिक वाढले. तुलनेने मराठवाडा प्रदेशाचे प्रमाण २२.८५% वरून २७.६५% वाढले. उलट उर्वरित महाराष्ट्राचे अनुशेषाचे प्रमाण ३९.१०% वरून ११.७९% पर्यंत कमी झाले. दुसऱ्या शब्दामध्ये असे म्हणता येईल की, विदर्भ व मराठवाडा प्रदेशामध्ये सिंचनाचा अनुशेष क्रमशः २२.५१% व ४.८% नी वाढला, तर उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष ३७.३१% नी कमी झालेला दिसतो.

### ६.२ सिंचनाचा अनुशेषः अमरावती विभाग

सिंचनाच्या अनुशेषामध्ये विदर्भाचे प्रमाण सतत वाढत असून त्याचा परिणाम विदर्भातील कृषी व ग्रामीण क्षेत्राचा मागासलेपणामध्ये दिसतो. एकंदरीत विदर्भ व मराठवाडा प्रदेशामध्ये अनुशेषामध्ये सतत वाढ होऊन या प्रदेशातील प्रतिव्यक्ती अनुशेषाचे प्रमाण उर्वरित महाराष्ट्रापेक्षा अधिक आहे. विदर्भाच्या वित्तीय अनुशेषाचा प्रश्न २०११ मध्येच संपुष्टात आला अशी शासकीय पातळीवर दर्पोक्ती होत असली तरी अमरावती विभागामध्ये सिंचनाचा भौतिक अनुशेष अद्यापही बाकी आहे; ही बाब चैनसुख संचेती (माजी अध्यक्ष, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर) यांच्या वक्तव्यातून स्पष्ट होते.

अमरावती विभागाच्या चार जिल्ह्यामध्ये सिंचनाचा एकूण भौतिक अनुशेष १,७९,४७७ हेक्टर आहे. ज्यामध्ये अमरावती, बुलढाणा, अकोला आणि वाशीम जिल्ह्याचे प्रमाण अनुक्रमे ७२,९७१ हेक्टर, ५२,२६२ हेक्टर, ४५,०२८ हेक्टर आणि ९,२१६ हेक्टर आहे. मागील सात वर्षांमध्ये वित्तीय संसाधनाची तरतूद करण्यात आली; परंतु वित्तीय तरतूद व प्रत्यक्ष खर्च यामध्ये अंतर असल्यामुळे अमरावती विभागाचा सिंचनाचा भौतिक अनुशेषाचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याचे दिसून येते. तक्ता क्र. ४ वरून लक्षात येते

**तक्ता क्र. ३ : प्रदेशनिहाय सिंचनाचा वित्तीय अनुशेष**

(प्रमाण टक्क्यामध्ये)

| आधार | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र |
|---|---|---|---|
| सत्यशोधन समिती (FFC-1984) | ३८.०५ | २२.८५ | ३९.१० |
| निर्धारके व अनुशेष समितीची (I&BC-1994) | ५५.०४ | ३२.३७ | १२.५९ |
| मान. राज्यपालांचे दिशानिर्देश (२००५) | ७०.३१ | २९.५१ | ०.१८ |
| विदर्भ विकास मंडळ अहवाल (२०१२-१३) | ६०.५६ | २७.६५ | ११.७९ |

**स्त्रोत** : Khandewale and others (2021)

की, एकूण वित्तीय तरतुदीचे प्रमाण कमी होत असल्यामुळे सिंचन प्रकल्पावरील प्रत्यक्ष खर्च कमी होत आहे. मार्च २०१३ मध्ये रु.२०८० कोटी निधी उपलब्ध असताना प्रत्यक्ष खर्च रु.८६१ कोटी होता. प्रत्यक्ष खर्चाचे उपलब्ध निधीशी प्रमाण ४१% होते. मार्च २०२० मध्ये प्रत्यक्ष खर्चाचे उपलब्ध निधीशी प्रमाण ६१% झाले. तात्पर्य, उपलब्ध निधी व प्रत्यक्ष खर्च यामध्ये अंतर निर्माण होऊन अमरावती विभागाचा सिंचनाचा भौतिक अनुशेष अद्यापही पूर्ण झालेला नाही. अमरावती विभागाचा सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी रु.१५,४८८ कोटीची आवश्यकता आहे. परंतु उपलब्ध निधीचे कमी होणारे प्रमाण पाहाता सिंचनाचा अनुशेष दूर होईल, ही शक्यता कमीच आहे. अपर्याप्त वित्तीय

**तक्ता क्र. ४ : अमरावती विभागः अनुशेष दूर करण्यासाठी वर्षनिहाय निधी व खर्चाचे प्रमाण**

| वर्ष | उपलब्ध निधी (रु. कोटी) | प्रत्यक्ष खर्च (रु. कोटी) | प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| मार्च २०१३ | २०८० | ८६१ | ४१.३९ |
| मार्च २०१४ | २१०८ | ८८२ | ४१.८४ |
| मार्च २०१५ | १२२१ | १००४ | ८२.२२ |
| मार्च २०१६ | २२४० | २०५५ | ९१.७४ |
| मार्च २०१७ | १६७७ | १६९५ | १०१.०७ |
| मार्च २०१८ | १९४८ | १४५३ | ७४.५८ |
| मार्च २०१९ | १२६७ | १४७७ | ११६.५७ |
| मार्च २०२० | १२७५ | ७७६ | ६०.८६ |

**स्रोत** : दैनिक लोकमतः १३ फेब्रुवारी, २०२०

निधीमुळे कृषी व संबंधित क्षेत्रे मागासलेली राहून त्याचा दृश्य परिणाम शेतकरी आत्महत्येच्या रूपाने दिसून येतो. त्याचप्रमाणे विदर्भ व मराठवाडा प्रदेश उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेमध्ये कृषी विकास, उद्योगाचा स्थापना विकास, सिंचनाची अपर्याप्तता, महिला व बालकल्याण व मानव विकास या क्षेत्रामध्ये अधिक मागासलेला आहे. भारत सरकारच्या अहवालानुसार २०१४ मध्ये विदर्भामध्ये कुपोषित बालकांचे प्रमाण ११.७६% व मराठवाड्यामध्ये ८.२०% होते. २०१८ मध्ये ते प्रमाण क्रमशः ११.५७% व ८.३०% झाले. त्याचप्रमाणे शिक्षित महिला, कमी वयामध्ये विवाह, कुमारी माता व रक्तक्षीणतेचे प्रमाण हे मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रापेक्षा अधिक असल्याचे दिसते (खांदेवाले:२०२०).

### ६.३ प्रदेशनिहाय विकास निर्धारकांची सद्यस्थिती

विकास निधीचे प्रदेशनिहाय असमान वितरण तसेच प्रत्यक्ष खर्चाचे तरतूद निधीशी अल्प प्रमाण यामुळे प्रादेशिक असमतोल दृष्टिगोचर होतो. हा प्रादेशिक असमतोल विभिन्न विकास निर्धारकांच्याबाबतीत दृष्टीस पडतो. विभिन्न निर्धारकांमध्ये दळणवळण यंत्रणा, शिक्षण व कौशल्य विकास, आरोग्य, वित्त उपलब्धता आणि ऊर्जा इत्यादी विकास निर्धारकांच्या बाबतीत प्रदेशनिहाय अंतर आढळते. विकास निर्धारकांमधील अंतर विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र प्रदेशामध्ये अनुक्रमे ०.३९, ०.३७ व ०.२४ होते (Kelkar Committee: 2013). हीच स्थिती विद्यमान काळामध्ये आढळते. तक्ता क्र. ५ नुसार विभिन्न आर्थिक-सामाजिक

विकासाच्या सापेक्ष पातळीमध्ये प्रादेशिक विसंगती आढळून येते. प्रतिलाख लोकसंख्येमागे रुग्णालयातील खाटांची संख्या, सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार याबाबतीत तिन्ही प्रदेश राज्य सरासरीच्यामागे आहे. उलट सिंचनाखालील एकूण क्षेत्राचे एकूण पिकांशी प्रमाण, प्रत्यक्ष सिंचित क्षेत्राचे निर्मित सिंचन क्षमतेशी प्रमाण, प्रतिलाख लोकसंख्येमागे लोहमार्गाच्या लांबी, औद्योगिक कारणासाठी विजेचा दरडोई वापर, प्रतिलाख लोकसंख्येमागे वाणिज्य अधिकोषाची संख्या, प्रतिलाख लोकसंख्येमागे दूरध्वनीची संख्या, प्रतिलाख हजारीमागे प्रतिचालू कारखान्यामध्ये रोजगार संख्या याबाबतीत विदर्भ आणि मराठवाडा प्रदेश उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेमध्ये मागे आहे. वैधानिक विकास मंडळाच्या स्थापनेद्वारे राज्याची नियोजन प्रक्रिया विकेंद्रित स्वरूपाची होत असल्याचे दिसत असले, तरी निधी वाटपाच्या अधिकाराचे प्रत्यक्षात विकेंद्रीकरण प्रभावीरीत्या झालेले दिसून येत नाही. २००१-०२ पासून विकास मंडळांना सामूहिक योजनेंतर्गत एकत्रित रु.१०० कोटी विशेष निधी वाटपाचे अधिकार होते. परंतु नंतर ही रक्कम रु. १ कोटीवर आली. विभिन्न क्षेत्रासाठी करण्यात येणाऱ्या वित्तीय तरतुदीमध्ये विकास मंडळाचे स्थान दुय्यम असून निधी वाटपाचे संपूर्ण अधिकार राज्य नियोजन विभागाकडे केंद्रित झालेले दिसून येते. दुसऱ्या शब्दामध्ये असे म्हणता येईल की, विभिन्न घटकामध्ये उर्वरित महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाची सापेक्ष पातळी राज्य सरासरीपेक्षा अधिक आहे. विभिन्न घटकावर होणाऱ्या खर्चाचे अधिक प्रमाण, निधीची त्वरित उपलब्धता, अखर्चित निधीचे विकसित प्रदेशाकडे हस्तांतरण इत्यादी कारणामुळे उर्वरित महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाची सापेक्ष पातळी अन्य प्रदेशापेक्षा अधिक असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तात्पर्य, विकास निधीच्या वितरणातील तफावतीमुळे आर्थिक विकासाच्या सापेक्ष पातळीमध्ये प्रदेशनिहाय तफावत दिसून येते.

## ७. वैधानिक विकास मंडळाची प्रासंगिकता

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३७१(२) नुसार मान. राष्ट्रपतींनी ९ मार्च १९९४ रोजी प्रादेशिक विकास मंडळे स्थापन करण्याचा आदेश निर्गमित केला. त्यानुसार मान. राज्यपालांनी ३० एप्रिल १९९४ रोजी तीन विकास मंडळाची स्थापना करून २५ जून १९९४ ला अध्यक्ष व सदस्यांच्या नेमणुका केल्या. विकास मंडळे ही प्रारंभी पाच वर्षासाठी कार्यान्वित करण्यात आली होती. परंतु कलम ३७१(२)च्या निहित उद्दिष्टांची पूर्तता न झाल्यामुळे मंडळाचा कार्यकाळ ३० एप्रिल १९९९ पर्यंत वाढविण्यात आला. त्यानंतर प्रत्येक पाच वर्षांनी मंडळाला मुदतवाढ मिळत गेली. सद्यस्थितीमध्ये विकास मंडळाचा कार्यकाळ ३० एप्रिल २०२० रोजी समाप्त होऊन मंडळाचे अद्यापही पुनर्गठन झालेले नाही. प्रदेशांचा वित्तीय व भौतिक अनुशेष समाप्त झाल्यामुळे (केवळ शासकीय दर्पोक्ती) विकास मंडळाऐवजी राज्य सरकार प्रदेशांचा सर्वांगीण विकास करण्यास कटिबद्ध आहे, अशी राज्य सरकारची धारणा असावी. परंतु विकासपातळीचे सांख्यिकीय तथ्यांच्या आधारावर प्रदेशनिहाय तुलनात्मक विश्लेषण केल्यास राज्य सरकारची ही धारणा विदर्भ व मराठवाडा प्रदेशांच्या समतोल विकासाच्या दृष्टीने लागू पडत नाही. प्रदेशनिहाय अनुशेषाचे प्रमाण जरी कमी होत असले तरी विदर्भ व मराठवाडा प्रदेशांच्या सामाजिक व आर्थिक विकास समस्यांची तीव्रता अद्यापही कमी झालेली नाही. सिंचनाची उपलब्धता ही प्रदेशातील कृषी व संबंधित क्षेत्राच्या विकासाला निर्धारित करणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. विभिन्न अभ्यासगटांनी सिंचनाच्या संचयी अनुशेषामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण झाल्याचे अधोरेखित केले व त्यासाठी पर्याप्त निधीची तरतूद करण्याची शिफारस राज्य सरकारकडे केली. परंतु राज्य सरकारचे एकत्रित प्रयत्न समतोल प्रादेशिक विकासाच्या दृष्टीने अपुरे असल्याचे दिसते. त्याचा दृश्यपरिणाम विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशांमध्ये कृषी संकट निर्माण होऊन

**तक्ता क्र. ५: प्रदेशनिहाय आर्थिक विकास पातळीचा निर्देशांक (राज्य सरासरी=१००)**

| अनु. | निर्धारके | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| १ | सिंचनाखालील एकूण क्षेत्राचे एकूण पिकांशी प्रमाण (%) | ७६.४७ | ८४.१२ | १२४.७१ |
| २ | प्रत्यक्ष सिंचित क्षेत्राचे निर्मित सिंचन क्षमतेशी प्रमाण (%) | ८४.१३ | ६३.८० | १२१.७३ |
| ३ | प्रतिलाख लोकसंख्येमागे रस्त्यांची लांबी (कि.मी.) | १२०.५३ | १२८.०८ | ८६.२३ |
| ४ | प्रतिलाख लोकसंख्येमागे लोहमार्गाची लांबी (कि.मी.) | ७९.१७ | ९३.७५ | १६४.५८ |
| ५ | औद्योगिक कारणासाठी विजेचा दरडोई वापर (कि.वॅ. तास) | ५८.६४ | ६५.३७ | १२२.१४ |
| ६ | प्रतिलाख लोकसंख्येमागे रुग्णालयातील खाटांची संख्या | ५८.६१ | १६.३९ | ५१.४९ |
| ७ | प्रतिलाख लोकसंख्येमागे शैक्षणिक संस्था | ११३.७९ | १२५.२९ | ८९.६६ |
| ८ | प्रतिलाख लोकसंख्येमागे वाणिज्य अधिकोषांची संख्या | ९०.९१ | ६३.६४ | ११८.१८ |
| ९ | प्रतिलाख लोकसंख्येमागे दूरध्वनी संख्या | २५.४१ | १५.४४ | १४५.४६ |
| १० | सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार ('०००) | १६.९८ | १०.२५ | ७२.७२ |
| ११ | प्रतिचालू कारखान्यामध्ये रोजगार संख्या ('०००) | ८५.९६ | १२१.०५ | १००.०० |

**स्रोत** : Author' calculation (2022)

शेतकरी आत्महत्येच्या रूपाने दृष्टिगोचर होतो. या प्रदेशांमध्ये जवळपास तीन-चतुर्थांश श्रमशक्ती ही कृषी व संबंधित क्षेत्रामध्ये कार्यरत आहे. उद्योगांचा स्थापनाविस्तार हा शहरीकेंद्रित असून (मुख्यतः नागपूर, अमरावती, औरंगाबाद इत्यादी) संपूर्ण प्रदेश पातळीवर लाभदायक व कायमस्वरूपी रोजगार संधी निर्माण झालेल्या दिसत नाही. कृषिक्षेत्राची अल्प उत्पादकता, शहरीकेंद्रित उद्योगांचा स्थापनाविस्तार, रोजगारीच्या कमी संधी, गरजेनुरूप शैक्षणिक सुविधांची कमतरता इत्यादीमुळे हे प्रदेश आर्थिक व मानवी विकासामध्ये मागासलेले आहेत. मग प्रश्न असा निर्माण होतो की, या प्रदेशाचा समतोल विकास साध्य करण्यासाठी वैधानिक विकास मंडळे खरोखरच उपयुक्त सिद्ध ठरू शकतात का? जर तसे असेल तर विकास मंडळाचे अधिकार, स्वरूप व जबाबदाऱ्या कोणत्या? या प्रश्नाचा सखोल विचार करणे महत्त्वपूर्ण ठरते.

प्रदेशनिहाय विकास निधीचे समन्यायी वितरण आणि समतोल प्रादेशिक विकास हे राज्याचे ज्वलंत प्रश्न आहेत. विकास मंडळे ही राज्यातील मागास प्रदेशावर झालेल्या अन्यायाविरोधात शेवटची कायदेशीर व वैधानिक व्यासपीठे आहेत. विकास मंडळाच्या माध्यमातून प्रदेशाच्या समतोल विकासाला चालना मिळून प्रदेशातील लोकांच्या जीवनमानामध्ये वाढ होते; तद्वतच विकासाच्या पुरेश्या संधी उपलब्ध होतात. त्या अर्थाने विकास मंडळे ही प्रदेशाच्या समतोल विकासाच्या दृष्टीने विकेंद्रित नियोजनाचे रूप आहे. विकास मंडळे प्रदेशातील संसाधने, प्रदेशांच्या गरजा, विकासाची संभाव्यता तसेच सामाजिक-आर्थिक समस्यांबाबत अवगत असतात. प्रदेशातील प्राधान्य क्षेत्राला केंद्रबिंदू मानून विकासाच्या दीर्घकालीन योजना तयार करण्यामध्ये विकास मंडळे महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात. उदा. विदर्भ प्रदेशातील संसाधनाची उपलब्धता विचारात घेता संसाधन-आधारित उद्योगाच्या स्थापनाविस्ताराला बराच वाव आहे. त्यादृष्टीने विकासाची दीर्घकालीन व्यूहरचना तयार केल्यास प्रदेशाचा समतोल विकासाला प्रोत्साहन मिळू शकते असे निरीक्षण वर्धा योजना (१९६७),

लघु उद्योग विस्तार प्रशिक्षण संस्था, हैद्राबाद (१९७४) तसेच केळकर समिती (२०१३) इत्यादींच्या संशोधनातून वेळोवेळी स्पष्ट झाले आहे. २०१४ मध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने अर्थव्यवस्थेच्या संस्थात्मक बळकटीकरणासाठी नीती आयोगाची स्थापना केली. नीती आयोगाचा मुख्य उद्देश उपलब्ध संसाधनाच्या कार्यक्षम वापराद्वारे प्रादेशिक सबलीकरण करणे हा आहे (Datta & Mahajan: 2016). असे प्रयत्न अलीकडील काळामध्ये महाराष्ट्रामध्ये होताना दिसतात. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनामध्ये महाराष्ट्राचे योगदान १५% (Economic Survey of Maharashtra: 2023) आहे. सन २०२८ पर्यंत देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. त्यादृष्टीने मान. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन करण्याच्या दृष्टीने संस्थात्मक पुनर्गठनाच्या माध्यमातून 'मित्रा' (Maharashtra Institute for Transformation) संस्था स्थापन केली आहे (EAC: २०२३). या संस्थेचा मूळ हेतू उपलब्ध संसाधनाची क्षमता विचारात घेऊन समतोल प्रादेशिक विकास करणे हा आहे. त्यासाठी सर्वप्रथम वैधानिक विकास मंडळाच्या पुनर्गठनाचा प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडविणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वैधानिक विकास मंडळे आणि राज्य पातळीवरील 'मित्रा' संस्थेमध्ये कार्यात्मक समन्वय असणे आवश्यक आहे. सारांश रूपाने असे म्हणता येईल की, संस्थात्मक पुनर्गठनाच्या माध्यमातून प्रदेशातील उपलब्ध संसाधनाला उत्पादक कार्यामध्ये गुंतवून संसाधन आधारित उद्योगाचा स्थापनाविस्ताराला वाव आहे. त्यादृष्टीने समतोल प्रादेशिक विकासामध्ये विकास मंडळाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल, यामध्ये तिळमात्र शंका नसावी.

## ८. धोरणात्मक अन्वय व उपाययोजना

समतोल प्रादेशिक विकासाचे उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी विकास मंडळाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरू शकते. त्यासाठी विकास मंडळाद्वारे पुढील धोरणात्मक उपायांचा अवलंब करणे क्रमप्राप्त ठरते.

१. वैधानिक विकास मंडळाचे पुनरुजीवन प्राधान्याने व्हावे. संस्थात्मक बळकटीकरणासाठी राज्यस्तरीय शिखर संस्था 'मित्रा' व वैधानिक विकास मंडळे यांच्यामध्ये कार्यात्मक समन्वय असणे गरजेचे आहे.
२. प्रदेशनिहाय विकास निधीचे समान वितरण होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर विकास मंडळांद्वारे प्रदेशातील आधारभूत सुविधांमधील विसंगतीची गणना करणे क्रमप्राप्त आहे.
३. वित्तीय संसाधनाची तरतूद व वितरण प्रभावीपणे करण्यासाठी उचित वितरणाचे मापदंड निश्चित करणे. त्यासाठी अभ्यास समितीची स्थापना करणे.
४. विशेष विकास निधीचा वापर मुख्यतः प्रदेशातील मागास जिल्हे व तालुक्यासाठी करणे अपेक्षित आहे.
५. मानवी विकास निर्धारकांच्या संदर्भात प्रदेश व राज्य पातळीवर विकास अंतराची गणना करणे.
६. स्थानिक प्रदेशांचा विकास स्थानिक संसाधनाद्वारे करण्यासाठी विकास मंडळांनी स्थानिक स्वराज्य संस्थांसोबत (जसे- ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका इत्यादी) कार्यात्मक संबंध स्थापन करणे आवश्यक आहे. ज्यामुळे विकासाची संभाव्य क्षमता निर्माण होऊ शकेल.
७. प्रदेशातील प्राधान्य क्षेत्राला प्रमाण मानून त्यानुसार संसाधन आधारित विकास-केंद्रित प्रारूप (Growth-Centre Model) तयार करणे.
८. संस्थात्मक यंत्रणेचे बळकटीकरण करणे. ज्यामुळे विकास मंडळाच्या प्रस्तावित योजनांचे प्रभावी कार्यान्वयन होईल.
९. वैधानिक विकास मंडळांनी कार्ययोजना तयार करताना प्रदेशातील शैक्षणिक विद्यापीठे, कृषी

संशोधन व विस्तार विद्यापीठे, मत्स्यविद्यापीठे, औद्योगिक संघटना व प्रतिनिधी, विभिन्न क्षेत्रातील तज्ज्ञ, खाजगी क्षेत्रातील भागधारक इत्यादी यंत्रणांना सहभागी करावे. जेणेकरून, समतोल प्रादेशिक विकासासाठी या घटकांचे ज्ञान व अनुभवाचा लाभ प्राप्त होऊ शकेल.

## ९. संदर्भसूची


१) Committee on Government Assurance (1963-64), Maharashtra Legislative Assembly, Third Report, Maharashtra Legislative Secretariate, Bombay.

२) Datta, G. and Maharaj, A. (2016) Indian Economy, S. & Chand Publications, New Delhi.

३) Department of Planning, Government of Maharashtra. Retrived from: www.beams.mahakosh.gov.in and www.lan.maharashtra.gov.in

४) Economic Survey (2020-21&2022-23) Government of Maharashtra. Retrived from: https://www.mahades.maharashtra.gov.in

५) Growth Centre Approach for Central Vidarbha Region (1974) Small Industries Extension Training Institute, Hyderabad.

६) Kanbur, R. and Venables, A., Spatial Inequality and Development (2005), Oxford University Press, New York.

७) Khandewale, S. and others Politics of Regional Economics (2021), Rawat Publications, Jaipur.

८) Maharashtra Economic Advisory Council (2023), Department of Planning, Government of Maharashtra, Mumbai.

९) Maharashtra As A Linguistic Province, Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches (2019), Retrived from www.mea.gov.in

१०) Note on Approach to the Fourth Plan: Growth with Stability (Aug. 1968), Ministry of Information and Broadcasting, Government of India, Delhi.

११) Planning from below: Conceptual Background of the Wardha Plan (March 1967), Institute of Regional Development Planning, Wardha.

१२) Planning Commission, Performance Evaluation of Statutory Development Boards (SDBs) in Maharashtra (2003), Government of India. Retrived from: https://www.niti.gov.in/lanningcommission.gov.in

१३) Report of the Fact-Finding Committee on Regional Imbalance (1984), Department of Planning and Finance, Government of Maharashtra, Bombay.

१४) Report of the High-Level Committee on Balanced Regional Development Issues in Maharashtra (2013), Department of Planning, Government of Maharashtra, Mumbai.

१५) Selected Indicators for Districts in Maharashtra and States in India 2015-16 & 2016-17. Retrived from: https://www.mahades.maharashtra.gov.in

१६) The Fourth Plan: Mid-Term Appraisal (Feb. 1972), Planning Commission, Government of India, Delhi.

१७) The Annual Report of Vidarbha Statutory Development Board (1997), Government Press, Nagpur.

१८) The Report of the Indicators and Backlog Committee on Relative Levels of Development and Removal of Regional Imbalances (1997) Vol. I, Department of Planning,

Government of Maharashtra, Mumbai.
१९) The Report of the Indicators and Backlog Committee on the Status of Development of Some Sectors in the State of Maharashtra (2000) Vol. II, Department of Planning, Government of Maharashtra, Mumbai.
२०) खांदेवाले, एस., विदर्भ राज्यः न्यायाच्या प्रतीक्षेत, ऑक्टो.-नोव्हें.-डिसें. २०२०, समाज प्रबोधन पत्रिका, कोल्हापूर.
२१) दैनिक लोकमत, १३ फेब्रु. २०२०, नागपूर.
२२) सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राचीअर्थव्यवस्था १ ट्रिलियन करण्याच्या संदर्भात शासन निर्णय डीएपी-१०२३/प्र. क्र. ९८/का-१४८१ दिनांक २८ मार्च, २०२३, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

◆

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

**(फॉर्म ४, नियम ८ नुसार)**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना - ४३१२०४ |
| २. | नियतकाल | : | त्रैमासिक |
| ३. | मुद्रकाचे नाव | : | मारोती वि. तेगमपुरे |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | 'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना - ४३१२०४ |
| ४. | मुद्रण स्थळ | : | भारती मुद्रणालय, ८३२ ई, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर ४१६ ००१ फोन : (०२३१) २६५४३२९ |
| ५. | प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र. ३ प्रमाणे |
| ६. | संपादकाचे नाव | : | राहुल शंकरराव म्होपरे |
| ७. | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | 'सर' निवास, री. स. नं. ३३/क/२, प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी, दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर, पिन : ४१६ ००४ |
| ८. | मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा : सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम.एन. रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र. ६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूलजवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. ३२३ समोर, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१ |

मी मारोती वि. तेगमपुरे असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**मारोती वि. तेगमपुरे**
मुद्रक व प्रकाशक

# सूक्ष्मवित्त - शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये गाठण्याचा मार्ग

**सोनवणे (बच्छाव) आशालता देवराम** †

**प्रस्तावना:**

संयुक्त राष्ट्रसंघटनेने शाश्वत विकासाची व्याख्या अशी केली आहे की, 'असा विकास की जो वर्तमान गरजा पूर्ण करताना भविष्यकालीन पिढीला त्यांच्या गरजा पूर्ण करताना कोणत्याही तडजोडी करायला भाग पडणार नाही.' यात आर्थिक विकास, सामाजिक समावेशन आणि पर्यावरण संरक्षण या तीन घटकातील सुसंवाद अभिप्रेत आहे. 'आपल्या जगाचे परिवर्तन: २०३० पर्यंत शाश्वत विकास' (Transforming our World: The 2030 Agenda for Sustainable Development) या संयुक्त राष्ट्रसंघटनेने प्रकाशित केलेल्या प्रसिद्धी पत्रकात शाश्वत विकासाची १७ उद्दिष्ट्ये जाहीर केली, ज्यात १६९ लक्ष्ये निश्चित करण्यात आली. ही ध्येय सन २००० मध्ये निश्चित करण्यात आलेल्या आठ उद्दिष्टांपासून निर्माण झालेली आहेत. मानवी विकास आणि कल्याणाबरोबरच पृथ्वीचे आणि पर्यावरणाचे रक्षण, वर्तमान मानवी जीवनातील समृद्धीबरोबरच भविष्यातील पिढीसाठी संसाधनांचे रक्षण हे साध्य करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे. दारिद्र्यनिर्मूलन, शोषणविरहित समाज ही दोन्ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी परस्परपूरक धोरणे राबविणे गरजेचे आहे. सर्वांसाठी आरोग्य, शिक्षण यात सुधारणाबरोबरच विषमता कमी करणे आणि आर्थिक वृद्धीला चालना देणे गरजेचे आहेच; पण पर्यावरणीय असंतुलन, वातावरणीय बदल यापासून आपली जमीन, जंगले, समुद्र, हवा, पाणी यांचे रक्षण करून हे घटक चांगल्या स्थितीत पुढच्या पिढीकडे सोपविणे महत्त्वाचे आहे.

२०२२ मध्ये भारताचा SDG (Sustainable Development Goal) मधील क्रमांक १६३ देशांमधून १२१ होता, तर अलीकडचा स्कोर १०० पैकी ६०.३२ आहे. भारतात शाश्वत विकासाची अनेक उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी सूक्ष्मवित्त योजना आणि संस्था महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, असे अभ्यासाअंती दिसून येते. सदर शोधनिबंधात सूक्ष्मवित्ताद्वारे शाश्वत विकासाची ध्येय कशी साध्य करता येवू शकतात, याचा आढावा घेतलेला आहे.

**संदर्भ साहित्याचा आढावा:**

१) बुर्जोरजी, दीना एम. राणी देशपांडे आणि गीन वे दे मान सी यांचा अभ्यास असे दर्शवितो की, सूक्ष्मवित्त फक्त स्त्रियांना उत्पन्न निर्मितीच्या कार्यातच सहाय्यभूत ठरत नाही, तर त्यांच्या ग्रामीण असुरक्षित

† सहयोगी प्राध्यापक, म. वि. प्र. समाजाचे के. एस. के. डब्ल्यू, महाविद्यालय, सिडको, नाशिक.
आजीव सभासद क्र.१४६५, भ्रमणध्वनी : ९४२२२८३५५०, ई-मेल : ashalatasonawane11@gmail.com

कुटुंबांना उत्पन्नाचे साधन निर्माण करणे, त्यात गुंतवणूक करणे, त्याचा विमा घेणे यातूनही सुरक्षित करते.

२) हरिदोस आर. आणि फेड्रिक जे. यांच्या अभ्यासानुसार स्वयंसहाय्यता गटातील सदस्यत्व आर्थिक सक्षमीकरणासोबतच त्यांच्या जीवनमानाची गुणवत्ता वाढविणे, त्यांच्या सामाजिक दर्जात सुधारणा घडवून आणणे, आत्मविश्वासात वाढ घडवून आणणे यातही महत्त्वाचे योगदान देते.

३) नाबार्डच्या २००३ च्या सूक्ष्मवित्त अहवालात ११ राज्यातील २२३ स्वयंसहाय्यता गटातील ५६० सदस्यांच्या परिणामात्मक मूल्यामापनातून असे दिसून आले की, सदस्यांच्या एकूणच राहाणीमानात संपूर्ण बदल झाला. त्यांच्या मालमत्ता मालकी, बचत, उत्पन्न निर्मितीची साधने, उत्पन्न पातळी आणि कर्जक्षमतेत सुधारणा झाली.

४) पिल्लई बी. विजयचंद्रन आणि व्ही. हरिकुमार यांच्या मते, स्वयंसहाय्यता गटातील सहभागामुळे लोकांना दारिद्र्यरेषेच्यावर येण्यास आणि स्वावलंबी होण्यात निश्चितच मदत होते. स्वयंसहाय्यता गटातील सहभागामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होते, राहाणीमानाचा दर्जा सुधारतो आणि त्यांच्या सामाजिक दर्जातही सुधारणा होते. समाजातील वंचितांना मुख्य प्रवाहात येण्यास मदत होते.

५) श्रीधरन, दमयंती यांच्या मते, स्वयंसहाय्यता गटातील सहभागामुळे स्त्रियांचे सामाजिक पुनर्रचना आणि व्यावसायिक उपक्रमातील वर्चस्व समाजात परिवर्तन घडवून आणण्यास सहाय्यभूत ठरत आहे. स्त्रियांचे आर्थिक विकासातील योगदान महत्त्वाचेच आहे. त्यांच्या सहभागाशिवाय होणारा विकास अपूर्णच असेल. स्वयंसहाय्यता गट, स्त्रियांचे सक्षमीकरण होऊन त्यांना सामाजिक आणि आर्थिक विकासात योगदान देण्याविषयी जागरुकता निर्माण करतो. त्यांना स्वावलंबी आणि स्वयंशिस्तीच्याबाबतीत संवेदनशील बनवण्यास गटातील सहभाग मदत करतो. त्यांच्यातील आत्मविश्वास वाढीस लागून ग्रामीण स्त्रियांचे दैनंदिन जीवन यशस्वी करण्यास मदत करतो.

**उद्दिष्ट :** सूक्ष्मवित्ताची शाश्वत विकासाची ध्येय गाठण्यात असलेली भूमिका अभ्यासणे.

**गृहीतकृत्य :** सूक्ष्मवित्त योजनांद्वारे भारतात शाश्वत विकासाचे ध्येय गाठण्यास सहाय्य होत आहे.

**नमुना निवड :** सदर संशोधनासाठी नाशिक जिल्ह्यातील दहा तालुक्यांतील एकूण ७२० स्वयंसहाय्यता गटांची निवड केलेली आहे.

**संशोधन पद्धती :** सदर शोधनिबंधात प्राथमिक सामग्री आणि दुय्यम साहित्याच्याआधारे सूक्ष्मवित्त योजना भारतात शाश्वत विकासाची ध्येय गाठण्यास कशी उपयुक्त ठरत आहे, याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्राथमिक माहिती, उद्दिष्टांवर आणि गृहीतावर आधारित संरचित प्रश्नावली, मुलाखती आणि प्रत्यक्ष भेट याद्वारे गोळा केली आहे. सदर संशोधनासाठी दुय्यम साहित्य म्हणून नाबार्डचे अहवाल, सूक्ष्मवित्ताचे अहवाल, ग्रंथ आणि विविध शोधनिबंध आणि विविध वेबसाईट या दुय्यम साहित्याचा वापर केलेला आहे. संशोधिकेने स्वतः नाशिक जिल्ह्यातील स्त्रियांच्या सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता गटांची भूमिका आपल्या विद्यावाचस्पतीची पदवी मिळविण्यासाठी अभ्यासलेली आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील सूक्ष्मवित्ताची दारिद्र्यनिर्मूलन, रोजगारनिर्मिती भूमिका यावर सातत्याने अभ्यास सुरू आहे. शाश्वत विकासाची जी एकूण १७ ध्येय आहेत, ती साध्य करण्यात स्वयंसहाय्यता गट निश्चितच महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. हे सिद्ध करण्यासाठी संशोधनातून आलेले निष्कर्ष मदत करताना दिसतात.

**सूक्ष्मवित्त - शाश्वत विकासाची ध्येय साध्य करण्यासाठी उपयोगी :**

भारतात दारिद्र्यरेषेखालील लोकांना कर्जक्षम

बनविणे, त्यांना लहान लहान व्यवसाय सुरू करण्यास मार्गदर्शन करणे, त्यांच्या उत्पन्नात सुधारणा घडवून आणणे आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यात सूक्ष्मवित्त आणि स्वयंसहाय्यता गटांचा मोठा सहभाग आहे. गेल्या काही दशकात हे सिद्ध झाले आहे की, कमी उत्पन्न गटातील लोकांना कर्जक्षम बनवणे शक्य आहे आणि त्यातल्या त्यात ग्रामीण आणि दारिद्र्यरेषेखालील स्त्रियांना कर्ज देणे अधिक सुरक्षित आहे. कारण त्यांचा कर्जफेडीचा दर निश्चितच इतर कर्जदारांपेक्षा चांगला आहे. त्या अधिक विश्वासू आहेत. सूक्ष्मवित्तामुळे त्यांचा शाश्वत विकास घडवून आणणे तर शक्य आहेच; पण त्यांना विकासाच्या प्रक्रियेत सामावून घ्यायलासुद्धा सूक्ष्मवित्त आणि बचत गट महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

शाश्वत विकासाची सर्वच ध्येय साध्य करण्यात स्वयंसहाय्यता गट प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. कारण निधी निर्माण करणे आणि ही ध्येय समाजात प्रस्तुत करणे, लोकांना प्रशिक्षित करणे याद्वारे ध्येय साध्य करण्यासाठी स्वयंसहाय्यता गट हस्तक्षेप करू शकतात. हे सूक्ष्मवित्ताद्वारे दोन प्रकारे होवू शकते. १) वित्तीय समावेशनाद्वारे २) सामाजिक अभियांत्रिकीद्वारे. सदर शोधनिबंधात सूक्ष्मवित्त शाश्वत विकासाची जी ध्येय प्रत्यक्षरीत्या साध्य करण्यात मदत करतात ती पुढीलप्रमाणे.

ध्येय क्रमांक १ - दारिद्र्यनिर्मूलन, ध्येय क्रमांक २- शून्य उपासमार, ध्येय क्रमांक ३ - सुदृढ आरोग्य आणि कल्याण, ध्येय क्रमांक ४- गुणवत्तापूर्ण शिक्षण, ध्येय क्रमांक ५ - लिंगभाव समानता, ध्येय क्रमांक ६- योग्य कार्यसंस्कृती आणि आर्थिक वाढ, ध्येय क्रमांक ७- विषमता कमी करणे ही ७ ध्येय साध्य करण्यात सूक्ष्मवित्त कसे सहाय्यभूत ठरते, हे पुढील विवेचनावरून सिद्ध होते.

**शाश्वत विकास - ध्येय क्रमांक १ - दारिद्र्यनिर्मूलन - सर्व प्रकारचे दारिद्र्य संपवणे (SDG 1 : No Poverty : to End Poverty in all its forms)**

पहिल्या क्रमांकाचे ध्येय साध्य करण्यात सूक्ष्मवित्त कसे उपयुक्त आहे किंवा यशस्वी भूमिका बजावू शकते हे दर्शविणारी अनेक संशोधने आणि अभ्यासातून दिसून येतात. त्यातील काही अभ्यास पुढील निष्कर्ष किंवा निरीक्षणे नोंदविताना दिसतात, तर प्रत्यक्ष संशोधनातून आलेले निष्कर्षही स्वयंसहाय्यता गट दारिद्र्यनिर्मूलनात मोलाची मदत करतात, असे निदर्शनास आणून देतात.

● नाबार्डने केलेल्या अनेक अभ्यासातून असे दिसून आले आहे की, स्वयंसहाय्यता गटांच्या बँक जोडणी कार्यक्रमातून अनेक कुटुंबांना मोठ्या प्रमाणात कर्ज उपलब्ध झाले असून, त्यांची भांडवल उभारणीची क्षमता वाढली आहे. त्यातून अनेक उत्पन्न निर्माण करणाऱ्या प्रक्रिया स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्यांनी सुरू केलेल्या आहेत.

● बचतीतील वाढ आणि भांडवलनिर्मिती यातून सदस्यांची स्व-वित्तपुरवठा आणि जोखीम पत्करण्याची क्षमता वाढण्यास मदत झाली आहे.

● संशोधने आणि अभ्यास असेही दर्शवितात की, स्वयंसहाय्यता कार्यक्रमात सदस्यांना दारिद्र्यरेषेच्यावर येण्यास मदत झाली आहे.

● स्वयंसहाय्यता गटाचे सदस्य होण्यापूर्वी दारिद्र्यरेषेखाली असलेली संख्या ५८% होती. ती या चळवळीत आल्यानंतर ३३% वर आली आहे. कारण गटात आल्यानंतर सदस्यांच्या उत्पन्नात जवळपास वार्षिक ६% पर्यंत वाढ होत आहे.

● एकूण नमुना निवडीतील फक्त ११ (३.४०%) सदस्यांनी उत्पन्नात काहीही बदल झाला नाही असे नोंदवलेले आहे. २२ (६.७९%) सदस्य उत्पन्नातील बदल नगण्य आहे असे नोंदवितात. १७६ (५४.३२%) सदस्य उत्पन्नात पुरेसा बदल झाला आहे असे नोंदवितात,

तर ११५ (३५.४९%) सदस्य उत्पन्नात लक्षात घेण्याजोगा बदल झाला आहे असे मत नोंदवितात. यावरून स्वयंसहाय्यता गटात आल्यापासून ९०% स्त्रियांच्या उत्पन्नात समाधानकारक बदल झाला आहे.

● गटाचा सदस्य झाल्यापासून प्रत्येक सदस्य बचत करत असलेला दिसून येतो. ही एक चांगली वित्तीय सवय सदस्यांमध्ये रुजताना दिसते. त्यापूर्वी ७८.०९% सदस्य कोणतीही बचत करीत नव्हते.

● गटाचे सदस्य झाल्यापासून ७५.३१% सदस्यांनी कर्ज घेतले आहे. याचा अर्थ, त्यांची कर्जक्षमता वाढलेली आहे. यातील काही कर्जं वैयक्तिक गरजा भागविण्यासाठी तर काही व्यवसायासाठी घेतलेले दिसून येते. यांचे कर्जफेडीचे प्रमाणही ७०% पेक्षा जास्त आहे.

● सा-धन ने सूक्ष्म वित्तीय संस्थांच्या भारतातील १७ राज्यातील ग्राहकांचा २०२२-२३ मधील अभ्यासावर आधारित प्रकाशित केलेल्या अहवालानुसार या संस्थांनी पुरविलेल्या कर्जापैकी ४६% कर्ज अशा कुटुंबाना दिले गेले आहे की, ज्यांचे मासिक उत्पन्न २०,०००/- रुपयांपेक्षा कमी आहे. यावरून समाजातील कमी उत्पन्न गट किंवा शोषित वर्ग सूक्ष्मवित्ताचा लाभार्थी आहे. या संस्थांनी पुरविलेल्या कर्जापैकी ५२% कर्ज हे उत्पन्न निर्माण करणाऱ्या व्यवसायात खेळते भांडवल म्हणून वापरले गेले आहे. ३१% कर्ज उत्पन्न निर्माण करणाऱ्या संपत्तीत गुंतवले गेले आहे. उदा. पशुपालन. सुरुवातीला घेतलेले कर्ज व्यवसायाची सुरुवात करण्यासाठी तर नंतर घेतलेले कर्ज खेळते भांडवल म्हणून वापरले गेले आहे. यामुळे ग्रामीण सावकारांच्या विळख्यातून सुटण्यास मदत झाली आहे. ग्रामीण सावकारांवरील अवलंबित्व २०.१% वरून ८.३% कमी झाले आहे. शोषित किंवा तळागाळाच्या लोकांना संस्थात्मक कर्जाच्या कक्षेत आणण्यात सूक्ष्मवित्त महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

**शाश्वत विकास- ध्येय क्रमांक २- शून्य उपासमार (SDG2- Zero Hunger)**

स्त्रियांच्या सक्रिय सहभागाशिवाय उपासमारीचे भयावह सत्य संपवणे शक्य नाही. कारण अन्न शिजवण्याच्या प्रक्रियेत स्त्रियांचा सक्रिय सहभाग तर असतोच; पण स्वयंसहाय्यता गटातील महिला उत्पन्न निर्मितीतही सध्या सक्रिय झाल्या आहेत. या स्त्रियांचे उपासमार शून्यावर आणण्यात निश्चितच लाभदायक योगदान मिळू शकते. कारण-

● पुष्कळशा स्वयंसहाय्यता गटांनी आणि त्यांच्या संघांनी सकस आहाराबाबत जागृती निर्माण करण्याचे कार्य हाती घेतलेले आहे.

● बऱ्याच स्वयंसहाय्यता गटांनी आणि त्यांच्या सदस्यांनी अन्नधान्य, भाजीपाला, फळ, दुग्धोत्पादन यात सहभाग घेऊन घरगुती उपभोगात सुधारणा घडवून आणली आहे.

● हंगामी रोखतेच्या समस्येवर मात करण्यासाठी आणि खरेदीशक्तीतील कमतरता दूर करण्यासाठी सदस्यांनी काही प्रमाणात कर्जाचा वापर उपभोगासाठीही केलेला दिसून येतो.

● योग्य नियोजनातून सदस्यांनी आपल्या उपजीविकेचे साधन निर्माण करून उत्पन्न प्रवाहाचे वितरण आपल्या उपभोग गरजा भागविण्याची कला साध्य केली आहे.

**शाश्वत विकास- ध्येय क्रमांक ३ - सुदृढ आरोग्य आणि कल्याण (SDG 3 : Good Health and Well Being)**

शाश्वत विकासाचे तिसरे उद्दिष्ट सर्वांना, सर्व वयोगटातील लोकांना खात्रीशीर आरोग्यपूर्ण जीवन आणि कल्याण हे उद्दिष्टसुद्धा स्त्रियांच्या सक्रिय सहभागाशिवाय साध्य होऊ शकत नाही. महिला सक्षमीकरणात आर्थिक सुरक्षा, कुटुंब आणि समाजातील हक्कांमध्ये सुधारणा, आरोग्याबद्दल जाणीवजागृती, कुटुंबातील निर्णयातील सहभाग आणि कुटुंबातील समान

दर्जा या सर्व बाबी येतात. यामुळे सुरक्षित बाळंतपण, माता-बालक आरोग्याला प्राधान्य यामुळे माता आणि बालमृत्यू दर कमी होतो. याशिवाय घरगुती स्वच्छता तसेच वस्त्या, गावपातळीवरील स्वच्छता यात सरकारच्या योजना राबविताना स्त्रियांच्या सहभागातून निश्चितच लाभ होतो. प्राथमिक माहितीच्याआधारे असे दिसून येते की, स्त्रिया आपल्या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज घेतात, त्यांना वह्या-पुस्तके घेऊन देणे, शाळेची फी भरणे, सायकल खरेदी करणे यासाठी गटाच्या माध्यमातून कर्ज घेतलेले दिसून येते. तसेच कुटुंबातील सदस्यांची आरोग्यविषयक काळजी घेण्यासाठी, औषधोपचार, दवाखाना यासाठीही स्त्रियांनी कर्ज घेतलेले दिसून येते.

**शाश्वत विकास- ध्येय क्रमांक ४- गुणवत्तापूर्ण शिक्षण** (SDG 4 : Quality Education)

स्वयंसहाय्यता गटाचे सदस्यत्व सर्वांपर्यंत शिक्षण या योजनेची अंमलबजावणी करण्यात महत्त्वाचे योगदान देत आहे. अनुभवजन्य अभ्यासातून असे दिसून आले आहे की, स्वयंसहाय्यता गटातील ८०% सदस्यांनी शिक्षणाच्या उपलब्धतेत वाढ झाली आहे. अनेक स्वयंसहाय्यता गटांनी आपल्या खेड्यात शाळा सुरू करण्याचा आग्रह धरला आहे. गरीब विद्यार्थ्यांना पुस्तके-वह्यांचे वाटप, घरातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी स्वतः खर्च करणे, मुलींच्या शिक्षणासाठी आग्रही होणे अशी कार्ये हाती घेतली आहेत. गटांच्या बैठकीत अनेकदा शिक्षणाचे महत्त्व चर्चिले जाते. रात्रशाळा, प्रौढ शिक्षण वर्ग असे उपक्रम हाती घेतले जातात. बऱ्याच स्त्री सदस्यांनी आपल्या कुटुंबातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी गटाकडून कर्जही घेतलेले दिसून येते.

**शाश्वत विकास- ध्येय क्रमांक ५ - लिंगभाव समानता (SDG 5 : Gender Equality)**

- विविध अभ्यासातून आणि संशोधनातून असे दिसून आले आहे की, स्वयंसहाय्यता गटांच्या सदस्यांची घरातील आणि समाजातील सक्रिय भूमिका वाढत चालली आहे. विविध निर्णयांमध्ये त्यांचा सहभाग वाढला आहे. घरातील आणि घराबाहेरील परिस्थिती सदस्य स्त्रिया समर्थपणे हाताळत आहेत.
- अन्याय आणि घरगुती हिंसेविरुद्ध त्या स्वतःसाठी आणि त्यांच्या सहसदस्यांसाठी आवाज उठविण्यास सक्षम झाल्या आहेत.
- बिगर सदस्य महिलांपेक्षा सदस्य महिला आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत अधिक जागरूक झाल्या आहेत. प्रसंगी मुलांच्या शिक्षणाचा खर्च करण्यासाठी पैसा उभारण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण झाली आहे.
- सूक्ष्मवित्ताच्या कर्ज ग्राहकांमध्ये स्त्रियांचे प्रमाण ९८% आहे. त्या कुटुंब आणि व्यवसायांसाठी संसाधनांच्या निर्मितीत सहभाग देत आहेत.
- सा-धनच्या अभ्यासानुसार नमुन्यातील २२% महिला स्वतः मोबईलवरून यु. पी. आय. द्वारे व्यवहार करत आहेत, तर ६२% त्यांच्या जोडीदार किंवा कुटुंबातील सदस्यांद्वारे रोकडविरहित व्यवहार करत आहेत.
- प्राथमिक माहितीच्या आधारे गटाचे सदस्य होण्यापूर्वी एकूण १४३ सदस्यांकडे कोणत्याही प्रकारची मालमत्ता नव्हती. त्यापैकी १०३ सदस्यांनी आज काही ना काही मालमत्ता निर्माण केली आहे. नमुना निवडीतील आदिवासी तालुके पेठ, सुरगाणा, बागलाण आणि दिंडोरी यातील जास्तीतजास्त महिला सदस्यांकडे गटाच्या सदस्य होण्यापूर्वी कोणतीही मालमत्ता नव्हती; पण सध्या मालमत्ता नसलेल्या सदस्यांची संख्या नगण्य आहे. प्रत्येक तालुक्यात केवळ २ ते ३ सदस्य असे आहेत की त्यांनी मालमत्ता निर्माण केलेली नाही.
- भारतीय कुटुंब पद्धतीत स्त्रियांकडे मालकी हक्क देताना जुने कायदे आणि परंपरांचा आजही पगडा दिसून येतो. मात्र स्वयंसहाय्यता गटात आल्यानंतर स्त्रियांच्या

मालमत्ता धारण करण्याच्या प्रमाणात निश्चितच वाढ झालेली दिसून येते.

**शाश्वत विकास - ध्येय क्रमांक ८- योग्य कार्यसंस्कृती आणि आर्थिक वाढ (SDG 8 : Decent Work and Economic Growth)**

रोजगार संधीची निर्मिती आणि सदस्यांच्या उत्पादकतेत वाढ याद्वारे स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून सुयोग्य कार्यपद्धती आणि आर्थिक वृद्धीला चालना मिळत आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला नावीन्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण रीतीने शेती, हस्तकला, अन्नप्रक्रिया, दुग्धोत्पादने, कुक्कुटपालन याद्वारे आधार देण्याचे कार्य स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून सुरू आहे. सरकारी योजनांशी, बँकांशी तसेच बिगर शासकीय संस्थांशी समन्वय साधून सामग्री आणि संधीचा वापर करण्यात महत्त्वाचा हातभार लावण्याचे कार्य यामार्फत होत आहे.

- एकूण नमुन्यातील १२१ सदस्यांनी स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून आपले व्यवसाय सुरू केलेले आहेत.
- एकूण नमुन्यातील ८७ (२६.८५%) गटांनी १ ते ५ लोकांना रोजगार निर्माण करून दिला आहे. ११४ (३५.१९%) गटांनी ५ ते १० लोकांना रोजगार दिला आहे, तर १२३ (३७.९६%) गटांनी १० पेक्षा अधिक लोकांना रोजगार मिळवून दिला आहे.

यावरून कार्यसंस्कृती विकसित करणे आणि आर्थिक वाढ घडवून आणण्यात स्वयंसहाय्यता गट निश्चितच चांगले योगदान देत आहेत आणि भविष्यातही देवू शकतात.

**शाश्वत विकास- ध्येय क्रमांक १०- विषमता कमी करणे (SDG10: Reduced Inequalities)**

स्त्री-सक्षमीकरणाची गरजच मुळात स्त्री-पुरुष विषमतेतून निर्माण झाली. समाजातील अर्धा भाग असलेल्या स्त्रियांना आर्थिक प्रवाहात आणणे, त्यांना बचत, कर्ज, व्यवसाय या मार्गात सामावून घेणे सूक्ष्मवित्ताद्वारे स्वयंसहाय्यता गटांनी करून दाखविले आहे. यामुळे ग्रामीण स्त्रियांच्या निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास वाढीस निश्चितच मदत झाली आहे, असे अनेक अभ्यासातून सिद्ध झाले आहे.

गृहीत कृत्य 'सूक्ष्मवित्त योजनांद्वारे भारतात शाश्वत विकासाचे ध्येय गाठण्यास सहाय्य होत आहे'. हे वरील विवेचनावरून सिद्ध होते.

मागील विवेचनावरून ध्येय क्रमांक १ - दारिद्र्यनिर्मूलन, ध्येय क्रमांक २- शून्य उपासमार, ध्येय क्रमांक ३ - सुदृढ आरोग्य आणि कल्याण, ध्येय क्रमांक ४- गुणवत्तापूर्ण शिक्षण, ध्येय क्रमांक ५ - लिंगभाव समानता, ध्येय क्रमांक ६- योग्य कार्यसंस्कृती आणि आर्थिक वाढ, ध्येय क्रमांक ७- विषमता कमी करणे ही ध्येय साध्य करण्यात सूक्ष्मवित्त आणि स्वयंसहाय्यता गट महत्त्वाची भूमिका बजावत असलेली दिसून येतात. त्यांचे योगदान वाढावे यासाठी अधिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. यासाठी सरकारी आणि बिगर सरकारी पातळीवर प्रयत्न वाढविणे गरजेचे आहे. अजूनही या प्रयत्नात पुढील मार्गांनी भर टाकता येऊ शकते -

**शाश्वत विकासाची ध्येय साध्य करण्यासाठीचा मार्ग :**

सूक्ष्मवित्त संस्थांचे ९०% पेक्षा जास्त लाभार्थी दारिद्र्यरेषेखालील महिला आहेत. सूक्ष्म कर्जाद्वारे शाश्वत विकासाचे पहिले, दुसरे, चौथे, पाचवे, आठवे आणि दहावे ध्येय साध्य व्हायला मदत होताना दिसतेच; पण अप्रत्यक्षपणे त्यातून तिसरे, सहावे, सातवे, अकरावे, बारावे आणि सोळावे ध्येय साध्य व्हायलासुद्धा मदत होते. २०३० पर्यंत शाश्वत विकासाची ध्येय साध्य करण्यासाठी सर्व संसाधने आणि पैशाच्या स्वरूपातही मोठी गुंतवणूक करण्याची बांधिलकी येते. यासाठी पुढील बाबींवर कृती करणे आवश्यक आहे-

**१) सर्व पात्र कुटुंब दारिद्र्यरेषेखालील स्वयंसहाय्यता गटांच्या कक्षेत आणणे:**

सामाजिक आर्थिक आणि जातिनिहाय जणगणनेनुसार १७.९७ कोटी ग्रामीण कुटुंबांपैकी १३.४० कोटी कुटुंबे अशी आहेत की, ज्यांचे कुटुंबातील जास्तीतजास्त कमावत्या सदस्याचे महिन्याचे उत्पन्न ५०००/- रुपयांपेक्षा कमी आहे. ही सर्व कुटुंब आर्थिकदृष्ट्या मागासलेली असून, दारिद्र्यरेषेखालील गटांचे सदस्य होण्यास पात्र आहेत. दारिद्र्यरेषेखालील स्वयंसहाय्यता गटांनी १६.१९ कोटी कुटुंबांना सदस्य करून घेतले आहे म्हणून आता फार संधी उरलेली नाही. असे असले तरी हे प्रमाण ओरिसा, महाराष्ट्र या राज्यात तसेच दक्षिणेकडील पाचही राज्यात आणि आसाम या राज्यात उद्दिष्टापेक्षा अधिक लोकसंख्या स्वयंसहाय्यता गटांच्या कक्षेत आलेली आहे. उरलेल्या राज्यात अजूनही १८.६० लाख स्वयंसहाय्यता गट स्थापन करण्यास संधी आहे, ज्याच्या माध्यमातून कमी उत्पन्न गटातील कुटुंबे या कक्षेत येतील. गेल्या तीन वर्षातील स्वयंसहाय्यता गटांचा स्थापनेचा वृद्धिदर ६.४७% होता हे पाहाता, २०३० पूर्वीच हे उद्दिष्ट आपल्याला गाठता येणे शक्य आहे. ही मोहीम राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका मिशनने (NRLM) हे कार्य आधीच हाती घेतलेले आहे. या योजनेची ही भूमिका अतिशय महत्त्वाची आहे.

**२) कर्ज तफावत आणि प्रादेशिक असमतोल कमी करणे:**

दारिद्र्यरेषेखालील स्वयंसहाय्यता गटांच्या कर्ज तफावतीचे प्रमाण ४८.१% आहे. याचा अर्थ, ६४.४६ लाख स्वयंसहाय्यता गट अद्याप या कक्षेत आलेले नाही. गेल्या तीन वर्षांत स्वयंसहाय्यता गट कर्जाच्या कक्षेत येण्याचे प्रमाण ७.५२% राहिले आहे. २०३० पर्यंत कर्ज थकबाकीचे प्रमाण ११५.१७ लाख असण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. सर्व गटांना कर्जाच्या कक्षेत आणणे आणि नवीन गटांना कर्जाशी जोडणे यासाठी सध्याचा वृद्धिदर वाढविणे गरजेचे आहे. त्यासाठी-

- शाश्वत धोरणात्मक पाठबळ आणि दक्षिणेकडील राज्यांप्रमाणे इतर राज्यांनी धोरण स्वीकारणे गरजेचे आहे.
- बँकांची भूमिका यात महत्त्वाची आहे. क्षमता वृद्धी आणि जाणीवजागृती यासाठी बँक कर्मचाऱ्यांनी सातत्याने सर्व पातळ्यांवर संपर्क साधणे आणि लक्ष घालणे गरजेचे आहे.
- गुणवत्तापूर्ण वित्तपुरवठ्यासाठी ग्राहक माहिती आणि नियंत्रण कक्षाला माहिती देणे.
- बंद पडलेल्या गटांना वेगळे करणे आणि त्यांचे पुनर्गठण करणे.

**३) स्वयंसहाय्यता गटांना सूक्ष्म उद्योगात परिवर्तित करणे :**

स्वयंसहाय्यता गटांच्या सदस्यांना सूक्ष्म उद्योजकात रूपांतरित करण्यासाठी पुढील बाबींवर भर देणे आवश्यक आहे.

- खात्रीशीर आणि सातत्यपूर्ण कर्जपुरवठा.
- बचतीला प्रोत्साहन देणे. जेणेकरून जास्तीतजास्त सदस्यांना कर्ज उपलब्ध होईल.
- सूक्ष्म संरचना निर्मिती जी लहान लहान गुंतवणुकीला व्यवहार्य बनवणे आणि आणि फलदायी बनवण्यास मदत करेल.
- कमीतकमी ऊर्जा, संसाधने आणि प्रयत्नातून विविध कार्यक्रम आणि प्रक्रियांचे अभिसरण करणे.
- घेतलेले कर्ज फक्त व्यवसायांसाठी असेल असा प्रयत्न करणे, ज्यातून नवउद्योग, गटातील स्त्रियांना प्रशिक्षण आणि प्रशासकीय मदत मिळून यशस्वी व्यवसायांची निर्मिती होईल.

**४) वित्तीय समावेशनाची गती वाढविणे:**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या २०२०-२४ च्या वित्तीय समावेशन कार्यक्रमानुसार, वित्तीय समावेशनाचे संगणकीकरण होण्यासाठी वित्तानी गती वाढण्यासाठी डिजिटल प्रक्रियांचा वापर वाढणे गरजेचे आहे. यासाठी

दोन बाबी महत्त्वाच्या ठरतात. एक म्हणजे वित्तीय सेवांच्या डिजिटल नोंदी होणे आणि माहितीचे योग्य संकलन (Database) होणे, दुसरे म्हणजे वेगवेगळ्या डिजिटल सुविधांचा वापर करून व्यवहार करण्याची सवय विकसित होणे. दोन्ही बाबी परस्परांवर अवलंबून आहेत. पारदर्शकता आणि वित्तीय समावेशनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी दोन्हीमधील समन्वय आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1. Burjorji, Dina M., Rani Deshpande and Gin wei de man Supporting Women's Livelihoods: Microfinance that works for Majority. New York: United Nations Capital Development Fund-Special Unit for Microfinance, 2002.
2. Haridos R., Fredrik J., (2008), “Empowerment of Women through SHGs in Madurai District - An Empirical Analysis”, Emerging Dimenion in Self Help Groups, Dominant Publication, PP. 81 - 97.
3. Hemlata Prasad, (2006)-Social Mobilisation, Emloyment and Empowerment of Women through SHG's-Sponsored and published by Ministry of Rural Development Govt. of India.
4. Lalitha N., Role of Banks and Apex Institutions in promoting the sustainability of Self Help Group.
5. Maitee Shrabanti and Saraniya Rahul, "Does microfinance alleviate poverty and inequality? Studying self-help groups in Bodoland, Assam', Pages 1006-1019.
6. Pillai B. Vijaychandran, V. Harikumar, (2008), “SHGs in Kerala - An Evaluation”, Emerging Dimenions in Self Help Groups, Dominant Publishers and Distributors
7. SHG,(2003), Bank Linkage Programme as Impact Evaluation, Bombay, NABARD.
8. Shridharan, Damayantee, (Oct. 1997), “Encourage Self Help Group”, Social Welfare, Vol. 44 Number 7.
9. Yunnus Mohammad, (1999), Bankee to the Poor-micro lending and the Battle against World Poverty, Pacific Affairs, New York.
10. https://www.igi-global.com/book/handbook-research-microfinancial-impacts-women/187132 Adhikary Manaklal, Das Sumanata Kumar, "Impact of Self-Help Group (SHG) on Income and Income Inequality: A Case Study of Birbhum District in West Bengal', Handbook of Research on Microfinancial Impacts on Women Empowerment, Poverty, and Inequality- cited on 07/02/2024.
11. https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/status-of-microfinance-in-india-2022-23.
12. pdfhttps://www.tandfonline. com - cited on 09/02/2024.
13. https://www.igi-global.com/chapter/microfinance-for-achieving-sustainable-development-goals/293795 - cited on - 07/02/2024.
14. https://www.thehindubusinessline.com/opinion/microfinance-is-broadening-and-deepening-financial-inclusion/article66235482.ece - cited on - 09/02/2024.
15. https://www.ibef.org/blogs/evolution-of-micro-finance-in - cited on 13/02/2024.
16. https://www.gdrc.org/icm/microcredit - cited 29/02/2024.
17. https://www.ijraset.com/research-paper/microfinance-and-sustainable-development - cited on 28/02/2024.


◆

# भारतातील उच्च शिक्षणाची वाढ आणि लैंगिक असमानता प्रत्यावर्तनाचा विश्लेषणात्मक अभ्यास

**हरी पंढरी वंगरवार** †

**प्रस्तावना :**

उच्च शिक्षण ज्ञानाची निर्मिती आणि प्रसाराद्वारे शाश्वत विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान देते. भारतात तक्षशिला आणि नालंदा विद्यापीठात उच्चशिक्षण दिले जात होते याचे पुरावे सापडतात. परंतु आधुनिक उच्च शिक्षणाची सुरुवात १९व्या शतकाच्या सुरुवातीस झाली. तथापि, चार्ल्स वूड (१८५४) यांनी भारतातील शैक्षणिक विकासाचा पाया घातला. त्यांच्या शिफारशीनुसार भारतात पाश्चात्त्य धर्तीवर प्रथमतः १८५७ साली मुंबई, मद्रास कलकत्ता विद्यापीठाची स्थापना झाली. तसेच उच्च शिक्षणात महिलांना प्रवेश घेण्यास मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर लॉर्ड कर्झन यांनी उच्च शिक्षणाचा विस्तार आणि विकास करण्यात मोलाची भूमिका निभावली. असे असले तरी स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी भारतातील उच्च शिक्षण हे शहरी, उच्चवर्णीय लोकांसाठी आणि असमानतेने ग्रासलेले होते. त्याचबरोबर उच्च शिक्षण घेणाऱ्या महिलांचे प्रमाण देखील खूपच अल्प होते. १८५५-५६ साली उच्च शिक्षण देणाऱ्या कॉलेजची संख्या २१ तर या कॉलेजमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४३५५ एवढी अल्प होती. १९४७ साली उच्च शिक्षण देणाऱ्या कॉलेजची संख्या वाढून ४९६ झाली आणि त्यातील एकूण विद्यार्थिसंख्या २,३७,५४६ एवढी होती. देशाच्या लोकसंख्येचा विचार करता हे प्रमाण खूपच कमी होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाच्या वाढीसाठी आणि विशेषतः उच्च शिक्षणातील महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. परिणामी, देशातील उच्च शिक्षणातील एकूण आणि महिलांच्या स्थूल नोंदणी प्रमाणात (Gross Enrollment Ratio) मोठी वाढ झाली. १९५०-५१ साली उच्च शिक्षणातील स्थूल नोंदणी प्रमाण ०.७% होते. ते वाढून २०२०-२१ साली २७.३% झाले. हे स्थूल नोंदणी प्रमाण २०२०-२१ साली महिलांसाठी २७.९% तर पुरुषासाठी २६.७% होते. म्हणजे भारतातील १८-२३ वयोगातील महिलांचा उच्च शिक्षणातील सहभाग पुरुषांपेक्षा जास्त आहे. UNESCO च्या Institute for Statistics (UIS) च्या आकडेवारीनुसार २०००-२०१८ च्या दरम्यान जागतिक स्तरावर पुरुषासाठी उच्च शिक्षणातील स्थूल नोंदणी प्रमाण (GER) १९% पासून ३६% पर्यंत वाढले तर

† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, बी. वाय. के. (सिन्नर) कॉलेज ऑफ कॉमर्स, नाशिक.
आजीव सभासद क्र.१४८९, भ्रमणध्वनी : ९४०४७८१८६५, ई-मेल : haripinkey@gmail.com

महिलांसाठी १९% वरून ४१% वर गेले. थोडक्यात, सर्व प्रमुख देशात उच्च शिक्षणातील नोंदणीमध्ये जलद वाढ होण्याचे बहुसंख्य लाभार्थी महिला विद्यार्थी झालेल्या आहेत.

या शोधनिबंधात भारतातील उच्च शिक्षणाचा स्वातंत्र्योत्तर काळातील विकास आणि २१व्या शतकातील उच्च शिक्षणातील महिलांचा सहभाग यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. उच्च शिक्षणातील महिला सहभागातील वृद्धी, त्याचे शाखानिहाय विश्लेषण, महिला शिक्षण सहभागास जबाबदार घटक आणि त्यांचा उत्पादक कार्यातील सहभाग यावर शोधनिबंधात विश्लेषण केले जाणार आहे. शेवटी काही सूचना देण्याचा प्रयत्न केला जाईल ज्यामुळे भारतातील उच्च शिक्षणात महिलांच्या सहभागाला अधिक गती मिळेल.

**संशोधन साहित्याचा आढावा :**

ओसीइएडी, २००८ हा अहवाल आर्थिक सहकार्य आणि विकासासाठी संघटना (OCED) सदस्य देशांच्या उच्च शिक्षणातील स्त्री-पुरुष सहभागाच्या लैंगिक असमानतेचे विश्लेषण करतो. विसाव्या शतकाच्या शेवटी OCED सदस्य देशांमध्ये लिंग असमानता प्रत्यावर्तन (Gender Inequality Reversal) प्रस्थापित झाले असून वय किंवा उच्च शिक्षणाचा प्रकार विचारात न घेता सर्व प्रकारच्या उच्च शिक्षणात पुरुषांपेक्षा स्त्रिया अधिक प्रमाणात प्रवेश घेताना दिसतात. त्यामुळे अभ्यासाची सर्व क्षेत्रे स्त्रीप्रधान बनली आहेत. उच्च शिक्षणातील लैंगिक असमानतेचे प्रत्यावर्तन विविध लोकसंख्याशास्त्रीय, आर्थिक, समाजशास्त्रीय आणि शैक्षणिक घटकांमुळे झाले असून त्यातील कोणताही घटक पुढील काही दशकांत हे प्रत्यावर्तन संपण्याची किंवा उलट होण्याची शक्यता दर्शवित नाही. याउलट, त्यापैकी काही घटक पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या शिक्षणाच्या पातळीत अधिक वेगाने वाढ होईल असे दर्शवितात. परिणामी, पुरुष उच्च शिक्षणापासून वंचित राहाण्याची आणि त्यात वाढ होण्याची दाट शक्यता अहवालात वर्तविली आहे. हे पिढी बदलाचे (Generation Replacement) संकेत असून या पुढील काळात महिला लोकसंख्या कोणत्याही परिस्थितीत पुरुष लोकसंख्येपेक्षा अधिक सुशिक्षित राहील. परिणामी, शाश्वत शैक्षणिक असमानता पुरुषांच्या सामाजिक हानीसाठी किंवा लोकसंख्याशास्त्रीय संकट किंवा श्रमिक बाजारपेठेतील लैंगिक वेतन असमानतेच्या प्रत्यावर्तनास कारणीभूत ठरेल की काय अशी भीती अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. तसेच पुरुषांचे नुकसान करणाऱ्या असमान शैक्षणिक धोरणाकडे दुर्लक्ष करणे धोक्याचे ठरेल, असे अहवालात प्रतिपादन करण्यात आले आहे.

तुषार कांती धारा, २०१६ यांनी आपल्या अभ्यासातून भारतातील उच्च शिक्षणात महिलांचा महत्त्वपूर्ण सहभाग असल्याचे प्रतिपादन केले. तथापि, भारतातील बहुतांश राज्यांमध्ये उच्च शिक्षणात महिलांची नोंदणी पुरुषांच्या तुलनेत मंदगतीने होत आहे. त्यांनी महिलांची उच्च शिक्षणातील नोंदणीतील वाढ महिला शिक्षकांच्या सहभागावर अवलंबून असल्याचे सांगितले. त्यांच्या मते, भारतात अजूनही उच्च स्तरावरील कामातील आणि प्रशासनातील महिलांचा सहभाग मध्यम आणि निम्न कामकाजाच्या व्यवसायापेक्षा तुलनेने कमी आहे.

डॉ. शांजेंदू नाथ, २०१४ यांनी आपल्या लेखात भारतातील स्त्रीशिक्षणाची वाढ आणि विकास याचा आढावा घेतला. त्यांच्या मते, राष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासात स्त्रीशिक्षणाचे महत्त्वाचे स्थान आहे. भारतातील स्त्रीशिक्षणाची सुरुवात स्वातंत्र्याप्राप्ती पूर्वी झाली असली, तरी २०व्या शतकाच्या सहाव्या दशकापासून महिला उच्च शिक्षणावर शासनाने लक्ष केंद्रित केले आहे. सरकारने अनेक उपक्रमांद्वारे उच्च शिक्षणासाठी महिलांना प्रोत्साहन

दिल्यामुळे उच्च शिक्षणात महिलांच्या निरपेक्ष आणि सापेक्ष संख्येत मोठी वाढ झाल्याचे दिसून येते असे मत मांडले. तसेच त्यांनी आपल्या शोधनिबंधात उच्च शिक्षणातील महिलांच्या सहभागातील अडथळ्यांवर चर्चा केली आणि त्यावर उपाय सुचविले आहेत.

**उच्च शिक्षणाची व्याख्या:**

भारत सरकारच्या मंत्रालयानुसार, '१२ वर्षे शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर किंवा समतुल्य शिक्षण पूर्ण केल्यानंतर किमान ९ महिन्यांचे पूर्णवेळ शिक्षण किंवा १० वर्षे शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर किमान ३ वर्षे पूर्णवेळ शिक्षण प्राप्त केल्यास त्यास उच्च शिक्षण म्हणतात. हे शिक्षण सामान्य, व्यावसायिक किंवा तांत्रिक स्वरूपाचे असू शकते.'

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये:**

१. भारतातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी नोंदणीचा अभ्यास करणे.
२. उच्च शिक्षणाच्या विविध विद्याशाखेतील विद्यार्थी नोंदणीचे सापेक्ष प्रमाण जाणून घेणे.
३. भारतातील उच्च शिक्षण घेणाऱ्या महिला विद्यार्थी नोंदणीचा कल शोधणे.
४. भारतातील उच्च शिक्षण घेणाऱ्या महिला विद्यार्थिसंख्येच्या वाढीच्या कारणांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**

हा शोधनिबंध वर्णनात्मक स्वरूपाचा असून पूर्णतः दुय्यम माहितीवर आधारित आहे. त्यासाठी विविध नियतकालिक, मासिक, वर्तमानपत्र, वेबसाईट विशेषतः शिक्षण मंत्रालयाचे उच्च शिक्षण विभाग यांचे वार्षिक अहवाल, विद्यापीठ अनुदान आयोगाचे वार्षिक अहवाल, भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचे अहवाल, विविध आंतरराष्ट्रीय संस्थांचे अहवाल यांचा उपयोग करण्यात आला. विविध अहवालातून प्राप्त केलेल्या सांख्यिकीय माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी शेकडेवारी, सरासरी वार्षिक वृद्धिदर आणि आलेख या सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**भारतातील आधुनिक उच्च शिक्षणाचा इतिहास:**

भारतातील उच्च शिक्षणाचा आधुनिक कालखंड १७८१ साली सुरू झाला. यावेळी गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज यांनी स्थानिक मुस्लिमांच्या विनंतीवरून कलकत्ता येथे उच्च शिक्षणासाठी कलकत्ता मदरशाची स्थापना केली. त्यानंतर अनेक एजन्सींनी विविध हेतूने प्रेरित होऊन देशातील विविध भागांत शैक्षणिक संस्थाची स्थापना केली. १८१७ साली राजाराम मोहन रॉय आणि डेव्हिड हेअर यांनी कोलकत्ता येथे हिंदू कॉलेजची स्थापना केली. भारतातील इंग्रजीतून उच्च शिक्षण देणारे आणि युरोपियन पद्धतीचे हे पहिले कॉलेज आहे. तथापि, १८५४ पर्यंत उच्च शिक्षणाचे कोणतेही स्पष्ट आणि निश्चित धोरण नव्हते. १८५४ साली चार्ल्स वूड यांनी भारतातील शैक्षणिक विकासासाठीचा अहवाल ब्रिटिश सरकारला सादर केला. त्यांनी अहवालात भारतातील सुनियोजित शिक्षणाच्या विकासासाठी प्राथमिक शिक्षणापासून ते विद्यापीठीय शिक्षणापर्यंत योग्य प्रणाली तयार करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. तसेच लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर भारतात विद्यापीठांची स्थापना करण्याची शिफारस केली. परिणामी, १८५७ साली मुंबई, मद्रास, कलकत्ता येथे विद्यापीठाची स्थापना झाली. त्यानंतर २०व्या शतकाच्या सुरुवातीस लॉर्ड कर्झन यांनी भारतातील उच्च शिक्षणात गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न केले. परिणामी, १८५५-५६ साली भारतातील उच्च शिक्षण देणाऱ्या कॉलेजची संख्या २१ होती आणि त्यात ४३५५ विद्यार्थी शिक्षण घेत होते. १९२१-२२ साली कॉलेजेसची संख्या वाढून १७२ आणि त्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५८८३७ झाली. भारतात १९४७ साली १९ विद्यापीठे आणि ४९६ कॉलेज होते आणि त्यात २३७५४६ विद्यार्थी शिक्षण घेत होते. असे असले तरी भारतातील

उच्च शिक्षण व्यवस्थेत अनेक दोष होते. शिक्षण केवळ सैद्धांतिकदृष्ट्या सर्वांना उपलब्ध होते. उच्च शिक्षण संस्था मोठ्या प्रमाणात महानगर आणि ठरावीक प्रदेशात केंद्रित झालेल्या होत्या. तसेच त्याचा लाभ उच्च जाती आणि अधिकांश पुरुष विद्यार्थ्यांना होत होता. उच्च शिक्षणातील महिला विद्यार्थ्यांचे प्रमाण नगण्य होते. ही असमानता घालवण्यासाठी नियोजन काळात मोठे प्रयत्न झाले.

**भारतातील महिला शिक्षणाची पार्श्वभूमी:**

महिला या मानव संसाधनाचा अविभाज्य भाग आहेत. परंतु भारतात दीर्घकाळापासून महिलांविरुद्ध शिक्षणात तीव्र पक्षपात केला जात होता. त्यांना समान सामाजिक-आर्थिक संधी नाकारण्याची प्रवृत्ती होती. स्त्रियांबद्दलची ही उपेक्षित वृत्ती अनेक बाबतीत विशेषत: शैक्षणिक क्षेत्रात अजूनही ठळकपणे दिसून येते. सध्या उच्च शिक्षणातील महिलांच्या सहभागाच्या प्रश्नावर पारंपरिक आणि आधुनिक अशी दोन भिन्न मते आहेत. पारंपरिक दृष्टिकोन स्त्रियांच्या शिक्षणास त्यांना चांगल्या पत्नी आणि आई बनण्यासाठी सुसज्ज करण्यासाठी समर्थन देतो. त्यांचा असा विश्वास आहे की, सध्याचे शिक्षण स्त्रियांच्या जीवनात पूर्णपणे अप्रासंगिक आहे. तो केवळ वेळेचा अपव्यय असून त्याची दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यास कोणतीही मदत होत नाही. त्यांच्या मते, आधुनिक शिक्षित स्त्रिया सामाजिकदृष्ट्या उपयुक्त नाहीत. आधुनिक दृष्टिकोन महिला शिक्षणाला समानता आणि विकासासाठीचे एक साधन मानते.

भारतातील महिला शिक्षणाची सुरुवात १९व्या शतकात ब्रिटिशांच्या उदार शैक्षणिक धोरणामुळे आणि समाजसुधारकांनी स्त्रीशोषणाच्या विरोधात दिलेल्या लढ्यातून झाली. १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाडा येथे महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी भारतातील पहिली शाळा सुरू केली. तसेच धोंडो केशव कर्वे यांनी महिलांचा उच्च शिक्षणातील सहभाग वाढविण्यासाठी १९१८ साली पुणे येथे पहिले महिला विद्यापीठ सुरू केले. ते SNDT महिला विद्यापीठ नावाने विकसित होऊन मुंबई येथे हलविण्यात आले. हे भारतातील पहिले महिला विद्यापीठ आहे, म्हणून पुणे हे शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते.

**भारतातील उच्च शिक्षणातील विद्यार्थी नोंदणीचा विस्तार आणि वाढ:**

भारतात पाश्चात्य आधुनिक उच्च शिक्षणाची सुरुवात विसाव्या शतकाच्या सुरुवातीस झाली. १८५५-५६ साली भारतात केवळ ४३५५ विद्यार्थी उच्च शिक्षण घेत होते. परंतु १८५७ साली मुंबई, मद्रास आणि कलकत्ता विद्यापीठाची स्थापना झाली. तसेच ब्रिटिश सरकारने भारतातील शिक्षणव्यवस्थेत सुसूत्रता आणण्यासाठी आणि विस्तारासाठी प्रयत्न केले. त्यामुळे १९४७-४८ साली भारतातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २, ३७,५४६ एवढी झाली. १८५५-५६ ते १९४७-४८ या काळातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी नोंदणीचा वार्षिक सरासरी वृद्धिदर ३.९% होता.


तक्ता १ मध्ये भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रातील एकूण विद्यार्थी नोंदणी, पुरुष विद्यार्थी नोंदणी, महिला विद्यार्थी नोंदणी, महिलांचे उच्च शिक्षणातील प्रमाण, प्रति १०० पुरुषामागे महिलांची संख्या याची आकडेवारी दिलेली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने शालेय आणि उच्च शिक्षणाचा विस्तार करण्याचे धोरण स्वीकारले. परिणामी, १९५०-५१ ते २०२०-२१ या सत्तर वर्षांच्या काळात भारतातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी ३.९७ लक्षवरून ४१३.८ लक्ष एवढी प्रचंड वाढली असून, ही वाढ १०४ पट आहे. १९५०-५१ ते २०२०-२१ या कालावधीतील विद्यार्थी नोंदणीचा वार्षिक सरासरी वृद्धिदर ६.६ होता.

नियोजनाच्या सुरुवातीला १९५०-५१ ते १९६०-

**तक्ता क्र. १ : भारतातील उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांची नोंदणी**

| शैक्षणिक वर्ष | एकूण नोंदणी | पुरुष नोंदणी | महिला नोंदणी | महिलांची टक्केवारी | १०० पुरुषांमागे महिलांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १९५०-५१ | ३९७००० | ३५७००० | ४०००० | १०.१ | ११ |
| १९६०-६१ | ५५६५५९ | ४०६५५९ | १५०००० | २७ | ३७ |
| १९७०-७१ | १९५३७०० | १५२२८७८ | ४३०८२२ | २२.१ | २८ |
| १९८०-८१ | २७५२४३७ | २००३४३७ | ७४९००० | २७.२ | ३७ |
| १९९०-९१ | ४४२५२४७ | २९८८३६० | १४३६८८७ | ३२.५ | ४८ |
| २००२-०३ | ९२२७८३३ | ५५३१८६९ | ३६९५९६४ | ४०.१ | ६७ |
| २०१०-११ | १६९७४८८३ | ९९२६१९५ | ७०४८६८८ | ४१.५ | ७१ |
| २०२०-२१ | ४१३८०७१३ | २१२३७९१० | २०१४२८०३ | ४८.७ | ९५ |

संदर्भ : Various Annual Reports of University Grants Commission, Ministry of Education, Government of India.




संदर्भ : तक्ता १ चा आधार घेऊन वार्षिक सरासरी वृद्धिदर गणना केली आहे.

६१ या काळात विद्यार्थी नोंदणीचा वार्षिक वृद्धिदर ३.४ टक्के होता. परंतु १९६०-६१ ते १९७०-७१ या काळात वाढून १२.६% झाला. ही वाढ नियोजनकाळातील सर्वात मोठी वाढ मानली जाते. कोठारी आयोगाचे या वाढीत महत्त्वपूर्ण योगदान आहे. परंतु हा वृद्धिदर पुढील दशकात घसरला. असे असले तरी भारतातील उच्च शिक्षणातील ही वाढ सतत कायम असून १९७०-७१ पासून उच्च शिक्षणातील विद्यार्थी नोंदणीचा वृद्धिदर हा सतत वाढता आहे (आकृती १ पाहा).

तसेच स्वातंत्र्योत्तर काळात उच्च शिक्षण क्षेत्रात

विविधता आली. नियोजन काळाच्या सुरुवातीला उच्च शिक्षणात कला, वाणिज्य विज्ञान शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी होती. १९४७-४८ साली एकूण विद्यार्थी संख्येच्या ४७% विद्यार्थी कला शाखेत, ३२% विद्यार्थी विज्ञान शाखेत आणि ८% विद्यार्थी वाणिज्य शाखेत प्रवेश घेतलेले होते. या तीन शाखेत एकूण विद्यार्थी संख्येच्या ८७% विद्यार्थी होते. तथापि, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, वैद्यकीय शिक्षण आणि विधी या क्षेत्रात शिक्षण घेणारे विद्यार्थी अल्प होते. परंतु काळानुसार नवनवीन ज्ञानाच्या शाखा निर्माण होत गेल्या. त्यातील रोजगाराची उपलब्धता आणि उच्च पगार यामुळे परंपरागत कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची सापेक्ष संख्या कमी झाली.

२०१०-११ साली एकूण विद्यार्थिसंख्येच्या ३६%

**तक्ता क्र. २ : उच्च शिक्षणातील विद्याशाखेनुसार विद्यार्थी नोंदणीतील निरपेक्ष आणि सापेक्ष बदल**

| विद्याशाखा | १९४६-४७ | १९७३-७४ | १९९०-९१ | २०१०-११ | १९४६-४७ | १९७३-७४ | १९९०-९१ | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कला | १२४६६७ | १००३३७५ | १७८९४८० | ६१७७७३० | ४६.९ | ४४.९ | ४०.४ | ३६.४ |
| वाणिज्य | २०८२२ | ३४०३९२ | ९६९८८२ | २९०४७५२ | ७.८ | १५.२ | २१.९ | १७.१ |
| विज्ञान | ८५७३५ | ४७३६८५ | ८६९१११९ | ३११२७०४२ | ३२.३ | २१.२ | १९.६ | १८.४ |
| शिक्षण | २००६ | ७०६८० | ९९६१३ | ५६९९६१ | ०.८ | ३.२ | २.३ | ३.४ |
| अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान | ५८४८ | ८६६६५ | २१६८३७ | २८६२४३९ | २.२ | ३.९ | ४.९ | १६.९ |
| विधी | ९७७४ | ११३२३० | २३४५३८ | ३२७१४६ | ३.७ | ५.१ | ५.३ | १.९ |
| वैद्यकीय विज्ञान | ८८४७ | १०२२४२ | १५०४५८ | ६५२५३३ | ३.३ | ४.६ | ३.४ | ३.८ |
| कृषी | ४३०२ | २६५२० | ४६९०८ | ९३१६६ | १.६ | १.२ | १.१ | ०.५ |
| इतर | ४८४८ | १७५९६ | ४८४१२ | २६०११४ | १.४ | ०.८ | १.१ | १.५ |
| एकूण | २६५८४४ | २२३४३८५ | ४४२५२४७ | १६९७४८८३ | १०० | १०० | १०० | १०० |

संदर्भ : Haggerty William J. (1969), “Higher and Professional Education in India”, U.S. Government Printing Office, Washington, Annual Reports of University Grants Commission, Reports of All India Survey on Higher Education.

विद्यार्थी कला शाखेत, १८% विद्यार्थी विज्ञान शाखेत आणि १७% विद्यार्थी वाणिज्य शाखेत प्रवेश घेतलेले होते. या तीन शाखेत एकूण विद्यार्थी संख्येच्या अजूनही ७१% विद्यार्थी आहेत. तथापि, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान (१६.९%), शिक्षण (३.४%), वैद्यकीय शिक्षण (३.८%) या विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची निरपेक्ष आणि सापेक्ष संख्या वाढलेली दिसते. तसेच विदेशी भाषा, पत्रकारिता, समाजकार्य, हॉटेल व पर्यटन व्यवस्थापन, फॅशन डिझाइन, ललित कला, योगशास्त्र, अंतराळ विज्ञान इ. विद्याशाखेतील विद्यार्थी नोंदणी लक्षणीय आहे. त्याचबरोबर २०२०-२१ साली कला, विज्ञान, वाणिज्य शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण पदवी व पदव्युत्तर स्तरावर आणखी घसरल्याचे दिसते (तक्ता ४ पहा). या परंपरागत शाखेत पदवी

स्तरावर ५०% आणि पदव्युत्तर स्तरावर ४६% विद्यार्थी प्रवेश घेतलेले दिसतात. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (२०२०) कौशल्य शिक्षणावर मोठा भर देण्यात आलेला आहे. त्यामुळे पुढील दोन दशकात भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल झाल्याचे दिसतील असे वाटते.

**उच्च शिक्षणातील महिलांचा सहभाग:**

नियोजनकाळात उच्च शिक्षणाच्या विस्तारीकरणाबरोबरच महिलांच्या सहभागावर देखील सरकारने लक्ष दिले. महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ, महाविद्यालये, महिला वसतिगृहांची उभारणी, उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या महिलांना प्रवेश फीमध्ये सवलत, महिला आरक्षण इ. कारणामुळे महिलांचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढले. १९५०-५१ साली उच्च शिक्षणातील एकूण विद्यार्थी नोंदणीमध्ये महिलांचा वाटा जेमतेम १०% होता. तो वाटा २०२०-२१ साली ४८.७% झाला. तसेच उच्च शिक्षणातील दर १०० पुरुषामागे महिला विद्यार्थ्यांची संख्या सतत वाढत आहे. १९५०-५१ साली १०० पुरुषामागे १० महिला विद्यार्थी नोंदणी होती ती वाढून २०२०-२१ साली ९५ एवढी झाली.

अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण (२०२०-२१) अहवालानुसार, ४.१४ कोटी विद्यार्थी नोंदणीपैकी ३.२६ कोटी पदवी, ४७.१६ लक्ष पदव्युत्तर, २.१३ लक्ष पीएच.डी. आणि २९.७९ लक्ष डिप्लोमा किंवा प्रमाणपत्र स्तरासाठी झालेली होती. तक्ता ३ मध्ये पदवी, पदव्युत्तर, एम.फील/पीएच.डी. आणि डिप्लोमा किंवा प्रमाणपत्र स्तरावरील उच्च शिक्षणासाठी पुरुष आणि महिला विद्यार्थी नोंदणीची आकडेवारी दिलेली आहे. २०२०-२०२१ वर्षातील उच्च शिक्षणातील पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण एकूण विद्यार्थी नोंदणीच्या ९०% पेक्षा जास्त असून त्यातील महिला विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे. पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी नोंदणीपैकी सर्वाधिक ५६.५% विद्यार्थी महिला असून त्याखालोखाल पदवी शिक्षणात महिलांचे प्रमाण ४८.७% आहे. तसेच एम.फील./पीएच.डी. शिक्षणात हे प्रमाण ४६% आहे. तक्ता ४ वरून असे दिसून येते की, कला (५२%), विज्ञान (५२%), शिक्षणशास्त्र (६३%), वैद्यकशास्त्र (५९%), विदेशी भाषा (५६%), भारतीय भाषा (६४%) आणि समाजकार्य (५१%) पदवीस्तरावरील या विद्याशाखेत महिलांचे प्रमाण

**तक्ता क्र. ३ : २०२०-२१ वर्षातील उच्च शिक्षणातील स्तरनिहाय विद्यार्थी नोंदणी**

| स्तर/ पातळी | पुरुष | महिला | एकूण | महिलांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| पदवी | १६७४७६७४ | १५९०९८३५ | ३२६५७५०९ | ४८.७ |
| पदव्युत्तर | २०५३७९४ | २६६२८५५ | ४७१६६४९ | ५६.५ |
| एम.फील./ पीएच.डी. | १२३१०९ | १०५४८७ | २२८५९६ | ४६.१ |
| डिप्लोमा किंवा प्रमाणपत्र | २१०११३२ | १२९१२८६ | ३३९२४१८ | ३८.१ |
| एकात्मिक (Integrated) | २१२२०१ | १७३३४० | ३८५५४१ | ४५.० |
| एकूण | २१२३७९१० | २०१४२८०३ | ४१३८०७१३ | ४८.७ |

संदर्भ : Government of India (2022), “All India Survey on Higher Education 2020-21”, Department of Higher Eduacation, Ministry of Education, New Delhi.

पुरुषांपेक्षा अधिक दिसून येते. तथापि, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान (२९%), कृषी (३०%) आणि विधी (३४%), व्यवस्थापन (३६.६%) या ज्ञानशाखेव्यतिरिक्त इतर सर्व शाखांत २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील महिला विद्यार्थी नोंदणी पुरुष नोंदणीपेक्षा जास्त किंवा जवळपास असल्याचे दिसते. हे महिलांचे प्रमाण पदव्युत्तर स्तरावर विविध विद्याशाखात यापेक्षा अधिक दिसते.

पदव्युत्तर स्तरावरील शिक्षणात सामाजिक शास्त्र, विज्ञान, वाणिज्य, शिक्षण, वैद्यकीय शास्त्र, विदेशी भाषा, भारतीय भाषा, समाजकार्य या शाखेत महिलांचे प्रमाण ५०% किंवा त्यापेक्षा अधिक दिसून येते. तसेच पत्रकारिता (४८%), माहिती तंत्रज्ञान व संगणक (४७%), विधी (४४%) आणि व्यवस्थापन (४३%) या विद्याशाखेत पदवीस्तरापेक्षा अधिक प्रमाण दिसते. केवळ अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि कृषिशास्त्र या विद्याशाखेत ते ४० टक्केपेक्षा कमी आढळून येते. तसेच संशोधन (Ph.D.) स्तरावरील महिला नोंदणीचे प्रमाण ४६% असून याही क्षेत्रात महिला मागे नसल्याचे दिसते. थोडक्यात, उच्च शिक्षणात लिंग असमानता प्रत्यावर्तनास सुरुवात झाली असून पुढील १० वर्षांच्या काळात ज्ञानाच्या बहुतेक शाखेत पदवी व पदव्युत्तर स्तरावर महिलांची संख्या लक्षणीय वाढल्याचे दिसेल, यात

**तक्ता क्र. ४: २०२०-२१ वर्षातील विद्याशाखानिहाय उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या**

| विद्याशाखा | पदवी | | | पदव्युत्तर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महिला | एकूण | महिलांची टक्केवारी | महिला | एकूण | महिलांची टक्केवारी |
| कला/ सामाजिक शास्त्र | ५४१७४२४ | १०४०५६७० | ५२.१ | ५३२२०४ | ९४१६४८ | ५६.५ |
| विज्ञान | २५०५२२४ | ४८१७८२६ | ५२.० | ४१६३१८ | ६७९१७८ | ६१.३ |
| वाणिज्य | २०९६४१८ | ४३२३४५४ | ४८.५ | ३५६७४७ | ५३६५६० | ६६.५ |
| अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान | १०६९१३६ | ३६८६२९१ | २९.० | ५९२६७ | १७७२७९ | ३३.४ |
| शिक्षण | १०४०३०५ | १६४९१९३ | ६३.१ | १३३०२७ | १९२२९४ | ६९.२ |
| वैद्यकीय शास्त्र | ८९४१७८ | १५२६२४७ | ५८.६ | १३२६९० | २२२७३० | ५९.६ |
| विधी | १६१८९७ | ४७८०१२ | ३३.९ | १७०७२ | ३८८४७ | ४३.९ |
| पत्रकारिता आणि संवाद | १६४१६ | ३२५९५ | ५०.४ | १०३५४ | २१३७१ | ४८.४ |
| विदेशी भाषा | ९२९९२ | १६७१९० | ५५.६ | १४५१८२ | २२२४६३ | ६५.३ |
| भारतीय भाषा | १९३९५० | ३०३१०९ | ६४.० | २१००४२ | ३२०१७६ | ५५.६ |
| समाजकार्य | १६४१६ | ३१८७३ | ५१.५ | ३२३१० | ५९४६५ | ५४.३ |
| व्यवस्थापन | २९८५९४ | ८१४८६७ | ३६.६ | २९५७४५ | ६८६००१ | ४३.१ |
| माहिती तंत्रज्ञान आणि संगणक | ३४४४९२ | ८७७९३७ | ३९.२ | ९३८९९ | २००४९१ | ४६.८ |
| कृषी | ८६८६० | २९०३९६ | २९.९ | ११७८५ | ११८१५ | ९९.७ |
| एकूण | १५९०९८३५ | ३२६५७५०९ | ४८.७ | २६६२८५५ | ४७१६६४९ | ५६.५ |

संदर्भ : Government of India (2022), “All India Survey on Higher Education 2020-21”, Department of Higher Eduacation, Ministry of Education, New Delhi.

शंका बाळगण्याचे कोणतेही कारण नाही.

**भारतातील महिलांच्या उच्च शिक्षणातील वाढत्या प्रवाहाची कारणे, त्यांच्या समस्या आणि उपाय:**

OCED अहवालानुसार प्रजनन व्यवस्थापन, सामाजिक समतावाद, वेतन समानता, कुटुंबाचा सतत कमी होणार आकार, करिअर नियोजनातील जागरूकता, महिलांना अनुकूल श्रमबाजार धोरण, घटता लैंगिक भेदभाव, वाढती मध्यमवर्गीय शिक्षित कुटुंबे, शिक्षणावरील उच्च परतावा, अभ्यासक्रमातील पर्यायांची उपलब्धता, अल्पकालीन अभ्यासक्रमांची वाढती संख्या, शिक्षणातील मुलींची सापेक्ष चांगली प्रगती, शिक्षणातील मुलांच्या तुलनेत मुलींच्या अपेक्षेत वाढ, उच्च शिक्षणातील तरतुदींमधील बदल, शिक्षकी पेशातील महिलांचे मोठे प्रमाण ही उच्च शिक्षणात स्त्रियांची निरपेक्ष आणि सापेक्ष संख्या वाढण्याची प्रमुख कारणे आहेत. यातील बहुतांश करणे भारतातील उच्च शिक्षणातील महिलांच्या वाढत्या प्रमाणास कारणीभूत असल्याचे दिसून येते.

परंतु उच्च शिक्षित महिलांचे संसद व विधानसभा लोकप्रतिनिधी, उच्च पदस्थ अधिकारी, उद्योजक या क्षेत्रातील संख्या अल्प दिसते. सध्या लोकसभेच्या १५% आणि राज्यसभेच्या १३% खासदार महिला आहेत. तसेच कोणत्याही राज्याच्या विधानसभेत २०% पेक्षा जास्त महिला प्रतिनिधी नाहीत. कालबद्ध श्रमशक्ती सर्वेक्षण २०१-२२ नुसार, १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या ३६.६% ग्रामीण भागातील महिला आणि ७८.२% पुरुष श्रमदानात सहभागी होत आहेत. शहरी भागात हे प्रमाण अनुक्रमे महिलांसाठी २३.८% तर पुरुषासाठी ७४.७% आहे. कोणत्याही देशातील श्रमिक बाजारपेठेतील महिलांचा सहभाग प्रामुख्याने आर्थिक विकास, शिक्षण पातळी, प्रजनन दर, बालसंगोपन आणि व इतर सहाय्यक सेवा, कौटुंबीक जबाबदाऱ्या, आरोग्य, सोयीस्कर वेळ व स्थान आणि सांस्कृतिक आणि सामाजिक प्रथा इ. विविध घटकांवर अवलंबून आहे. तथापि, जलद आर्थिक वृद्धी, वाढते शिक्षण, घटती प्रजनन क्षमता, महिलांना रोजगारातील झुकते माप यामुळे अलीकडे श्रमशक्तीमध्ये महिलांचा सहभाग वाढत आहे. भारतातील महिलांना आर्थिक विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासकीय स्तरावर आणि सामाजिक स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक आहे. सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवास, महिला हेल्पलाइन केंद्राचे सार्वत्रिकीकरण, समान संधी, कामाच्या ठिकाणी अनुकूल वातावरण, वेतन समानता, बालसंगोपन रजा, प्रसूती रजा, बालसंगोपन गृहांची व्यवस्था, कौशल्यावर आधारित शिक्षणाचा विस्तार यासारखे उपाय केल्यास भारतात महिलांचा श्रमशक्तीतील सहभाग वाढू शकतो.

**सारांश :**

भारतातील आधुनिक उच्च शिक्षणाची सुरुवात ब्रिटिशांनी १९ व्या शतकात केली. परंतु त्याचा गुणात्मक आणि संख्यात्मक विस्तार स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झाला. मुदलियार आयोग, कोठारी आयोग, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, महिला शिक्षण आयोग यांसारख्या विविध धोरणात्मक प्रयत्नामुळे नियोजनकाळात उच्च शिक्षणाच्या विस्ताराबरोबरच महिलांचा उच्च शिक्षणातील सहभाग वाढला. १९५०-५१ साली उच्च शिक्षणातील स्थूल नोंदणी प्रमाण ०.७% होते. ते वाढून २०२०-२१ साली २७.३% झाले. तसेच हे स्थूल नोंदणी प्रमाण २०२०-२१ साली महिलांसाठी २७.९%, तर पुरुषासाठी २६.७% होते. १९५०-५१ ते २०२०-२१ या सत्तर वर्षांच्या काळात भारतातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी ३.९७ लक्षवरून ४१३.८ लक्ष एवढी प्रचंड वाढली असून ही वाढ १०४ पट आहे. १९५०-५१ ते २०२०-२१ या कालावधीतील विद्यार्थी नोंदणीचा वार्षिक सरासरी वृद्धिदर ६.६ होता.

नियोजनकाळात उच्च शिक्षणातील महिलांचा सहभाग पुरुषांच्या सहभागापेक्षा जलद गतीने वाढला. १९५०-५१ ते २०२०-२१ या कालावधीतील पुरुष विद्यार्थी नोंदणीचा सरासरी वार्षिक वृद्धिदर ५.८% तर

महिला नोंदणीचा सरासरी वार्षिक वृद्धिदर ८.९% होता. याच कालावधीतील उच्च शिक्षणातील महिलांचे सापेक्ष प्रमाण १० टक्केवरून ४९% झाले. एवढेच नव्हे, तर पदवी स्तरावर कला, विज्ञान, शिक्षणशास्त्र, वैद्यकीय शिक्षण, पत्रकारिता, भाषा, समाजकार्य या विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या महिलांचे प्रमाण पुरुषांपेक्षा जास्त आहे. तसेच पदव्युत्तर स्तरावर महिला नोंदणीचे प्रमाण ५६% एवढे प्रचंड असून संशोधन पातळीवरील हे प्रमाण ४६% आहे. वरील सर्व सांख्यिकीय विश्लेषण लक्षात घेतले असता भारतात उच्च शिक्षणात लिंग असमानता प्रत्यावर्तनास झाल्याचे दिसून येते. तथापि, सर्वच क्षेत्रात विशेषतः उच्च पदस्थ रोजगारातील महिलांचे प्रमाण अजूनही अल्प दिसून येते. उच्च प्रजनन दर, बालसंगोपन, कौटुंबिक जबाबदाऱ्या, आरोग्य, सोयीस्कर वेळ व स्थान आणि सांस्कृतिक व सामाजिक प्रथा इ. कारणामुळे रोजगारामधील भारतातील महिलांचा सहभाग कमी असल्याचे दिसते.

प्रस्तुत शोधनिबंधात अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, कृषी, विधी या क्षेत्रात उच्च शिक्षण घेणाऱ्या महिलांचे प्रमाण पुरुषांपेक्षा खूप कमी आहे, त्याच्या कारणांचा शोध घेतला गेला नाही. तसेच भारतातील विविध राज्यांतील उच्च शिक्षणातील महिलांच्या सहभागासंबंधी विश्लेषण करण्यात आले नाही. त्यामुळे वरील दोन्ही प्रश्नावर संशोधन करण्यास वाव असून पुढील संशोधन लेखात यावर प्रकाश टाकण्याचे विचाराधीन आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1. Government of India, (2022), "All India Survey on Higher Education 2020-21", Department of Higher Education, Ministry of Education, New Delhi.
2. Government of India, (2023), "Female labour utilisation in India", Ministry of Labour & Employment, Government of India, New Delhi.
3. Government of India, University Grants Commission Annual Reports", University Grants Commission, Ministry of Education, New Delhi.
4. Haggerty William J., (1969), "Higher and Professional Education in India", U.S. Government Printing Office, Washington.
5. Kavita A. Sharma, (2013), "Sixty Years of University Grants Commission", December 2013, University Grants Commission, New Delhi.
6. OCED (2008), "Higher Education to 2030", Volume 1, Centre for Educational Research and Innovation, Organization for Economic Cooperation and Development, Paris (France).
7. Shanjendu Nath, (2014), "Higher Education and Women Participation in India" Journal of Business Management & Social Sciences Research (JBM&SSR), Volume 3, No.2, February 2014, ISSN No: 2319-5614.
8. Tushar Kanti Ghara, (2016), "Status of Indian Women in Higher Education", Journal of Education and Practice, Vol.7, No.34, 2016, www.iiste.org (ISSN 2222-1735 (Paper) ISSN 2222-288X (Online).
9. UNESCO (2021), "Women in Higher Education: has the female advantage put an end to gender inequalities?", March 2021, UNESCO, Paris (France), PP. 13.
10. https://thewire.in/government/in-charts-what-womens-representation-in-indias-parliament-assemblies-looks-like-now dated on 17/01/2024.


◆

# कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया व्यवसायाचा आर्थिक अभ्यास

**मारोती विरभद्र तेगमपुरे** †
**संभाजी शिवाजी सावंत**††

**प्रस्तावना :**

भारतीय शेतीव्यवसायाला खूप जुना इतिहास आहे. देशाच्या वैविध्यपूर्ण नैसर्गिक वातावरणामुळे पीकरचनेत विविधता दिसून येते. या विविधतेचा लाभ घेण्यासाठी देशात विविध प्रकारच्या वस्तू उत्पादनाचा प्रयत्न केला पाहिजे, ज्यामुळे देशात शेतीविकासाबरोबर शेतमाल प्रक्रिया उद्योग, पशु-पक्षी पैदास, दुग्धव्यवसाय यांसारखे शेतीआधारित उद्योग विकसित होतील. शेतीच्या विकासासाठी, रोजगारनिर्मितीसाठी आणि एकंदरित सामाजिक-आर्थिक विकासासाठी, कृषिआधारित उद्योग महत्त्वाचे आहेत.

शेतमालाचे संकलन करून शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग आणि शेतीसाठी लागणारी आदाने तयार करणाऱ्या उद्योग संस्थांना कृषिआधारित उद्योग संस्था असे म्हणता येईल. हे कृषिआधारित उद्योग शेतीविकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. भातप्रक्रिया व्यवसाय हा एक कृषिआधारित उद्योग आहे. रोजगारनिर्मिती आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ घडवून आणण्यासाठी मदत करत आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये भातावर प्रक्रिया करणाऱ्या जवळपास अठराशे ते दोन हजार लहान-मोठ्या गिरण्या आहेत. या गिरण्या भातावर प्रक्रिया करून उत्तम दर्जाचा तांदूळ तयार करत आहेत.

या पार्श्वभूमीवर, प्रस्तुत अभ्यासाच्या माध्यमातून भातप्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. अभ्यास करताना लहान भातप्रक्रिया उद्योगांचे तसेच मोठ्या भातप्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचे अर्थकारण यांचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**पूर्वसुरीच्या साहित्याचे अवलोकन:**

**कोमल सिंह (२०१३)**, बेंगलोर स्थित 'ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट अँड रुलर ट्रान्सफॉर्मेशन सेंटर इन्स्टिट्यूशन फॉर सोशल अँड इकॉनोमिक चेंज नागरभावी' या संस्थेने प्रमुख भात उत्पादन करणाऱ्या राज्यांच्या बाबतीत हिलिंग अँड मिलिंग रेशोचे मोजमाप केले आहे. त्यांचा हा अभ्यास प्रामुख्याने भात उत्पादनामध्ये अग्रेसर असलेल्या पश्चिम बंगाल, कर्नाटक आणि पंजाब या तीन राज्यांच्याबाबतीत मर्यादित होता.

† अर्थशास्त्र विभाग प्रमुख, गोदावरी कला महाविद्यालय अंबड, जि. जालना.
आजीव सदस्य क्र. - १२९५, भ्रमणध्वनी - ९४२३९९३१३७, ई-मेल : maruti3137@gmail.com
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, र.भा.माडखोलकर महाविद्यालय चंदगड, जि. कोल्हापूर.
आजीव सदस्य क्र. - १२३०, भ्रमणध्वनी - ९४२३८००१०५, ई-मेल - sambhajisawant2019@gmail.com

**पुरुषोत्तम नायक (१९९६)**, यांनी त्यांच्या संशोधनाच्या माध्यमातून भातप्रक्रिया करणाऱ्या गिरण्यांच्या आधुनिकीकरणाबाबतचे प्रश्न तसेच त्यांचे भवितव्य यावर भाष्य केले आहे. लेखकाचा अभ्यास हा मिदनापूर जिल्ह्याशी संबंधित असून जिल्ह्यातील एकूण २१ मोठ्या भातप्रक्रिया करणाऱ्या उद्योगांपैकी १८ भातप्रक्रिया उद्योगांचा सर्व्हे करून लेखकाने भातप्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचे प्रश्न विस्ताराने मांडले आहेत. संशोधकांच्या मते, भाताचे तांदळात रूपांतर करताना जवळपास १०% भात वाया जाते. **के. सिंग (२०१२)**, यांनी 'इकॉनॉमिक्स ऑफ प्याडी प्रोसेसिंग इंडस्ट्री इन इंडिया : अ केस स्टडी ऑफ कर्नाटका' या विषयावर संशोधन केले आहे. त्यांचा अभ्यास हा एकूण ९२ भात गिरण्यांवर अवलंबून होता. भाताचे रूपांतरण प्रमाण (Conversion Ratio of Rice) हे पारंपरिक भात गिरण्यांच्याबाबतीत ६३%, तर आधुनिक भात गिरण्यांच्याबाबतीत ५८.७% इतके आढळून आले. **इंदुमती व्ही. एम. महिंद्रा. के. आणि एस. मोगना लावण्या (२०१५)**, यांनी त्यांच्या संयुक्त अभ्यासामध्ये दक्षिण तामिळनाडूमधील भातप्रक्रिया उद्योगांच्या प्रक्रियांचा विस्ताराने अभ्यास केला आहे. या संशोधनात त्यांनी दक्षिण तामिळनाडूतील भातप्रक्रिया उद्योगांची बलस्थाने संधी, उणिवा आणि संभाव्य धोके यांचा आढावा घेतला आहे. **नागराज बी. व्ही. आणि कृष्ण निग्रोडा वाय. टी. (२०१५)**, यांनी त्यांच्या संयुक्त अभ्यासामध्ये भातावर आधारित उपपदार्थांच्या मूल्यसाखळीचा कर्नाटक राज्याच्याबाबतीत चिकित्सक अभ्यास केलेला आहे. कृषिविकासाचा चेहरा पुन्हा परिभाषित करावयाचा असेल, तर ई-गव्हर्नन्स आणि पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपचा (पीपीपी) वापर भातप्रक्रिया उद्योगाच्या व्यवस्थापनामध्ये करण्याची गरज आहे. **सीता देवी के. आणि पोन्नर सी. टी. (२००९)**, यांनी त्यांच्या 'ॲन इकॉनोमिक ॲनालिसिस ऑफ मॉडर्न राईस प्रोडक्शन टेक्नॉलॉजी अँड ॲडोप्शन बिहेवियर इन तामिळनाडू' या संयुक्त अभ्यासाचा भाताचे अर्थशास्त्र आणि भात जातीची निवड करताना शेतकऱ्यांची पसंती अभ्यासणे हा त्यांच्या अभ्यासाचा प्रमुख हेतू होता.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

प्रस्तुत संशोधन अध्ययनासाठी कार्यक्षेत्र म्हणून कोल्हापूर जिल्ह्याची निवड केलेली आहे. महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील एक विकसित जिल्हा म्हणून कोल्हापूर जिल्ह्याची ओळख आहे. मुबलक पाणी आणि विकसित सिंचनाच्या सुविधा असल्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यात बाराही महिने वेगवेगळी पिके घेतली जातात. जिल्ह्यातील शेतकऱ्याकडून भातपिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. त्यामुळे भातावर प्रक्रिया करण्यासाठी प्रक्रिया उद्योगांना मोठ्या प्रमाणावर कच्चामाल उपलब्ध होत असल्याने त्यांच्या विकासाला खूप मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहे.

तक्ता क्र. १ मध्ये दर्शविलेली आकडेवारी ही 'कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने' वर्ष २०२२-२३ मध्ये देशातील भातपिकाच्या उत्पादनाची जाहीर केलेली आकडेवारी आहे. त्यावरून भातपिकाच्या उत्पादनात भरघोस वाढ झालेली दिसून येते. याचा अर्थ, भातावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांच्या विकासाला देशात भरपूर वाव आहे असे म्हणता येईल. तथापि, भातप्रक्रिया उद्योगसंस्थांची या कालावधीतील अधिकृत आकडेवारी उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे संशोधकाने संकलित केलेल्या प्राथमिक आकडेवारी आधारे सदर विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

व्ही. खेरा (२०१७) यांच्या अभ्यासानुसार भारतात ३६,५०० कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल या व्यवसायात होते. भारतात जवळपास ८५ दशलक्ष टन भातावर प्रतिवर्षी प्रक्रिया केली जाते. सर्वसाधारणपणे ५० टक्केपेक्षा जास्त भात आधुनिक प्रकारच्या भातप्रक्रिया गिरणीमधून प्रक्रिया केला जातो. तर जवळपास ४०%

**तक्ता क्र. १ : भारतातील भात उत्पादनाची स्थिती**

As on 14.02.2023 (Lakh Tonnes)

| अ.क्र. | वर्ष | हंगाम | | |
|---|---|---|---|---|
| | | खरीप | रब्बी | एकूण |
| ०१ | २०१२-१३ | ९२३.५९ | १२८.७३ | १०५२.३२ |
| ०२ | २०१३-१४ | ९१४.९७ | १५१.४९ | १०६६.४६ |
| ०३ | २०१४-१५ | ९१३.९२ | १४०.९१ | १०५४.८२ |
| ०४ | २०१५-१६ | ९१४.१३ | १२९.९५ | १०४४.०८ |
| ०५ | २०१६-१७ | ९६३.०३ | १३३.९६ | १०९६.९८ |
| ०६ | २०१७-१८ | ९७१.३५ | १५६.२२ | ११२७.५८ |
| ०७ | २०१८-१९ | १०२०.४ | १४४.४४ | ११६४.८४ |
| ०८ | २०१९-२० | १०२२.७७ | १६५.९४ | ११८८.७० |
| ०९ | २०२०-२१ | १०५२.०८ | १९१.६० | १२४३.६८ |
| १० | २०२१-२२ | १११०.०१ | १८४.७१ | १२९४.७१ |
| ११ | २०२२-२३ | १०८०.७५ | २२७.६२ | १३०८.३७ |

**स्त्रोत :** Department of Agriculture and Farmers Welfare
(Second Advance Estimates of Production of Foodgrains for 2022-23)

भात हा पारंपरिक भातप्रक्रिया गिरणीमधून प्रक्रिया केला जातो. तर उर्वरित १०% भात हे आजही हाताने सडले (प्रक्रिया केले) जाते. कोल्हापूर जिल्ह्यातील १२०० गावांमध्ये जवळपास प्रत्येक गावात भातावर प्रक्रिया करणाऱ्या पारंपरिक पद्धतीच्या किमान एक ते दोन अशा १४६६ छोट्या भातप्रक्रिया गिरणी आणि ११७ मोठ्या (आधुनिक) भातप्रक्रिया गिरणी कार्यरत आहेत. हे भातप्रक्रिया उद्योग भातावर प्रक्रिया करून रोजच्या उपभोगासाठी तांदूळ तयार करून त्याची बाजारात विक्री करतात. त्याला बाजारपेठांमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. याचा शेतकरीवर्गालाही फायदा होत आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन हे गुणात्मक तसेच तुलनात्मक प्रकारचे आहे. कारण भातप्रक्रिया करणाऱ्या उद्योजकांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास विस्ताराने केल्यामुळे हे संशोधन गुणात्मक स्वरूपाचे आहे. तसेच लहान व मोठ्या भातप्रक्रिया उद्योगांचा तौलानिक अभ्यास केल्याने प्रस्तुत संशोधन हे तुलनात्मक स्वरूपाचे देखील आहे.

**तथ्य संकलनाच्या पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी मुख्यत्वेकरून प्राथमिक तथ्याचा वापर केला असला तरी, दुय्यम तथ्याचा वापर उपलब्धतेनुसार व गरजेनुसार केलेला आहे.

प्रस्तुत संशोधनात प्रामुख्याने प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब केला असून मुलाखत, अनुसूची व निरीक्षण या साधनांच्या साहाय्याने तथ्य संकलन केले आहे. यामध्ये भातप्रक्रिया उद्योगात कार्यरत असणारे लहान-मोठे उद्योजक, कृषी अधिकारी, भातप्रक्रिया व्यवसायाशी संबंधित काम करणाऱ्या विविध अनुभवी व तज्ज्ञ लोकांच्या मुलाखतीमधून संकलित केली आहे.

भातप्रक्रिया उद्योगासंबंधी आकडेवारी ही फारशी उपलब्ध नाही. उपलब्ध आकडेवारी ही कुटीरउद्योग, ग्रामोद्योग या शीर्षकांतर्गत एकत्रित समाविष्ट आहे. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील माहिती जिल्हा सामाजिक, आर्थिक समालोचन, सरकारच्या विविध विभागामार्फत प्रकाशित होणारे वार्षिक अहवाल, नियतकालिके, संशोधन अग्रलेख, संदर्भ ग्रंथ, प्रकाशित संशोधन प्रबंध, मासिके, वर्तमानपत्रे, साप्ताहिक इ. साधनांच्या माध्यमातून प्राप्त केलेली आहे.

**तथ्य पृथक्करण :**

तथ्यांचे शास्त्रशुद्ध विवेचन करण्यासाठी पुढील दोन पद्धतींचा वापर केला आहे.

**तथ्य विश्लेषण पद्धती :**

प्राप्त झालेल्या प्राथमिक आणि दुय्यम तथ्याचे प्रथम तालिकीकरण करून आवश्यक त्या ठिकाणी आलेख काढण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने दंडाकृती, वर्तुळाकाराकृती, रेषीयआकृती यांचा समावेश केला आहे. अर्थात, उपलब्ध तथ्याच्या आधारावर योग्य आलेखाची निवड करण्यात आली आहे. याबरोबरच विश्लेषणात्मक पद्धती अवलंबिली आहे.

**सांख्यिकीय साधने :**

तथ्याच्या पृथ्थकरणासाठी वारंवारता, शेकडा प्रमाण, सरासरी, प्रचलन गुणांक, साधा वार्षिक वृद्धिदर, संयुक्त वार्षिक वृद्धिदर, लघुतम, महत्तम इ. सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला आहे. गृहीतक पडताळणीसाठी टी चाचणी, झेड चाचणी, स्काय स्क्वेअर यांचा वापर करण्यात आला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये:**

प्रस्तुत अभ्यासाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

- कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया व्यवसायाची प्रगती अभ्यासणे.
- कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया व्यावसायिकांचा सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
- कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया व्यावसायिकांचा आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
- कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया व्यवसायातील छोट्या व मोठ्या उद्योगांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
- कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया व्यवसाय सुधारण्यासाठी उपाय सुचविणे.

**स्पष्टीकरण / निरीक्षण / निष्कर्ष :**

**गृहीतक / परिकल्पना:**

सरासरी लहान भातप्रक्रिया उद्योगांमधील उत्पन्न हे मोठ्या भातप्रक्रिया उद्योगांमधील उत्पन्नापेक्षा कमी आहे.

सरासरी उत्पन्न

H0: शून्य परिकल्पना

सरासरी लहान भातप्रक्रिया उद्योगांमधील उत्पन्न आणि मोठ्या भातप्रक्रिया उद्योगांमधील उत्पन्न यामध्ये तफावत नाही.

$H0: \mu 1 = \mu 2$

Ha: पर्यायी परिकल्पना

सरासरी लहान भातप्रक्रिया उद्योगांमधील उत्पन्न हे मोठ्या भातप्रक्रिया उद्योगांमधील उत्पन्नापेक्षा कमी आहे.

$Ha : \mu 1 < \mu 2$

उपरोक्त गृहीतकाची पडताळणी करण्यासाठी टी-चाचणी वापरण्यात आली असून या चाचणीचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

$$\text{t-statistics} = \frac{\mu 1 < \mu 2}{SE\mu 1 - SE\mu 2}$$

$\mu 1$ = लहान भातप्रक्रिया उद्योगातील सरासरी उत्पन्न

$\mu 2$ = मोठ्या भातप्रक्रिया उद्योगातील सरासरी उत्पन्न

$SE\mu 1$ = लहान भातप्रक्रिया उद्योगातील उत्पन्न प्रमाण विचलन

$SE\mu 2$ = मोठ्या भातप्रक्रिया उद्योगातील उत्पन्न प्रमाण विचलन

**तक्ता क्र. २ : युग्मीत नमुना सांख्यिकी Paired Samples Statistics**

| | | **मध्य** Mean | **निरीक्षणांची संख्या** N | **प्रमाण विचलन** Std. Deviation | **मध्य प्रमाण दोष** Std. Error Mean |
|---|---|---|---|---|---|
| जोडी-१ Pair-1 | एकूण उत्पन्न लहान भात प्रक्रिया उद्योग | ११६८५० | ३०० | ५१४०० | ३५६४०.५६५ |
| | एकूण उत्पन्न मोठे भात प्रक्रिया उद्योग | २३७४६०० | ३० | १६८००० | १५४३६९.२५६ |

T- गणना मूल्य = १९.३६

T- तक्ता मूल्य = १.६५

Degree of Freedom / मुक्ती संख्या = ३२९

Confidence level / विश्वास अंतराळ = ९५%

Two-sided $\alpha$ / द्वी-अंगी $\alpha$ = ०.०५

या ठिकाणी T- तक्ता मूल्य हे ३२९ इतक्या Degree of Freedom साठी १.६५ इतके असून T-गणना मूल्य हे १९.३६ इतके आहे. म्हणजेच ते T-तक्ता मूल्यापेक्षा जास्त असल्याने शून्य परिकल्पना नाकारली जाते व पर्यायी परिकल्पना स्वीकारली जाते. म्हणजेच 'सरासरी लहान भातप्रक्रिया उद्योगांमधील उत्पन्न हे मोठ्या भातप्रक्रिया उद्योगांमधील उत्पन्नापेक्षा कमी आहे', हे सिद्ध होते.


**कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया उद्योगांची प्रगती:**

कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया उद्योगाची स्वतंत्रपणे शासकीय पातळीवर फारसी आकडेवारी उपलब्ध नाही. सरकारी आकडेवारी कृषिआधारित उद्योगांच्या स्वरूपात एकत्रित आहे. तथापि, स्थानिक वृत्तपत्रे, मासिके व अग्रलेख, राईस मिल असोसिएशन्स इ. यांच्याकडील उपलब्ध असलेल्या माहितीवरून भातप्रक्रिया उद्योगाच्या प्रगतीचा काही प्रमाणात अंदाज बांधता येतो. पश्चिम महाराष्ट्र परिसर राईस मिल ओनर्स असोसिएशन कोल्हापूर, यांच्याकडून प्राप्त झालेल्या दुय्यम आकडेवारीवरून कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया उद्योगांच्या विकासाबाबत पुढील निरीक्षणे नोंदवता येतील.

१. कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया उद्योगाची संख्या ही ८९९ इतकी २००१ मध्ये होती. यामध्ये ६८९ लहान भातप्रक्रिया उद्योग, १६५ मध्यम भातप्रक्रिया उद्योग व ४५ मोठे भातप्रक्रिया उद्योग होते. सन २००५ नंतर भातप्रक्रिया उद्योगांमध्ये वाढ झाल्याचे आढळून येते. सन २००३, २००४, २००७ आणि २००९ या वर्षांचा अपवाद वगळता इतर वर्षी भातप्रक्रिया उद्योगांच्या संख्येत धनात्मक वाढ झाली असल्याचे दिसून येते.

२. सन २००१ मध्ये एकूण ८९९ असणाऱ्या भातप्रक्रिया उद्योगांची संख्या ही २०१८ मध्ये २०३३ इतकी झाली होती. याचा अर्थ असा की, २००१ ते २०१८ या अठरा वर्षाच्या कालखंडात भातप्रक्रिया उद्योगाच्या संख्येत ४.९ टक्के इतकी प्रतिवर्षी संयुक्त वार्षिक वृद्धिदराने वाढ झाली होती.

**आलेख क्र. १ : कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया उद्योगाची प्रगती**




स्त्रोत: पश्चिम महाराष्ट्र परिसर राईस मिल ओनर्स असोसिएशन, कोल्हापूर.

**कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया व्यावसायिकांची सामाजिक स्थिती :**

१. अभ्यासासाठी विचारात घेतलेल्या एकूण लहान उद्योगांपैकी ५५.३३% उद्योग हे खुल्या प्रवर्गातील उद्योजकांकडून सुरू करण्यात आल्याचे दिसून आले. तर मोठ्या उद्योगांच्याबाबतीत हे प्रमाण जवळपास ५६.६६% इतके आढळून आले. ओबीसी प्रवर्गातील उद्योजकांचे प्रमाण हे लहान गिरण्यांच्या संदर्भात २५.६६% तर मोठ्या उद्योगांच्याबाबतीत २०% इतके दिसून आले आहे. एस.टी. प्रवर्गातील उद्योजकांचे प्रमाण लहान गिरण्यांच्या संदर्भात १.६६% इतके दिसून आले. तर ते शून्य टक्के इतके मोठे उद्योजकांच्या संदर्भात आढळून आले आहे. एन. टी. प्रवर्गातील लहान उद्योजकांचे प्रमाण ६%, तर मोठ्या उद्योजकांच्यामध्ये हे प्रमाण ६.६७% इतके दिसून आले. एस.ई.बी.सी. प्रवर्गातील लहान उद्योजकांचे प्रमाण हे ३.६७%, तर मोठ्या उद्योजकांच्याबाबतीत ६.६७% इतके ते आढळून आले. थोडक्यात, एकूण भातप्रक्रिया उद्योजकांच्यापैकी जवळपास ५५.४६% गिरण्या खुल्या प्रवर्गातील उद्योजकांनी सुरू केल्या असून, ओबीसी उद्योजकांचे प्रमाण २५.१५% इतके आढळून आले.

२. अभ्यासासाठी विचारात घेतलेल्या ६४% लहान व ८३.३३% मोठ्या भातप्रक्रिया उद्योजकांच्या मते त्यांचे राहणीमान उच्चप्रतीचे आहे.

३. भातप्रक्रिया उद्योजकांपैकी ७३.३३% लहान व ८७.७३% मोठ्या उद्योजकांनी त्यांना भातप्रक्रिया व्यवसायामुळे समाजात पत आहे, असे मत नोंदविले आहे.

४. अभ्यासासाठी विचारात घेतलेल्या सर्वच भातप्रक्रिया उद्योजकांकडे वीज, स्वच्छतागृह, स्वयंपाकगृह, नळजोडणी या मूलभूत जीवनावश्यक वस्तू आहेत. तसेच फक्त ७% लहान भातप्रक्रिया उद्योजकांकडे घरगुती गॅस जोडणी नसून उर्वरित सर्व उद्योजकांकडे घरगुती गॅस जोडणी आहे. ही एक समाधानाची बाब आहे.

**कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया व्यावसायिकांची आर्थिक स्थिती :**

१. सरासरी ११६८५० रु. प्रतिवर्षी भातप्रक्रिया उद्योगापासून लहान उद्योजकांना उत्पन्नाची प्राप्ती होत होती, तर २३,७४,६०० रु. वार्षिक उत्पन्नाची प्राप्ती ही मोठ्या भातप्रक्रिया उद्योजकांना होत होती. तुलनेने लहान भातप्रक्रिया उद्योजकांचे उत्पन्न मोठ्या भातप्रक्रिया उद्योजकांच्यापेक्षा फार कमी असलेले दिसून आले आहे.

२. इतर मार्गांनी लहान व मोठ्या भातप्रक्रिया उद्योजकांना प्राप्त झालेले वार्षिक महत्तम उत्पन्न हे अनुक्रमे ५१,८०० रु. आणि २,६४,३०० रु. इतके नोंदवले गेले आहे. याउलट लहान व मोठ्या भातप्रक्रिया उद्योजकांना प्राप्त झालेले वार्षिक कमीत कमी उत्पन्न हे अनुक्रमे २२,५०० व १,३८,२०० इतके आहे. लहान उद्योजकांचे इतर मार्गाने प्राप्त होणाऱ्या वार्षिक महत्तम उत्पन्नाचे प्रमाण विचलन हे रु. १२,८०० इतके दिसून आले तर ते रु.९५,६०० इतके मोठ्या उद्योगांच्या बाबतीत आढळून आले. यावरून इतर मार्गांनी प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात असणारे चढ-उतार मोठ्या उद्योगात जास्त आहेत, ते स्पष्ट होते.

३. लहान भातप्रक्रिया उद्योजकांना सरासरी वार्षिक रु.१,५५,२५० इतके निश्चित उत्पन्न प्राप्त होते. हे प्रमाण मोठ्या प्रक्रिया उद्योजकांच्या संदर्भात २५,४२,९०० इतके दिसून आले. यावरून निश्चित उत्पन्न हे मोठ्या उद्योजकांमध्ये जास्त असल्याचे स्पष्ट होते. निश्चित उत्पन्नाचे प्रमाण विचलन हे लहान उद्योगांच्या संदर्भात रु.६४,२०० तर मोठ्या उद्योगांच्या संदर्भात ते रु.२,६३,६०० इतके आढळून आले.

**लहान-मोठ्या भातप्रक्रिया व्यावसायिकांच्या उत्पन्नाचा तुलनात्मक अभ्यास :**

शेती आधारित उद्योगांच्या विकासावर एखाद्या विशिष्ट भागातील प्रादेशिक विकासाची पातळी अवलंबून असते. पश्चिम घाटातील आंबा प्रक्रिया उद्योगांच्या विकासाने आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या सामाजिक आर्थिक जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. त्याच पद्धतीने कोल्हापूर विभागातील भातप्रक्रिया उद्योगांच्या विकासामुळे शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती व सामाजिक विकास घडून आला आहे. भात हे कोल्हापूर विभागातील एक प्रमुख अन्नधान्य पीक असून, आजरा, चंदगड, गडहिंग्लज यांसारख्या तालुक्यांमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर भाताची लागवड केली जाते. कोल्हापूर विभागातील भौगोलिक वातावरण आणि मृदा प्रकार हा भातपिकास पोषक असल्याने भाताची उत्पादकता देखील जास्त आहे.

सरासरी रु.३८९ इतके दैनंदिन उत्पन्न लहान भातप्रक्रिया उद्योगांना प्राप्त होत होते. तर जवळपास रु.७,९१५ इतके सरासरी दैनंदिन उत्पन्न मोठ्या भातप्रक्रिया उद्योगांना प्राप्त होत होते. एकूण कोल्हापूर विभागातील भातप्रक्रिया उद्योगांच्या दैनंदिन सरासरी उत्पन्नाचा विचार करता ते रु.४,१५२.४१ इतके आढळून आले. लहान व मोठ्या भातप्रक्रिया उद्योगांना प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे मासिक सरासरी उत्पन्न हे अनुक्रमे रु.९,७३७.५ व रु.१,९७,८८३.२ इतके दिसून आले. त्याचबरोबर लहान व मोठ्या भातप्रक्रिया उद्योगांना भातप्रक्रिया उद्योगापासून सरासरी वार्षिक अनुक्रमे रु.१,१६,८५० व रु.२३,७४,६०० इतके उत्पन्न प्राप्त होत होते. लहान व मोठ्या उद्योगांना अनुक्रमे रु.६,४५० व रु.१,४०,५६६ इतके मुख्य घटकापासून मासिक उत्पन्न प्राप्त होत होते. उपघटकापासून लहान प्रक्रिया उद्योगांना मासिक रु. ३,२८७.५ इतके उत्पन्न मिळत होते तर ते सरासरी रु. ५७,३१७.२५ इतके मोठ्या उद्योगांच्या संदर्भात दिसून आले.

महत्तम भातप्रक्रिया उद्योगापासून प्राप्त होणारे दैनंदिन उत्पन्न हे रु. ७८८.१ इतके लहान प्रक्रिया उद्योगांच्या संदर्भात तर रु. ८,९५७ इतके मोठ्या प्रक्रिया उद्योगांच्या संदर्भात आढळून आले. यावरून मोठ्या व लहान उद्योगांना प्राप्त होणाऱ्या सरासरी व महत्तम दैनंदिन उत्पन्नात खूप मोठी तफावत आहे असे म्हणता येईल.

हीच परिस्थिती मासिक व वार्षिक उत्पन्नाच्या संदर्भात दिसून येते. मासिक महत्तम उत्पन्न लहान व मोठ्या उद्योगांच्या संदर्भात रु. १९,७०२.५ व रु.२,२३,९२५ इतके नोंदविले गेले आहे. तसेच वार्षिक महत्तम उत्पन्न लहान व मोठ्या उद्योगांच्या संदर्भात अनुक्रमे २,३६,४३० रु. तर २६,८७,१०० रु. आढळून आले.

लघुतम भातप्रक्रिया उद्योगापासून प्राप्त होणारे दैनंदिन उत्पन्न रु.३१७.६ इतके लहान प्रक्रिया उद्योगांच्या संदर्भात तर रु.७,००० इतके मोठ्या प्रक्रिया उद्योगांच्या संदर्भात आढळून आले. मासिक लघुतम उत्पन्न लहान व मोठ्या भातप्रक्रिया उद्योगांच्या संदर्भात अनुक्रमे रु.७,९४१.६ व रु.१,७५,०१६.६ इतके आढळून आले. तसेच वार्षिक लघुत्तम भातप्रक्रिया उद्योगापासून प्राप्त झालेले उत्पन्न हे लहान व मोठ्या भातप्रक्रिया उद्योगांच्या संदर्भात अनुक्रमे रु.९५,३०० व रु.२१,००,२०० इतके दिसून आले.

उत्पन्नातील प्रमाण विचलनाचा विचार केल्यास ते लहान व मोठ्या भातप्रक्रिया उद्योगांच्यामध्ये दैनंदिन उत्पन्नात अनुक्रमे रु.४५५.१६ व रु.७,०४५ इतके आढळून आले, तर मासिक उत्पन्नाच्या संदर्भात ते अनुक्रमे रु.१३,४८० व रु.२,०४,०१५ इतके आढळून आले. वार्षिक उत्पन्नातील प्रमाण विचलन हे रु.५१,४०० इतके लहान भातप्रक्रिया उद्योगात तर रु.१,६८,००० इतके ते मोठ्या भातप्रक्रिया उद्योगात दिसून आले.

दैनंदिन मासिक आणि वार्षिक उत्पन्नाचा प्रचरण गुणांक हा अनुक्रमे ११६.८६%, १३८.४३%, ४३.९९% इतका लहान भातप्रक्रिया उद्योगात आढळून आला. तर तो अनुक्रमे ८९%, १०३.१०%, ७.०७% इतका मोठ्या भातप्रक्रिया उद्योगांच्या संदर्भात दिसून आला. मुख्य मासिक उत्पन्नाचा प्रचरण गुणांक हा ८४.९६% इतका लहान भातप्रक्रिया उद्योगांच्या संदर्भात तर ८०.०७% इतका तो मोठ्या भातप्रक्रिया उद्योगांच्या संदर्भात दिसून आला.

थोडक्यात, सरासरी दैनंदिन, मासिक आणि वार्षिक उत्पन्नाचे आकारमान हे मोठ्या भातप्रक्रिया उद्योगांच्यामध्ये अधिक आहे. यावरून असे स्पष्ट होते की लहान भातप्रक्रिया उद्योगातील उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणावर अस्थिरता आहे.

**सूचना / उपाययोजनाः**

भातप्रक्रिया उद्योगांच्या विकासासाठी पुढील महत्त्वपूर्ण उपाययोजना सुचविता येतील.

**१. स्वतः भात (कच्चा माल) खरेदी करून तांदळाची (पक्का माल) विक्री करावी :**

लहान भातप्रक्रिया उद्योजक कच्चामाल खरेदी करून त्यावर प्रक्रिया करत नाहीत. तसेच ते स्वतः तांदळाची विक्री करत नाहीत. त्यामुळे त्यांना खरेदी-विक्रीचे लाभ प्राप्त होत नाहीत. परिणामी, त्यांचे उत्पन्न कमी असलेले दिसून येते. लहान भातप्रक्रिया उद्योजकांनी स्वतः भात (कच्चा माल) खरेदी करून तांदळाची विक्री करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**२. व्यावसायिक दृष्टिकोन अंगीकार करावा :**

भातप्रक्रिया उद्योगाकडे फक्त उदरनिर्वाहाचे साधन म्हणून न पाहाता त्याकडे उत्पन्ननिर्मितीचे साधन म्हणून पाहिले पाहिजे. उत्पन्न, खर्च यांच्या नोंदी ठेवून उत्पन्नात कशी वाढ करता येईल. याचा प्रत्येक लहान उद्योजकाने विचार केला पाहिजे.

**३. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा :**

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास तांदळाची (उत्पादनाची) गुणवत्ता वाढून उत्पादन खर्च कमी होईल. आधुनिक गिरण्यांप्रमाणे उत्पादनासाठी क्लिनिंग, ग्रेडिंग, कलर सॉर्टर इत्यादी सारख्या यंत्राचा वापर केल्यास उत्पादनाची गुणवत्ता सुधारून अधिक उत्पन्नाची व नफ्याची प्राप्ती होईल.

**४. ग्रेडिंगसाठी छोटी यंत्रे विकसित करावीत :**

भातप्रक्रिया उद्योगांना ग्रेडिंगसाठी छोटी यंत्रे कमी किमतीत उपलब्ध झाली, तर उत्पादन गुणवत्तापूर्ण होऊन उत्पादन खर्चात बचत होईल. प्रक्रिया गिरण्यांनी अशा

**तक्ता क्र. ३ : भातप्रक्रिया उद्योगापासून प्राप्त होणारे दैनंदिन, मासिक आणि वार्षिक उत्पन्न**

| उत्पन्न तपशील | सरासरी उत्पन्न | | |
|---|---|---|---|
| | लहान | मोठी | एकूण |
| प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे दैनंदिन उत्पन्न | ३८९.५ | ७९१५.३३ | ४१५२.४१५ |
| प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे मासिक उत्पन्न | ९७३७.५ | १९७८८३.२५ | १०३८१०.३७५ |
| प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न | ११६८५० | २३७४६०० | १२४५७२५ |
| मुख्य मासिक उत्पन्न | ६४५० | १४०५६६ | ७३५०८ |
| उपघटकांच्यापासून मिळणारे मासिक उत्पन्न | ३२८७.५ | ५७३१७.२५ | ३०३०२.३७५ |
| | महत्तम उत्पन्न | | |
| प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे दैनंदिन उत्पन्न | ७८८.१ | ८९५७ | ४८७२.५५ |
| प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे मासिक उत्पन्न | १९७०२.५ | २२३९२५ | १२१८१३.७५ |
| प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न | २३६४३० | २६८७१०० | १४६१७६५ |
| मुख्य मासिक उत्पन्न | ११५०० | १६५४०० | ८८४५० |
| उप घटकांच्या पासून मिळणारे मासिक उत्पन्न | ८२०२.५ | ५८५२५ | ३३३६३.७५ |
| | लघुतम उत्पन्न | | |
| प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे दैनंदिन उत्पन्न | ३१७.६ | ७०००.६ | ३६५९.१ |
| प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे मासिक उत्पन्न | ७९४१.६ | १७५०१६.६ | ९१४७९.१ |
| प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न | ९५३०० | २१००२०० | १०९७७५० |
| मुख्य मासिक उत्पन्न | ५५०० | १२१००० | ६३२५० |
| उपघटकांच्यापासून मिळणारे मासिक उत्पन्न | २४४१.६ | ५४०१६.६ | २८२२९.१ |
| | उत्पन्नाचे प्रमाण विचलन | | |
| प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे दैनंदिन उत्पन्न | ४५५.१६ | ७०४५ | ३७५०.०८ |
| प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे मासिक उत्पन्न | १३४८० | २०४०१५ | १०८७४७.५ |
| प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न | ५१४०० | १६८००० | १०९७०० |
| मुख्य मासिक उत्पन्न | ५४८० | ११२५४६ | ५९०१३ |
| उपघटकांच्यापासून मिळणारे मासिक उत्पन्न | ३३६० | ५३४८९ | २८४२४.५ |
| | उत्पन्नाचे प्रचरण गुणांक | | |
| प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे दैनंदिन उत्पन्न | ११६.८६ | ८९ | ९०.३१ |
| प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे मासिक उत्पन्न | १३८.४३ | १०३.१ | १०४.७६ |
| प्रक्रिया उद्योगापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न | ४३.९९ | ७.०७ | ८.८१ |
| मुख्य मासिक उत्पन्न | ८४.९६ | ८०.०७ | ८०.२८ |
| उपघटकांच्यापासून मिळणारे मासिक उत्पन्न | १०२.२१ | ९३.३२ | ९३.८० |

**स्त्रोत :** प्राथमिक साधने

ग्रेडिंग यंत्रांचा वापर करून आपल्या व्यवसायात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासाठी शासकीय स्तरावरून छोटी यंत्रे विकसित करण्यासाठी प्रोत्साहन दिले गेले पाहिजे.

**५. पूर्ण क्षमतेने यंत्रांचा वापर करावा :**

उपलब्ध मशिनरी आणि यंत्रसामग्रीचा पूर्ण क्षमतेने वापर करण्यासाठी ती दरदिवशी किमान आठ तास सुरू असली पाहिजेत. असे झाल्यास लहान भातप्रक्रिया उद्योगांचा उत्पादन खर्च कमी होऊन अधिक उत्पन्नाची प्राप्ती होईल. या उद्योगांनी खरेदी-विक्री व्यवहारात सहभागी झाले तर त्यांना अधिक उत्पन्न मिळेल.

**६. संघटना स्थापन करून क्लस्टर उद्योग सुरू करावेत :**

भातप्रक्रिया उद्योजकांनी एकत्र येऊन त्यांच्या संघटना स्थापन केल्यास, सामूहिकरीत्या कच्चामाल खरेदी करता येईल. याबरोबरच व्यवसायातील इतरही अडचणी सामूहिकरीत्या सोडवण्यास मदत होईल. एकत्र येऊन क्लस्टर उद्योगांची स्थापना करावी. ज्यामुळे लहान गिरण्यांचे तंत्रज्ञानविषयक प्रश्न सुटण्यास मदत होईल.

**७. अखंड तांदळाचे प्रमाण वाढविणे :**

अखंड तांदूळ व तुकडा तांदूळ यांचे विलगीकरण करून अखंड तांदळाचे प्रमाण जास्तीतजास्त कसे मिळेल यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी गुणवत्तापूर्ण कच्चा माल मिळविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. त्यामुळे उत्पादनात गुणवत्ता निर्माण होईल व अधिक उत्पन्नाची प्राप्ती होईल.

**८. ब्रँडिंगचा वापर :**

बहुतेक गिरणीधारक आपला उत्पादित पक्का माल कोणत्याही प्रकारचा ब्रँड किंवा ॲगमार्क वापर करून विक्री करताना दिसत नाहीत. दीर्घकाळाचा विचार करून, मोठ्या भातप्रक्रिया उद्योजकांनी विशिष्ट दर्जेदार व गुणवत्ता पूर्ण तांदळाचे स्वतः ब्रँडिंग करून विक्री करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**९. उप-पदार्थांची निर्मिती :**

भातप्रक्रिया उद्योगांना विविध प्रकारचे उप-पदार्थ बनविता येणे शक्य आहे. भाताच्या कोंड्यापासून पशुखाद्य, तेल, इंधन, खत यांसारख्या पदार्थांचे उत्पादन घेणे शक्य आहे. उपपदार्थांच्या निर्मितीमुळे उत्पादनाचा सरासरी खर्च कमी होऊन अधिक नफा प्राप्त होईल.

**१०. शेतकऱ्यांना दर्जेदार संकरित वाणांची लागवड करण्यास प्रेरित करावे :**

मोठ्या उद्योजकांनी पुढाकार घेऊन शेतकऱ्यांना संकरित भाताच्या वानांची लागवड करण्यास प्रेरित करावे. त्यामुळे स्थानिक पातळीवर मोठ्या भातप्रक्रिया उद्योजकांना गुणवत्तापूर्ण कच्चा माल उपलब्ध होईल व वाहतूक खर्चात बचत होईल. याबरोबरच शेतकऱ्यांचे उत्पादन वाढून आर्थिक स्थिती सुधारेल.

**११. सामूहिक विक्रीचा प्रयत्न करावा :**

बाजारात तांदळाच्या विक्री प्रक्रियेत मध्यस्थ, दलाल यांचे वर्चस्व असते. यासाठी जवळपासच्या गिरणी व्यावसायिकांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर संस्था तयार करून विक्री केल्यास त्यांची सौदाशक्ती वाढेल. परिणामी, दलाली खर्चात बचत होऊन या उद्योगांचा  नफा वाढेल.

**सारांश :**

भारताला लाभलेल्या नैसर्गिक विविधतेचा लाभ घेण्यासाठी शेतीमध्ये विविध प्रकारच्या वस्तू उत्पादनाचा प्रयत्न केला पाहिजे. ज्यामुळे देशात शेती विकासाबरोबर शेतमाल प्रक्रिया उद्योग, पशु-पक्षी पैदास, दुग्धव्यवसाय यांसारखे शेतीआधारित उद्योग विकसित होतील. शेतीच्या विकासासाठी, रोजगारनिर्मितीसाठी आणि एकंदरित सामाजिक-आर्थिक विकासासाठी, कृषिआधारित उद्योग महत्त्वाचे आहेत. भातप्रक्रिया व्यवसाय हा एक महत्त्वाचा कृषिआधारित व्यवसाय आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्याकडून भातपिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. त्यामुळे भातावर प्रक्रिया करण्यासाठी प्रक्रिया

उद्योगांना मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये भातावर प्रक्रिया करणाऱ्या जवळपास अठराशे ते दोन हजार लहान-मोठ्या गिरण्या आहेत. या गिरण्या भातावर प्रक्रिया करून उत्तम दर्जाचा तांदूळ तयार करत आहेत.

प्रस्तुत संशोधनामधून असे लक्षात येते की, भातप्रक्रिया व्यवसायात ग्रामीण भागात रोजगार निर्माण करण्याची क्षमता आहे. व्यावसायिकांना चांगले उत्पन्न मिळत असल्यामुळे त्यांचे जीवनमान चांगले असलेले दिसून येते. अर्थात, तुलनेने लहान भातप्रक्रिया उद्योजकांचे उत्पन्न मोठ्या भातप्रक्रिया उद्योजकांपेक्षा फार कमी असलेले दिसून येते. व्यावसायिक दृष्टिकोनाचा अंगीकार, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, ग्रेडिंगसाठी छोट्या यंत्रांचा वापर, ग्रेडिंग-ब्रँडिंग, क्लस्टर दृष्टिकोनातून विकास इत्यादी उपाययोजना केल्यास या व्यवसायाला उज्ज्वल भविष्य आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1. Directorate of Government Printing Stationery and Publication Maharashtra State, (1960), Maharashtra State Gazette Kolhapur, District Gazette, 1960.
2. Divate S.A., Fuge S.C., Mhatare S. J., Yadav J.M., Anap, V.N. and Talathi J.M., (2018), An Economic Analysis of Rice Based Cropping System in Ratnagiri District of Maharashtra. Bulletin of Environment, Pharmacology and Life Sciences. Volume 8, Issue 1, PP. 121-125. Indumati V. M. Mahindra, K and S Mogna Lavanya, (2015), Processing Activity of Paddy Processing Industries in Tamil Nadu SWAT Analysis. International Journal of Applied and Natural Sciences (IJANS), Volume 4, Issue 2, PP. 9-16.
3. Khera V., (2017), Sixty Years of Indian Agriculture and Allied Activities, Magistrate Publication Mumbai, P.71.
4. Komol Singh, (2013), Healing and Milling Ratio of Major Paddy Growing States: All India Consolidated Report. Agriculture Development and Ruler Transformation Center Institution for Social and Economic Change Nagarbhavi Bangalore.
5. Mishra J.R. Nine M.S.and Rashmi Singh (2015). Rice Processing Industry in India Present Status, Problems and Future Prospects. International Conference on Extension Research Interface Promoting Exportable Rice Varieties and Availing a Sustainable Model October 2015 New Delhi.
6. Purushottam Nayak, (1996), Problems and Prospects of Rice Meals Modernization: A Case Study. Journal of Assam University. Volume 1 Issue 1, PP. 22-28.
7. कोल्हापूर जिल्हा जनगणना अहवाल (२०११).
8. प्रशांत नायगावकर (२०१८) खेळते भांडवल म्हणजे काय? ‘स्मार्ट उद्योजक’ १८ डिसेंबर.....
9. महाराष्ट्र सरकार, (२०१८), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, भारत, कोल्हापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन (२००६-०७,०९,१०,११, १२,१३, १७ आणि १९).
10. डॉ. संभाजी सावंत, (२०२१), कोल्हापूर विभागातील भातप्रक्रिया व्यवसायाचा आर्थिक अभ्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास सादर केलेला पीएच. डी. प्रबंध.
11. संजीव कुलकर्णी, (२०१६), पश्चिम महाराष्ट्रातील भातप्रक्रिया उद्योगांसमोरील आव्हाने, योजना मासिकातील लेख, सप्टेंबर २०१६.
12. https://m.dailyhunt.in/news/india/marathi/smart+udyojak-epaper-smtudy/khelate+bhandaval+mhanaje+kay-newsid-78301497.
13. https://pib.gov.in/Press ReleasePage.aspx? PRID=1899236


◆

# शाश्वत आणि समावेशक विकास अनुकूल महाराष्ट्र अंदाजपत्रक २०२४-२५

**प्रकाश कांबळे** †

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री मा. अजित पवार यांनी आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीचे राज्याचे अंतरिम अंदाजपत्रक मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी मान्यतेसाठी विधानसभेत सादर केले आहे. हे जरी अंतरिम अंदाजपत्रक असले तरी ते महत्त्वाचे आहे. कारण येत्या भविष्यकाळात राज्याचा विकास या अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार होईल. तसेच त्यानंतरच्या कालावधीतही यावर आधारितच पुढील अंदाजपत्रक येईल. या अंदाजपत्रकाचे विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, राज्याच्या शाश्वत आणि समावेशक विकासास प्रयत्न करणारे हे अंदाजपत्रक आहे. हे अंदाजपत्रक राज्याचा आर्थिक विकास गतिमान करण्यासाठी प्रयत्नशील दिसते.

**सार्वजनिक अंदाजपत्रक सिद्धांत :**

आपण एखाद्या धोरणाचे मूल्यमापन करताना त्याची सैद्धांतिक पार्श्वभूमी आणि चौकट आपणास माहीत असणे आवश्यक असते. कारण या चौकटीत मूल्यमापन करणे तटस्थ आणि योग्य होते.

सार्वजनिक अंदाजपत्रकास इंग्रजीमध्ये 'Public Budget' असे म्हणतात. यातील 'Budget' हा शब्द 'Bougett' या फ्रेंच शब्दापासून आलेला असून त्याचा इंग्रजीत अर्थ 'Leather Bag' म्हणजे चामड्याची पिशवी असा आहे. यावरून त्या चामडी पिशवीत असलेल्या सरकारच्या कागदपत्रांनाच अंदाजपत्रक असे म्हणतात. सरकारची महसूल आणि खर्चाविषयीची असलेली कागदपत्रे किंवा दस्तऐवज म्हणजे सार्वजनिक अंदाजपत्रक होय, असा अर्थ ध्वनित होतो. सार्वजनिक अंदाजपत्रक या संकल्पनेचा अर्थ अधिक चांगल्या प्रकारे तिच्या व्याख्यांच्याआधारे अधिक सुस्पष्ट करता येतो. रेणी स्टवूर्ण यांच्या मते, "A document containing a preliminary approval plan of public revenue and expenditure". म्हणजेच ''प्राथमिक मान्यताप्राप्त सार्वजनिक महसूल आणि सार्वजनिक खर्च योजना असलेला दस्तऐवज म्हणजे सार्वजनिक अंदाजपत्रक होय.'' यावरून हे स्पष्ट होते की, सरकारचे अंदाजपत्रक म्हणजे त्याच्या महसूल आणि खर्चाविषयीची प्राथमिक मान्यता असलेला एक आराखडा असतो. यापेक्षाही अधिक व्यापक अर्थ आपणास सार्वजनिक अंदाजपत्रकाच्या बिलिऊ यांच्या पुढील व्याख्येतून स्पष्ट होतो; "A statement of the estimated expenses during fixed

† प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, डॉ. हरिसिंग गौर केंद्रीय विद्यापीठ, सागर, मध्यप्रदेश.
आजीव सदस्य क्र. ४८७, भ्रमणध्वनी - ९४२३०३३१७९, ई-मेल - pskambleeconomics1965@gmail.com

period; it is a comparative table giving the amounts of the receipt to be realised and the expenses to be incurred; it is furthermore an authorisation or command given by the authorities to incur the expenses and collect the revenues". म्हणजेच ''सार्वजनिक अंदाजपत्रक हे एका विशिष्ट कालावधीतील अंदाजित खर्चाचे विवरण पत्र असते. ते महसूल आणि खर्च रकमेचा एक तौलनिक तक्ता असतो. याच्यापुढे जावून, ते सरकारने करण्याचा खर्च आणि गोळा करावयाचा महसूल याचा आदेश असतो.'' यावरून हे स्पष्ट होते की, सार्वजनिक अंदाजपत्रक म्हणजे एक वर्षाच्या काळात, सरकार किती महसूल गोळा करून कोणत्या बाबीवर खर्च करणार आहे याचा अधिकृत आणि मान्यताप्राप्त अधिकार आणि आदेश असतो.

सार्वजनिक अंदाजपत्रकाच्या सिद्धांताचा विचार करता त्याविषयीचे सनातन आणि आधुनिक असे दोन दृष्टिकोन किंवा सिद्धांत आहे. सनातन दृष्टिकोन ॲडम स्मिथ यासारख्या सनातन संप्रदायातील अर्थशास्त्रज्ञांनी विकसित केला आहे. त्यांच्या मते, सार्वजनिक अंदाजपत्रक हे समतोल किंवा संतुलित असावे. कारण तुटीमुळे अनुत्पादक कर्ज वाढत जाते. सरकारने अर्थव्यवस्थेत कमीतकमी कार्ये करावीत आणि उपक्रम हाती घ्यावेत. त्यांनाच संरक्षण कार्ये असे म्हणता येईल. विशिष्ट मर्यादेनंतर सार्वजनिक खर्च अनुउत्पादक घटक आहे. तुटीच्या अंदाजपत्रकामुळे संसाधनाचे खाजगी क्षेत्राकडून सरकारकडे स्थलांतर होते, जे अनुत्पादक असते. त्यामुळेच सार्वजनिक अंदाजपत्रक हे संतुलित असावे, जे उत्तम अंदाजपत्रक आणि तटस्थ असते. अर्थात, हा सनातन दृष्टिकोन आधुनिक काळात मान्य होण्यासारखा नाही. त्यामुळेच सार्वजनिक अंदाजपत्रकविषयक आधुनिक दृष्टिकोन डाल्टन यासारख्या आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी विकसित केला आहे. आधुनिक दृष्टिकोनाप्रमाणे, संतुलित अंदाजपत्रक नेहमीच योग्य असते असे नाही. सार्वजनिक अंदाजपत्रक हे आर्थिक विकास आणि आर्थिक स्थैर्य साध्य करण्याचे साधन असते. ते उत्पन्न आणि संसाधने पुनर्वाटपाचे साधन असते. मंदीच्या खाईतून अर्थव्यवस्था बाहेर काढण्याचे ते तंत्र असते. तुटीचे अंदाजपत्रक रोजगारनिर्मिती करू शकते. ते आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्यास मदत करते. मंदीच्या काळात तुटीचे तर चलनवाढीच्या काळात शिलकीचे अंदाजपत्रक योग्य आणि उपयुक्त ठरते. सार्वजनिक अंदाजपत्रक धोरण निश्चित करून राबविण्याचे अनेक हेतू किंवा उद्दिष्टष्ट्ये असतात. त्यात प्रामुख्याने आर्थिक नियोजनाची आखणी आणि अंमलबजावणी करण्यासाठी, वेळ किंवा कालावधीची गरज, आवश्यक निधी गोळा करणे, निधी संकलनात कार्यक्षमता आणण्यासाठी, सार्वजनिक खर्चात कार्यक्षमता आणण्यासाठी, भूतकाळाचा अनुभव विचारात घेवून वर्तमान आणि भविष्यकाळात वाटचाल करण्यासाठी, वर्तमान कार्यक्रम आणि योजना राबविणे, व्यापारचक्रे नियंत्रण आणि आर्थिक स्थैर्य निर्माण करणे, सरकारची जबाबदारी निश्चित करून पूर्ण करण्यासाठी मदत करणे, इत्यादींचा समावेश होतो. वेगवेगळ्या निकषांच्या आधारे, सार्वजनिक अंदाजपत्रकांचे अनेक प्रकार आहेत. त्यांचे प्रामुख्याने पारंपरिक आणि आधुनिक असे वर्गीकरण केले जाते. आज विशेषतः आधुनिक वर्गीकरणातील आर्थिक आणि कार्यात्मक, कामगिरी अंदाजपत्रक ज्यात उद्दिष्ट वर्गीकरण आणि कार्यक्रम वर्गीकरण यांचा समावेश होतो. याबरोबरच, शून्याधारित अंदाजपत्रक असाही एक प्रकार सांगितला जातो. सार्वजनिक अंदाजपत्रकाचे तुटीचा अर्थभरणा हे एक साधन असून त्याची महसुली तूट, प्रभावी महसुली तूट, अंदाजपत्रकीय तूट, भांडवली तूट, राजकोषीय/राज्य वित्तीय तूट, प्राथमिक तूट, मौद्रिक तूट असे प्रकार किंवा मापके सांगितली जातात.

भारतासारख्या देशात सार्वजनिक अंदाजपत्रक हे संविधानकृत दस्तऐवज असतो. कारण अंदाजपत्रकाची

तरतूद भारतीय राज्यघटनेत केली आहे त्यामुळे संविधान कायदा मान्य दस्तऐवज आणि धोरण असते. भारतीय संविधानाच्या ११२ कलमाप्रमाणे केंद्र सरकारने अंदाजपत्रक म्हणजेच सरकारचा वित्तीय मसुदा मान्यतेसाठी संसदेत म्हणजेच लोकसभा आणि राज्यसभेत सादर करायचे असते. तर भारतीय संविधानाच्या २०२ कलमाप्रमाणे राज्य सरकारांनी आपले अंदाजपत्रक राज्यसंसद म्हणजेच विधानसभा आणि विधानपरिषदेत मान्यतेसाठी सादर करावयाचे असते. केंद्र सरकारच्या राज्य वित्तीय व्यवहारांची एकत्रित संकलित निधी खाते, आकस्मिक निधी खाते आणि सार्वजनिक बचत खाते अशी एकूण तीन खाती असतात आणि त्याचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये वेगवेगळी असतात. देशात सार्वजनिक अंदाजपत्रक निर्मिती करणे, सादर करणे व कायदा करणे आणि अंमलबजावणी करणे या तीन टप्प्यांतून होते. पहिल्या टप्प्यात, वित्त मंत्रालय सूचना काढून सरकारची वेगवेगळी मंत्रालये आणि खाती यांच्याकडून अंदाजित खर्च आणि महसूल संकलनाच्या शक्यता येत्या वर्षासाठी आणि सुधारित चालू वर्षासाठी संकलित करून अंदाजपत्रक तयार केले जाते. दुसऱ्या टप्प्यात, लोकसभा आणि राज्यसभेत हा वित्तमसुदा मान्यतेसाठी सादर केला जातो आणि सखोल आणि व्यापक त्यावर चर्चा होवून त्यास मान्यता मिळते आणि त्याचा कायदा तयार होवून अंदाजपत्रक तयार होते. शेवटच्या टप्प्यात, या तयार अंदाजपत्रकाची अंमलबजावणी त्या त्या मंत्रालयाची आणि खात्यांची असते. अशीच प्रक्रिया राज्य अंदाजपत्रकाबाबतीतही असते.

**राज्याचा आर्थिक विकास :**

राज्याचा आर्थिक विकास गतिमान करण्यासाठी हे अंदाजपत्रक पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी आवश्यक तरतुदी करते. तर दुसऱ्या बाजूने शेती, उद्योग आणि सेवाक्षेत्र विकसित करण्यासाठी आवश्यक तरतुदींचा समावेश करते. यात प्रामुख्याने वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू विस्तार, विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्ग विकासासाठी जमीन संपादनासाठी २२,२२५ कोटी रुपये तरतूद केली आहे. पुणे चक्राकार वळण मार्गासाठी आवश्यक भूमीसंपादनासाठी १०,५१९ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. जालना-नांदेड जलदगती मार्गासाठी आवश्यक जमीन संपादनासाठी २,८८६ कोटी रुपये प्रस्तावित केले आहेत. सार्वजनिक विभाग रस्तेसाठी १९,९३६ कोटी रुपयांची तरतूद या अंदाजपत्रकात आहे. रस्ते विकासाबरोबरच रेल्वेसारख्या पायाभूत सुविधा विकासासाठी आवश्यक खर्चाची तरतूदही या अंदाजपत्रकाने केली आहे. यात कल्याण, मुरबाड, नाशिक, तुळजापूर, सोलापूर, धाराशिव या रेल्वे मार्गांचा समावेश आहे. तसेच बंदर विकासाचा प्रयत्न हे अंदाजपत्रक करणार आहे, त्यासाठी आवश्यक खर्चाची तरतूद हे अंदाजपत्रक करते.

**औद्योगिक विकास:**

उद्योग विकासातून आर्थिक विकास गतिमान करण्यासाठी लघुउद्योग विकासाचा मानस या अंदाजपत्रकाचा आहे. १८ लघु उद्योग संकुले विकसित करून ३६ हजार रोजगारनिर्मिती करण्याचा प्रयत्न हे अंदाजपत्रक करणार आहे. २०२३-२८ साठी एकात्मिक आणि शाश्वत वस्त्रोद्योग धोरण अंमलबजावणी करणार आहे. निर्यात वाढीसाठी आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ४५० कोटी रुपयांची आणि निर्यातक्षम घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी ४०० कोटी रुपये तरतूद या अंदाजपत्रकात आहे. उद्योग विभागाला उद्योग विकासासाठी १,०२१ कोटी रुपयांची तरतूद हे अंदाजपत्रक करते. सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागास या अंदाजपत्रकात १,९५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**शेतीविकास:**

भारताप्रमाणे शेतीचे महत्त्व राज्यातही अनन्यसाधारण आहे. त्यामुळे साहजिकच शेतीविकासासाठीच्या या अंदाजपत्रकात तरतुदी असणे अपेक्षित होते. अपेक्षेप्रमाणे तशा तरतुदी या

अंदाजपत्रकात आहेतही. नमो शेतकरी महासन्मान योजनेनंतर्गत शेतकऱ्यांना सहाय्य करण्यासाठीची तरतूद या अंदाजपत्रकात केली आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या दुसऱ्या टप्प्यास मंजुरी देण्यात आली आहे. शेती विभागास या अंदाजपत्राकाने ३,६५० कोटी रुपये खर्चाची तरतूद केली आहे. याबरोबरच मत्स्यव्यवसाय, दुग्ध, पशुपालन, फलोत्पादन यावरील खर्चासही अंदाजपत्रक तरतूद करते. ३९ जलसिंचन प्रकल्प पूर्ण करून २ लाख ३४ हजार हेक्टर जमीन ओलिताखाली आणली जाणार आहे. तसेच बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत अजून १६ प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न हे अंदाजपत्रक करणार आहे. जागतिक बँकेच्या सहकार्याने ३ हजार कोटी किमतीचा प्रकल्प कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात होणाऱ्या पुरापासूनचे नुकसान थांबविण्याचा प्रयत्न यासाठी हे अंदाजपत्रक करणार आहे. विदर्भातील जलसिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी २ हजार कोटी रुपये तरतूद या अंदाजपत्रकात आहे. वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून जलसिंचन क्षेत्र वाढविण्याचा मानस या अंदाजपत्रकात दिसून येतो. विजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी खाजगी क्षेत्राची मदत घेतली जाणार आहे. अर्थात, त्यावर सरकारचे पूर्ण नियंत्रण आणि नियमन असणे अपेक्षित आहे. राज्यातील खारभूमी विकासासाठी १३ कोटी रुपयांची तरतूद हे अंदाजपत्रक करते. जलसंपदा विभागास या अंदाजपत्राकाने १६ हजार ४५६ कोटी रुपयांची तरतूद खर्चासाठी केली आहे.

**शाश्वत विकास:**

मुख्यमंत्री रोजगार योजनेत २५,००० उद्योग घटकातून ५०,००० रोजगार निर्माण करण्याचा प्रयत्न येत्या वर्षात केला जाणार असून, त्यात ३०% प्राधान्य महिलांना दिले जाणार आहे. उच्च तंत्रज्ञानावर आधारित उद्योगात १०,००० कोटी गुंतवणूक करून चार हजार रोजगार निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. अमृत २ योजना १४५ शहरात राबविली जाणार असून त्यासाठीची आवश्यक खर्चाची तरतूद हे अंदाजपत्रक करते. पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागास या अंदाजपत्राकाने ३,८७५ कोटी रुपयांची तरतूद करते. अमृत २ योजना १४५ शहरात राबविली जाणार असून त्यासाठी आवश्यक खर्चाची तरतूद हे अंदाजपत्रक करते. पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागास या अंदाजपत्राकाने ३,८७५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. राज्य आणि जिल्हा महामार्गावर वृक्ष लागवड करण्याचा मानस या अंदाजपत्रकात दिसतो. पर्यावरण आणि वातावरण बदल विभागास या अंदाजपत्रकात २४५ कोटी रुपये तरतूद केले आहेत. तर वन विभागास २,५०७ कोटी रुपयांची तरतूद या अंदाजपत्रकात आहेत. मृदू आणि जल संधारण विभागास ४,२४७ कोटी रुपये खर्च तरतूद केली आहे. शेतीला निरंतर वीज पुरवठ्यासाठी सौर वीज वाहिनीचा प्रस्ताव या अंदाजपत्रकात आहे. हे अंदाजपत्रक मागेल त्या शेतकऱ्याला सौरऊर्जा पंप उपलब्ध करून देणार आहे. राज्यातील जलउपसा योजना सौरऊर्जीकरण करण्याचा मानस हे अंदाजपत्रक व्यक्त करते. तसेच ३७,००० अंगणवाड्यांना सौरऊर्जा संच हे अंदाजपत्रक उपलब्ध करून देणार आहे. तसेच एक लाख शेतकऱ्यांना सौरऊर्जा कुंपण तयार करण्यासाठी अनुदान हे अंदाजपत्रक उपलब्ध करून देणार आहे. ऊर्जा विभागास हे अंदाजपत्रक ११,९३४ कोटी रुपयेही खर्चासाठी उपलब्ध करून देणार आहे.

**सामाजिक समावेशक विकास :**

राज्याच्या सामाजिक विकासासाठी शिवनेरी संग्रहालय, युवक, महिला, गरीब आणि अन्नदाता यांच्यासाठी कल्याणकारी योजनेची अंमलबजावणी केली जाईल, असे हे अंदाजपत्रक सांगते. महिला सशक्तीकरण योजनेअंतर्गत १ लाख महिलांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न येत्या वर्षात केला जाणार आहे. अंगणवाडी सेविका

आणि मदतनीस पदे भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. कुपोषण नियंत्रित करण्यासाठी नागरी बालविकास केंद्रे सुरू केली जाणार आहेत. महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी १० शहरांतील पाच हजार महिलांना पिंक रिक्षा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. महिला आणि बालविकास विभागास कार्यक्रम खर्चासाठी ३ हजार १०७ कोटी रुपये उपलब्ध करून दिले जाणार आहेत. राज्यातील एकूण ११ जिल्ह्यांत १०० विद्यार्थी क्षमतेची वैद्यकीय महाविद्यालये आणि ४०० खाट असलेले दवाखाने सुरू करण्याचा मानस या अंदाजपत्रकात दिसतो.

राज्याचे आरोग्यक्षेत्र बळकट करण्याचा मानस या अंदाजपत्रकाचा दिसतो. कारण तशा तरतुदी या अंदाजपत्रकात केल्याचे दिसते. राज्यातील एकूण ११ जिल्ह्यात १०० विद्यार्थी क्षमतेची वैद्यकीय महाविद्यालये आणि ४०० खाट असलेले दवाखाने सुरू करण्याचा मानस या अंदाजपत्रकात आहे, तर एकूण आठ ठिकाणी परिचर्या महाविद्यालये सुरू करण्याचा प्रस्तावही अंदाजपत्रकात आहे. नागपूर एम्स धर्तीवर पुण्यात एम्स सुरू करण्याचा प्रस्ताव या अंदाजपत्रकात आहे. ऊसतोड कामगारांना अपघात विमा लागू केला जाणार आहे. सर्व जिल्ह्यात केमोथेरपी सेंटर सुरू केले जाणार आहे. ग्रामीण रुग्णालयात डायलेसिस सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. प्रत्येक तालुक्यात शववाहिका उपलब्ध करून दिली जाणार आहे. एकूण आरोग्य विभागास ६ हजार कोटी रुपये खर्चासाठी उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

स्थलांतरित ऊसतोड कामगार मुलांना वसतिगृह, तृतीय पंथीयांना बीज भांडवल आणि मातंग समाजासाठी इंदिरा आवास योजनेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे, असा प्रस्ताव या अंदाजपत्रकात आहे. देवनार येथे लेदर पार्क आणि कोल्हापूर येथे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा मानस या अंदाजपत्रकात दिसतो. तसेच मातंग समाजासाठी अण्णा भाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्था सुरू केली जाणार आहे. सामाजिक न्याय आणि सहाय्य विभागास १८ हजार ८१६ कोटी रुपये देण्याचा प्रस्ताव या अंदाजपत्रकात आहे. आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी विकासासाठी १५ हजार ३६० कोटी रुपये तरतूद केले आहे. सामाजिक न्याय देण्यासाठी संत गाडगेबाबा महामंडळाचा प्रस्ताव या अंदाजपत्रकात आहे. मौलाना आझाद विकास महामंडळामार्फत देण्यात येणारी पतहमी मर्यादा या अंदाजपत्रकाने मोठ्या प्रमाणात वाढविलेली आहे. दिव्यांगांसाठी नवीन घरकुल योजना त्यांचा निवाऱ्याचा प्रश्न निकालात काढण्यासाठी सुरू केली जाणार आहे. आनंदाच्या शिद्याची व्याप्ती वाढविण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकाने केला आहे. इतर मागास बहुजन कल्याण आणि अल्पसंख्यांक विभागास केल्या जात असलेल्या खर्चाच्या तरतुदीत वाढ करण्यात आली आहे. क्रीडाक्षेत्राच्या विकासासाठी ५३७ कोटी रुपयांची तरतूद या अंदाजपत्रकाने केली आहे.

**शिक्षण आणि कौशल्ये विकास :**

महाराष्ट्र ड्रोन मिशन प्रबळ करण्याबरोबरच त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देण्याची तरतूदही हे अंदाजपत्रक करते. उच्च शिक्षणासाठी २ हजार ९८ कोटी रुपये, तर शालेय शिक्षणासाठी २ हजार ९५९ कोटी रुपयांची तरतूद हे अंदाजपत्रक करते. आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास केंद्र आणि स्वच्छ भारत कौशल्य केंद्र प्रत्येक महसूल विभागात स्थापन करण्याचा प्रस्ताव या अंदाजपत्रकात आहे. मानव विकासासाठी ज्ञान आणि कौशल्ये विकास प्रकल्पास मंजुरी देतानाच, २,००० प्रमोद महाजन कौशल्ये विकास केंद्रे सुरू केली जाणार आहेत. कौशल्य, नावीन्यता आणि रोजगार कार्यक्रमासाठी ८०७ कोटी रुपये हे अंदाजपत्रक तरतूद करते.

**पर्यटन आणि सांस्कृतिक विकास:**

पर्यटन व्यवसाय विकासासाठी खास प्रयत्न हे अंदाजपत्रक करते. त्यासाठी ५० पर्यटन स्थळांचा विकास करण्याचा प्रयत्न येत्या वर्षात केला जाणार आहे.

कोयनानगरसहित इतर ठिकाणीही नावीन्यपूर्ण जलपर्यटन विकास केला जाणार आहे. लोणावळा येथे जागतिक दर्जाचा स्काय वॉक निर्माण केला जाणार आहे. श्रीनगर आणि अयोध्या या ठिकाणी महाराष्ट्र भवन निर्माण करण्याचा प्रस्ताव या अंदाजपत्रकात आहे. सांस्कृतिक कार्य, सार्वजनिक बांधकाम आणि महसूल विभागास खर्चासाठी भरीव तरतूद या अंदाजपत्रकाने केली आहे. संभाजी महाराज समाधी परिसर, १२ जोतिर्लिंगापैकी औंढा नागनाथ आणि माहूरगड क्षेत्र विकसित करण्याचा प्रस्ताव या अंदाजपत्रकात आहे. अहिल्याबाई होळकर जयंती आणि मंदिरे विकसित करण्यासाठी या अंदाजपत्रकाने खर्चाची तरतूद केली आहे. याबरोबरच जीवा महल, गोरोबा, लहू साळवे, सानेगुरुजी, मंगेश पाडगांववकर यांची स्थळे आणि ठिकाणे विकसित करण्याची तरतूद या अंदाजपत्रकात केली आहे .

**प्रस्तावित खर्च :**

हे अंदाजपत्रक नियोजन, रोजगार हमी योजना, आणि मराठी भाषा विकासास भरीव तरतूद करते. तसेच जिल्हा योजनेस १८,१६५ कोटी रुपयांची तरतूद करते. या अंदाजपत्रकात वार्षिक योजना ९२ हजार कोटी, अनुसूचित जाती उपयोजना १५,८९३ कोटी, अनुसूचित जमाती उपयोजना १५,३६० कोटी रुपयांची प्रस्तावित केली आहे. या अंदाजपत्रकाने २०२४-२५ साठी एकूण खर्च ६,५२२ कोटी रुपये प्रस्तावित केला आहे. मात्र एकूण महसूल जमा मात्र कमी आणि अपुरी आहे. तसेच महसुली जमेपेक्षा महसुली खर्च अधिक राहिल्याने महसुली तूट ९,७३४ कोटी रुपये राज्याला सहन करावी लागणार आहे.

**घोषणा अधिक :**

या अंदाजपत्रकात अनेक घोषणा दिसून येतात. अशा तरतुदींना खर्चाचा आधार नाही. तशी खर्चाची तरतूद या अंदाजपत्रकात नाही. जोपर्यंत अशा तरतुदींना खर्चाची जोड नाही, तोपर्यंत त्या प्रत्यक्षात येऊ शकत नाहीत. त्यामुळे अशा तरतुदी आणि उपायांना अर्थ राहात नाही. मात्र अशा अनेक घोषणा आणि तरतुदी या अंदाजपत्रकात दिसून येतात. त्याचं काय करायचं? हा प्रश्न निर्माण होतो. त्यांचा समावेश राजकीय हेतूंनी केला आहे का? असा प्रश्न आणि शंका निर्माण होते. दुर्दैवाने अशा अनेक घोषणा या अंदाजपत्रकात समाविष्ट आहेत. त्यामुळे त्या लोकप्रियतेसाठी आणि राजकीय लाभ उठविण्यासाठी अंतर्भूत केल्या आहेत का? असाही प्रश्न निर्माण होतो.

**महसूल संकलनाचे काय?**

हे अंदाजपत्रक आर्थिक, सामाजिक, समावेशक आणि शाश्वत विकास साध्य करण्याचा मानस स्पष्ट करते. त्यासाठी आवश्यक अनेक उपाय आणि धोरणेही या अंदाजपत्रकात अंतर्भूत करते. त्यांच्या अंमलबजावणीसाठी खर्चाची तरतूदही करते. मात्र त्यासाठी फार मोठ्या प्रमाणात महसूल आवश्यक आहे. मात्र तो आवश्यक महसूल कसा येणार? कसा गोळा केला जाणार? याची या अंदाजपत्रकात चर्चा नाही. आहे ते महसूल मार्ग आणि साधने कशी कार्यक्षम आणि उत्पादक करणार आहोत? नवीन काही महसूल साधने शोधली आहेत का? महसूल आणि करविषयक काही उपाय आणि सुधारणा करणे आवश्यक होते. मात्र त्यांचा अभाव या अंदाजपत्रकात दिसून येतो.

**तुटीच्या अर्थभरण्याचे काय?**

या अंदाजपत्रकाने तुटीच्या अर्थभरण्याचा आधार घेतला आहे. या अंदाजपत्रकात महसुली आणि राजकोषीय तूट उल्लेखनीय प्रमाणात दिसून येते. मात्र महसुली तूट कोणत्या मार्गाने भरून काढली जाणार आहे? त्याचा उल्लेख या अंदाजपत्रकात नाही. नवीन आणि वाढीव महसुली उत्पन्न गोळा करण्याचे मार्ग आणि साधने या अंदाजपत्रकात दिसत नाहीत. त्यामुळे महसुली तूट कशी भरून काढली जाणार? याचे उत्तर या अंदाजपत्रकात मिळत नाही. हा महत्त्वाचा प्रश्न कसा सोडवायचा? हा एक यक्ष प्रश्न हे अंदाजपत्रक उभा करते. या अंदाजपत्रकात राजकोषीय तूटही आहे. अर्थात,

ती कशी भरून काढली जाणार? याविषयी हे अंदाजपत्रक बोलत नाही. कोणत्या मार्गांनी राजकोषीय तूट भरून काढली जाणार, ते हे अंदाजपत्रक सांगत नाही. त्यामुळे तरतूद केलेला खर्च प्रत्यक्षात खर्च केला जाणार की नाही, अशी शंका निर्माण होण्यास वाव आहे.

**सुधारणांची दिशा :**

जेवढा महसूल गोळा करणे शक्य आहे, तेवढ्याच तरतुदी या अंदाजपत्रकात समाविष्ट करणे आवश्यक आहेत. शिक्षण आणि आरोग्यावरील तरतूद वाढवावी. शिक्षक आणि नोकर भरतीचा समावेश या अंदाजपत्रकात करावा, कारण त्याची अत्यंत गरज आहे. महसुलाचे नवीन नवीन मार्ग शोधून काढावेत. त्यातून किती महसूल मिळणार ते स्पष्ट करावे. जुने महसूल मार्ग कसे उत्पादक आणि कार्यक्षम केले जाणार आहेत, ते स्पष्ट करावे. राज्यातील तरुणांसाठी नेमका संघटित क्षेत्रात किती रोजगार निर्माण होणार, ते स्पष्ट केले जावे. त्यांना आवश्यक शिक्षण आणि आरोग्यसेवा उपलब्ध होईल, याची तरतूद करावी. आर्थिक सर्वेक्षण सादर न केल्यामुळे राज्यापुढील नेमके सामाजिक आर्थिक प्रश्न आणि आव्हाने कोणती आहेत? ती स्पष्ट झाली नाहीत. त्यामुळे आर्थिक सर्वेक्षण सादर करावे आणि त्यात प्रतिबिंबित झालेले प्रश्न आणि आव्हाने सोडविण्याच्या तरतुदी अंदाजपत्रकात समाविष्ट कराव्यात. नवीन शिक्षण धोरणाच्या पार्श्वभूमीवर, शिक्षणावरील खर्चात भरीव वाढ करावी. अंदाजपत्रक हे विकास धोरणाचे प्रभावी साधन म्हणून स्वीकारावे. राजकीय प्रतिबिंब त्यात नसावे. या सूचना आणि सुधारणा अंदाजपत्रकात समाविष्ट केल्यास हे अंदाजपत्रक अधिक शाश्वत, समावेशक, सर्वकष आणि वास्तव होईल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


**अ. ग्रंथ**

1. Economic and Political Weekly, Various Issues in February 2024.
2. Herber, B. P., (1967), Modern Public Finance, Richard D. Irwin, Homewood.
3. Jha, R., (1998), Modern Public Economics, Routledge, London.
4. Lekhi, R.K., (2020), Public Finance, Kalyani Publishers, Ludhiana.
5. Musgrave, R. A., (1959), The Theory of Public Finance, McGraw Hill, Kogakhusa, Tokyo.
6. Musgrave, R. A. and P. B. Musgrave, (1976), Public Finance in Theory and Practice, McGraw Hill, Kogakusha, Tokyo.
7. Mundell, S., (1999), Public Finance Policy: Issues for India, Oxford University Press, New Delhi.
8. Shoup, C. S., (1970), Public Finance, Aldine, Chicago.
9. Sreekantaradhya, B. S., (1972), Public Debt and Economic Development in India, New Delhi.
10. Tyagi, B. P., (2020), Public Finance, Jai Prakash Nath Company, Meerut, UP.

**ब. अहवाल**

1. Government of Maharashtra (2024-25), Maharashtra Budget 2024-25.
2. Government of Maharashtra (2022-23), Economic Survey 2022-23.
3. Government of India (2024-25), Budgetary Documents 2024-25, Ministry of Finance, New Delhi.
4. Government of India (2021-22), Economic Survey 2022-23, Ministry of Finance, New Delhi.

**क. वर्तमानपत्रे**

1. Daily Economic Times, Various Issues in February 2024.
2. Daily Times of India, Various Issues in February 2024.
3. Daily Loksatta, Various Issues in February 2024.


◆

# कळसुबाई हरिश्चंद्रगड वन्यजीव विभागात येणाऱ्या अतिदुर्गम भागातील आदिवासी महिला बचतगटांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा अभ्यास

**मानसी कृतकोटी** †
**मिनल भोसले** ††

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये महिलांसाठी व त्यांच्या सक्षमीकरणासाठी आर्थिक धोरण जाहीर केले. या माध्यमातून स्त्रीचे घराबाहेर पाऊल पडू लागले. आपण घराबाहेर पडून काही करू शकतो, याची जाणीव तिला करून द्यावी. हा या धोरणामागचा उद्देश होता. महिला शिक्षित असो वा नसो, कौटुंबिक पाठिंबा किंवा सहकार्य नसेल तर बहुतांशी वेळा तिच्या कर्तृत्वाचा आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास होत नाही. २०२१ नुसार १४० कोटी लोकसंख्येत निम्म्याने म्हणजेच ५०% असणाऱ्या महिला जरी विकास प्रक्रियेचा भाग असल्या तरी अतिदुर्गम भाग, ग्रामीण भाग याबाबतीत अजूनही त्या मागासलेल्याच आहेत. अजूनही ग्रामीण भागात महिला म्हणले की, केवळ रोजगार हमी योजना हाच पर्याय आहे असेच समजले जाते. परंतु ग्रामीण महिलांना आता रोजगार हमी योजनेच्या पलीकडे जावून आधुनिक शिक्षण, व्यावसायिक कौशल्य, नवे तंत्रज्ञान यांच्या साहाय्याने खरे सक्षम व्हायचे आहे. या सर्वांसाठी उत्तर आहे ते म्हणजे स्वयंसहाय्यता बचतगट. बचतगटाच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबनास मदत होते. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या कुटुंबाला आर्थिक हातभारदेखील लावला जावू शकतो. मात्र महिला विकासासाठीच्या शासनाच्या प्रयत्नांना अपयश येण्यामागे विकासप्रक्रियेत स्त्रियांच्या सहभागाचा अभाव आणि ग्रामीण भागातील महिला वित्तीय सुविधांपासून दूर असणे, अशी प्रमुख कारणे सांगता येतील. ग्रामीण भागातील महिला उद्योजकतेच्या प्रवाहात येत नाही तोपर्यंत विकास विशेषतः ग्रामीण तसेच अतिदुर्गम भागाचा विकास शक्य होणार नाही. भारतात १९९० पर्यंत ५०० स्वयंसहाय्यता बचतगट असलेली संख्या २००४ पर्यंत १० लाख ७८ हजार ९१ झाली. मार्च २००८ साली ही संख्या ३४ लाख ७७ हजार ९६५ इतके बचतगट झाले, तर २०२३ चा विचार करता ४ कोटी २० हजार इतकी बचतगटांची संख्या असून या माध्यमातून ८ कोटीच्या आसपास स्त्रिया बचतगटाच्या माध्यमातून उद्योजकतेशी अंशतः जोडल्या गेल्या आहेत. यातील १ कोटी बचतगट एकट्या महाराष्ट्र राज्यात आहेत.

† डॉ.डी.वाय.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपरी-पुणे १८
आजीव सदस्य क्र. १९५० भ्रमणध्वनी - ९१६८८४१२४९, ई-मेल - manasikurtkoti@gmail.com
†† डॉ.डी.वाय.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी-पुणे ४४
आजीव सदस्य क्र. २०१३, भ्रमणध्वनी - ९९६०१५३१६४, ई-मेल : minalbhosale18@gmail.com

महिलांचा विकास व सक्षमीकरण करावयाचे असेल तर स्त्रियांच्या अंगभूत गुणांना वाव देण्यासाठी महिलांमधील बचत प्रवृत्तीला प्रोत्साहन देवून त्यांना व्यवसायाभिमुख बनविण्याचे तसेच स्त्रियांना कर्जपुरवठा करून उद्योगाभिमुख करण्यासाठी स्वयंसहाय्यता बचतगटाची संकल्पना उपयोगी पडेल.

बचतगटातून केव्हाही पैशाची निकड भागवली जाऊ शकते, हे माहीत झाल्याने ग्रामीण भागातील महिलांमध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. बाहेरील सावकारी व्याजाने पैसे उभे करण्यापेक्षा बचत केलेले पैसे वापरले तर ते योग्यच होते अशी या महिलांची भूमिका होते. गरजेच्यावेळी विनाविलंब पैसे मिळतात. कमी व्याजदराने म्हणजेच वार्षिक ४% व्याजदराने शासनाकडून उद्योगासाठी भांडवल मिळते व उद्योगातून कुटुंबालादेखील हातभार लावता येतो. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून कळसुबाई हरिश्चंद्रगड वन्यजीव विभागातील अतिदुर्गम भागातील आदिवासी महिला बचतगटांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा अभ्यास हा विषय अभ्यासासाठी निवडला. कळसुबाई हरिश्चंद्रगड वन्यजीव विभागाअंतर्गत २६ गावांचा समावेश आहे. या गावांमध्ये एकूण आदिवासी बचतगटांची संख्या ३२२ इतकी आहे. या बचतगटांच्या सक्षमीकरणाचा अभ्यास करून या महिलांच्याबाबतीत उद्योजकतेसंदर्भात ठोस पाऊल उचलले जावू शकते.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये -**

१. आदिवासी महिला स्वयंसहाय्यता बचतगटांची स्त्री सक्षमीकरणातील भूमिका अभ्यासणे.

२. दारिद्र्यरेषेखालील आदिवासी महिलांचे बचतगटाच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण होत आहे की नाही याचा अभ्यास करणे.

३. अतिदुर्गम भागातील आदिवासी महिला बचतगटाच्या कार्यपद्धती व त्यांच्याकडून चालविण्यात येणाऱ्या व्यवसायांचा अभ्यास करणे.

४. आदिवासी महिला बचतगटांच्या विकासातील शासनाच्या भूमिकेचे परीक्षण करणे.

**अभ्यासाची गृहीतके -**

१. आदिवासी महिला बचतगटांच्या बचतीचे प्रमाण वाढत्या महागाई दरापेक्षा प्रचंड कमी आहे.

२. आदिवासी महिला बचत गटांमध्ये उद्योजकतेचे प्रमाण अतिशय अल्प आहे.

३. अतिदुर्गम आदिवासी भागात महिला उद्योजकता विकासासाठी शासनाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

**नमुना निवड -**

कळसुबाई हरिश्चंद्रगड वन्यजीव विभागातील अतिदुर्गम भागातील आदिवासी महिला बचतगटांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा अभ्यास करत असताना खालील तक्ता क्र.१ प्रमाणे कळसुबाई हरिश्चंद्रगड वन्यजीव विभागाअंतर्गत असलेल्या २६ गावांमध्ये ३२२ बचतगट आहेत. त्यामध्ये ९ गावांमधील २७ बचतगटांमधील १३५ महिलांची अभ्यासासाठी निवड केली आहे.

कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याअंतर्गत एकूण २६ गावे येतात. या २६ गावांमधून ९ गावांची अभ्यासासाठी निवड केली आहे. आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय राजूर या ठिकाणी नोंद असलेल्या व २०१५ - २०२४ या काळात कमीत कमी पाच वर्षे पूर्ण झालेल्या आणि कार्यरत असणाऱ्या ९ गावांमधून प्रत्येकी ३ याप्रमाणे १४७ बचतगटांपैकी २७ (१८.३६%) बचतगटांची स्तरीत नमुना निवड पद्धतीने निवड केलेली आहे. या प्रत्येक गटातील ०५ महिला याप्रमाणे १३५ महिलांची सोईस्कर नमुना निवड पद्धतीने निवड प्रश्नावली व मुलाखतीद्वारे माहिती गोळा केली आहे.

**निष्कर्ष -**

१. अभ्यासक्षेत्रातील महिला बचतगटात समाविष्ट महिलांच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घेतला असता

**तक्ता क्र. १ : कळसुबाई हरिश्चंद्रगड वन्यजीव विभागातील अभ्यासासाठी निवडलेल्या गावांची तसेच बचतगट व बचतगटातील महिलांची माहिती**

| अनु. क्र. | गावांची नावे | एकूण लोकसंख्या | पुरुष | महिला | महिला बचत गटांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | पानशेत | ७४६ | ३७० | ३७६ | १२ |
| २ | पांजरे | १५४५ | ७५० | ७९५ | २५ |
| ३ | मुरशेत | ८८८ | ४३२ | ४५६ | १७ |
| ४ | उडदावणे | १५३९ | ७५० | ७८९ | २६ |
| ५ | शिंगणेवाडी | ९३६ | ४५४ | ४८२ | १० |
| ६ | घाटघर | ११७६ | ५८८ | ५८८ | १४ |
| ७ | सम्रद | ७८९ | ४१७ | ३७२ | १२ |
| ८ | रतनवाडी | १११८ | ५७२ | ५४६ | २३ |
| ९ | कोलटेंबे | ५०५ | २५३ | २५२ | ०८ |
| १० | कुमशेत | ६६७ | ३३४ | ३३३ | १० |
| ११ | शिरपुंजे ब्रु. | १५७२ | ७८२ | ७९० | १२ |
| १२ | शिरपुंजे खु. | ३२४ | १५८ | १६६ | १० |
| १३ | अंबिट | ६९२ | ३२८ | ३६४ | ०८ |
| १४ | पाचनाई | ६९६ | ३५३ | ३४३ | ०९ |
| १५ | लवळी कोतुळ | ४६८ | २४१ | २२७ | ११ |
| १६ | लवळी ओतुळ | ४२६ | २२१ | २०५ | १३ |
| १७ | कोथाळे | ७३२ | ३९२ | ३४० | ०८ |
| १८ | ताले | ६२३ | ३२४ | २९९ | ०९ |
| १९ | विहीर | ४९६ | २४९ | २४७ | १० |
| २० | सोमाळवाडी | ६०६ | ३१० | २९६ | ०८ |
| २१ | फोफसंडी | ८९३ | ४५३ | ४४० | १३ |
| २२ | पळुसदे | १४४० | ६८६ | ७५४ | १२ |
| २३ | साठेवाडी | १६६० | ८१८ | ८४२ | १० |
| २४ | खेटेवाडी | ५७८ | २९१ | २८७ | ११ |
| २५ | उंबरवडी | ३२९ | १७१ | १५८ | ०८ |
| २६ | मोरवडी | ५९४ | २९४ | ३०० | १३ |
| | | २२०३८ | १०९९१ | ११०४७ | ३२२ |

संदर्भ : आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय राजूर कळसुबाई हरिश्चंद्रगड वन्यजीव विभाग.

**तक्ता क्र. २ : कळसुबाई हरिश्चंद्रगड वन्यजीव विभागातील अभ्यासासाठी निवडलेल्या गावांची तसेच बचतगट व बचतगटातील महिलांची माहिती**

| अनु. क्र. | गावांची नावे | एकूण लोकसंख्या | पुरुष | महिला | महिला बचतगट | नमुना निवड केलेले बचतगट | नमुना निवड केलेल्या बचतगटातील महिलांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पानशेत | ७४६ | ३७० | ३७६ | १२ | ०३ | १५ |
| २ | पांजरे | १५४५ | ७५० | ७९५ | २५ | ०३ | १५ |
| ३ | मुरशेत | ८८८ | ४३२ | ४५६ | १७ | ०३ | १५ |
| ४ | उडदावणे | १५३९ | ७५० | ७८९ | २६ | ०३ | १५ |
| ५ | शिंगणेवाडी | ९३६ | ४५४ | ४८२ | १० | ०३ | १५ |
| ६ | घाटघर | ११७६ | ५८८ | ५८८ | १४ | ०३ | १५ |
| ७ | सम्रद | ७८९ | ४१७ | ३७२ | १२ | ०३ | १५ |
| ८ | रतनवाडी | १११८ | ५७२ | ५४६ | २३ | ०३ | १५ |
| ९ | कोलटेंबे | ५०५ | २५३ | २५२ | ०८ | ०३ | १५ |
| | एकूण | ९२४२ | ४५८६ | ४६५६ | १४७ | २७ | १३५ |

संदर्भ - आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय राजूर कळसुबाई हरिश्चंद्रगड वन्यजीव विभाग.

८२.२३% महिलांचे प्राथमिक पहिली ते सातवीइतके शिक्षण पूर्ण झाले आहे, तर १७.७७% महिलांनी बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण केले आहे. ग्रामीण अतिदुर्गम भागातील महिला साक्षर तर आहेत; परंतु उच्च शिक्षणाचा अभाव असल्यामुळे उद्योजकता, व्यावसायिक शिक्षण याबाबत बहुतांशी महिला या अनभिज्ञ असलेल्या दिसून येतात.

२. अभ्यासक्षेत्रात बचतगट स्थापनेचा उद्देश काय याविषयी वर्गीकरण केले असता, ५ बचतगटातील १८.५१% महिलांनी स्वयंस्फूर्तीने बचतगट स्थापन केला आहे असे उत्तर दिले. ०४ बचतगटांमधील १४.८१% महिलांनी त्यांचा बचतगट हा राजकारणी लोकांनी प्रवृत्त केल्यामुळे स्थापन झाला आहे असे प्रतिपादन केले. १५ बचतगटांमधील ५५.५५% महिलांनी बचतगट हा कर्ज आणि बचतीसाठी स्थापन केला आहे असे सांगितले, तर फक्त ३ बचतगटांतील ११.११% महिलांनी बचतगट हा उद्योजकता विकसित व्हावी, या उद्देशाने स्थापन केला आहे, असे मत व्यक्त केले. यावरून असे स्पष्ट होते की, अतिदुर्गम आदिवासी भागात आजही बचतगट ही संकल्पना फक्त थोडीफार बचत करणे व कारणास्तव कर्ज घेणे यासाठी वापरली जाते. उद्योजकतेचा विचार करून बचतगट स्थापन केले जात नाहीत. आदिवासी अतिदुर्गम भागातील बचतगटात उद्योजकता अतिशय अल्प प्रमाणात दिसून येते.

३. क्षेत्रीय पाहणीतील आदिवासी दुर्गम भागातील बचतगट किती प्रमाणात बचत करतात याचे वर्गीकरण पाहिले असता, ४४.४४% म्हणजेच १२ बचतगट हे महिना पन्नास रुपये इतकी बचत करतात. ४०.७४%

म्हणजेच ११ बचतगट हे महिना शंभर रुपये इतकी बचत करतात. ११.११% म्हणजेच ०३ बचतगट हे दीडशे रुपये इतकी बचत करतात. तर ३.७१% म्हणजे ०१ बचतगट दोनशे रुपये इतकी बचत करतात. यावरून असे मत व्यक्त करता येईल की, एकीकडे महागाईचा दर पाहाता व शहरी भागातील महागाई पाहाता अतिदुर्गम आदिवासी भागात बचतगटांच्या माध्यमातून बचत करण्यात येणारी ५०, १००, १५०, २०० रुपये ही रक्कम अतिशय अत्यल्प आहे.

४. क्षेत्रीय पाहणीत बचतगटात येण्यापूर्वी महिला बचत करत १०० टक्के महिला बचतगटात येण्यापूर्वी बचत करत नव्हत्या. वित्तीय साक्षरता, बचत, बचतीतून भांडवल निर्मिती व यातून उद्योजकता या सर्व संकल्पनाची माहिती नसल्यामुळे तसेच शिक्षण आणि व्यावसायिक कौशल्य यांच्या अभावामुळे बचतगटात येण्यापूर्वी अतिदुर्गम भागातील आदिवासी महिला या कोणत्याही प्रकारची बचत करताना दिसून येत नाही.

५. अभ्यासक्षेत्रातील आदिवासी दुर्गम भागातील महिला बचतगट उद्योजकतेसाठी बँकेकडून कर्ज घेतले जाते का याचा तपशील पाहिला असता २०% बचतगटांनी उद्योजकतेसाठी बँकेकडून कर्ज घेतले आहे व शासनाच्या कमी व्याजदरात कर्जयोजनेचा लाभ घेतला आहे, तर ८०% बचतगटांनी उद्योजकतेसाठी कोणत्याही प्रकारचे कर्ज घेतलेले नाही. याचाच अर्थ, ८० टक्के बचतगट हे फक्त बचत करतात व घरगुती कारणास्तव अंतर्गत कर्ज घेतात. उद्योजकतेच्या दृष्टिकोनातून कोणताही विचार करत नाहीत.

६. अभ्यासक्षेत्रातील २०% बचतगटांनी उद्योजकतेसाठी बँकेकडून कर्ज घेतलेले दिसून येते. हे २०% बचतगट कोणता उद्योग करतात याची पाहाणी केली असता ३ बचतगटातील आदिवासी महिला या सडीचा तांदुळ पॅकींग करण्याचा, तर ३ बचतगट हे नाचणीपासून पापड बनवण्याचा उद्योग करताना दिसून येतात. आदिवासी अतिदुर्गम भागात महिला बचतगटांमध्ये उद्योजकतेचे प्रमाण फार कमी आहे. शहरात ये-जा असणाऱ्या काही महिलांनी पुढाकार घेवून लहान पातळीवर उद्योग सुरू करण्याचे धाडस केले आहे; परंतु यामध्ये वर्षभराचे सातत्य नाही. ठरावीक काळात उत्पादनाला मागणी असेल तरच उद्योग चालू राहाताना दिसून येतो.

७. अभ्यासक्षेत्रातील अतिदुर्गम आदिवासी भागातील एकाही बचतगटाने उद्योग व्यवसायासाठी प्रशिक्षण घेतलेले नाही; तसेच त्यांची व्यवसायकौशल्य विकसित झालेली नाहीत. अतिदुर्गम भाग शिक्षणाचा अभाव तसेच शासनाचे या भागाकडील असणारे कमी लक्ष इ. कारणांमुळे एकही बचतगटाने उद्योजकतेसाठी प्रशिक्षण घेतलेले नाही.

८. एक वर्ष पूर्ण झालेल्या बचतगटांना शासनामार्फत २० हजार रुपये इतके अनुदान देण्यात येते. अभ्यासक्षेत्रातील बचतगटांना शासनाच्यामार्फत मिळालेल्या मदतीसंदर्भात विचारणा केली असता, ०% बचतगटाला म्हणजेच एकाही बचतगटाला शासनाकडून एक वर्ष पूर्ण झाल्यावर मिळणारे अनुदान मिळालेले नाही. अशिक्षितपणा, शासनाच्या असलेल्या योजनांची माहिती नसणे इ. कारणांमुळे बचतगटांना शासनामार्फत देण्यात येणाऱ्या अनुदानाचा फायदा घेता येत नाही.

९. अभ्यासक्षेत्रात बचतगटांमुळे महिला सक्षमीकरण होते का याची विचारणा केली असता ४८.८८% महिलांनी बचतगटांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण होते असे मत व्यक्त केले. ३.७०% महिलांनी सामाजिक सक्षमीकरण होते असे सांगितले, २०% महिलांनी बचतगटांमुळे निणर्यक्षमता सुधारते असे सांगितले, २३.७०% महिलांनी आत्मविश्वास वाढीस लागला, असे मत व्यक्त केले, तर ३.७०% महिलांनी बचतगटाच्या माध्यमातून सामाजिक जाणीव निर्माण होते, असे मत व्यक्त केले. यातून असे स्पष्ट होते की,

**तक्ता क्र.३ : कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याअंतर्गत येणाऱ्या अतिदुर्गम आदिवासी महिला बचतगटांमधील बचतीचे प्रमाण**

| अ.क्र. | गावांची नावे | बचगट क्र.१ | बचगट क्र.२ | बचगट क्र.३ |
|---|---|---|---|---|
| १ | पानशेत | ५० | ५० | ५० |
| २ | पांजरे | ५० | ५० | १५० |
| ३ | मुरशेत | ५० | १५० | ५० |
| ४ | उडदावणे | ५० | ५० | ५० |
| ५ | शिंगणेवाडी | २०० | ५० | ५० |
| ६ | घाटघर | ५० | ५० | ५० |
| ७ | सम्रद | ५० | ५० | ५० |
| ८ | रतनवाडी | ५० | ५० | १५० |
| ९ | कोलटेंबे | ५० | ५० | ५० |

संदर्भ - क्षेत्रीय पाहणी

**तक्ता क्र.४ : कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याअंतर्गत येणाऱ्या अतिदुर्गम आदिवासी महिला बचतगटांमधील बचतीचे प्रमाण**

| अ.क्र. | तपशील | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ५० रु. दरमहा बचत करणारे बचतगट | १२ | ४४.४४ |
| २ | १०० रु. दरमहा बचत करणारे बचतगट | ११ | ४०.७४ |
| ३ | १५० रु. दरमहा बचत करणारे बचतगट | ०३ | ११.११ |
| ४ | २०० रु. दरमहा बचत करणारे बचतगट | ०१ | ३.७१ |
| | एकूण | २७ | १०० |

संदर्भ - क्षेत्रीय पाहणी

| ANOVA | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Source of Variation | SS | df | MS | F | P-value | F crit |
| Between Groups | 48.26 | 2 | 22.63 | 0.02 | 0.586 | 2.586 |
| Within Groups | 26.12 | 24 | 2612.11 | | | |
| Total | 45000 | 26 | | | | |

Anova Test F Value =0.02, P-value = 0.586***.

P-value by Logistic regression, P-value >0.05 is considered to be statistically not significant. ***P-value>0.001.

Decision Based on Statistical Analysis: We Reject Null Hypothesis (H01) and Accept Alternative Hypothesis (H1) at 5% Level of Significance (LOS).

बचतगटाच्या माध्यमातून महिलासक्षमीकरण होत आहे. शासनाने बचतगटांसाठी नियोजिलेल्या योजनांच्या माध्यमातून या सक्षमीकरणात आणखी वाढ होवू शकते, यासाठी शासनाने स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून प्रयत्न करावेत; तसेच बचतगटांना उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देवून उत्पादनासाठी बाजारपेठ कशी निर्माण होईल, यासाठी प्रयत्न करावेत.

**गृहीकृत्य पडताळणी -**

**गृहीतकृत्य परिकल्पना क्रमांक १ -**

● शून्य गृहीतकृत्य (H0)- आदिवासी महिला बचतगटांच्या बचतीचे प्रमाण पुरेसे आहे.

● पर्यायी गृहीतकृत्य (H1) - आदिवासी महिला बचतगटांच्या बचतीचे प्रमाण वाढत्या महागाई दरापेक्षा प्रचंड कमी आहे.

आदिवासी महिला बचतगटांच्या बचतीचे प्रमाण वाढत्या महागाई दरापेक्षा प्रचंड कमी आहे, हे पाहाण्यासाठी ॲनोव्हा ही सांख्यिकीय पडताळणी करण्यात आली. या पडताळणीमध्ये असे सिद्ध होते की, बचतीचे प्रमाण हे वाढता महागाई दर पाहाता ०.५% लक्षणीय पातळीचे गणितीय मूल्य सारणी मूल्यापेक्षा कमी आहे. याचाच अर्थ, सांख्यिकीय विश्लेषणावर आधारित शून्य गृहीतकृत्य नाकारून ५% महत्त्वाच्या पातळीवर पर्यायी गृहीतक स्वीकारतो.

**गृहीतकृत्य परिकल्पना क्रमांक २ -**

● शून्य गृहीतकृत्य (H0) - आदिवासी महिला बचतगटांमध्ये उद्योजकतेचे प्रमाण जास्त आहे.

● पर्यायी गृहीतकृत्य (H1) - आदिवासी महिला बचतगटांमध्ये उद्योजकतेचे प्रमाण अतिशय अल्प आहे.

**तक्ता क्र.५ : कळसुबाई हरिशचंद्रगड अभयारण्याअंतर्गत येणाऱ्या अतिदुर्गम आदिवासी महिला बचतगटांमधील उद्योजकतेचे प्रमाण ०१**

| अ.क्र. | उद्योग करता का | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ०६ | २० |
| २ | नाही | २१ | ८० |
| | | २७ | १०० |

संदर्भ - क्षेत्रीय पाहणी

Logistic regression Value =0.2857, P-value = 0.001***.

P-value by Logistic regression, P-value<0.05 is considered to be statistically significant. ***P-value<0.001.

**Test Statistics Details:**

Value of Test Statistic (Logistic regression value) = 0.2857

P-value (Probability value) = 0.001 (Statistically Significant by Logistic regression value).

**Decision Based on Statistical Analysis:** We Reject Null Hypothesis (H02) and Accept Alternative Hypothesis (H2) at 5% Level of Significance (LOS).

चाचणी आकडेवारी मूल्य लॉजिस्टिक प्रतिगमन मूल्य ०.२८५७ पी मूल्य संभाव्यता मूल्य ०.००१ लॉजिस्टिक प्रतिगमन मूल्यानुसार सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण आदिवासी महिला बचतगटांमध्ये उद्योजकतेचे प्रमाण अतिशय अल्प आहे. हे पाहाण्यासाठी लॉजिस्टिक प्रतिगमन मूल्य ही सांख्यिकीय पडताळणी करण्यात

आली. या पडताळणीमध्ये असे सिद्ध होते की, उद्योजकतेचे प्रमाण अतिदुर्गम आदिवासी भाग पाहाता ०.५% लक्षणीय पातळीचे गणितीय मूल्य सारणी मूल्यापेक्षा कमी आहे. याचाच अर्थ, सांख्यिकीय विश्लेषणावर आधारित शून्य गृहीतकृत्य नाकारून ५ टक्के महत्त्वाच्या पातळीवर पर्यायी गृहीतक स्वीकारतो.

**गृहीतकृत्य परिकल्पना क्रमांक ३**

- शून्य गृहीतकृत्य (H0) - अतिदुर्गम आदिवासी भागात महिला उद्योजकता विकासासाठी शासनाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.
- पर्यायी गृहीतकृत्य (H1) - अतिदुर्गम आदिवासी भागात महिला उद्योजकता विकासासाठी शासनाची भूमिका महत्त्वपूर्ण नाही.

**तक्ता क्र.६ : कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याअंतर्गत येणाऱ्या अतिदुर्गम आदिवासी महिला बचतगटांना शासनाच्या मिळणाऱ्या अनुदानाचा तपशील**

| अ.क्र. | शासनाचे अनुदान मिळाले आहे का | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ०० | ०० |
| २ | नाही | २७ | १०० |
| | | २७ | १०० |

संदर्भ - क्षेत्रीय पाहणी

Logistic regression Value =0.2857, P-value = 0.001***.

P-value by Logistic regression, P-value<0.05 is considered to be statistically significant. ***P-value<0.001.

**Test Statistics Details :**

Value of Test Statistic (Logistic regression value) = 0.2857

P-value (Probability value) = 0.001 (Statistically Significant by Logistic regression value).

**Decision Based on Statistical Analysis** : We Reject Null Hypothesis (H02) and Accept Alternative Hypothesis (H2) at 5% Level of Significance (LOS).

चाचणी आकडेवारी मूल्य लॉजिस्टिक प्रतिगमन मूल्य ०.२८५७ पी मूल्य संभाव्यता मूल्य ०.००१ लॉजिस्टिक प्रतिगमन मूल्यानुसार सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण अतिदुर्गम आदिवासी भागात महिला उद्योजकता विकासासाठी शासनाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. हे पाहाण्यासाठी लॉजिस्टिक प्रतिगमन मूल्य ही सांख्यिकीय पडताळणी करण्यात आली. या पडताळणीमध्ये असे सिद्ध होते की, आदिवासी भागात शासनाची भूमिका पाहाता ०.५% लक्षणीय पातळीचे गणितीय मूल्य सारणी मूल्यापेक्षा कमी आहे. याचाच अर्थ सांख्यिकीय विश्लेषणावर आधारित शून्य गृहीतकृत्य नाकारून ५% महत्त्वाच्या पातळीवर पर्यायी गृहीतक स्वीकारतो.

**शिफारशी :**

१. या भागाचा विकास करावयाचा असेल तर या भागात शासनामार्फत बचतगटांना उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम अवलंब करणे आवश्यक आहे. अतिदुर्गम भागातील महिला बचतगटांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होण्याकडे शासनाने पुरेसे लक्ष दिल्यास व उद्योजकता वाढीसाठी प्रशिक्षण दिल्यास आदिवासी

भागातील महिलांचा विकास होऊन दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल.

२. बचतगटांनी कोणता उद्योग करावा यासाठी आदिवासी प्रकल्प अधिकाऱ्यांच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जावेत व बचतगटांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ मिळेल, यासाठी प्रयत्न करावे.

३. आदिवासी बचतगटांना बँकामार्फत मिळणारे कर्ज अनुदान याविषयी माहिती देण्यात यावी. यातून कर्जाविषयी असणारे गैरसमज दूर होवून बचतगट कर्ज घेतील यातून उद्योजकता वाढीस लागेल.

४. शासनामार्फत आदिवासी भागातील महिला बचतगटांतील अशिक्षित महिलांसाठी प्रौढ निरंतरवर्ग सुरू करावेत.

**समारोप :**

महाराष्ट्रातील एक प्रगतीशील जिल्हा म्हणून नगर जिल्ह्याची ओळख आहे. पण याच नगर जिल्ह्याचा भाग असलेला अतिदुर्गम कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याचा भाग हा प्रगतीपासून, सोईसुविधांपासून नेहमीच वंचित राहिला आहे. या भागाचा विकास घडवण्यासाठी येथे परंपरागत वास्तव्यास असलेल्या आदिवासी समाजात सुधारणा होणे अत्यंत आवश्यक आहे. महिलांना आत्मसन्मान मिळवून देण्याच्या जाणिवेतून त्यांचे सक्षमीकरण व सबलीकरण करण्याच्या विचारांतून महिला एकत्र आल्यानंतर जग उलटपालट करण्याची क्षमता महिलांमध्ये असते हे साध्य होण्यासाठी महिला संघटीकरण होणे गरजेचे आहे. महिला समाजाच्या प्रवाहात स्वतः सुधारणा घडवून आणतात. तसेच पूर्ण कुटुंबदेखील सुधारण्यात पुढाकार घेतात आणि या महिलांमध्ये बदल घडवण्यासाठी बचतगट महत्त्वाची भूमिका बजावताना दिसून येतात.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१. कदम प्रभा, २००६, महिला सक्षमीकरणामध्ये महिला बचतगटाचे योगदान, सातारा जिल्ह्याचा सूक्ष्म अभ्यास.

२. घाटोळे रा.ना., २०००, समाशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती, श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर.

३. पुरंदरे संगीता, २००९, ग्रामीण भागातील विशेषतः शिरूर तालुक्यातील महिला स्वयंसहाय्यता बचतगटांचा विश्लेषणात्मक अभ्यास.

४. Jagtap Kishor, 2007, "Implication on Poverty Alleviation under Swamjayanti Gram Swarozgar Yojana (SGSY) A Critical Evaluation Study in Pune Dist'.

५. Karmakar K. G., 1999, "Rural Credit and self help group, Micro Finance needs and its conceps in India'.

६. K. Dinkarrao and Rajatam Dasgupta- "A Study of SHG and Linkage program National Institute of Bank Management, 1999.


◆

कला म्हणजे काहीतरी करण्याचा सुंदर मार्ग,
विज्ञान म्हणजे काहीतरी करण्याचा प्रभावी मार्ग,
तर व्यवसाय म्हणजे काहीतरी करण्याचा आर्थिक मार्ग.

**- इलबर्ट हुब्बार्ड**

# जागतिक आनंद निर्देशांकाचा सैद्धांतिक अभ्यास आणि भारताची दशा व दिशा

**गणेश आदिनाथ टेकळे** †

**प्रस्तावना :**

आनंद, कल्याण, लवचिकता आणि शाश्वतता घटकांचे मूल्यमापन करणाऱ्या सखोल सर्वेक्षण साधनाला आनंद निर्देशांक म्हणतात. आनंद निर्देशांक, हॅप्पीनेस अलायन्सद्वारे संशोधक, समुदाय संयोजक आणि डेटा वापरू इच्छिणाऱ्या इतर वापरकर्त्यांसाठी आणि व्यक्तिपरक कल्याणाचा निर्देशांक म्हणून एक सर्वेक्षण साधन म्हणून तयार केले गेले. या साधनाचा उपयोग एखाद्याच्या जीवनातील समाधानाची पातळी आणि त्याची परिस्थिती मोजण्यासाठी केला जाऊ शकतो. याचा उपयोग विशिष्ट लोकसंख्येच्या लोकसंख्येतील कल्याणाच्या इतर पैलूंचे वर्णन करण्यासाठी देखील केला जाऊ शकतो, जसे की समुदायाची भावना, सरकारवरील विश्वास आणि उत्पन्न असमानता.

२०२४ चा जागतिक आनंद अहवाल प्रसिद्ध झाला असून, फिनलंड हा सलग सातव्या वर्षी सर्वात आनंदी देश आहे. दुसरीकडे, सूचीबद्ध केलेल्या १४३ देशांपैकी भारत १२६ व्या क्रमांकावर आहे. वार्षिक अहवाल सामाजिक आधार, उत्पन्न, आरोग्य, स्वातंत्र्य, औदार्य आणि भ्रष्टाचाराची स्थिती यांसारख्या घटकांचा विचार करून १४० हून अधिक राष्ट्रांमधील आनंदाच्या पातळीचे मूल्यांकन करतो. गॅलप वर्ल्ड पोलसह विविध आउटलेट्समधून डेटा प्राप्त केला जातो आणि हा अहवाल दरवर्षी २० मार्च रोजी आंतरराष्ट्रीय आनंद दिनानिमित्त प्रकाशित केला जातो. सहयोगकर्त्यांमध्ये यू. एन. सस्टेनेबल डेव्हलपमेंट सोल्युशन्स नेटवर्क, गॅलप आणि ऑक्सफर्ड वेलबीइंग रिसर्च सेंटर यांचा समावेश आहे.

वर्ल्ड हॅप्पीनेस रिपोर्टच्या २०२४ च्या अंकात, जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर लोकांच्या आनंदावर लक्ष केंद्रित केले आहे. शेक्सपियरच्या 'ॲज यू लाइक इट' मध्ये माणसाच्या सात युगात, आयुष्याच्यानंतरचे टप्पे अत्यंत निराशाजनक म्हणून चित्रित केले आहेत. परंतु आनंदाचे संशोधन (वर्ल्ड हॅप्पीनेस रिपोर्ट) अधिक सूक्ष्म चित्र दाखवते आणि ते काळानुसार बदलत आहे. २०२४ चा अहवाल जगाच्या तरुण, वृद्ध - आणि त्यादरम्यानच्या प्रत्येकाच्या आनंदावर निष्कर्षांसाठी प्रकाश टाकतो.

प्रस्तुत लेखामध्ये, लेखकाने आनंद निर्देशांकाचा सैद्धांतिक अभ्यास सखोल व विस्तृतपणे केला आहे. यासोबतच जागतिक आनंद निर्देशांकाच्या २०२४ च्या अहवालाचा भारताच्या दृष्टीने अभ्यास केला आहे.

† संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सदस्य क्र. २०००, भ्रमणध्वनी - ८६००८०४१०७, ई-मेल - ganeshtekale159@gmail.com

जगाच्या क्रमवारीत भारताचे असलेले स्थान निराशादायक असल्याने; भारताची वर्तमान स्थिती, कारणे व काही उपाय या लेखाच्या केंद्रस्थानी ठेवले आहेत.

**संशोधन पद्धती:**

सर्वेक्षणाचे साधन चार वेगवेगळ्या फेऱ्यांमध्ये विकसित केले गेले आहेत. पहिल्या फेरीत भूतानच्या GNHI डोमेनच्या आनंद, कल्याण आणि जीवनाच्या गुणवत्तेसाठी प्रासंगिकतेचे मूल्यांकन केले गेले आहे. फेरी २ ने सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी लागणारा वेळ कमी करण्यावर भर दिला. फेऱ्या ३ आणि ४ दोन्ही व्यक्तिनिष्ठ कल्याण निर्देशकांचे मानकीकरण आणि सर्वेक्षणाची लांबी आणि पूर्ण होण्याची वेळ कमी करण्यावर केंद्रित आहेत. चौथ्या फेरीत प्रश्नावली व त्यांची साधने येतात. प्रत्येक प्रश्नाचे स्रोत खाली दिले आहेत. प्रत्येक डोमेन प्रश्नांचा संपूर्ण मजकूर स्त्रोतांनुसार उत्तर निवडीसह सूचीबद्ध करते.


१. कॅनट्रिल पायरी (सद्यस्थितीत आपण आपले जीवन कोणत्या टप्प्यावर अनुभवता?). यामध्ये ०.सर्वात खराब., ते १०. सर्वोत्कृष्ट जीवन शक्यता असे मापन केले जाते. २. जीवनासोबत समाधान (''आजकाल तुम्ही तुमच्या जीवनात किती समाधानी आहात? 'तुम्ही तुमच्या आयुष्यात करत असलेल्या गोष्टी कितपत फायदेशीर वाटतात?' 'काल तुम्हाला किती आनंद झाला होता?' 'काल तुम्हाला किती चिंता वाटत होती?'') ३. मानसिक कल्याण (मी हेतुपूर्ण व अर्थपूर्ण जीवन जगत आहे, मी माझी दैनंदिन कामे आवडीने व झोकून करतो, मी माझ्या जीवनाबद्दल आशावादी आहे, मी जे काम करतो, ते अनुकूल व फलदायी वाटते, सामान्यतः मी स्वतःला सकारात्मक समजतो, मला गावातील मंदिरापेक्षा वारीत अधिक समाधानी वाटते.) या प्रश्नांची उत्तरे (पूर्णपणे असहमत, असहमत, असहमत/सहमत दोन्ही नाही, सहमत, पूर्णपणे सहमत) याप्रमाणे द्यावयाची असतात. ४ . आरोग्य (सामान्यतः माझे आरोग्य हे ---- असते, दैनंदिन कामांसाठी तुमच्याकडे पुरेशी ऊर्जा असते का? दिवसातून किती तास काम करता? दैनंदिन कामे करण्यासाठीच्या तुमच्या क्षमतेशी तुम्ही किती समाधानी असता? शारीरिक व्यायामासाठी मिळालेल्या वेळेसंदर्भात तुम्ही समाधानी किती असता?) ५. वेळ (व्यस्त जीवनात स्वतः साठी वेळ काढणे शक्य होते का? जीवन खूप घाईत चालू आहे, माझ्याकडे भरपूर मोकळा वेळ आहे.) ६. आजीवन शिक्षण, कला आणि संस्कृती (तुमच्या स्थानिक समुदयामध्ये/ समाजामध्ये पुढील कार्यक्रमांत प्रभावीपणे व मनमोकळेपणाने सहभागी होण्याची संधी असते. तुम्हाला तुमच्या वंश, संस्कृती, रंग, भाषा, लिंग, जात किंवा धर्मामुळे समाजामध्ये अस्वस्थ किंवा जागा नसल्यासारखे वाटते.) ७. समुदाय (तुम्हाला तुमच्या स्थानिक समुदायाशी आपलेपणाची भावना कशी वाटते? तुम्ही तुमच्या शेजारी राहाणाऱ्या किती लोकांवर विश्वास ठेवता? तुम्ही तुमच्या व्यवसायातील किती लोकांवर विश्वास ठेवता? समजा, तुमच्या शेजारी/ जवळ राहाणाऱ्या व्यक्तीस तुमचे ५००० रुपये असणारे पाकीट सापडले, तर तो ते पाकीट तुम्हाला परत आणून देण्याची किती शक्यता वाटते? तुमच्या शहरात किंवा गावात तुमच्या वैयक्तिक सुरक्षिततेबद्दल तुम्ही किती समाधानी आहात? सामान्यतः सामाजिक संस्थेसाठी स्वेच्छेने तुम्ही किती वेळ देता? सामान्यतः सामाजिक कार्यासाठी स्वेच्छेने तुम्ही किती वेळा दान देता?) ८. सामाजिक सहकार्य (तुम्ही तुमच्या वैयक्तिक नातेसंबंधामध्ये किती समाधानी आहात? 'माझ्या जवळचे लोक माझी काळजी घेतात', या विधानाशी किती सहमत आहात? मागील आठवड्यात किती वेळा जीवनात प्रेम वाटले? मागील आठवड्यात किती वेळा जीवनात एकटेपणा वाटला?) ९. पर्यावरण (भौतिक पर्यावरण किती निरोगी आहे? तुमच्या परिसरात निसर्ग/

पर्यावरण संवर्धनासाठी होणाऱ्या प्रयत्नाबद्दल तुम्ही किती समाधानी आहात? निसर्गाचा आनंद घेण्याच्या संधीबद्दल तुम्ही किती समाधानी आहात? तुमच्या परिसरातील हवेच्या गुणवत्तेसंदर्भात तुम्ही किती समाधानी आहात?) १०. शासन ('तुमच्या गाव/शहरामध्ये भ्रष्टाचार होतो' या विधानाशी किती सहमत आहात? तुमच्या गाव/शहराचे प्रशासन तुमच्या मागण्यांकडे लक्ष देते, तुम्हाला तुमच्या केंद्र सरकारवर विश्वास आहे, तुम्हाला तुमच्या राज्य सरकारवर विश्वास आहे.) ११. राहणीमानाचा दर्जा/अर्थव्यवस्था (आर्थिक बाबतीत तुम्ही स्वतःला किती तणावपूर्ण समजता? तुम्हाला मिळणाऱ्या उत्पन्नाच्या कमतरतेमुळे जीवन जगताना किती वेळा संघर्ष होतो? तुमच्याकडे पुरेसे अन्न किंवा पुरेसे पैसे नसल्याने मागील एका वर्षात कितीवेळा अर्धपोटी राहिला आहात? माझ्याकडे मला हव्या त्या वस्तू घेण्यासाठी पुरेसे पैसे आहेत.) १२. काम (तुम्ही तुमच्या सध्याच्या व्यवसाय/ नोकरीमध्ये किती समाधानी आहात? तुम्ही तुमच्या सशुल्क कामातील व जीवनातील इतर वैयक्तिक वेळेचा समतोल साधण्यात किती समाधानी आहात? तुम्ही व्यवसाय किंवा नोकरीतील किती वेळ आवडीने घालवता? माझ्या नोकरीतील माझे प्रयत्न व यश लक्षात घेऊन मला योग्य मोबदला मिळतो. माझ्या नोकरीची स्थिती मला शक्य तेवढे उत्पादक बनवते. माझे काम कसे करायचे ते ठरविण्याची मला पूर्ण मुभा आहे.) अशा निर्देशकांचा/ चलांचा वापर करून सर्वेक्षण केले जाते.

**जागतिक आनंद निर्देशांक २०२४:**

२०२४ चा जागतिक आनंद अहवाल २० मार्चला प्रसिद्ध करण्यात आला. कोविड-१९ साथीच्या आजारापूर्वी या यादीतील शीर्ष १० देश समान राहिले आहेत, तर युनायटेड स्टेट्स आणि जर्मनी या क्रमवारीत घसरले आहेत. युनायटेड स्टेट्स गेल्यावर्षी १६व्या स्थानावरून यावर्षी २३व्या स्थानावर घसरले आहे. या वर्षी, कॅनडा १५व्या स्थानावर आहे, तर यूके २०व्या, जर्मनी २४ आणि फ्रान्स २७व्या स्थानावर आहे. मध्यपूर्वेतील राष्ट्रांमध्ये, यूएई २२व्या आणि सौदी अरेबिया २८व्या स्थानावर आहे. आशियाई राष्ट्रांमध्ये सिंगापूर ३०व्या स्थानावर आहे. जपान ५० आणि दक्षिण कोरिया ५१व्या स्थानावर आहे.

**आकृती क्र. १ आनंद निर्देशांक २०२४**



**तक्ता क्र. १. जागतिक आनंद निर्देशांक क्रमवारी व स्कोर (२०२२-२४)**

| अ.क्र. | देश | क्रमांक २०२४ | स्कोर २०२४ | नवीनतम स्कोर बदल | क्रमांक २०२३ | स्कोर २०२३ | क्रमांक २०२२ | स्कोर २०२२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फिनलँड | १ | ७.७४ | -०.०६४ | १ | ७.८०४ | १ | ७.८२१ |
| २ | डेन्मार्क | २ | ७.५८ | -०.००६ | २ | ७.५८६ | २ | ७.६३६ |
| ३ | आइसलँड | ३ | ७.५३ | ० | ३ | ७.५३ | ३ | ७.५५७ |
| ४ | स्वीडन | ४ | ७.३४ | -०.०५५ | ६ | ७.३९५ | ७ | ७.३८४ |
| ५ | इस्रायल | ५ | ७.३४ | -०.१३३ | ४ | ७.४७३ | ९ | ७.३६४ |
| ६ | स्वित्झर्लंड | ९ | ७.०६ | -०.१८ | ८ | ७.२४ | ४ | ७.५१२ |
| ७ | युनायटेड किंगडम | २० | ६.७५ | -०.०४६ | १९ | ६.७९६ | १७ | ६.९४३ |
| ८ | संयुक्त राष्ट्र | २३ | ६.७३ | -०.१६४ | १५ | ६.८९४ | १६ | ६.९७७ |
| ९ | जपान | ५१ | ६.०६ | -०.०६९ | ४७ | ६.१२९ | ५४ | ६.०३९ |
| १० | चीन | ६० | ५.९७ | ०.१५२ | ६४ | ५.८१८ | ७२ | ५.५८५ |
| ११ | नेपाळ | ९३ | ५.१६ | -०.२ | ७८ | ५.३६ | ८४ | ५.३७७ |
| १२ | पाकिस्तान | १०८ | ४.६६ | ०.१०५ | १०८ | ४.५५५ | १२१ | ४.५१६ |
| १३ | भारत | १२६ | ४.०५ | ०.०१४ | १२६ | ४.०३६ | १३६ | ३.७७७ |
| १४ | श्रीलंका | १२८ | ३.९ | -०.५४२ | ११२ | ४.४४२ | १२७ | ४.३६२ |
| १५ | बांगलादेश | १२९ | ३.८९ | -०.३९२ | ११८ | ४.२८२ | ९४ | ५.१५५ |
| १६ | डी. आर. काँगो | १३९ | ३.३ | ०.०९३ | १३३ | ३.२०७ | | |
| १७ | सिएरा लिओन | १४० | ३.२५ | ०.११२ | १३५ | ३.१३८ | १४० | ३.५७४ |
| १८ | लेसोथो | १४१ | ३.१९ | | | | १४१ | ३.५१२ |
| १९ | लेबनॉन | १४२ | २.७१ | ०.३१८ | १३६ | २.३९२ | १४५ | २.९५५ |
| २० | अफगाणिस्तान | १४३ | १.७२ | -०.१३९ | १३७ | १.८५९ | १४६ | २.४०४ |

संदर्भ: वर्ल्ड पॉप्युलेशन रिव्यू

तक्ता (जागतिक आनंद निर्देशांक क्रमवारी व स्कोर) व आकृती (आनंद निर्देशांक २०२४) क्र. १. मध्ये दर्शविल्याप्रमाणे, मागील वर्षांच्या अनुषंगाने, नॉर्डिक देश शीर्ष क्रमवारीत वर्चस्व गाजवत आहे. फिनलंडने सलग सातव्या वर्षी अव्वलस्थान पटकावले आहे. डेन्मार्क आणि आइसलँडने अनुक्रमे दुसरे आणि तिसरे स्थान कायम राखले असून, स्वीडन चौथ्या क्रमांकावर आहे. उल्लेखनीय म्हणजे, कोस्टा रिका आणि लिथुआनियाने अनुक्रमे १२ आणि १९ क्रमांक मिळवून प्रथमच टॉप २० च्या यादीत प्रवेश केला आहे. अगदी विरुद्ध टोकाला, अफगाणिस्तानने जगातील सर्वात दुःखी देश म्हणून आपली स्थिती कायम ठेवली आहे. २०२० मध्ये तालिबानने अफगाणिस्थानवर ताबा मिळवल्यापासून हा देश मानवतावादी, हवामान आणि आर्थिक संकटांच्या पार्श्वभूमीवर आहे. लेबनॉन, लेसोथो, सिएरा लिओन आणि काँगो या यादीत सर्वात तळाशी

असलेल्या अफगाणिस्तानसोबत सामील झाले आहेत. गेल्या वर्षीप्रमाणेच भारत १२६व्या स्थानावर आहे. भारताचे सर्व शेजारी देश उच्च स्थानावर आहेत. चीन ६०व्या, त्यानंतर नेपाळ ९३, पाकिस्तान (१०८), म्यानमार (११८), श्रीलंका (१२८) आणि बांगलादेश (१२९) आहेत.

**तक्ता क्र. २. वयोगटानुसार सर्वात आनंदी व किमान आनंदी क्रमांक (२०२१-२३)**

| अ.क्र. | देश | सर्व वयोगट | तरुण | निम्न मध्यम | उच्च मध्यम | वृद्ध | सर्वात आनंदी वयोगट | किमान आनंदी वयोगट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फिनलँड | १ | ७ | १ | १ | २ | वृद्ध | तरुण |
| २ | डेन्मार्क | २ | ५ | ३ | ४ | १ | वृद्ध | तरुण |
| ३ | आइसलँड | ३ | ४ | ४ | २ | ५ | तरुण | निम्न मध्यम |
| ४ | स्वीडन | ४ | १८ | ८ | ३ | ४ | वृद्ध | तरुण |
| ५ | इस्रायल | ५ | २ | २ | ७ | १८ | तरुण | वृद्ध |
| ६ | स्वित्झर्लंड | ९ | १३ | ९ | ११ | १४ | तरुण | उच्च मध्यम |
| ७ | युनायटेड किंगडम | २० | ३२ | २७ | १९ | २० | वृद्ध | निम्न मध्यम |
| ८ | संयुक्त राष्ट्र | २३ | ६२ | ४२ | १७ | १० | वृद्ध | निम्न मध्यम |
| ९ | जपान | ५१ | ७३ | ६३ | ५२ | ३६ | तरुण | निम्न मध्यम |
| १० | चीन | ६० | ७९ | ६७ | ५७ | ३० | वृद्ध | निम्न मध्यम |
| ११ | नेपाळ | ९३ | ९२ | १०१ | ९३ | ७६ | तरुण | उच्च मध्यम |
| १२ | पाकिस्तान | १०८ | १०७ | १०९ | ११३ | १२२ | तरुण | वृद्ध |
| १३ | भारत | १२६ | १२७ | १२७ | १२१ | १२१ | तरुण | निम्न मध्यम |
| १४ | श्रीलंका | १२८ | १२३ | १२८ | १२८ | १२८ | तरुण | उच्च मध्यम |
| १५ | बांगलादेश | १२९ | १२८ | १२९ | १२९ | १२० | तरुण | उच्च मध्यम |
| १६ | डी आर काँगो | १३९ | १४० | १३७ | १३४ | १३९ | तरुण | वृद्ध |
| १७ | सिएरा लिओन | १४० | १४१ | १३६ | १३२ | १३३ | वृद्ध | निम्न मध्यम |
| १८ | लेसोथो | १४१ | १३८ | १४१ | १४२ | १३८ | तरुण | उच्च मध्यम |
| १९ | लेबनॉन | १४२ | १४२ | १४२ | १४१ | १४१ | तरुण | वृद्ध |
| २० | अफगाणिस्तान | १४३ | १४३ | १४३ | १४३ | १४३ | तरुण | वृद्ध |

संदर्भ: वर्ल्ड हॅप्पीनेस रिपोर्ट, २०२४

तक्ता (वयोगटानुसार सर्वात आनंदी व किमान आनंदी क्रमांक) क्र. २. मध्ये उद्धृत केल्याप्रमाणे, सर्व वयोगटातील क्रमवारीत फिनलँड प्रथम स्थानावर आहे. सर्वात आनंदी वयोगटाचा विचार करता, तरुण वयोगट सर्वाधिक देशांत सर्वात अधिक आनंदी आहेत. किमान आनंदी वयोगटामध्ये, निम्न मध्यम वयाचे लोक कमी आनंदी असल्याचे निष्पन्न होते. भारताच्या बाबतीत, सर्वात आनंदी वयोगटात तरुणांचा तर किमान

आनंदी वयोगटात निम्न मध्यम समावेश होतो.

**भारतातील वृद्ध - प्रौढांमधील जीवन समाधानातील फरक:**

भारताची वृद्ध लोकसंख्या ही जगभरातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी लोकसंख्या आहे. ६० आणि त्याहून अधिक वयाचे १४० दशलक्ष भारतीय, २५० दशलक्ष चिनी लोकांनंतर दुसऱ्या क्रमांकावर आहेत. याव्यतिरिक्त, ६० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या भारतीयांसाठी सरासरी वाढीचा दर देशाच्या एकूण लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा तिप्पट आहे. लोकसंख्येचे वृद्धत्व सामाजिक आणि आर्थिक प्रगती दर्शवत असले तरी, जगभरातील शास्त्रज्ञ वृद्धापकाळात जीवनाच्या गुणवत्तेमध्ये योगदान देणाऱ्या घटकांवर वादविवाद करत आहेत. भारतातील दीर्घकालीन वृद्धत्व अभ्यास (LASI, 2017-19) च्या बेसलाइन वेव्हचा वापर केला आहे, जो आरोग्य आणि सेवानिवृत्ती अभ्यास (HRS) भारतीय रूपांतर आहे. LASI; जनसांख्यिकी, आरोग्य लक्षणे, परिस्थिती, अपंगत्व, आरोग्यसेवेचा उपयोग, घरगुती सामाजिक-आर्थिक स्थिती, कौटुंबिक आणि सामाजिक नेटवर्क आणि ४५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या ७३,३९६ प्रौढांबद्दल महत्त्वपूर्ण माहिती प्रदान करते. LASI ने अंतिम निरीक्षण युनिट्सवर पोहोचण्यासाठी मल्टीस्टेज स्तरीकृत क्षेत्र संभाव्यता क्लस्टर सॅम्पलिंग डिझाइनचा वापर केला आहे.

वय आणि जीवनातील समाधान यांच्यातील सकारात्मक संबंध केवळ उच्च-उत्पन्न असलेल्या राष्ट्रांमध्येच अस्तित्वात असल्याच्या काही दाव्यांचे खंडन करून वृद्धापकाळ हा भारतातील उच्च जीवनातील समाधानाशी संबंधित आहे. सरासरी, भारतातील वृद्ध पुरुष; वृद्ध स्त्रियांपेक्षा जीवनात अधिक समाधानी असतात, परंतु इतर सर्व चले विचारात घेतल्यास, वृद्ध स्त्रिया त्यांच्या पुरुष सहकाऱ्यांपेक्षा जास्त जीवन समाधानी असल्याचे दिसून येते. माध्यमिक/ उच्च शिक्षण घेतलेले वयस्कर प्रौढ आणि उच्च सामाजिक जातीचे लोक, औपचारिक शिक्षण नसलेल्या आणि अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातींमधील समकक्षांपेक्षा उच्च जीवनातील समाधान नोंदवतात. राहाणीमानाच्या व्यवस्थेबद्दलचे समाधान, समजलेला भेदभाव आणि स्वयंमूल्यांकित आरोग्य हे या अभ्यासात जीवनातील समाधानाचे शीर्ष तीन भविष्यसूचक म्हणून उदयास आले आहेत.


**तक्ता क्र. ३. राष्ट्र-वर्ष निरीक्षण आधारित आनंद निर्देशांकाची संक्षिप्त सांख्यिकी (२०२१-२३)**

| चल | सरासरी | मानक विचलन | किमान | कमाल | N |
|---|---|---|---|---|---|
| जीवन पायरी | ५.५८ | १.१७ | १.२८ | ७.७९ | ४०० |
| सकारात्मक परिणाम | ०.६५ | ०.११ | ०.१८ | ०.८४ | ४०० |
| नकारात्मक परिणाम | ०.२९ | ०.०९ | ०.१ | ०.६१ | ४०० |
| लॉग दरडोई उत्पन्न | ९.५५ | १.१३ | ७.०३ | ११.६८ | ३८४ |
| सामाजिक आधार | ०.८ | ०.१३ | ०.२३ | ०.९८ | ४०० |
| निरोगी जीवनमान | ६५.१२ | ५.६४ | ४६.१५ | ७४.६० | ३९० |
| निवडीचे स्वातंत्र्य | ०.७९ | ०.१२ | ०.२३ | ०.९८ | ३९५ |
| औदार्य | ०.०३ | ०.१६ | -०.३२ | ०.६ | ३८४ |
| भ्रष्टाचार स्थिती | ०.७२ | ०.१८ | ०.१४ | ०.९५ | ३८५ |

संदर्भ: वर्ल्ड हॅप्पीनेस रिपोर्ट, २०२४

तक्ता (राष्ट्र-वर्ष निरीक्षण आधारित आनंद निर्देशांकाची संक्षिप्त सांख्यिकी) क्र. ३. व आकृती (आनंद निर्देशांक सांख्यिकी) क्र. २. मध्ये, आनंदी निर्देशांकात उपयुक्त चलांची सांख्यिकीय मांडणी केली आहे. यात मुख्यतः सरासरी, मानक विचलन, किमान व कमाल परिमाण व नमुना यांचा समावेश आहे. जीवन पायरी, सकारात्मक परिणाम, नकारात्मक परिणाम, लॉग दरडोई उत्पन्न, सामाजिक आधार, निरोगी जीवनमान, निवडीचे स्वातंत्र्य, औदार्य आणि भ्रष्टाचार स्थिती या चलांचे परिमाण दिले आहे.

**आकृती क्र. २. आनंद निर्देशांक सांख्यिकी २०२१-२३.**




**भारताच्या निम्न आनंद निर्देशांकाची कारणे:**

१. घटते उत्पन्न आणि बेरोजगारी.

२. देशातील भ्रष्टाचाराबाबत प्रतिकूल समज.

३. सामाजिक आधाराचा अभाव.

४. शैक्षणिक सुविधांची निम्न पातळी.

५. भारताच्या लोकसंख्येची वयरचना.

**समारोप:**

भारत जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे; परंतु तो सर्वात कमी आनंदी देशांपैकी एक आहे. अमेरिका, ब्राझील, इजिप्त, फ्रान्स इंडोनेशिया आणि मेक्सिको या देशांसोबत भारतामध्येही एकाकी लोकांची संख्या सर्वाधिक आहे. उदयोन्मुख अर्थव्यवस्था आणि विकसनशील देशांमध्ये सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा सर्वात कमी वापर (३१%) भारताने नोंदवला आहे. अहवालानुसार, हे देशातील रहिवाशांमध्ये कमी परस्परसंवाद दर्शविते. परिणामी, आनंदाच्या भागामध्ये घट होते. देशांना उच्च स्थान मिळावे यासाठी, आरोग्य, विशेषत: मानसिक आरोग्य, कामाची गुणवत्ता, कौटुंबिक जीवन आणि समुदायाचे अधिक प्राधान्य गृहीत धरले जाते; म्हणून यावर भर देण्याची गरज आहे.

'एखाद्या लोकसंख्येला संपूर्ण जीवनातील समाधानाचे उच्च स्तर केवळ तेव्हाच अनुभवता येतील जेव्हा तेथील लोकदेखील सामाजिक, निरोगी आणि समृद्ध असतील. दुसऱ्या शब्दांत, तेथील लोकांमध्ये ॲरिस्टॉटल ज्याला 'युडायमोनिया' म्हणतात त्याची उच्च पातळी असणे आवश्यक आहे'.

(सदर लेखासाठी संशोधकास डॉ. राहुल शं. म्होपरे यांचे मार्गदर्शन लाभले आहे, त्याबद्दल संशोधक त्यांचा ऋणी आहे.)

(सदर लेखासाठी संशोधकास डॉ. राहुल शं. म्होपरे यांचे मार्गदर्शन लाभले आहे, त्याबद्दल संशोधक त्यांचा ऋणी आहे.)

**संदर्भ ग्रंथ सूची:**


1. Business Standard, (2024), Finland tops 2024 World Happiness Report again; India ranks 126. World News. Business Standard. Retrieved March 27, 2024, from https://www.business-standard.com/world-news/finland-tops-2024-world-happiness-report-again-india-ranks-126-124032000537_1.html.
2. Centre, Wellbeing Research, WHR Editorial Board, (2024), World Happiness Report, University of Oxford, UK.
3. Desk, N. W. ,(2020), First-ever annual 'India Happiness Report' released; Mizoram, Punjab, Andaman and Nicobar Islands top index. Retrieved February 24, 2024, from https://www.nationalheraldindia.com/india/first-ever-annual-india-happiness-report-released-mizoram-punjab-andaman-and-nicobar-islands-top-index.
4. DSOUZA, R., (2021), Five reasons for an unhappy India. Observer Research Foundation. Retrieved February 23, 2024, from https://www.orfonline.org/expert-speak/five-reasons-unhappy-india.
5. EPW. (2022, April 2). In Pursuit of Happiness. Economic & Political Weekly, 7-8.
6. Frontline. (2024). India's low rank in World Happiness Report puts reasons for dissatisfaction in focus. Frontline. Retrieved April 02 , 2024 , from https://frontline.thehindu.com/news/india-ranks-126th-out-of-143-nations-in-global-happiness-index/article67994475.ece#:~:text=India%20ranked%20126th%20out%20of,the%20world's%20most%20populous%20country.
7. Nandy, A. (2012, January 14). The Idea of Happiness. Economic & Political Weekly, XLVII(2), 45-48.
8. The Hindu, (2024), The Great Indian Unhappiness: What a new report says about India's young and old. Health. The Hindu. Retrieved March 29, 2024, from https://www.thehindu.com/sci-tech/health/the-great-indian-unhappiness-what-a-new-report-says-about-indias-young-and-old/article67971075.ece.
9. The Indian Express, (2024), In world happiness index of 2024, which country tops and where India stands. World News. The Indian Express. Retrieved March 30, 2024, from https://indianexpress.com/article/world/world-happiest-country-2024-list-9223848.
10. Wire, T., (2024), World Happiness Report 2024: India Ranks 126th Out of 143 Nations; Behind Pakistan, Iraq, Palestine. The Wire. Retrieved April 02, 2024, from https://thewire.in/society/world-happiness-report-2024-india-ranks-126th-out-of-143-nations-behind-pakistan-iraq-palestine.
11. World Population Review, (2024), Happiest Countries in the World 2024. World Population Review. Retrieved April 01, 2024, from https://worldpopulationreview.com/country-rankings/happiest-countries-in-the-world.


◆

# मराठी अर्थशास्त्र परिषद
# ४५ वे वार्षिक अधिवेशन : २०२२-२३ कार्यवाहांचा अहवाल

**मारोती वि. तेगमपुरे**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४६ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन दि. २५ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०२३ या तीन दिवसांच्या कालावधीत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे येथे अतिशय आनंदमय वातावरणात यशस्वीररीत्या संपन्न झाले. प्रा.डॉ. दिलीप अर्जुने, जालना हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते.

**अधिवेशन उद्घाटन सोहळा :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४६ व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटन शनिवार, दिनांक २५ नोव्हेंबर २०२३ रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे येथे महामानवांच्या प्रतिमेला वंदन करून व दीपप्रज्वलनाने झाले. उद्घाटक म्हणून मा.डॉ.पराग काळकर (प्र.कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे हे होते. मा.सी.ए. डॉ. दिलीप सातभाई (अध्यक्ष- पुणे ब्रांच ऑफ डब्ल्यू. आय. आर. सी. ऑफ आय.सी.ए.आय.), विशेष निमंत्रितांमध्ये मा. सी.ए. डॉ. एम.एस. जाधव (खजिनदार, वाघिरे महाविद्यालय, सासवड), मा. ए.एम. जाधव (सहसचिव प्रशासन, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ.) यांची यावेळी विशेष उपस्थिती होती. ४६ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा.डॉ. दिलीप अर्जुने, कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम, कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे, अर्थसंवादचे संपादक डॉ. राहुल म्होपरे, स्थानिक कार्याध्यक्ष डॉ. पंडित शेळके (प्राचार्य- पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे), स्थानिक कार्यवाह डॉ. विशाल पावसे, प्रा.डॉ.आर.बी.भांडवलकर यांची यावेळी मंचावर उपस्थित होती. उद्घाटनप्रसंगी स्वागतपर मनोगत प्राचार्य डॉ. पंडित शेळके यांनी व्यक्त केले. स्थानिक कार्यवाह डॉ. विशाल पावसे यांनी अधिवेशन आयोजनामागील भूमिका व महाविद्यालय तथा अर्थशास्त्र विभागासंदर्भातील माहिती आपल्या प्रास्ताविकातून दिली. उपस्थित मान्यवरांचे स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी शोधनिबंधाच्या स्मरणिकेचे विमोचन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी परिषदेचा गौरवशाली इतिहास, परिषदेची उद्दिष्ट्ये, विस्तार आणि ध्येय याविषयी संक्षिप्तपणे आढावा घेत असताना परिषदेच्या विविध उपक्रमांची आणि कार्याची माहिती दिली. यावेळी परिषदेच्या वतीने कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम यांनी मनोगत व्यक्त केले. परिषदेच्या ४६व्या अधिवेशनाचे उद्घाटक मा.डॉ.पराग काळकर यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात म्हणाले की, ''भारतीय अर्थव्यवस्था आज एका महत्त्वाच्या

वळणावर येवून पोहचली आहे. आता भारतीय अर्थव्यवस्थेचे सक्षमीकरण करणे आवश्यक असून त्यासाठी मराठी अर्थशास्त्र परिषदेने अभ्यासपूर्ण सहकार्य करावे व अर्थशास्त्रीय ज्ञान जनमानसापर्यंत घेऊन जाण्याचे काम केले पाहिजे'', असे ते म्हणाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मा. सी.ए. डॉ. एम.एस. जाधव (खजिनदार, वाघिरे महाविद्यालय, सासवड ) म्हणाले की, ''अर्थशास्त्र फक्त कळून उपयोगाचे नाही तर त्याची प्रत्यक्ष व्यवहारात उपयोगिताही वाढली पाहिजे. कारण अर्थकारणावर देशाचा विकास अवलंबून असून अर्थ साक्षरता हा खऱ्या अर्थाने आज आवश्यक बाब झाली असून, मराठी अर्थशास्त्र परिषदेने यामध्ये निर्णायक भूमिका बजावली पाहिजे'', असा आशावादही त्यांनी यावेळी प्रकट केला. यावेळी बोलताना मा.ए.एम. जाधव (सहसचिव प्रशासन, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ.) यांनी या अधिवेशन काळात होणाऱ्या चर्चा सरकारकडे पाठवल्यास धोरणनिश्चिती करताना या बाबींचा नक्कीच फायदा होतो असे उद्गार त्यांनी यावेळी काढले. परिषदेच्या ४६ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. दिलीप अर्जुने यांनी आपले अध्यक्षीय भाषण 'भारतातील दारिद्र्यनिर्मूलनासाठी शेतीउत्पन्न वाढीची आवश्यकता.' या विषयावर दिले. आपल्या भाषणात देशातील दारिद्र्याच्या प्रश्नावर आपल्या ओघवत्या शैलीत विविध समित्यांचे दाखले देत अभ्यासपूर्ण मांडणी केली. यावेळी परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. दि.व्यं. जहागीरदार, डॉ. संतोष दास्ताने, डॉ. सुर्यकांत जगदाळे, डॉ. शिवाजी भोसले, डॉ. जे.एस. पाटील, डॉ. मुक्ता जहागीरदार, डॉ. सुहास आव्हाड, यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. समीर कुंभारकर यांनी केले.

**चर्चासत्रे :**

सदर अधिवेशन कालावधीत दरवर्षीप्रमाणे एकूण चार चर्चासत्र संपन्न झाली. शनिवार, दिनांक २५ नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारी 'मानवी भांडवलाचे सैद्धांतिक विश्लेषण' या विषयावरील पहिल्या चर्चासत्राचे सत्राध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम देशमुख यांनी या सत्राचे कामकाज पार पाडले. या सत्रात सूत्रसंचालक डॉ. सुर्यकांत गायकवाड तर वृत्तसंकलक म्हणून डॉ. जयवंत इंगळे यांनी काम केले. रविवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२३ रोजी दुसरे चर्चासत्र 'केंद्र पुरस्कृत विकास योजना आणि भारतीय शेती' या विषयावरील सत्राचे सूत्रसंचालक डॉ. राजाराम पाटील, वृत्तसंकलक डॉ. लक्ष्मण सिताफुले आणि सत्राध्यक्ष म्हणून डॉ. मोहन सदामते यांनी जबाबदारी पार पाडली. त्याच दिवशी तिसरे सत्र 'महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र.' या विषयावरील सत्राचे सूत्रसंचालक डॉ. राजाराम पाटील, वृत्तसंकलक डॉ. ज्ञानेश्वर जिगे आणि सत्राध्यक्ष डॉ. मोहन सदामते यांनी कामकाज यशस्वीपणे पार पाडले. अधिवेशन काळात संपन्न झालेल्या तिन्ही चर्चासत्रात परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ. दिलीप अर्जुने, कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम व कार्यवाह - खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी हे सर्व सत्र व्यवस्थित पार पाडण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी दुपारी ४.३० वाजता आयत्या वेळच्या विषयावरील चौथे सत्र संपन्न झाले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून ४६ व्या वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिलीप अर्जुने यांनी जबाबदारी पार पाडली. या सत्रात मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. संतोष दास्ताने यांनी 'भारतातील आधारभूत संरचनेचे मूल्यमापन' या विषयावर अनेक दाखले देत अतिशय अभ्यासपूर्ण मांडणी केली. अध्यक्षीय भाषणाने या सत्राचा समारोप झाला. या चारही सत्रामध्ये परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिलीप अर्जुने, कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम, कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे उपस्थित होते.

**प्रा. नी. वि.सोवनी स्मृती व्याख्यान :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नी.वि.सोवनी स्मृती व्याख्यान या नावीन्यपूर्ण उपक्रमामध्ये तेरावे पुष्प अर्थविषयक अभ्यासक तथा कुलगुरू प्रा.डॉ. अजित रानडे (कुलगुरू - राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे) यांनी गुंफले. 'आर्थिक वृद्धी

व विषमता' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. या विषयावर मांडणी करताना ते म्हणाले की, आज रोजी भारतातील आर्थिक वृद्धीबरोबरच देशातील आर्थिक विषमताही वाढत असून, यावर उपाययोजना करूनच भविष्यातील दिशा निश्चित करावी लागेल, अशी भूमिका स्पष्ट केली. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४६व्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. दिलीप अर्जुने यांनी अध्यक्षीय समारोप करताना भारतासारख्या देशात आर्थिक विषमतेचा प्रश्न दीर्घकालीन आणि तीव्र स्वरूपाचा असून, त्याचे निर्मूलन होणे अत्यंत आवश्यक आहे. तरच वाढत्या आर्थिक वृद्धीला अर्थ असल्याचे यावेळी सांगितले. यावेळी कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी प्रा. नी. वि. सोवनी स्मृती व्याख्यानाचा उद्देश आणि त्यांचे परिषदेच्या उभारणीतील योगदान याविषयीची माहिती आपल्या प्रास्ताविकात दिली. डॉ. अविनाश निकम यांनी प्रमुख अतिथी डॉ. अजित रानडे यांचा परिचय करून दिला

**डॉ. ह.कृ. परांजपे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ विशेष व्याख्यान :**

दरवर्षी मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या एका माजी अध्यक्षांचा स्मृतिप्रित्यर्थ अधिवेशन काळात विशेष व्याख्यानाचे आयोजन आपण करीत असतो. यावेळी मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या नवव्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. ह.कृ. परांजपे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २७ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ९.३० वाजता हे विशेष व्याख्यान संपन्न झाले. यावेळी या स्मृतिप्रित्यर्थ व्याख्यानासाठी मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ.दि.व्यं.जहागीरदार यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. जहागीरदार यांनी 'भारताच्या विकासात्मक वाटचालीत रोजगाराचे वास्तव' या विषयावरील आपली विस्तारित मांडणी केली. यावेळी आपल्या मांडणीत सध्यस्थितीच्या अनुषंगाने बेरोजगारीच्या वास्तव आकडेवारीच्या साहाय्याने सभागृहासमोर ठेवले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप डॉ. दिलीप अर्जुने (४६ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष) यांनी केला. प्रास्ताविक कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी केले. यावेळी त्यांनी डॉ. ह.कृ. परांजपे यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला. कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम यांनी सर्वांचे आभार मानले.

**समारोप सोहळा :**

दिनांक २७ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता समारोप सोहळ्यास सुरुवात झाली. समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष परिषदेच्या ४६ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिलीप अर्जुने हे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ.एन.जे.पवार (कुलगुरू, डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठ, पुणे), मा.डॉ. दिगंबर दुर्गाडे (अध्यक्ष-पुणे जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँक मर्या.पुणे), मा. कल्याण जाधव यांची यावेळी विशेष उपस्थिती होती. कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम, कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे, अर्थसंवादचे संपादक डॉ. राहुल म्होपरे, स्थानिक कार्याध्यक्ष डॉ. पंडित शेळके (प्राचार्य-पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे), स्थानिक कार्यवाह डॉ. विशाल पावसे, विश्वस्त डॉ. अजय दरेकर, डॉ. विकास सुकाळे, डॉ. विठ्ठल घीनमीने, प्राचार्य डॉ. संजय धनवटे, डॉ. विजय भोपाळे, डॉ.जयवंत इंगळे, डॉ. बाळासाहेब पाटील, डॉ. सुभाष सावंत, डॉ. राजाराम पाटील, डॉ. सुरेश ढाके, डॉ. दयालु राठोड, डॉ. मनीषकुमार कायरकर, डॉ.अनिलकुमार वावरे, डॉ. जनार्दन काकडे यांची मंचावर विशेष उपस्थित होती. अधिवेशनाच्या उत्तम आयोजनाबाबत सर्वांनीच यावेळी समाधान व्यक्त केले.

**परिषदेच्यावतीने विविध पारितोषिकांचे वितरण :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्यावतीने दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांचे वितरण समारोपाच्या सोहळ्यातील प्रमुख पाहुणे व मान्यवर पदाधिकाऱ्यांचे हस्ते करण्यात आले.

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक (रु.१०००/- व सन्मानपत्र)

डॉ. आनंद शेवाळे/डॉ. विशाल बेलुरे यांच्या गणितीय अर्थशास्त्र व अर्थमिती' या ग्रंथास देण्यात आला.

२. प्रा. मो. स. भावे पारितोषिक (रु.५००/- व सन्मानपत्र) अर्थसंवादमधील सर्वोत्कृष्ट लेखाबद्दल डॉ. समित माहोरे/रामदास माहोरे यांच्या 'आरोग्यावरील खर्च आणि आरोग्याची स्थिती : भारत आणि महाराष्ट्राच्या विशेष संदर्भात' (ऑक्टो.- डिसें. २०२२, खंड ४६, अंक ३) आणि डॉ. राजकुमार वाईंगडे यांच्या 'बहुआयामी दारिद्र्य : दारिद्र्य मापनाचा नवा दृष्टिकोन' (जुलै - सप्टेंबर २०२२, खंड ४६, अंक २) या लेखकांना विभागून देण्यात आला.

३. मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक (रु.११,०००/- व सन्मानपत्र) डॉ. प्रा.डॉ. मुक्ता जहागीरदार यांच्या 'परामर्श विकासाचा' या ग्रंथास देण्यात आला.

४. प्रा. सौ. अरूणा रारावीकर, वृत्तपत्रातील आर्थिक विषयक लेखाला प्रथम पारितोषिक (रु.१०००/ -व सन्मानपत्र) डॉ. माधव शिंदे यांच्या 'शोकांतिका भारताच्या उपासमारीची' तर द्वितीय पारितोषिक (रु.५००/- व सन्मानपत्र) डॉ. अविनाश कुलकर्णी, यांच्या 'पेण मूर्ती कलेचा सांस्कृतिक वारसा' या लेखाला देण्यात आला.

**अधिवेशन काळात सादरीकरण झालेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास पारितोषके :**

१. कै. ग.प्र. पिंपरकर पारितोषिक (रु.१०००/- व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास दिले जाते. कारभारी भालचंद्र काशिनाथ यांच्या 'भारत सरकारच्या कृषिविकासासाठी अंमलात आणलेल्या शीतगृह साखळी विकास धोरणाची चिकित्सा' या विषयावरील शोधनिबंधास देण्यात आले.

२. प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक (रु.५००/- व सन्मानपत्र) सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास दिले जाणारे पारितोषिक डॉ. गणेश बापूराव गावंडे यांच्या 'महाराष्ट्रातील रस्ते वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र आणि वास्तविकता' या विषयावरील शोधनिबंधास देण्यात आले.

३. डॉ. ज.फा. पाटील पारितोषिक (रु.२०००/- व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (विद्यार्थ्यांकरिता) गणेश आदिनाथ टेकळे यांच्या शोधनिबंधास देण्यात आला.

४. पद्मजा गंधे पारितोषिक (रु. १०००/- व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (महिलांकरिता) डॉ. तृप्ती कवळे यांच्या 'आरोग्य आणि मानवी भांडवल : सैद्धांतिक अवलोकन' या शोधनिबंधास देण्यात आला.

**ऋणनिर्देश :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४६ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन यशस्वी करण्यात अनेक दृश्य आणि अदृश्य हातांचे सहकार्य लाभले असून, यामध्ये मा. अजित पवार (अध्यक्ष-पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे), मा. राजेंद्र घाडगे उपाध्यक्ष-पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे), मा.संदीप कदम (मंड सचिव, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे), मा. मोहनराव देशमुख (खजिनदार-पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे), मा. एल. एम. पवार (उपसचिव - पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे), मा. ए. एम. जाधव (सहसचिव-प्रशासन पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे)

डॉ. पंडित शेळके (प्राचार्य-पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे), स्थानिक कार्यवाह डॉ. विशाल पावसे यांच्या प्रत्यक्ष सहकार्याशिवाय हे अधिवेशन यशस्वी होऊ शकले नसते. याप्रसंगी मी त्यांचे आभार प्रकट करतो. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघिरे कला, वाणिज्य व

विज्ञान महाविद्यालय, सासवड येथील शिक्षक व शिक्षकेतर बांधवांचे आभार व्यक्त करणे कार्यवाह-खजिनदार म्हणून माझे कर्तव्य आहे.

**वार्षिक सर्वसाधारण सभा :**

४६ व्या वार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने सोमवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०२३ रोजी .....वाजता परिषदेचे अध्यक्ष डॉ. दिलीप अर्जुने यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा (आमसभा) अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सभेच्या सुरुवातीलाच परिषदेच्या दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सर्वसाधारण सभेतील काही महत्त्वाचे निर्णय पुढीलप्रमाणे आहेत.

ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ मध्ये होणाऱ्या परिषदेच्या ४७ व्या वार्षिक अधिवेशनाचे यजमानपद दयानंद महाविद्यालय, लातूर यांना देण्यात आले. ४७ व्या वार्षिक अधिवेशनासाठी चर्चेकरिता पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले.

१. २०१५ पासूनच्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त अर्थतज्ज्ञाचे आर्थिक विचार.
२. भारताच्या वित्तीय क्षेत्राच्या बदलत्या आकृतीबंधाचा अभ्यास.
३. महाराष्ट्रातील शैक्षणिक व आरोग्यविषयक धोरणांचा आर्थिक अभ्यास.

**निवडणूक :**

४७ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे, सातारा यांची बहुमताने निवड झाली. कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांची मुदत दि. ३१ मार्च २०२४ रोजी पूर्ण होत असल्यामुळे दि. ०१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२७ या तीन वर्षासाठी पुन्हा एकदा कार्यवाह-खजिनदार म्हणून अविरोध डॉ. मारोती तेगमपुरे यांची निवड करण्यात आली. विश्वस्त डॉ. अजय दरेकर यांची मुदत दि. ३१ मार्च २०२४ रोजी पूर्ण होत असल्यामुळे दि. ०१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२७ या तीन वर्षांसाठी विश्वस्त म्हणून प्रा. पवार धोंडीराम भोजू यांची अविरोध निवड करण्यात आली. दि. ०१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२७ या तीन वर्षांसाठी कार्यकारी मंडळावर डॉ. तलवारे जितेंद्र दगडू - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, डॉ. राजाराम केरबा पाटील- पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, डॉ. भोसले हनुमंत अंकुशराव - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ. शिंदे राजू कथ्थू - एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई, डॉ. ठावरे विठ्ठल निळकंठराव - गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली (०१ ते १० विद्यापीठ वगळता इतर विद्यापीठ) यांची अविरोध निवड झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील, प्राचार्य डॉ. संजीव लाटे व डॉ. एल.एस घाटगे यांनी काम पाहिले. सर्वांचे मनःपूर्वक आभार.

धन्यवाद!

डॉ. मारोती वि. तेगमपुरे
कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद.

जो देश औद्योगिकरित्या अधिक विकसित आहे, तो केवळ विकसित झालेल्या, त्याच्या स्वत:च्या भविष्याची प्रतिमा आहे.

**- कार्ल मार्क्स**

# अर्थसंवाद

## (खंड ४७, २०२३-२४)

### अ) लेख सूची


| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | W20 आणि भारतीय महिलांची स्थिती | ३ |
| २. | चिमण्यांची घरं | १४ |
| ३. | कृषिक्षेत्र : रोजगार आणि उद्योजकता | २१ |
| ४. | २००० रुपयाच्या नोटवापसीमुळे होणारे अर्थव्यवस्थेवरील परिणाम | २८ |
| ५. | श्री वारणा सहकारी बँक मर्यादित, वारणानगर :<br>एक व्यष्टी अध्ययन | ३५ |
| ६. | प्रधानमंत्री मुद्रा योजना : टीकात्मक परीक्षण | ४३ |
| ७. | पेणच्या आर्थिक विकासातील गणपती कारखान्यांचे<br>योगदान आणि रोजगारसंधींचा चिकित्सक अभ्यास | ५० |
| ८. | भारतातील सहकारी कृषी पतसंस्था | ५६ |
| ९. | शोधनिबंध विषयक रूपरेषा :<br>मानवी भांडवलाचे सैद्धांतिक विश्लेषण | ५८ |
| १०. | शोधनिबंध विषयक रूपरेषा :<br>केंद्र पुरस्कृत विकास योजना आणि भारतीय शेती | ६५ |
| ११. | शोधनिबंध विषयक रूपरेषा :<br>महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र | ६७ |
| १२. | नवीन आजीव सभासदांची यादी | ७२ |
| १३. | इमारत निधी | ७३ |
| १४. | निवृत्तीवेतन योजनेचे विविध आयाम | ७७ |
| १५. | परिकल्पना परीक्षणाची संशोधनातील भूमिका | ८४ |
| १६. | अर्थशास्त्र पोरके झाले... | ९६ |
| १७. | G-20 आणि भारत : लक्ष्यभेदी व्यूहनिती | १०१ |
| १८. | चॅटजीपीटी नॉलेज इकॉनोमी समोरील तगडे आव्हान | ११६ |
| १९. | भारतातील पर्यटन उद्योग | १२३ |
| २०. | केंद्र पुरस्कृत विकास योजना आणि भारतीय शेती | १२९ |
| २१. | राष्ट्रीय सार्वजनिक वित्त आणि धोरण संस्था, दिल्ली : टिपण | १३५ |

| | | |
|---|---|---|
| २२. | आर्थिक सुधारणा काळातील भारतातील विदेशी थेट गुंतवणुकीचा चिकित्सक अभ्यास | १३९ |
| २३. | पुस्तक परिचय : भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्षे: सिंहलोकन आर्थिक बदलांचे | १४८ |
| २४. | अर्थशास्त्राचे २०२३ चे नोबेल पारितोषिक : स्त्री श्रमबाजाराच्या संशोधनाला | १५३ |
| २५. | सांगली जिल्ह्यातील कृषी शाश्वततेचे विश्लेषण: शाश्वत कृषी निर्देशांक दृष्टिकोन | १६२ |
| २६. | मराठवाड्याच्या औद्योगिक विकासात एमआयडीसीची भूमिका | १७४ |
| २७. | लाभांशाच्या चक्रव्युहात सहकारी बँकांचे भागधारक | १९० |
| २८. | शेतीपूरक व्यवसाय आणि ग्रामीण अर्थव्यवस्था | २०१ |
| २९. | गिग इकॉनॉमी: सेवाक्षेत्रातील स्थित्यंतराचे नवे पर्व | २०८ |
| ३०. | एस. वेंकिटरमणन (१९३१-२०२३) | २१६ |
| ३१. | पुस्तक परिचय : इकॉनॉमिक्स ऑफ सर्व्हायव्हल सस्टेनेबल, इन्क्ल्युझिव अँड इक्विटेबल प्रोस्पेरिटी | २२० |
| ३२. | पुस्तक परिचय : ट्रायल्स, ट्रिब्युलेशन्स अँड अहा! मॉमेंटस् ऑफ अ टॅक्समॅन | २२५ |
| ३३. | संपादकीय | २२९ |
| ३४. | भारतातील दारिद्र्यनिर्मूलनासाठी शेतीउत्पन्न वाढीची आवश्यकता | २३१ |
| ३५. | महाराष्ट्रातील प्रादेशिक विकासाचा असमतोल आणि वैधानिक विकास मंडळाची प्रासंगिकता | २४५ |
| ३६. | सूक्ष्मवित्त - शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये गाठण्याचा मार्ग | २६४ |
| ३७. | भारतातील उच्च शिक्षणाची वाढ आणि लैंगिक असमानता प्रत्यावर्तनाचा विश्लेषणात्मक अभ्यास | २७२ |
| ३८. | कोल्हापूर जिल्ह्यातील भातप्रक्रिया व्यवसायाचा आर्थिक अभ्यास | २८२ |
| ३९. | शाश्वत आणि समावेशक विकास अनुकूल महाराष्ट्र अंदाजपत्रक २०२४-२५ | २९३ |
| ४०. | कळसुबाई हरिश्चंद्रगड वन्यजीव विभागात येणाऱ्या अतिदुर्गम भागातील आदिवासी महिला बचतगटांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा अभ्यास | ३०० |
| ४१. | जागतिक आनंद निर्देशांकाचा सैद्धांतिक अभ्यास आणि भारताची दशा व दिशा | ३०९ |
| ४२. | मराठी अर्थशास्त्र परिषद ४५ वे वार्षिक अधिवेशन : २०२२-२३ कार्यवाहांचा अहवाल | ३१७ |
| • | संदर्भ सूची | |
| | अ) लेख सूची | ३२२ |
| | ब) लेखक सूची | ३२४ |
| | क) नवीन आजीव सभासदांची यादी | ३२६ |
| | ड) तज्ज्ञ परिक्षक सूची | ३३० |

# अर्थसंवाद
# (खंड ४६, २०२२-२०२३)

**ब) लेखक सूची**


| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | सुभाष पाटील | ३ |
| २. | अविनाश कुलकर्णी | १४ |
| ३. | सूर्यकांत पांडुरंग गायकवाड, अजय दरेकर | २१ |
| ४. | मृणालिनी तापस | २८ |
| ५. | चंद्रकांत रा. जाधव | ३५ |
| ६. | हरी पंढरी वंगरवार | ४३ |
| ७. | बी.एस.पाटील | ५० |
| ८. | आण्णा काका पाटील : पुस्तक परिचय | ५६ |
| ९. | पुरुषोत्तम विष्णुपंत देशमुख : शोधनिबंध विषयक रूपरेषा | ५८ |
| १०. | श्रीनिवास खांदेवाले : शोधनिबंध विषयक रूपरेषा | ६५ |
| ११. | संतोष दास्ताने : शोधनिबंध विषयक रूपरेषा | **६७** |
| १२. | नवीन आजीव सभासदांची यादी | ७२ |
| १३. | इमारत निधी | ७३ |
| १४. | श्रीनिवास खांदेवाले | ७७ |
| १५. | पुरुषोत्तम विष्णुपंत देशमुख | ८४ |
| १६. | संतोष दास्ताने | ९६ |
| १७. | प्रशांत हरमकर | १०१ |
| १८. | संजय विठ्ठल धोंडे | ११६ |
| १९. | दीपक विठ्ठल भुसारे | १२३ |
| २०. | वनिता केरूजी बनकर | १२९ |
| २१. | वनिता चोरे | १३५ |
| २२. | हरी पंढरी वंगरवार | १३९ |
| २३. | धनश्री महाजन : पुस्तक परिचय | १४८ |
| २४. | प्रशांत हरमकर | ५३ |
| २५. | दिग्विजय र. पाटील, एम . एस . देशमुख, अमृत म. चव्हाण | १६२ |
| २६. | अप्पासाहेब विठ्ठल गायके, प्रशांत एन. देशमुख | १७४ |
| २७. | विजय मारुती कुंभार | १९० |
| २८. | प्रशांत यशवंत फडणीस | २०१ |

| | | |
|---|---|---|
| २९. | किशोर गजाजन सुतार | २०८ |
| ३०. | संतोष दास्ताने | २१६ |
| ३१. | बद्रीनाथ हिरालाल दामजी : पुस्तक परिचय | २२० |
| ३२. | अविनाश कुलकर्णी : पुस्तक परिचय | २२५ |
| ३३. | राहुल शंकरराव म्होपरे | २२९ |
| ३४. | दिलीप अर्जुने | २३१ |
| ३५. | नरेश बोडखे, योगेश पायलीमोडे | २४५ |
| ३६. | सोनवणे (बच्छाव) आशालता देवराम | २६४ |
| ३७. | हरी पंढरी वंगरवार | २७२ |
| ३८. | मारोती विरभद्र तेगमपुरे, संभाजी शिवाजी सावंत | २८२ |
| ३९. | प्रकाश कांबळे | २९३ |
| ४०. | मानसी कृतकोटी मिनल भोसले | ३०० |
| ४१. | गणेश आदिनाथ टेकळे | ३०९ |
| ४२. | मारोती वि. तेगमपुरे : मराठी अर्थशास्त्र परिषद<br>४५ वे वार्षिक अधिवेशन : २०२२-२३ कार्यवाहांचा अहवाल | ३१७ |
| ● | संदर्भ सूची | |
| | अ) लेख सूची | ३२२ |
| | ब) लेखक सूची | ३२४ |
| | क) नवीन आजीव सभासदांची यादी | ३२६ |
| | ड) तज्ञ परिक्षक सूची | ३३० |


# अर्थसंवाद


| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **पुस्तक परिचय** | |
| २३. | पुस्तक परिचय : भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्षे: सिंहलोकन आर्थिक बदलांचे | १४८ |
| ३१. | पुस्तक परिचय : इकॉनॉमिक्स ऑफ सर्व्हायव्हल सस्टेनेबल,<br>इन्क्ल्युझिव अँड इक्विटेबल प्रोस्पेरिटी | २२० |
| ३२. | पुस्तक परिचय : ट्रायल्स, ट्रिब्युलेशन्स अँड अहा! मॉमेंटस् ऑफ अ टॅक्समॅन | २२५ |
| | **पुस्तक परिचय** | |
| २३. | धनश्री महाजन | १४८ |
| ३१. | बद्रीनाथ हिरालाल दामजी | २२० |
| ३२. | अविनाश कुलकर्णी | २२५ |

# नवीन आजीव सभासदांची यादी

## (१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४)

| अ.क्र. | आजीव सभासद क्र. | आजीव सभासदांचे नाव | पावती क्र. | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | १९१३ | श्रीमती नंदिनी कट्टी | ४९० | ५१००/- |
| २. | १९१४ | डॉ. ब्लेझी एसो. | ४९१ | ५१००/- |
| ३. | १९१५ | डॉ. करुणा विठ्ठल शिंदे | ४९२ | ५१००/- |
| ४. | १९१६ | दाभाडे पांडुरंग सुदामराव | १०४ | ३१००/- |
| ५. | १९१७ | उज्ज्वला रामचंद्र महाजन | ९७ | ३१००/- |
| ६. | १९१८ | बावनगडे हरीश मुरारी | ९८ | ३१००/- |
| ७. | १९१९ | गिरी रागिणी महारुद्र | ९९ | ३१००/- |
| ८. | १९२० | तोडकर सतीश दिलीपराव | १०० | ३१००/- |
| ९. | १९२१ | घाडगे अतुल कृष्णा | १०५ | ३१००/- |
| १०. | १९२२ | डॉ. ढोरे काळूराम बबुशा | १०६ | ३१००/- |
| ११. | १९२३ | हरिभाऊ सामा खरात | १०७ | ३१००/- |
| १२. | १९२४ | भुसारे विशाल अशोक | १०८ | ३१००/- |
| १३. | १९२५ | डॉ. भोईटे राजेश हरिचंद्र | १०९ | ५१००/- |
| १४. | १९२६ | बोरवणकर हर्षवर्धिनी अरविंद | ११० | ३१००/- |
| १५. | १९२७ | सौ. पाटील रुपाली प्रशिल | १११ | ३१००/- |
| १६. | १९२८ | गवांड मानसी महेंद्र | ११२ | ३१००/- |
| १७. | १९२९ | सौ. नाईक पल्लवी गंगाधर | ११३ | ३१००/- |
| १८. | १९३० | पाटील चंद्रकांत तुकाराम | ११४ | ५१००/- |
| १९. | १९३१ | बारला वेरोनिका बेनेदिक | ११५ | ३१००/- |
| २०. | १९३२ | डॉ. भागवत निलिमा चिंतामणी | ११६ | ३१००/- |
| २१. | १९३३ | डॉ. जगताप हनुमंतराव कृष्णा | ११७ | ५१००/- |
| २२. | १९३४ | डॉ. वाडकर अनिल दिगंबर | ११८ | ५१००/- |
| २३. | १९३५ | सौ. तेगमपुरे महादेवी मारोती | ११९ | ३१००/- |
| २४. | १९३६ | कु.पावडे राणी नवनाथराव | १२० | ३१००/- |
| २५. | १९३७ | गिरी कांचन माधव | १२१ | ३१००/- |
| २६. | १९३८ | डॉ. चिखलोंडे गुलाबचंद रामसिंह | १२२ | ३१००/- |
| २७. | १९३९ | डॉ. श्रीरामे राजू घनश्याम | १२३ | ५१००/- |
| २८. | १९४० | डॉ. सुनील शेषराव नरवडे | १२४ | ५१००/- |
| २९. | १९४१ | डॉ. सरतापे रामा अच्युत | १२५ | ५१००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३०. | १९४२ | उगले गीता दिलीप | १२६ | ३१००/- |
| ३१. | १९४३ | डॉ. काकडे अशोक भिकू | १२७ | ५१००/- |
| ३२. | १९४४ | प्रा. दळवे राम गोविंद | १२८ | ५१००/- |
| ३३. | १९४५ | मेंढे किशोर भाऊराव | १२९ | ३१००/- |
| ३४. | १९४६ | प्रा.डॉ. साळवे संगीता | १३० | ५१००/- |
| ३५. | १९४७ | डॉ. पवार सुनील दादाराम | १३१ | ३१००/- |
| ३६. | १९४८ | डॉ. महाजन ज्योती पुंजाराम | १३२ | ५१००/- |
| ३७. | १९४९ | प्रा. आचार्य बालाजी वैजनाथ | १३३ | ५१००/- |
| ३८. | १९५० | डॉ. कुर्तकोटी मानसी सुनील | १३४ | ५१००/- |
| ३९. | १९५१ | जाधव रोहिदास शेकू | १३५ | ३१००/- |
| ४०. | १९५२ | प्रा. भोई ज्योती प्र. | १३६ | ३१००/- |
| ४१. | १९५३ | डॉ. पवार सुदाम वसंतराव | १३७ | ५१००/- |
| ४२. | १९५४ | डॉ. पवार अविनाश विलासराव | १३८ | ५१००/- |
| ४३. | १९५५ | इघे संदीप हिरामण | १३९ | ३१००/- |
| ४४. | १९५६ | डॉ. वाकोडे ज्योती सहदेव | १४० | ५१००/- |
| ४५. | १९५७ | डॉ. कांबळे दशरथ पंढरी | १४१ | ५१००/- |
| ४६. | १९५८ | पवार गौरव गौतम | १४२ | ३१००/- |
| ४७. | १९५९ | जोगदंड बाळासाहेब सखाराम | १४३ | ५१००/- |
| ४८. | १९६० | गरुड काकासाहेब लक्ष्मण | १४४ | ३१००/- |
| ४९. | १९६१ | कुंभार श्रुती सुधाकर | १४५ | ५१००/- |
| ५०. | १९६२ | पवार प्रियंका जयराम | १४६ | ३१००/- |
| ५१. | १९६३ | डॉ. खोकले रामदास कोंडबाराव | १४७ | ५१००/- |
| ५२. | १९६४ | डॉ. राजश्री आप्पाराव जाधव | १४८ | ५१००/- |
| ५३. | १९६५ | डॉ. सोमवंशी मनोजकुमार यादवराव | १४९ | ५१००/- |
| ५४. | १९६६ | डॉ. जाधव अर्चना सतीश | १५० | ३१००/- |
| ५५. | १९६७ | पाटील स्वाती विजय | १५१ | ३१००/- |
| ५६. | १९६८ | पाटील नीता अरुण | १५२ | ३१००/- |
| ५७. | १९६९ | चौधरी मयूर राजू | १५३ | ३१००/- |
| ५८. | १९७० | तांबोळी रेश्मा जहिरोद्दिन | १५४ | ३१००/- |
| ५९. | १९७१ | पाटील ज्योती प्रविणचंद्र | १५५ | ३१००/- |
| ६०. | १९७२ | डॉ. सुचेता जोशी | १५६ | ५१००/- |
| ६१. | १९७३ | डॉ. बंडे मोहन व्यंकटराव | १५७ | ५१००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६२. | १९७४ | डॉ. गाडेकर बुद्धाजी पांडुरंग | १५८ | ५१००/- |
| ६३. | १९७५ | कोहक निलेश विष्णू | १५९ | ३१००/- |
| ६४. | १९७६ | बांगर उज्ज्वला कचरू | १६० | ३१००/- |
| ६५. | १९७७ | मदन बाबासाहेब वैजनाथ | १६१ | ३१००/- |
| ६६. | १९७८ | प्रा. सत्यापा शंकर कोळी | १६२ | ३१००/- |
| ६७. | १९७९ | प्रा. आगटे अरुंधती निखील | १६३ | ५१००/- |
| ६८. | १९८० | डॉ. पाठक प्रणिता | १६४ | ३१००/- |
| ६९. | १९८१ | डॉ. घुटे बालाजी तुळशीराम | १६५ | ५१००/- |
| ७०. | १९८२ | प्रा. रानवडे शुभांगी अशोक | १६६ | ३१००/- |
| ७१. | १९८३ | डॉ. वासुंडे सविता सागर | १६७ | ३१००/- |
| ७२. | १९८४ | डॉ. मोहोळ सारिका चंद्रकांत | १६८ | ३१००/- |
| ७३. | १९८५ | जगदाळे सरकार अमरसिंह शिवाजीराव | १६९ | ३१००/- |
| ७४. | १९८६ | गांजवे प्रशांत तुकाराम | १७० | ३१००/- |
| ७५. | १९८७ | डॉ. बाबर प्रवीण गुलाबराव | १७१ | ५१००/- |
| ७६. | १९८८ | डॉ. गडकर परमेश्वर संभाजी | १७२ | ३१००/- |
| ७७. | १९८९ | डॉ. गिरी संजय अरुण | १७३ | ३१००/- |
| ७८. | १९९० | डॉ. गाडेकर भागवत भाऊराव | १७४ | ३१००/- |
| ७९. | १९९१ | डॉ. मोरे आश्रू पांडुरंग | १७५ | ३१००/- |
| ८०. | १९९२ | खर्डे अरुण चांगदेव | १७६ | ५१००/- |
| ८१. | १९९३ | डॉ. गव्हाणे जयश्री रामदास | १७७ | ५१००/- |
| ८२. | १९९४ | डॉ. चव्हाण संजय काशिनाथ | १७८ | ५१००/- |
| ८३. | १९९५ | देशमुख केशव पंढरीनाथ | १७९ | ५१००/- |
| ८४. | १९९६ | बारवकर रोहित सोपान | १८० | ३१००/- |
| ८५. | १९९७ | कवितके रामचंद्र भारत | १८१ | ३१००/- |
| ८६. | १९९८ | निकम सचिन गोविंद | १८२ | ५१००/- |
| ८७. | १९९९ | डॉ. काळेल आप्पासो मच्छिंद्र | १८३ | ३१००/- |
| ८८. | २००० | टेकळे गणेश आदिनाथ | १८४ | ३१००/- |
| ८९. | २००१ | डॉ प्रसाद सुरजकुमार सुभाषचंद्र | १८५ | ५१००/- |
| ९०. | २००२ | थोरमोटे शत्रुघ्न विश्वनाथ | १८६ | ५१००/- |
| ९१. | २००३ | डॉ. पाटील दिग्विजय रमेश | १८७ | ३१००/- |
| ९२. | २००४ | चव्हाण अमृत मनोहर | १८८ | ३१००/- |
| ९३. | २००५ | गायके आप्पासाहेब विठ्ठल | १८९ | ३१००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९४. | २००६ | सपकाळे सुनील रमेश | १९० | ३१००/- |
| ९५. | २००७ | डॉ. सूर्यवंशी शिवानंद जानकीराम | १९१ | ३१००/- |
| ९६. | २००८ | डॉ. पाठक स्वप्नजा सुभाष | १९२ | ३१००/- |
| ९७. | २००९ | डॉ. बोडखे नरेश रामकृष्ण | १९३ | ५१००/- |
| ९८. | २०१० | डॉ. धनगर जगतराव उत्तम | १९४ | ५१००/- |
| ९९. | २०११ | प्राचार्या डॉ. घाटे संगीता पुष्कर | १९५ | ५१००/- |
| १००. | २०१२ | डॉ. ससाणे हेमचंद्र लक्ष्मणराव | १९६ | ५१००/- |
| १०१. | २०१३ | डॉ. भोसले मिनल दत्तात्रय | १९७ | ३१००/- |
| १०२. | २०१४ | शिर्के साधना उत्तम | १९९ | ३१००/- |
| १०३. | २०१५ | गोतपागर श्रीकांत तातोबा | २०० | ५१००/- |

**सूचना :** रुपये ३१००/- आजीव सभासद वर्गणी देणारे सभासद विद्यार्थी किंवा विना अनुदानित संस्थेमध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांचेकडून इमारत निधी घेण्यात आला नाही.

**- डॉ. मारोती वि.तेगमपुरे**

कार्यवाह - खजिनदार,

मराठी अर्थशास्त्र परिषद

व्यक्तीचे सक्षमीकरण म्हणजे देशाला सक्षम बनविणे. जलद सामाजिक बदल आणि जलद आर्थिक वाढ हा सबलीकरणाचा सर्वोत्तम मार्ग आहे.

**- अटल बिहारी वाजपेयी**

# अर्थसंवाद - तज्ञ परीक्षक सूची

अर्थसंवादच्या खंड ४६ मधील अंक १ ते अंक ४ मधील लेखांचे परीक्षण खालील तज्ञांनी केलेले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. श्रीनिवास खांदेवाले | - | नागपूर |
| २. | डॉ. दि. व्य. जहागीरदार | - | अमरावती |
| ३. | डॉ. सौ. मुक्ता जहागीरदार | - | अमरावती |
| ४. | डॉ. संतोष दास्ताने | - | पुणे |
| ५. | डॉ. विनायक देशपांडे | - | नागपूर |
| ६. | डॉ. अनिल सुर्यवंशी | - | बार्शी |
| ७. | डॉ. आर. वाय. माहोरे | - | नागपूर |
| ८. | डॉ. सुरेश ढाके | - | भुसावळ |
| ९. | डॉ. विकास सुकाळे | - | नांदेड |
| १०. | डॉ. एस. एम. भोसले | - | आटपाडी |
| ११. | डॉ. सुभाष पाटील | - | पुणे |
| १२. | डॉ. संतोष कदम | - | मंद्रुप |
| १३. | डॉ. मारोती तेगमपुरे | - | अंबड |
| १४. | डॉ. के. के. पाटील | - | अर्धापूर |
| १५. | डॉ. तेजस्विनी मुडेकर | - | कोल्हापूर |
| १६. | डॉ. आर. जी. रसाळ | - | लोणी |
| १७. | डॉ. राहुल शं. म्होपरे | - | अर्जूननगर |
| १८. | डॉ. दिलीप अर्जुने | - | जालना |
| १९. | डॉ. अनिल वावरे | - | सातारा |
| २०. | डॉ. अजय दरेकर | - | बारामती |
| २१. | डॉ. राजकुमार वाईंगडे | - | अर्जुननगर |
| २२. | डॉ. जयवंत इंगळे | - | मलकापूर |

# महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२–२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२–२४३२ ५९३१ ई–मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in

**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना–विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित–संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व – डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास–रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश – संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला–के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज – श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई–बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोदिंया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी अॅन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३९१०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452


## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

(यु.जी.सी. केअर लिस्ट (ग्रुप १) समावेशीत तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

**ISSN 0973-8452**

## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल (B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु. ५,०००/- | रु. ११,०००/- |
| २) मागील (आतील) पृष्ठ | रु. ५,०००/- | रु. ११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु. ६,०००/- | रु. १५,०००/- |

आपला मजकूर - डिझाईन (1/5 = 150 x 210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिद्ध होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !



**दिलीप अर्जुने**
अध्यक्ष
भ्रमणध्वनी : ९४२२२ १९७२३

**अविनाश रा. निकम**
कार्याध्यक्ष
भ्रमणध्वनी :९८२२६ ६५१४१

**मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार
भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७

**राहुल शं. म्होपरे**
प्रमुख संपादक
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०


मूल्य : रु. १०/- (सभासदांकरिता विनामूल्य)

भारती मुद्रणालय, कोल्हापूर